# संतचरित्रमाला



म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १२…



ह. भ. प.
के. ल. रा. पांगारकर

REFBK-0016038

# संतचरित्रमाला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ४५८९९ वि. चरित्र
क्र. १३५४ १५/१/६७

कै र

REFBK-0016038
REFBK-0016038

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६०३८

विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणें

प्रकाशक
अ. ज. प्रभु
विदर्भ मराठवाडा बुक कंपनी
१३२० शुक्रवार : पुणें २

प्रथमावृत्ति १९२२
पुनर्मुद्रण १९६७

© विदर्भ मराठवाडा बुक कंपनी : पुणें

मूल्य रु. ५·५०

मुद्रक
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस (प्रा.) लि.,
३८३ नारायण पेठ : पुणें २

# दोन शब्द

१. श्रीविठ्ठलाच्या जयन्तिमहोत्सवाच्या मंगलदिनीं ही 'संतचरित्रमाला' मी परमाल्हादपूर्वक त्याच्याच गळयांत घालतो व अशीच सेवा गोड करून घेण्याविषयीं त्याच्या चरणीं प्रार्थना करितो. देवभक्तिचरित्रें तन्मयतेनें गाण्यांत आयुष्य वेचावें यापरता लाभ कोणता ? देव आणि संत हे अभिन्न तनु आहेत. संत हीं देवाचीं रूपें आहेत. देव ते संत व संत ते देव. देवस्वरूप अनिर्वचनीय आहे, व संत हे देवस्वरूप असल्यामुळें त्यांचेंही स्वरूप यथार्थपणें कोणासही वर्णितां येणार नाहीं. संतांच्या बाह्यरूपांत, राहणींत, बोलण्याचालण्यांत, स्वभावांत, परिस्थितींत भेद दिसेल, पण त्यांचें अंत:स्वरूप एकच आहे. ते अखंड परमात्मस्वरूपाकार असतात. कोणी गृहस्थाश्रमी वर्णाश्रमधर्म पाळून शिस्तीनें राहत असतील, कोणी फटिंगपणें वागतील; कोणी सौम्य व शांत दिसतील, कोणी उग्रता धारण करतील; कोणी जगाशीं फटकून वागतील, कोणी जग सुधारण्याचा अट्टाहास करतील; कोणी ज्ञाननिष्ठ, कोणी योगारूढ, कोणी भक्तिमार्गी, कोणी कर्मप्रवण याप्रमाणें संतांच्या बाह्यरंगांत विविधता असते, पण सर्व संत अंतर्यामीं भगवत्स्वरूपाकार असतात. संतचरित्रें हीं मुमुक्षुजीवांना तारक, मार्गदर्शक आहेत. संतमाउलीचा प्रेमपान्हा मिळाल्याशिवाय आजवर कोणीहि उद्धरला नाहीं. सर्व संत गुरुरूप आहेत असें मानून त्यांच्या अंतरंगाशीं मिळून जावें, व आपलें निजसुख आपण भोगावें. धर्म, पंथ, संप्रदाय, उपासनामार्ग, जातगोत, धनदौलत, रूपरंग, लिंग, वय, विद्या हा सारा बहिरंग आहे; संतपण याहून पलीकडे आहे. संतचरित्रांत तें धुंडावें; संतरूप आरशांत निजरूप पाहावें व सुखरूप व्हावें. संतसेवा ही भगवत्सेवा आहे. हा आत्मश्रेयाचा मार्ग आहे.

२. मुमुक्षूंत गेल्या १५ वर्षांत वेळोवेळीं अनेक संतांचीं चरित्रें येऊन गेलीं आहेत व कांहीं निवडून या ग्रंथांत घेतलीं आहेत व कांहीं नवीन स्वतंत्र लिहिलीं आहेत. ह्या ग्रंथांत एकंदर ४३ चरित्रें दिलीं आहेत. पहिलीं २१ चरित्रें व भोरचे दत्तंभट, अक्कलकोट स्वामी, माणिक प्रभु, रमावल्लभदास

व गोंदवलेकर महाराज हीं पांच मिळून २६ चरित्रें मी स्वत: लिहिलीं आहेत. पांच चार बिननांवी आहेत व बाकीचीं कांहीं माझ्या अधिकारी मित्रांनीं लिहिलीं आहेत. यांत न आलेलीं अशीं आणखी बरीच चरित्रें तयार आहेत, तीं श्रीविठ्ठलकृपेनें यथाकाल लोकांच्या दृष्टीस पडतील. पुढील चरित्रांच्या लेखकांचे मी मन:पूर्वक सप्रेम आभार मानतों.

२२ वेदांतकविशिरोमणि अक्खा = रा. भास्कर रामचंद्र भालेराव, ग्वाल्हेर.
२४ मौलवीसाहेब हमाल = रा. गणपतराव सराफ, नांदेड.
२५ राजकवि यशवंतराव पवार, ३० रामसनेही रामचरण = रा. काशिनाथ कृष्ण ऊर्फ बापूसाहेब लेले, धार.
२७ सिद्धारूढ स्वामी = ह. भ. प. वामनराव फणसळकर, सातारा.
२८ दाजीमहाराज टाकळीकर = रा. नरहरपंत काहळेकर, नांदेड.
३१ बलभीमबोवा साडेकर = श्री. रा. केशवराव खाजगीवालें, पुणें.
३७ चिदंबर दीक्षित = दिगंबरदास विठ्ठल कृष्ण कामत, माशेल, गोवा.
४१ रघुनाथभटजी नाशीककर, ४२ यशवंतराव देव मामलेदार, ४३ शुभराय महाराज = प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले, पुणें.

## स्वत: पाहिलेले सत्पुरुष

( शके १८४२ च्या वैशाखांत मी आपल्या ४० स्फुट काव्यांचा खंड ‘आनंदलहरी’ या नांवानें प्रसिद्ध केला आहे. त्यांत शेवटच्या ‘उपकृति-स्मरण’ नामक प्रकरणांत पुढील श्लोक आहेत. मी स्वत: पाहिलेल्या व कांहीं समागम झालेल्या सत्पुरुषांचीं नांवें त्यांत आलीं आहेत. १. यशवंतराव देव मामलेदार. २. सीताराम महाराज मंगळवेढेकर. ३. लक्ष्मणबोवा वाखरीकर. ४. नारायणमहाराज केडगांवकर. ५. पंढरीचा न्हावी भक्त. ६. गुलाबराव महाराज. ७. माहुलीचे श्रीब्रह्मेंद्रस्वामी. ८. एक गणेशभक्त. ९. माटुंग्याचे श्यामदास महाराज. १०. शीलनाथ महाराज. ११. सिद्धारूढ

स्वामी. १२. वासुदेवानंद सरस्वति. १३. काका पुराणिक व १४. भटजी बापू. यांपैकी ९ संतांचीं चरित्रें ह्या पुस्तकांत आलीं आहेत. )

संतीं कृष्णपदप्रपन्न सुजनीं जो बोध केला जनीं
तो सश्रद्धहि सन्मुखें परिसुनी आनंदलों मी मनीं ।
संतांचें यश गावयासि सजलों उत्तीर्ण व्हाया तया
आर्तत्राणपरायण प्रभु खरा त्याचीच सारी दया ।। ५१ ।।
जे जे जागविती दयाघन हरिप्रेमोर्मि यत्संगमीं
चित्तीं चिल्लहरी सदैव उठती जे सूर्य मायातमीं ।
भक्तिज्ञानसमन्वित प्रभु असे म्यां संत जे पाहिले
त्यांच्या दिव्य पदीं समागमसुखीं म्यां शीर्ष हें वाहिलें ।। ५२ ।।
वंदू **श्रीयशवंतदेव** सुकृती जेणें जनां तारिले
षष्ठाब्दीं स्वकरें जयें सकरुणें पेढे मला चारिले ।
पेढे ते न पसायदान दिधलें देवें स्वहस्तें मला
वंदूं प्रेमसमुद्र शांतिजलधी तो देव सत्त्वाथिला ।। ५३ ।।
मातें पंढरिवास चार वरुषें देवें दिला विठ्ठलें
भक्त्यानंद अपार तेथ लुटिला म्यां पूर्वपुण्यें बळें ।
तेथें देखिलि नग्न निर्मळ मियां आनंदमूर्ती भली
विद्याहंकृति पार लोपली पहा जाणीवही लाजली ।। ५४ ।।
**सीताराम**पदांसि घट्ट धरिलें प्रेमाश्रुंनीं नाहिलें
चित्तींचें गुज सांगुनी गुरुवरें तेणेंहि आश्वासिलें ।
'थंडी जाइल, रामराम वद रे, व्युत्पत्ति सारी दुरी'
ऐसें बोधुनियां प्रसन्नवदनें तो हस्त ठेवी शिरीं ।। ५५ ।।
म्यां **श्रीलक्ष्मण वाखरीकर बुवा** तेथेंचि हो ! पाहिले
ते मालेपरि सर्प हस्ति धरुनी कंठीं जयें वाहिलें ।
ज्यातें विस्मृतिचा निमेषहि गमे मोठ्या युगासारिखा
वर्षाकाळहि लोचनांत वसला तो **भक्त** व्हावी निका ।। ५६ ।।
**श्रीनारायण केडगांवकर** यच्चित्तीं नये डोल तो
मुद्रा शांत मुख प्रसन्न बघुनी श्रीदत्तही डोलतो ।

वृत्तिप्रेमळ मूर्ति सोज्ज्वल रत ध्यानाचिया साधनीं
लावी प्रेमभरें समस्त जनता श्रीदत्त-आराधनीं ।। ५७ ।।
कृष्णाची मुरली **गुलाब** बनली वेधी जना सुस्वर
धर्मप्रीति अपार कृष्णभजनीं ज्ञानीं दुजा भास्कर।
रामानंदपदारविंदकमलीं जो भृंगसा राहिला
ऐसा **सद्गुरुभक्त** माहुलिमध्यें सप्रेम म्यां पाहिला ।। ५८ ।।
म्यां **गाणेश** तपस्वि अद्भुत असा पालीकडे देखिला
माटुंग्यासहि **श्यामदास**वदनें गीतार्थ म्यां ऐकिला।
देवासांतहि **भोलनाथ** नमिला जो मान्य विद्वज्जनीं
**सिद्धारूढ** प्रसिद्ध सिद्ध हुबळीमध्येंहि शैवाग्रणी ।। ५९ ।।
वाडीमाजिहि **वासुदेवयति**ची श्रीदत्तभक्तिप्रथा
ऐकोनी नमिला यतींद्र विनयें संतारका यत्कथा।
'**काका** राव **पुराणिक** प्रभु' चरित्राचा भला आरसा
सेवी रामपदांबुजा अलि जसा अत्यादरें सारसा ।। ६० ।।
ते भागानगरींत **बापु भटजी** सद्भक्तचूडामणी
गंधर्वासम गान, नाथ दुसरे ज्ञानान्नसंतर्पणीं।
यांची संगति पंगतीहि घडली हें भाग्य भारी गणी
सर्वांचाहि सदैव मी मनिं असे सप्रेमभावें ऋणी ।। ६१ ।।
ग्रंथा वाचुनि जें कधीं न कळतें तें संतसंगें कळे
ग्रंथावांचुनि भाविका सकळही तें संतसंगें कळे।
संतांचा सहवास होय तरि बा! सद्ग्रंथ सारा कळे
सत्संगीं रमतां न जीव तरि त्या कांहीं कळे ना वळे ।। ६२ ।।

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. आद्य श्रीशंकराचार्य | ... | ९ |
| २. मोरया गोसावी | ... | ३२ |
| ३. राजा कुलशेखर | ... | ३९ |
| ४. दामाजीपंत | ... | ४३ |
| ५. सीतारामम्हाराज मंगळवेढेकर | ... | ५३ |
| ६. विठोबा आण्णा | ... | ५६ |
| ७. साधु रंगदास | ... | ५९ |
| ८. भटजी बापू | ... | ८० |
| ९. गुलाबराव महाराज | ... | ८६ |
| १०. जगदीशचंद्र बोस | ... | ९८ |
| ११. आण्णासाहेब पटवर्धन | ... | १०४ |
| १२. वासुदेवानंद सरस्वति | ... | १०६ |
| १३. विष्णुबुवा जोग | ... | १११ |
| १४. भक्त तिरुपन्नाल्वर | ... | ११३ |
| १५. नारायणमहाराज केडगांवकर | ... | ११५ |
| १६. संत सूरदास | ... | १२० |
| १७. सोहिरोबा आंबिये | ... | १२७ |
| १८. छोटू महाराज | ... | १३५ |
| १९. नारायणमहाराज जालवणकर | ... | १३६ |
| २०. सोनगीरचे महाराज | ... | १४२ |
| २१. कृष्णशास्त्री उप्पिनबेट्टिगिरी | ... | १४४ |
| २२. वेदांतकविशिरोमणि अक्खा | ... | १४६ |
| २३. गंगाधरशास्त्री तैलंग | ... | १५१ |
| २४. मौलवीसाहेब हमाल | ... | १५६ |
| २५. राजकवि यशवंतराव पवार | ... | १५८ |

२६. श्रीमत्सुब्रह्मण्यानंदतीर्थ (सुब्राव नाईक) ... १६२
२७. सिद्धारूढ स्वामी ... १६५
२८. दाजीमहाराज टाकळीकर ... १७४
२९. परमहंस तैलंगस्वामी ... १७८
३०. रामसनेही रामचरन ... १८२
३१. बलभीमबोवा साडेकर ... १९१
३२. यशवंतरावमहाराज जालनापूरकर ... १९८
३३. मोरचे दत्तंभट ... २०२
३४. अक्कलकोटचे स्वामी ... २०५
३५. माणिकप्रभू ... २१२
३६. रमावल्लभदास ... २२१
३७. चिदंबर दीक्षित ... २२६
३८. साध्वी सुंदराबाई ... २४३
३९. शीलनाथमहाराज ... २४६
४०. गोंदवलेकर महाराज ... २५६
४१. रघुनाथभटजी नाशिककर ... २६१
४२. देव मामलेदार ... २६६
४३. शुभराय महाराज सोलापूरकर ... २७५

हारपलें आपणपें पावें । तें संतांतें पाहतां गिंवसावें ।
म्हणोनि वानावें ऐकावें । तेंचि सदा ।।

(ज्ञानेश्वरी १८–४००)

# १. आद्य श्रीशंकराचार्य

१. अद्वैततत्त्वज्ञानाचा भूतलावर प्रकाश पाडणारे सूर्य, हिंदुधर्माचें अत्यंत बिकट प्रसंगीं संरक्षण करून धर्मसंस्थापना करणारे संतशिरोमणि व आचार्यमंडळाचे अध्यक्ष असे जे आद्य श्रीशंकराचार्य त्यांच्या जगदुद्धारक चरित्राचा या लेखांत विचार करावयाचा आहे. पाश्चात्य पंडितांना आचार्यांच्या अद्वैतसिद्धांतानें व त्यांच्या मोहक आणि निर्दोष विचारसरणीनें मोहून टाकलें आहे.

२. आचार्यांच्या चरित्राची ऐतिहासिकदृष्टया विश्वसनीय माहिती असावी तितकी उपलब्ध नाहीं. माधवाचार्य, आनंदगिरि, चिद्विलास, सदानंद यांचें शांकरविजय, स्कंदपुराणाच्या नवव्या अंशांतील एक अध्याय, माध्वपंडित नारायणाचार्य यांनीं लिहिलेले मध्वविजय व मणिमंजिरी हे ग्रंथ व विलसन, प्रो. मॅक्समुल्लर, तेलंग, कृष्णस्वामी अय्यर इत्यादिकांचे स्फुट लेख ही काय ती आचार्यांच्या चरित्राची सामग्री ! आचार्यांचे ग्रंथ स्वत:सिद्ध आहेतच.

३. ह्या सर्वांत श्रीमाधवाचार्य उर्फ विद्यारण्यस्वामी ह्यांच्या ग्रंथासच अग्रस्थान दिलें पाहिजे. हे विद्यारण्यस्वामी विजयानगरचे राजे हक्क आणि बुक्क यांचे मुख्य प्रेरक असून शृंगेरीमठाधिपति होते. आचार्यांच्या पश्चात् त्यांच्या पीठावर बसणाऱ्या सर्व पुरुषांत विद्यारण्यांच्या तोडीचा दुसरा एकही पुरुष झाला नाहीं. चारही वेदांच्या संहितांवर यांचीं भाष्यें आहेत. सर्व उपनिषदांवर यांच्या टीका आहेत. पराशरमाधवीय ह्या ग्रंथांत त्यांनीं सर्व स्मृतींचें सार आणलें आहे. षड्दर्शन–संग्रह, जीवन्मुक्ति–विवेक, पंचदशी,

व शांकरदिग्विजय हे सर्वमान्य ग्रंथ यांचेच आहेत. ह्यांपैकीं शांकर-दिग्विजय हा ग्रंथ आचार्यांच्या चरित्रावर जास्त प्रकाश पाडणारा असून अधिक विश्वसनीय आहे. नारायणाचार्य ह्यांच्या ग्रंथांत अर्थात् प्रतिकूल भागच अधिक आहे.

४. आचार्यांची जन्मभूमि कालटी नांवाचें एक लहानसें खेडें आहे तें होय. हें स्थान कोचीन–शोरनूर रेल्वेवर आलव्हाई नांवाचें एक स्टेशन आहे तेथून पूर्वेस सहा मैलांवर आहे. आनंद-गिरि हे आचार्यांच्या जन्मभूमीचें नांव चिदंबर असें देतात. त्रिचूरच्या आसपास असलेल्या नांबुद्री जातीच्या एका विद्वान् घराण्यांत आचा-र्यांच्या मातोश्रीचा जन्म झाला होता अशी मलबार प्रांतांत प्रसिद्धि आहे. तेथें त्या धन्य मातेची स्मशानभूमीही अजून दाखवितात. हिमालयांत बदरिकाश्रमीं श्रीनारायणाचें मंदिर असून व तें खुद्द आचार्यांनीं बांधलें असल्याबद्दलची प्रसिद्धि असून तेथील पुजारी-पणाचा मान कित्येक शतकांपासून एका नांबुद्री घराण्याकडे चालत आलेला आहे, यावरूनही वरील गोष्टीसच बळकटी येते. श्रीशंकरा-चार्यांचा जन्म मलबार प्रांतांत नांबुद्री ब्राह्मणघराण्यांत झाला असें म्हणावयास हरकत नाहीं.

५. राजशेखर नांवाच्या राजानें कालटी हा गांव एका पवित्र ब्राह्मणास अग्रहार दिला होता. दृष्टांत झाल्यावरून स्वयंभू शिव-लिंगासाठीं एक मंदिर बांधून त्यानें गांव अग्रहार दिला होता. त्या ब्राह्मणाच्या घराण्यांत विद्याधिराज नामक एक विद्वान् ब्राह्मण होऊन गेला. त्याला शिवगुरु नामक एकुलता एक मुलगा होता. शिवगुरूचा एका श्रेष्ठ घराण्यांतील सुशील कन्यकेशीं विवाह झाला व त्या विवाहाचें दिव्य फळ म्हणजे आद्य श्रीशंकराचार्य हें होय.

६. आचार्यांचा जन्मकाळ निश्चित करतां येत नाहीं. शृंगेरी-मठांत मूळ आचार्यांपासून आजपर्यंतच्या सर्व आचार्यांची यादी आहे, पण त्यांत दुसरे आचार्य जे सुरेश्वराचार्य त्यांना ७०० वर्षें दिलीं असल्यामुळें अर्वाचीन विद्वान् कालगणनेच्या बाबतींत तिला महत्त्व देत नाहींत. शके ७०८ म्ह० इ. स. ७८६ हा आचार्यांचा जन्मशक मानण्याकडे मॅक्समुल्लरप्रभृति विद्वानांचा कल आहे. तेलंगांनीं आचार्यांचा काळ सहाव्या शतकाचा उत्तरार्ध हा दिला आहे. सूत्रभाष्यांत मगध देशाचा बुद्धधर्मीय राजा पूर्णवामन याचा उल्लेख आला असून हा पूर्णवामन सहाव्या शतकाच्या अखेरीस मगध देशावर राज्य चालवीत असे. यावरून तेलंगांनीं हें अनुमान काढलें आहे. आचार्यांचा जन्मकाल वरील दोहोंपैकीं कोणता निश्चित समजावा हें सांगतां येणें कठिण आहे !

७. आचार्यांची अलौकिक बुद्धिमत्ता बाल्यापासूनच दिसत होती. मौंजीबंधनविधी सातव्या वर्षी झाल्यावर ते गुरुगृहीं वेदाभ्यासार्थ राहिले व असें सांगतात कीं, तीन चार वर्षांतच त्यांचें वेद व वेदांगें यांचें अध्ययन पूर्ण झालें ! यानंतर मुली सांगून येऊं लागल्या. आचार्यांच्या मातुश्रीनें त्यांचा विवाह उरकून घेण्याचा बराच आग्रह धरिला. पत्रिका व टिपणें ज्योतिषी पाहूं लागले. पण आचार्यांचें अवतारकृत्य वेगळेंच ठरलेलें होतें. त्यांनीं संन्यास घेण्याची इच्छा दर्शविली. मातुश्रीला फार वाईट वाटलें. आधींच वैधव्यदुःखानें होरपळलेली, त्यांत एकुलता एक लोकोत्तर-गुणी मुलगा संन्यास घेऊन निघून जाणार, मग एकटें राहण्याचा प्रसंग ! विचारपूस कोण करणार, मेल्यावर क्रियाकर्मांतर कसें होणार, वंशच्छेद होणार इत्यादि कल्पनांचें काहूर डोक्यांत उठून त्या प्रेमळ आईला अत्यंत दुःख झालें. मी संन्यास घेतला तरी

आपला पुत्रधर्म सोडणार नाहीं व तुला कधींही अंतर देणार नाहीं, असें आचार्यांनीं आपल्या आईस वचन देऊन तिच्या मनाचें समाधान केलें. त्यांचें उपजत वैराग्य तीव्रतम असल्यामुळें संन्यास घेण्याची त्यांना उत्कंठा लागून राहिली.

८. एके दिवशीं मायलेक दोघेंही स्नानास गेलीं होतीं, नदीला पूर आला होता, आचार्यांनीं पाण्यांत बुडी मारली तों त्यांस आढळून आलें कीं एका मगरीनें आपल्या पायास मिठी मारली आहे. त्यांनीं एकदम आईस आक्रोशपूर्वक सांगितलें, "आई आई ! मी मेलों ग मेलों, मगर माझा पाय ओढीत आहे. मला संन्यासी होऊन तरी सुखासमाधानानें मरूं दे. 'संन्यस्त हो' म्हणून म्हण, मग मी आनंदाने मरेन !" अशा संकटांत त्या भोळ्या आईनें त्याला सांगितलें "बाळा ! तूं संन्यासीच आहेस" हे आईच्या तोंडचे शब्द कानावर पडतात तों इकडे मगरानें आचार्यांचा पाय सोडला. 'पडत्या फळाची आज्ञा' घेऊन आचार्य घराबाहेर पडले. विश्वासू सज्जन आप्तांच्या स्वाधीन आपली चीजवस्त करून व मातोश्रीची परवानगी घेऊन संन्यासदीक्षा देण्यास योग्य अशा गुरूच्या शोधार्थ आचार्य निघाले.

९. आचार्य फिरत फिरत नर्मदातटाकीं आले. तेथें श्रीगोविंदपादाचार्य नामक अत्यंत थोर संन्यासी होते. त्यांच्या चरणीं निष्ठा धरून व सेवा करून आचार्य राहिले. गोविंदपादाचार्यांची आपणांस विशेष माहिती नाहीं. पण अद्वैतसिद्धांताची बैठक आचार्यांस त्यांजपासून मिळाली यांत शंका नाहीं. श्रीगोविंदभगवत्पाद व त्यांचे गुरु गौडपाद यांविषयीं आचार्यांनीं आपल्या ग्रंथांतून अनेकवार प्रेमोद्गार काढले आहेत. गोविंदपादांनीं शंकराचार्यांस संन्यासदीक्षा दिली. आचार्य नंतर श्रीक्षेत्र काशीस गेले. तेथें प्राप्त

झालेल्या ब्रह्मज्ञानाचा उपदेश करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. श्रीशंकराचार्य काशीस येऊन पोंचल्यावर लवकरच तेथील विद्वन्मंडळावर त्यांची विद्वत्ता, त्यांचें वादचातुर्य, त्यांची तेजस्विता व त्यांचा थोर अधिकार यांची छाप पडून त्यांच्याकडे अनेक तरुण विद्याभ्यासार्थ येऊं लागले व त्यांचा शिष्यसमूह फार वाढूं लागला. यांतच चोल प्रांतांतून (सांप्रतचें तंजावर) पद्मपाद नांवाचा एक विद्यार्थी आला होता. याची गुरुभक्ति अद्वितीय होती, व तो लवकरच गुरूंच्या पूर्णप्रेमास पात्र झाला. असें सांगतात कीं, आचार्यांची पद्मपादावर पूर्ण कृपा झालेली पाहून कित्येक अपक्व विचाराचे तरुण त्याचा हेवा करूं लागले. तेव्हां आचार्यांनीं एके दिवशीं त्याला गंगेवरून चालत जाण्यास सांगितलें असतां दृढ भक्तिबळानें तो जमिनीवरून चालावें त्याप्रमाणें गंगेवरून चालत पैलतीरावर गेला !

१०. आचार्यांनीं काशीक्षेत्रीं राहून ग्रंथरचनेस प्रारंभ केला. विष्णुसहस्रनामावरची टीका त्यांनीं प्रथम लिहिली असें म्हणतात. बरेच लहानमोठे ग्रंथ व अनेक देवतांवर स्तोत्रें लिहून झाल्यावर किंवा लिहितांलिहितां उपनिषदें, गीता व अखेर वेदांतसूत्रें यांवर त्यांनीं भाष्यें लिहून अद्वैतसिद्धांत प्रस्थापित केला. गीताभाष्यामध्यें त्यांचा संन्यासाकडे जास्त ओढा आहे हें प्रसिद्धच आहे. अर्वाचीन संतांपैकीं कोणी गृहस्थाश्रमी आहेत व कोणी ब्रह्मचारी आहेत तरी सर्वांचा उपदेश एकच आहे व तो हा कीं "ज्या आश्रमांत, जातींत, परिस्थितींत आहांत तेथल्या तेथें राहून सर्व कर्में भगवंताला अर्पण करून श्रीहरीचे सेवक व्हा म्हणजे हरिकृपापात्र होऊन मुक्त व्हाल." संन्यासदीक्षा घेऊन संन्यासधर्म यथायोग्य आचरून संन्यासधर्माचा जयजयकार जगभर आचार्यांसारखा

कोणींही केला नाहीं. आचार्यांचा संन्यास, समर्थांचें ब्रह्मचर्य व एकनाथांचा गृहस्थाश्रम हे इतके अलौकिक आहेत कीं, त्यावरून कोणत्याही आश्रमांतील ज्ञानी भक्ताला परब्रह्मप्राप्ति होते असा सिद्धांत काढायला कोणतीच हरकत नाहीं. असले अवतारी पुरुष आपापल्या आश्रमाचे विशेष अलंकार होत. आचार्यांनीं नाना मतमतांतरें मोडलीं, मोठमोठे पंडित वादांत जिंकून अद्वैतसिद्धांताची महती भूतलावर प्रस्थापित केली, वेदविरुद्ध बंडें मोडून वेदधर्मीयांतल्या उपासनाभेदांचें ऐक्य करण्यासाठीं पंचायतनपूजा प्रचारांत आणली, वेदधर्माचा माथा जगांत उजळ केला, हें प्रचंड कार्य अवघ्या ३२ वर्षांत करून अष्टदिशांस अष्टधाम स्थापले व मग ते नारायणरूप झाले–एवढी थोर कामगिरी कोणाही धर्मसंस्थापकानें केलेली नाही.

११. आचार्य एकदां गंगेवर स्नानास चालले असतां त्यांनीं व्याकरणशास्त्रावर 'चक्कू ताड्या' करणारा एक विद्यार्थी पाहिला. तेव्हां त्याला उद्देशून "**भज गोविंदं** भज गोविंदं मूढमते । प्राप्ते सन्निहिते मरणे नहि नहि रक्षति डुकृञ् करणे" असा उपदेश केला. हें स्तोत्र **चर्पटपंजरिकास्तोत्र** म्हणून प्रसिद्ध आहे. आचार्यांची वाणी किती शुद्ध, सरस, सुलभ व प्रासादिक आहे हें त्यांच्या असल्या स्फुट प्रकरणांवरून व स्तोत्रांवरूनही लक्षांत येण्यासारखें आहे. नश्वर संसाराच्या पाठीस सारे लोक लागले असून 'परे ब्रह्मणि कोऽपि न लग्नः' हें त्यांनीं पाहिलें तेव्हां जीवांची त्यांना करुणा आली, व ह्या अद्वैतकेसरीनें 'भज गोविंदं भज गोविंदं' असाच सगुणोपासनेचा बोध जडजीवांस केला. थोरांनींही 'करतलभिक्षा तरुतलवासः' ठेवला तरी आशापाश सुटत नाहीं; रात्र, दिवस, पक्ष, मास, अयन, वर्ष अशीं एकामागून एक चाललीं आहेत, तरी

आशामर्ष हटत नाहीं; म्हणून तूं ' भज गोविंदं. ' तो गोविंद दयाळु व समर्थ आहे, तो तुला सर्व पाशांतून मुक्त करील. ' मामेकं शरणं व्रज ' असा त्याचा जाब झाला आहे. ' कस्त्वं कोऽहं कुत आयातः ' असा विचार करून मोकळा हो. पंजरिकास्तोत्रांत आचार्य साधकांना थोडक्यांत सांगतातः–

गेयं गीतानामसहस्रं ध्येयं श्रीपतिरूपमजस्रम् ।
नेयं सज्जनसंगे चित्तं देयं दीनजनाय च वित्तम् ॥ १३ ॥

गीता आणि विष्णुसहस्रनामाचा पाठ ठेव, श्रीपतीच्या रूपाचें अखंड ध्यान कर, संतसंगाची आवड धरून संतसंग धर व गरजूंच्या उपयोगी पडत जा–असा आचार्यांचा तुम्हां आम्हां सर्वांना बोध आहे. अद्वैतसिद्धांत पचायला फार कठिण आहे. त्याला अधिकारी मोठाच पाहिजे. सर्वसाधारण जीवांना आचार्यांनीं सगुणोपासनाच सांगितली आहे. हा अधिकारही कांहीं सामान्य नाहीं. गीता, भागवत मनपूर्वक वाचावेत व ऐकावेत, विष्णुसहस्रनामाचा प्रत्यहीं पाठ ठेवावा, हरिप्रिय संतांचा संग धरावा, हरीचें रूप चित्तांत व नाम मुखांत ठेवून सर्वथा हरीचें होऊन जावें हा भागवतधर्म आहे व त्याचाच उपदेश आचार्यांनीं वरीलसारख्या स्तोत्रांतून केला आहे. ह्यावरून ज्ञानेश्वरादि अर्वाचीन संत आचार्यांच्याच मार्गानें कसे गेले आहेत हें समजून येईल.

१२. एकदां आचार्य मध्यान्हस्नानाला गंगेवर जात असतांना अंत्यवेषधर म्ह० चांडालाचा वेष धरून साक्षात् शंकर त्यांना आडवे आले ! ' गच्छ गच्छ ' म्ह० ' दूर हो, दूर हो ' असें आचार्य म्हणाले, तेव्हां ' अन्नमयादन्नमयमथवा चैतन्यमेव चैतन्यात् ' म्ह० देहाचा देहाला विटाळ होतो का चैतन्याचा चैतन्याला होतो असा शंकरांनीं प्रश्न केला. त्यावर आचार्यांनीं ' **मनीषापंचक** ' केलें आहे.

अवस्थात्रयाची साक्षिणी व सर्व देहांत नांदणारी आत्मकला मी आहें असा ज्याचा अनुभव आहे तो चांडाल असो वा द्विज असो, तो गुरु आहे असें मी मानतों असें आचार्यांनीं उत्तर केलें ! संविन्मय-पावकांत ज्यानें आपलें दुष्कृत जाळलें, प्रारब्धाच्या हातीं काया दिली, सर्व नाशवंत आहे असा गुरुवाक्यानें निश्चय केला व शांतात्मा, निर्वृतमानस, मुनी असा जो कोणी ब्रह्मचिंतनांत निरंतर रंगून गेला असेल त्याची जातगोत न पाहतां तो गुरूच असें मी मानतों हें आचार्यांचें उत्तर ऐकून शंकरांनीं आपलें स्वरूप प्रकट केलें ! आणि खरोखरीच चोखामेळा, सजनकसाई, पिंगला वेश्या, रोहिदास चांभार इत्यादि भगवद्भक्तांच्या जातगोताचा विचार आपण कोठें करितों ? वर्णाश्रमव्यवहार हा आपणांसाठीं शास्त्र-कारांनीं सांगितला आहे. ‘ जाति तंवचि वेगळालिया जंव न पवती मातें ’ असें ज्ञानोबारायांनींही म्हटलें आहे. ओहोळ गंगेला मिळा-ल्यावर गंगारूपच होतात. हें खैराचें लांकूड व हें चंदनाचें लांकूड हा भेद तें अग्नींत घालण्यापूर्वींचा आहे. असो. आचार्यांचें मनीषा-पंचक मननपूर्वक पाहावें म्हणजे भिन्नभिन्न वर्णाश्रमजातींचा अद्वैत-ब्रह्मस्वरूपाशीं आचार्यांनीं कसा समन्वय घातला आहे हें समजून येईल. सर्व साधुसंतांनीं आचार्यांप्रमाणेंच जातींचा प्रश्न सोडविला आहे.

नाहं जातो जन्ममृत्यू कुतो मे । नाहं प्राणः क्षुत्पिपासे कुतो मे ।
नाहं चित्तः शोकमोहौ कुतो मे । नाहं कर्ता बंधमोक्षौ कुतो मे ।।६।।

असो. आचार्यांनीं **आत्मपंचकांत** म्हटल्याप्रमाणें ज्यांचा अनुभव आहे,

संपूर्णं जगदेव नंदनवनं सर्वेऽपि कल्पद्रुमाः
गांगं वारि समस्तवारिनिवहः पुण्याः समस्ताः क्रियाः ।

वाचः प्राकृतसंस्कृताः श्रुतिशिरो वाराणसी मेदिनी
सर्वावस्थितिरस्य वस्तुविषया दृष्टे परब्रह्मणि ॥ १० ॥

असें त्यांनीं **धन्याष्टकांत** म्हटल्याप्रमाणें जो अद्वैतसिद्धांतावर आरूढ होऊन बसला आहे किंवा :—

नाहं मनुष्यो न च देवयक्षौ । न ब्राह्मणक्षत्रियवैश्यशूद्राः ।
न ब्रह्मचारी न गृही वनस्थो । भिक्षुर्नचाहं निजबोधरूपः २

असें त्यांनीं **हस्तामलकाच्या** तोंडून वदविल्याप्रमाणें जो निजबोधरूप म्ह० केवलशिवरूप होऊन गेला आहे त्याला व्यवहाराचीं बंधनें कोण लावू शकेल ? पण जो या पूर्णाच्या पायरीस पोंचला नाहीं तो जर अनर्गळपणानें 'मी ब्रह्म' असें नुसतें तोंडानें म्हणून श्रुतिशास्त्राच्या आज्ञा झुगारील तर तो चांडाळ असो वा द्विज असो तो भ्रष्ट कोटींतलाच गणला पाहिजे ! हस्तामलकासारख्या अधिकारी शिष्याला आचार्यांनीं जो बोध केला आहे तो अनधिकारी जीवांना किंवा खालच्या पायरीच्या लोकांना न करतां 'वेदो नित्यमधीयतां तदुदितं कर्म स्वनुष्ठीयताम्' असाच उपदेश त्यांनीं केला आहे. वर्णाश्रमधर्म किंवा सगुणोपासना यांना यत्किंचित् धक्का न लावतां किंबहुना यांना अधिक नेटानें रूढ करून आचार्यांनीं अद्वैतसिद्धांताची प्रतिष्ठापना केली ही तर त्यांच्या अवताराची मुख्य कामगिरी आहे. अद्वैतसिद्धांत नखशिखांत बाणवून घेऊनही वर्णाश्रमधर्म व जातिधर्म पाळतां येतात व सगुण भक्तिसुख घोटतां येतें हें न कळल्यामुळें कांहीं लोक भलभलतेच वाद जगांत माजवीत आले आहेत. पण एवढें खरें कीं, आचार्य जे सिद्धांत काशीक्षेत्रीं शिष्यमंडळीस शिकवीत त्यांचाच सर्वत्र फैलाव होऊन गेल्या हजार वर्षांतील बहुतेक सर्व साधुसंत त्यांच्याच अनुरोधानें चालले आहेत.

संगः सत्सु विधीयतां भगवतो भक्तिर्दृढा धीयताम्
शांत्यादिः परिचीयतां दृढतरं कर्माशु संत्यज्यताम् ।
सद्विद्वानुपसर्प्यतां प्रतिदिनं तत्पादुके सेव्यताम्
ब्रह्मैकाक्षरमर्थ्यतां श्रुतिशिरोवाक्यं समाकर्ण्यताम् ॥ २ ॥

हा आचार्यांनीं **साधनपंचकांत** सांगितलेला मार्गच सर्व साधु-संतांनीं सांगितला आहे, म्हणून अर्वाचीन काळच्या सर्व हिंदी संतांचे पुरस्कर्ते व आद्य संतशिरोमणि श्रीशंकराचार्य हेच होत.

१३. आचार्यांचीं लहान लहान स्तोत्रें व प्रकरणेंसुद्धां अत्यंत मनोहर आहेत. हीं बहुतेक त्यांनीं बाराव्या वर्षी रचलेलीं असावीं असें म्हणतात. त्यांची भाषा किती सरळ, प्रासादिक, स्पष्टार्थदा, ललितमनोहर व श्रवणसुखदात्री आहे हें साऱ्या जगास विदित आहे. आचार्य जसे धर्माचार्य आहेत तसेच ते गीर्वाणभाषेचेही आचार्य आहेत. संस्कृत भाषा त्यांच्यापुढें जशी नाचत असते ! संस्कृत भाषेंतील लक्षावधि ग्रंथांत आचार्यांच्या भाषेसारखी सर्वांग-मनोरम भाषा कोठेंच सांपडत नाहीं. आचार्य नर्मदातीरीं आपले गुरु गोविंदभगवत्पाद यांच्या समागमांत दोन वर्षें राहिले होते. तेथेंच यतिपंचक, मनीषापंचक, वाक्यवृत्ति, साधनपंचक, दशश्लोकी, आत्मानात्मविवेक, विवेकचूडामणि, वाक्यग्रंथ, पंचीकरण, बाल-बोधिनी इत्यादि अनेक प्रकरणें आचार्यांनीं बाराव्या वर्षाच्या आंत-बाहेर रचिलीं ! असली अद्‌भुत ज्याची बाललीला त्याला अव-तारी महापुरुष असें लोकांनीं कां मानू नये ? त्यांच्या भेटीची आकांक्षा धरून साक्षात् श्रीशंकरांनीं व श्रीव्यासांनीं प्रगट होऊन त्यांचा गौरव कां करूं नये ? व ह्या विसाव्या शतकांतील प्रो. मॅक्समुल्लर, प्रो. ड्यूसेन इत्यादि परधर्मीय व परदेशीय पंडितांनीं-सुद्धां आचार्यांच्या विचारसरणीनें, युक्तिवादानें व बुद्धिकौशल्यानें

कां चकित होऊन जाऊं नये बरें ? त्यांचें शारीरभाष्य हा ज्ञानाचा कळस आहे, त्यापुढें जगांतील सर्व ज्ञात्यांनीं आपलीं शिरें नमविलीं आहेत.

**नर्मदाष्टकांत आचार्य म्हणतात** --

सबिंदुसिंधुसुस्खलत्तरंगभंगरंजितं
द्विषत्सु पापजातजातकारिवारिसंयुतम् ।
कृतांतदूतकालभूतभीतिहारि वर्मदे
त्वदीय पादपंकजं नमामि देवि नर्मदे ।।

नर्मदाष्टकाचे आठ श्लोक असून **प्रातःस्मरण** नामक प्रकरणांत **तीनच** श्लोक आहेत. त्यांपैकीं पुढील श्लोक पाहा:--

प्रातः स्मरामि हृदि संस्फुरदात्मतत्त्वं
सच्चित्सुखं परमहंसगतिं तुरीयम् ।
यत्स्वप्नजागरसुषुप्तमवैति नित्यं
तत् ब्रह्म निष्कलमहं न च भूतसंघः ।। १ ।।

**यतिपंचक** ऊर्फ कौपीनपंचक संन्यासधर्म शिकविणारें आहे. त्यांतील पुढील श्लोक प्रसिद्धच आहेः—

वेदांतवाक्येषु सदा रमन्तो । भिक्षान्नमात्रेण च तुष्टिमन्तः ।
विशोकमन्तःकरणे रमन्तः । कौपीनवंतः खलु भाग्यवंतः ।। १ ।।

**वाक्यवृत्ति** प्रकरणांत ५३ श्लोक असून गुरुशिष्यसंवादरूपानें अद्वैतसिद्धांताचें त्यांत सुंदर प्रतिपादन केलें आहे. वाक्यवृत्तीलाच स्वात्मप्रकाशिका असें कोठें कोठें म्हटलें असून तीवर वाक्यवृत्तिप्रकाशिका नांवाची एक संस्कृतटीका असून मराठींत हंसराज स्वामींची सुंदर ओंवीबद्ध टीकाही विद्वन्मान्य आहे.

तापत्रयार्कसंतप्तः कश्चिदुद्विग्नमानसः ।
शमादिसाधनैर्युक्तः सद्गुरुं परिपृच्छति ।।

असा ह्या ग्रंथाचा प्रारंभ आहे.

**विवेकचूडामणि** ह्या लोकप्रिय ग्रंथाची श्लोकसंख्या ५८२ आहे. पहिल्या श्लोकांतच त्यांनीं आपल्या गुरूला पुढीलप्रमाणें वंदन केलें आहे:—

सर्ववेदांतसिद्धांतगोचरं तमगोचरम् ।
गोविंदं परमानंदं सद्गुरुं प्रणतोऽस्म्यहम् ।।

ह्या विवेकचूडामणिग्रंथांत कित्येक श्लोक सुभाषितरूप असून त्यांत शम, दम, तितिक्षा, श्रद्धा, मुमुक्षुता, भक्ति, बंध, मोक्ष, मोह, चित्तचतुष्टय, देहचतुष्टय, प्राण, अवस्थात्रय, मन, त्रिगुण, कोश, इत्यादिकांच्या उत्कृष्ट व्याख्या केलेल्या आहेत. वेदांताचा अभ्यास करणारे लोक हा ग्रंथ प्रथम मुखोद्गत करतात. वेदांताची परिभाषा व त्यांत वारंवार येणाऱ्या शब्दांचीं लक्षणें बरोबर समजून घेण्यासाठीं मुमुक्षु हा ग्रंथ आधीं आपलासा करितात. मासल्याकरितां चार दोन श्लोक देतों :—

अहंकारादि देहांतान्बंधानज्ञानकल्पितान् ।
स्वस्वरूपावबोधेन मोक्तुरिच्छा **मुमुक्षुता** ।।
मोक्षकारणसामग्र्यां भक्तिरेव गरीयसी ।
स्वस्वरूपानुसंधानं **भक्ति**रित्यभिधीयते ।।
**मोहं** जहि महामृत्युं देहदारसुतादिषु ।
यं जित्वा मुनयो यांति तद्विष्णोः परमं पदम् ।।
तदात्मानात्मनोः सम्यग्विवेकेनैव सिद्ध्यति ।
ततो **विवेकः** कर्तव्यः प्रत्यगात्मसदात्मनोः ।।

**दशश्लोकी** हीच निर्वाणदशक किंवा सिद्धांतबिंदु ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्यावर मधुसूदन सरस्वतींची टीका असून त्या टीकेचें पुन्हां ब्रह्मानंदस्वामींनीं न्यायरत्नावली नांवानें स्पष्टीकरण केलें

आहे. ह्या दशश्लोकींत व्यतिरेकरूप अनात्मवर्गाचा त्याग नासर्व केला असून 'शिवः केवलोऽहं' हा सिद्धांत स्थापित केला आहे :—

न भूमिर्न तोयं न तेजो न वायु–र्न खं नेंद्रियं वा न तेषां समूहः ।
अनैकान्तिकत्वात्सुषुप्त्येकसिद्ध–स्तदेकोऽवशिष्टः शिवः केवलोहम् ॥

**आत्मानात्मविवेक** हा गद्यग्रंथ असून ह्यांत संवादरूपानें प्रकृति-पुरुषविवेक सांगितला आहे. "आत्मानात्मविवेकः कथ्यते । आत्मनः किं निमित्तं दुःखम् ! शरीरपरिग्रहनिमित्तं दुःखम् । आत्मनाऽसह वै शरीरस्य सतः प्रियाप्रिययोपहतीति श्रुतेः ॥"

**मायाविवरण** प्रकरणांत मायावादाचें स्पष्टीकरण केलें आहे. हाही गद्यग्रंथच आहे. ह्यांत पांच वर्णनें किंवा भाग आहेत. (१) अध्यारोपापवाद, (२) अनुबंधचतुष्टय, (३) प्रपंचविमर्षण, (४) दुःखविचार, (५) कर्तृत्वकारयितृत्वविमर्षण. चित्सुखाचार्य म्हणतात कीं हा ग्रंथ आचार्यांनीं मात्राज्ञेनें संन्यास घेण्यापूर्वी आपल्या जन्मभूमीस म्ह० कालटीस असतांनाच लिहिला होता. याला त्यांनीं 'वेदांतपंचप्रकरणी' असें नांव दिलें आहे. ह्याचें मंगलाचरण आचार्य करितातः—

बालानामुपकाराय ममापि ज्ञानसिद्धये ।
तत्र श्रीबालगोपालकृष्णः सन्निहितो भवेत् ॥

ह्या ग्रंथाचा प्रारंभ असा केला आहे :—

"इह खलु धर्मार्थकाममोक्षाणां चतुर्विधपुरुषार्थानां मध्ये मोक्ष एक परमपुरुषार्थः । नित्यवात् । नच पुनरावर्तत इति श्रुतेः ॥"

**पंचीकरण** हें प्रकरणसुद्धां गद्यात्मक आहे. याचा प्रारंभ असा आहे :—"अथातः परमहंसपरिव्राजकानां समासविधिं व्याख्यास्यामः सच्छब्दवाच्यमविद्याशबलं ब्रह्म । ब्रह्मणो अव्यक्तम् । अव्यक्ता-

न्महत् । महतोऽहंकारः । अहंकारात् पंचतन्मात्राणि । पंचतन्मात्रेभ्यः पंचमहाभूतानि । पंचमहाभूतेभ्योऽखिलं जगत् ॥ ”

ह्याच्या शेवटीं पुढील लोकप्रसिद्ध सुंदर श्लोक आहेः—

ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः ॥
इति यस्य दृढा बुद्धिः स मुक्तो नात्र संशयः ॥

१४. **गुर्वष्टक** म्हणून आचार्यांचें एक आठ श्लोकांचें स्तोत्र प्रसिद्ध आहे, त्यांतील पहिला श्लोक असा आहेः—

शरीरं सुरूपं तथा वा कलत्रं यशश्चारु चित्रं धनं मेरुतुल्यम् ।
मनश्चेन्न लग्नं हरेरंघ्रिपद्मे ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ॥

गुरुचरणकमलाच्या ठिकाणीं चित्तवृत्ति जडून राहिली नाहीं तर बाकीची सर्व अनुकूलता फुकट आहे. कलत्र, धन, पुत्रपौत्रादि, गृह, बांधव या सर्वांची अनुकूलता आहे; शास्त्राध्ययन झालें आहे; वेदविद्या मुखांत आहे; गद्यपद्यरचना सुलभ झाली आहे; स्वदेशांत धन्यता व विदेशांत मान्यता मिळाली आहे; भूपभूपालवृंद पायापाशीं लोळत आहे; रत्नें व मोतीं विपुल आहेत; कामिनी अनुकूल आहे, पण ‘ गुरोरंघ्रिपद्मे मनश्चेन्न लग्नं ततः किं ततः किं ततः किं ततः किम् ? ’ बरें, गुरुचरणीं मन संलग्न झालें तर काय होईल ? ‘ लभेद्वांछितार्थं पदं ब्रह्मसंज्ञं ! गुरोरुक्तवाक्ये मनो यस्य लग्नम्. ’ गुरुपरंपरेचा मार्ग अगदीं अलीकडचा आहे असें म्हणणारांनीं हें आचार्यांचें स्वानुभवाचें सांगणें लक्ष्यांत ठेवणें जरूर आहे. आचार्यांनाही गोविंदभगवत्पादांची सेवा करावी लागली. प्रत्यक्ष रामकृष्णांनींही गुरुकृपा संपादन केली होती. ज्ञानेश्वरांचे गुरु निवृत्तिनाथ, एकनाथांचे जनार्दनस्वामी, तुकोबारायांचे बाबाजीचैतन्य व अगदीं अलीकडे विवेकानंदांचे गुरु रामकृष्ण परमहंस, आणि रामतीर्थांचे भगत धन्नाराम हे प्रसिद्ध आहेत. तेव्हां ‘ शाब्दे-

परेच निष्णातं ' असा ब्रह्मानुभवी गुरु प्रसन्न झाल्यावांचून केवळ प्रज्ञाबलानें वेदशास्त्राध्ययन करूनही ब्रह्मपदप्राप्ती होणार नाहीं. अलीकडे ढोंगी, पोटभरू व ' गुरु ' म्हणविणारे कच्चे स्वार्थी लोक फार बोकाळले आहेत हें खरें व म्हणून पारमार्थिकांनीं भलत्याला गुरुत्व देऊं नये हेंही खरें; पण योग्य गुरु भेटल्यावांचून व त्याचा प्रसाद जोडल्यावांचून परमार्थसिद्धि होणार नाहीं हें अत्यंत खरें आहे. स्वामी विवेकानंदांनीं भक्तियोगांत ' गुरूची अवश्यकता ' ह्यासंबंधानें म्हटलें आहे:—

" When help from outside (from Guru) comes, the higher powers and possibilities of the soul are quickend, spiritual life is awakened, and man becomes holy and perfect in the end. This quickening impulse cannot be derived from books. The soul can only receive impulses from another soul, and from nothing else. We may study books all our lives, we may become very intellectual, but in the end we find that we have not developed at all spiritually. In studying books we are sometimes deluded into thinking that thereby we are being spiritually helped; but if we analyse the effect of books on us, we find that only our intellect derives profit from such books and not our inner spirit. To quicken the spirit the impulse must come from another soul.

विवेकानंदांच्या ह्या उक्तीचा भावार्थ समर्थांच्या वाणीनेंच सांगतों. " करूनि नाना सायास । केला चौदा विद्यांचा अभ्यास । रिद्धी सिद्धी सावकाश । वोळल्या जरी ॥ ३३ ॥ तरी सद्गुरुकृपेंविरहित । सर्वथा न घडे स्वहित । यमपुरीचा अनर्थ । चुकेना येणे ॥ ३४ ॥ " (दासबोध ५–१) ' सद्गुरूवीण ज्ञान कांहीं । सर्वथा

होणार नाहीं,' 'सद्गुरूवीण मोक्ष पावावा। हें कल्पांतीं न घडे–' असा समर्थांचाही सिद्धांत आहे.

**दक्षिणामूर्तिस्तोत्रः**––ह्यांत १५ श्लोक आहेत. ही वाणी कोणा शिष्याची किंवा मागूनच्या कोणा आचार्यांची नसेलना, अशी शंका मनांत येते. यांतील पुढचा श्लोक सुप्रसिद्ध आहे.

चित्रं वटतरोर्मूले वृद्धाः शिष्या गुरुर्युवा।
गुरोस्तु मौनं व्याख्यानं शिष्यास्तु छिन्नसंशयाः॥

ह्या श्लोकांत स्वतः आचार्यांच्याच चरित्राचा प्रसंग दिसतो.

**षट्पदीः**––ह्या षट्पदींत नारायणाची स्तुति असून ही फारच गोड आहे.

अविनयमपनय विष्णो दमय मनः शमय विषयमृगतृष्णां।
भूतदयां विस्तारय तारय संसारसागरतः॥ १॥
सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम्।
सामुद्रो हि तरंगः क्वच न समुद्रो न तारंगः॥ ३॥
मत्स्यादिभिरवतारैरवतारवताऽवता सदा वसुधां।
परमेश्वर! परिपाल्यो भवता भवतापभीतोऽहम्॥ ५॥
दामोदर गुणमंदिर सुंदरवदनारविंद गोविंद।
भवजलधिमथनमंदर परमं दरमपनय त्वं मे॥ ६॥

किती सुधातुल्य गोड वाणी, केवढें प्रेम, व किती उदात्त मागणी ही! भाषा सुलभ व विचार उदात्त असून ललित शब्दरचनाही किती मोहक आहे! 'सत्यपि भेदापगमे नाथ! तवाहं न नामकीनस्त्वं' म्ह० सर्वत्र अद्वैतभाव उदित झाल्यामुळें जीवशिवभेद राहिला नाहीं, तथापि 'नाथ तवाहं' ही द्वैत उभारून भक्तिसुख भोगण्याची आवड राहिलीच आहे. आमचे सर्व महाराष्ट्र संत पुरे अद्वैती असून निस्सीम भक्त आहेत; त्याच अद्वैतभक्तीचा ऊर्फ

अभेदभक्तीचा हा पूर्व मार्ग आचार्यांच्या सदर श्लोकांत दिसतो. "सर्वात्मकपण । माझें हिरोनि नेतो कोण ॥ १ ॥ मज भक्तीची आवडी । देवा व्हावी हेची जोडी ॥ २ ॥" ही तुकोबारायांची उक्ति व 'सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं' ही आचार्यांची उक्ति अगदीं एकार्थीच आहेत. आचार्यांचीं मधुर स्तोत्रें पाहून ते अद्वैतसिद्धांत-केसरी म्हणून जगांत गाजले असले तरी त्यांना भक्तराजकोटींतच घालावेंसें मला वाटतें.

**देव्यपराधक्षमापनस्तोत्र**:—हें स्तोत्रही मोठें प्रेमळ आहे. आचार्यांची मातृभक्ति प्रसिद्धच आहे. त्या मातृभक्तीच्या अंतर्गतरसानें हें स्तोत्र फार गोड झालें आहे. 'कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति' व 'अपराधपरंपरावृतं न हि माता समुपेक्षते सुतम्' हे दोन सुंदर अर्थांतरन्यास ह्याच स्तोत्रांतले आहेत.

जगन्मातर्मातस्तव चरणसेवा न रचिता
न वा दत्तं देवि द्रविणमपि भूयस्तव मया ।
तथापि त्वं स्नेहं मयि निरुपमं यत्प्रकुरुषे
कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति ॥ ४ ॥

ह्या श्लोकांत आचार्य आपल्या जन्मदात्रीचीच प्रार्थना प्रेमळ वाणीनें करीत आहेत असें वाटतें ! अगदीं शैशवास्थेंत ते मातेची आज्ञा घेऊन घराबाहेर पडले व त्यामुळें तिची चरणसेवा मला पोटभर घडली नाहीं व चार लौकिक मुलांप्रमाणें पैसे मिळवून आणून ते आईच्या स्वाधीन केले नाहींत; तथापि मातेचा निरुपम स्नेह मजवर आहे असाही भाव आचार्यांच्या मनांत हे देविस्तोत्र रचतांना असेल काय ? 'मातृदेवो भव' हें श्रुतिवाक्य आचार्यांनीं अक्षरशः पाळलें आहे.

आपत्सु मग्नः स्मरणं त्वदीयं करोमि दुर्गे करुणार्णवेशि ! ।
नैतच्छठत्वं मम भावयेथाः क्षुधातृषार्ता जननीं स्मरन्ति ॥ १० ॥

आपणां सर्वांस बहुधा संकटकाळीं देवाचें स्मरण होतें, पण आचार्य म्हणतात कीं हें आमचें शठत्व आहे असें समजूं नये; 'क्षुधातृषार्ता जननीं स्मरंति' तहानभूक लागली म्हणजेच मुलांना आईचें विशेष स्मरण होत नाहीं काय ? मुलें एरवीं आपल्या स्वभावधर्माप्रमाणें खेळण्यांत नेहमीं गुंग असतात. हा जसा मुलांचा स्वभाव तसाच प्रपंचांतल्या खेळण्यांशीं खेळण्यांत रमणाऱ्या आम्हां जीवांचा स्वभाव ! 'मत्समः पातकी नास्ति पापघ्नी त्वत्समा न हि,' ह्या श्लोकांत स्तोत्राची समाप्ति केली आहे.

**शिवापराधक्षमापनस्तोत्र** :–वरील स्तोत्रांत महादेवीची–शिवेची–जशी प्रार्थना केली आहे, तशी ह्या चौदा श्लोकांच्या स्तोत्रांत महादेवाची, शिवाची, प्रार्थना केली आहे. 'क्षंतव्योमेऽपराधः शिव शिव शिव भो श्रीमहादेव शंभो' हा सर्वत्र चतुर्थ चरण आहे. शेवटचे तीन श्लोक 'किंवानेन धनेन वाजिकरिभिः' 'आयुर्नश्यति पश्यतां प्रतिदिनं' व 'करचरणकृतं' हे प्रसिद्धच आहेत.

**हरिमीडेस्तोत्र** :–ह्यांत ४३ सुंदर श्लोक असून चतुर्थ चरण 'तं संसारध्वांतविनाशं हरिमीडे' असा आहे. ह्यावर स्वयंप्रकाश-यति यांनीं 'हरितत्वमुक्तावलि' नामक टीका केली आहे.

स्तोष्ये भक्त्या विष्णुमनादिं जगदादिं
यस्मिन्नेतत्संसृतिचक्रं भ्रमतीत्थं ।
यस्मिन् दृष्टे नश्यति तत्संसृतिचक्रं
तं संसारध्वांतविनाशं हरिमीडे ॥ १ ॥

**शतश्लोकी** :–ह्या ग्रंथाची भाषा मोठी प्रौढ असून वेदान्त विषयाची मांडणी अप्रतिम झाली आहे. हीं वेदान्तावरचीं शंभर

सुभाषितें आहेत म्हटलें तरी चालेल. ह्यांतले चारदोन श्लोक आपण पाहूं.

दृष्टान्तो नैव दृष्टस्त्रिभुवनजठरे सद्गुरोर्ज्ञानदातुः
स्पर्शश्चेत्तत्र कल्प्यः स नयति यदहो स्वर्णतामश्मसारम् ।
न स्पर्शत्वं तथापि श्रितचरणयुगे सदगुरुः स्वीयशिष्ये ।
स्वीयं साम्यं विधत्ते भवति निरुपमस्तेन वाऽलौकिकोऽपि ॥१॥

सद्गुरु आत्मरूप असल्यामुळें त्यांना कोणताही दृष्टान्त देतां येत नाहीं. परिसाचा दृष्टांत देतात, पण परिस लोहाचें सोनें करितो, फक्त परीस दुसरा परीस निर्माण करीत नाहीं. सद्गुरु तर शिष्याला ‘ स्वीय साम्य ’ देतात, आत्मपद देतात, ते परिसाहून श्रेष्ठ आहेत.

देहस्त्रीपुत्रमित्रानुचरहयवृषास्तोषहर्तुर्ममेत्थं
सर्वे स्वायुर्नयंति प्रथितमलममी मांसमीमांसयेह ।
एते जीवन्ति येन व्यवहृतिपटवो येन सौभाग्यभाज-
स्तं प्राणाधीशमंतर्गतममृतममुं नैव मीमांसयन्ति ॥५॥

लोकव्यवहार पाहून आचार्य आश्चर्य करतात. देह, स्त्री, पुत्र, मित्र, अनुचर, हत्ती, घोडे, गुरेंढोरें इत्यादिकांना ‘ मी माझें ’ म्हणत लोक मांसमीमांसा करण्यांत बहुमोल आयुष्य व्यर्थ दवडतात. पण हे स्त्रीपुत्रादि ज्याच्या आधारावर जगतात, व्यवहार करतात, आनंदरूप दिसतात त्या अंतर्गत, प्राणाधीश, अविनाशी आत्मारामाची मीमांसा (विचार) करीत नाहींत हें आश्चर्य होय !

किं ज्योतिस्ते वदस्वाहनिरविरिह मे चंद्रदीपादि रात्रौ
स्यादेवं भानुदीपादिकपरिकलने किं तव ज्योतिरस्ति ।
चक्षुस्तन्मीलने किं भवति च सुतरां धीर्धियः किं प्रकाशे
तत्रैवाहं ततस्त्वं तदसि परमकं ज्योतिरस्मि प्रभोऽहम् ॥९५॥

ह्या सुंदर श्लोकांत गुरुशिष्यसंवादरूपानें आचार्यांनीं कसें लीलेनें साधकाला आत्मस्वरूपापर्यंत नेलें आहे तें समजतें.

**गुरु**:–दिवसा कोणाच्या तेजानें तूं व्यवहार करतोस ?

**शिष्य**:–सूर्याच्या.

**गुरु**:–बरें रात्रीं ?

**शिष्य**:–चंद्र किंवा दीप यांच्या.

**गुरु**:–बरें; सूर्य, चंद्र, अग्नि यांचें तेज तरी कशाच्या आधारानें पाहतोस ?

**शिष्य**:–चक्षूच्या म्हणजे डोळ्याच्या.

**गुरु**:–सूर्य, चंद्र, अग्नि, चक्षु, आहेत खरें, पण चन्द्रसूर्यवन्हि नसले व डोळे मिटले म्हणजे ?

**शिष्य**:–बुद्धीच्या.

**गुरु**:–बुद्धीला प्रकाश कोण देतो ?

**शिष्य**:–'अहं' मी.

**गुरु**:–तर मग तोच तूं आहेस. सूर्य, चंद्र, अग्नि, चक्षु, बुद्धि, या सर्वांच्या पलीकडचा व या सर्वांचा प्रकाशक जो तोच तूं आहेस. खरें ना ?

**शिष्य**:–आहे महाराज !

ह्या सुंदर श्लोकाचा पाठभेद वेगळा आहे व त्यासंबंधानें एक मनोरम आख्यायिका आहे तीही येथें देणें उचित वाटतें. पाठभेद हा :–

किंज्योतिस्तव ? भानुमानहनि मे, रात्रौ प्रदीपादिकं
स्यादेवं ! रविदीपदर्शनविधौ किं ज्योतिराख्याहि मे ? ।
चक्षुः, तस्य निमीलनादिसमये किं ? धीः, धियो दर्शने
किं ? तत्राऽहं अतो भवान् परमकं ज्योतिः ! तदस्मि प्रभो ॥१॥

असें सांगतात कीं आचार्य प्रयागास गेले असतांना एकदां अक्षय्यवट पाहण्यास आपल्या शिष्यवृंदासह गेले. अक्षय्यवट हा अत्यंत प्राचीन असून त्याचीच सीतादेवीनें 'श्यामवट' म्हणून प्रार्थना केली आहे (रामायण अयोध्याकांड पाहा.) चिनी प्रवासी हुयेन-संग हा हिंदुस्थानांत सातव्या शतकांत आला तेव्हां हा वट होताच. आचार्य त्या वटवृक्षाच्या अगदीं जवळ आले तेव्हां त्यांनीं तेथें एक ब्राह्मण आत्महत्त्या करतांना पाहिला. ह्या ब्राह्मणाच्या अंगावर पांढरें कोड फुटलें होतें, व तो आंधळा झाला होता. घुबडाप्रमाणें त्याला सूर्याकिडे पाहवत नसे. लज्जेनें व दुःखानें गांजून तो प्राणत्यागास उद्युक्त झाला होता. आचार्यांनीं त्याच्या अंगावरून हात फिरविला व तो खडखडीत बरा झाला. कोड गेलें व त्याला दिसूं लागलें. तो चांगला दिसूं लागला तेव्हां लोक त्याला '**उदंक**' म्हणूं लागले. म्ह० ज्याच्या अंगावरचीं कोडाचीं चिन्हें (अंक) गेलीं आहेत (उत्) असा. तो आचार्यांना शरण गेला व आचार्यांनीं त्याला प्रश्न करून व वरीलप्रमाणें त्याच्याकडून उत्तरें काढून त्याला एका श्लोकानेंच कृतार्थ केला. हा शिष्य आचार्यांच्या शिष्यमंडळांत पुढें सर्वमान्य झाला.

ह्या एकश्लोकीवर तत्त्वदीपन नामक स्वयंप्रकाश योगींद्र यांची एक टीका असून ती अद्याप अप्रकाशित आहे. वरील श्लोकाच्या संदर्भासंबंधानें योगींद्र म्हणतात :—

"इह खलु भगवान् सर्वज्ञश्चंद्रचूडावतारो श्रीशंकराचार्यः तीर्थैरिव त्रिभुवनं पालयन्, सद्वैद्यैरिव संरक्षन्, चंद्र इवाऽऽप्याययन्, कल्याणचरितैरत्नैरिवालंकुर्वन् शश्वद्विश्वं विचचार। तत्र कदाचिद् ग्रामविशेषे कूष्मांडमिव पाण्डुरांगं, ऊलूकमिव सूर्यावलोकनाक्षमं, लज्जया जनावलोकनक्षमं 'मां त्राहि त्राहि' इति पुनः पुनः प्रणमंतं

कंचन कुष्ठिनं साधनचतुष्टयसंपन्नमालोक्य परमकारुणिकत्वेन तावदेनं संसारसंकटान् मोचयन् तथाचकार । तदुपदेशवचनं प्रश्नोत्तरश्लोकरूपेण निबबंध । ” असो.

आदौ मध्ये तथांते जनिमृतिफलदं कर्ममूलं विशालं
ज्ञात्वा संसारवृक्षं भ्रममदमुदिताशोकतानेकपत्रं ।
कामक्रोधादिशाखं सुतपशुवनिताकन्यकापक्षिसंघं
छित्वाऽसंगासिनैनं पटुमतिरभितश्चिंतयेद्वासुदेवम् ॥ ॥ १०० ॥

गीतेच्या पंधराव्या अध्यायांतील अश्वत्थवृक्षाचेंच हें रूपक असून चौथ्या चरणांत त्यांनीं सांगितलें आहे कीं, बुद्धिमंतांनीं असंगशस्त्रानें त्याचा छेद करावा व वासुदेवाचें नित्य चिंतन करावें. भगवंताच्या अनेक नांवांपैकीं ‘ वासुदेव ’ हें नांव आचार्यांचें आवडतें आहे.

जातं मय्येव सर्वं पुनरपि मयि तत्संस्थितं चैव विश्वं
सर्वं मय्येव याति प्रविलयमिति तत् ब्रह्मचैवाहमस्मि ।
‘ यस्य स्मृत्या ’ च यज्ञाद्यखिलशुभविधौ सुप्रयातीह कार्यं
‘ न्यूनं संपूर्णतां ’ वै तमहमतिमुदैताच्युतं सन्नतोऽस्मि ॥ १०१ ॥

**गणेश पंचरत्नांतलें** मनोहर पदलालित्यही सहज आहे:—

नितांतकांतदन्तकान्तिमंतकांतकात्मजं
अचिंत्यरूपमन्तहीनमन्तरायकृंतनम् ।
हृदंतरे निरंतरं वसंतमेव योगिनां
तमेकदंतमेव तं विचिंतयामि संततम् ॥ ५ ॥

**सुब्रह्मण्यभुजंगस्तोत्रांत** पुढील वत्सलरसाचा अपूर्व श्लोक आहे. सुब्रह्मण्य म्ह० स्कंद, गुह, कार्तिकेय—

इहायाहि वत्सेति हस्तान्प्रसार्या—
व्हयत्यादराच्छंकरे मातुरंकात् ।

समुत्पत्य तातं श्रयंतं कुमारं
हराश्लिष्टगात्रं भजे बालमूर्तिम् ॥ १८ ॥

**शिवभुजंग**स्तोत्रांत पुढील रम्य व हृद्य प्रार्थना आहे:—

पशुर्वेत्सि चेन्मां–तमेवाधिरूढ:
कलंकीति वा–मूर्ध्नि धत्से तमेव ! ।
द्विजिन्ह: पुन्ह:–सोपि ते कण्ठभूषा
त्वदंगीकृत: शर्व ! सर्वेऽपि धन्या: ॥ १२ ॥

असो. श्रीरंगम् येथील आचार्यग्रंथावलींत आचार्यांच्या स्तोत्रांना दोन भाग दिले असून त्यांत ६५ स्तोत्रें आहेत. हीं सर्वच आद्य श्रीशंकराचार्यांचीं दिसत नाहींत, कांहीं मागून गादीवर आलेल्या आचार्यांचीही असतील. 'शिवानंदलहरी' शंभर श्लोकांची आहे ती आद्य आचार्यांची दिसत नाहीं. ह्या ६५ स्तोत्रांपैकीं १३ शिवपर, १३ विष्णुपर, १३ देवीपर, कांहीं गणेश व स्कंद यांवर व बाकीचीं गंगादि देवतापर आहेत. सर्व स्फुट प्रकरणें व कांहीं स्तोत्रें आद्य आचार्यांचीं आहेत यांत शंका नाहीं.

वरील चरित्रलेख मुमुक्षूंत मीं लिहिल्यावर आचार्यांच्या जन्मकालाविषयीं बराच पत्रव्यवहार मुमुक्षूंतच प्रसिद्ध झाला. त्यांत शिपोशीचे 'विष्णुशर्मा' (आठल्ये) यांनीं अनेक प्रमाणें देऊन "शालिवाहन शके ७१० विभवसंवत्सरीं वैशाख शुद्ध १० स दोनप्रहरीं" आद्य शंकराचार्यांचा जन्म झाला असें सिद्ध केलें आहे. प्रसिद्ध संशोधक व 'पुराणनिरीक्षण' कर्ते कै. त्र्यंबक गुरुनाथ काळे यांनींही प्रमाणांतरांनीं शक ७१०–७४२ हा आचार्यांचा काळ निर्णीत केला आहे. आचार्यांनीं गुहाप्रवेश शके ७४२ मध्यें वैशाख शुद्ध १५ स केला. 'म्हैसूर ग्याझिटीअर' कारांनीं काळे यांचाच कालनिर्णय मान्य केला आहे.

## ३. श्रीमोरया गोसावी

१. या सिद्ध पुरुषानें शके १५७० मध्यें मार्गशीर्ष वद्य ६ रोजीं चिंचवड मुक्कामीं जिवंत समाधि घेतली. या पुण्यतिथीनिमित्त चिंचवडास प्रतिवर्षी दहा हजारांवर यात्रा जमते व अन्नसंतर्पण होतें. ते दिवशीं राजापासून रंकापर्यंत सर्वजण आपापला उच्च-नीचभाव विसरून या सत्पुरुषाच्या दारीं उच्छिष्टाचीं शितें 'प्रसाद' म्हणून मोठ्या आनंदानें व आवडीनें भक्षण करतात. चिंचवड गांवास क्षेत्रपण मोरयागोसाव्यांच्या संन्निवासानें प्राप्त झालें आहे. चिंचवड गांव पवनगंगा ऊर्फ पवना नामक पुण्यतीर्थाच्या उत्तर तीरावर वसलेलें असून मोरयागोसावी यांचें भव्य समाधिमंदिर गंगाप्रवाहालगतच आहे व स्वतः स्नान करून सोंवळ्यानें मोरयास स्नान घालण्यास जाण्यासाठीं रमणीय दगडी घाट बांधलेले आहेत. स्नानसंध्यादि पुण्यकर्म करण्यास हें तीर्थ फार सोयीचें आहे; पण या तीर्थाला तीर्थपण ज्यांच्या कृपेनें प्राप्त झालें त्या श्रीमोरया-गोसाव्यांच्या संबंधानें दोन ओळी येथें मी लिहिणार आहें. तीर्थांचें तीर्थरूप संतच होत. मोरयागोसाव्यांना जरी २५० वर्षें होऊन गेलीं आहेत, तरी त्यांच्या पुण्यप्रभावानें चिंचवडाचें क्षेत्रपण कायम आहे.

२. हा आमचा पुणें जिल्हा खरोखरीच पुण्यसंपत्तीचें भांडार आहे. मागील युगांत 'दक्षिणापथ' राक्षसांची भूमि म्हणून याला समजत असत, पण या कलियुगांत ती संतभूमि झाली आहे! त्यांतूनही पुणें शहराची कीर्ति विश्वीं विस्तारली आहे, याविषयीं

शंका नाहीं. एकट्या पुणें जिल्ह्यांत सात आठ नामांकित क्षेत्रें आहेत. पुण्याच्या उत्तरेस तुकोबांची देहू, मोरयांचें चिंचवड व ज्ञानोबांची आळंदी या तीन क्षेत्रांचा सुंदर त्रिकोण झाला आहे—म्हणजे हीं तीनही क्षेत्रें पुण्याच्या परिसरापासून फार दूर नाहींत. हीं परम-पवित्र क्षेत्रें पुण्यनगरीच्या शिरावर आपला वरद हस्त ठेवून निरं-तर आशीर्वचनांचा घोष करीत आहेत, म्हणून तर शिवरायांच्या किंवा पेशव्यांच्या पुण्यनगरीचा यशोदुंदुभी त्रैलोक्यांत गाजून राहिला आहे. संतप्रसादावांचून यशश्री कैंची ? पुण्यपुरुषांच्या वरद-हस्ताशिवाय पराक्रम व तेज देणारा दुसरा चिंतामणि कोणता ? पुण्यनगरीच्या दक्षिणेस कौंडिण्यमुनींचा आश्रम जें कुंडिनपूर तें तानाजीचा सिंहगड नांवानें प्रसिद्ध आहे. पुण्याच्या पूर्वेस थेऊर व दक्षिणेस सासवड, जेजुरी व मोरगांव हीं क्षेत्रें असून वायव्येस भीमाशंकर व आग्नेयीस नीरानरसिंगपूर हीं सुप्रसिद्ध क्षेत्रें आहेत. भीमानदीचा उगम भीमाशंकरास असून पुणें जिल्ह्यांतील सर्व नद्या भीमेस नरसिंगपुरीं मिळतात, व हीच भीमा चंद्रभागा या नांवानें पुढें पंढरपुरीं श्रीपांडुरंगाच्या पायावर जाऊन पावन होते. पुणें जिल्ह्यांत शिवरायाची जन्मभूमि जें जुन्नर शहर, मोरोपंतांच्या सहवासामुळें प्रसिद्धीस आलेली बारामती, ब्रह्मेंद्रस्वामी उर्फ भार्गव-राम यांनीं लाखों रुपये खर्चून बांधलेल्या वापीमुळें व शिवबाच्या पाटिलकीमुळें प्रसिद्ध असलेलें इंदापूर, साडेतीन मुत्सद्यांच्या शहाणपणाच्या पताका वागविणारा पुरंदरचा किल्ला वगैरे प्रसिद्ध स्थानें हीं पुणें जिल्ह्यांतच आहेत ! पुणें जिल्ह्याच्या लौकिकामुळें पुण्याला पुण्यनगरी ही पदवी शोभते खरी असें यावरून कोण म्हणणार नाहीं ? पुणें, देहू, आळंदी, चिंचवड, थेऊर, सिंहगड, सासवड, जेजुरी, बारामती, जुन्नर, चाकण, भीमाशंकर, नरसिंगपूर,

पुरंदर–असलीं सुप्रसिद्ध स्थानें ज्या एकट्या पुणें जिल्ह्यांत आहेत, तो जिल्हा व त्या जिल्ह्याचें मुख्य ठिकाण जी पुण्यनगरी तिनें साऱ्या जगांत दिग्विजय लावला तरी अशक्य नाहीं ! यांपैकीं एकेक स्थान मनुष्यांत पावनत्व व वीरश्री भरण्यास पुरेसें आहे. मग या सर्वांचा ज्या प्रदेशांत समावेश होतो त्या प्रदेशाबद्दल परम प्रेमादर वाटल्यास काय आश्चर्य आहे ! ३५ वर्षांपूर्वी पुणें जिल्ह्याचा भूगोल आम्हांस शाळेंत पढविला गेला होता, पण आमच्या सांप्रतच्या शिक्षणपद्धतीची मौज ही आहे कीं या भूगोलाचें मर्म आमच्या लक्ष्यांत येण्यास दोन तपें लागलीं ! असो. या स्थळांपैकींच चिंचवड हें एक स्थळ आहे. महाराष्ट्रांत जिवंत समाधि घेणारे पहिले योगिराज श्रीज्ञानेश्वरमहाराज व दुसरे श्रीमोरयागोसावी. उभयतांमध्यें ३५० वर्षांचें अंतर आहे. उभयतां एकाच चैतन्यस्वरूपानें एकत्रच अखंड वास करून राहिले आहेत.

३. श्रीमोरयागोसावी यांचे वडील वामनभटजी हे कर्नाटक प्रांतीं शाली म्हणून एक क्षेत्र आहे तेथचे राहणारे. यांचें गोत्र हारीत. यांच्या स्त्रीचें नांव उमाबाई ऊर्फ पार्वतीबाई. उभय स्त्रीपुरुष मोठीं भगवद्भक्त होतीं. वामनभटजी तपानुष्ठान करण्याकरितां ब्रह्मक-मंडलु नदीच्या तीरीं म्हणजे कऱ्हेच्या कांठीं मोरगांव आहे, तेथें येऊन राहिले. त्यांना वृद्धपणापर्यंत पुत्र नव्हता. ते शुल्कवृत्तीनें क्षेत्रांतलें धान्य गोळा करून राहत असत. त्यांना गणेशाची भक्ति होती. तत्प्रसादानें त्यांना मोरया गोसावी झाले. गोसावी नामक सांप्रदाय आहे, त्याचा वाचक हा शब्द येथें नाहीं. गोसावी ही सन्मानाची पदवी आहे. गो म्ह० इंद्रियें त्यांचा स्वामी तो गोसावी. गोस्वामी शब्दाचा अपभ्रंश गोसावी असा पुढें झाला.

गोसावी म्ह० यति, इंद्रियदमन करणारा. तुकोबा एका अभंगपादांत म्हणतात—

काम क्रोध बंदिखानीं । तुका म्हणे दिले दोन्ही ।
इंद्रियाचे धनी । झालों आम्ही गोसावी ।। १ ।।

४. मोरया गोसाव्यांचा जन्मशक समजला नाहीं. ह्यांचे वडील निवर्तले तेव्हां १२५ वर्षांचे होते व मातोश्री तत्पूर्वी निवर्तल्या त्या १०५ वर्षांच्या होत्या ! शुद्ध तपाचरणानें राहणारे संत दीर्घायुषी असतात. पूर्वी पूर्वी अकालीं मृत्यु फारच विरळ होत. मोरोपंत कवींचे गुरु गणेश पाध्ये अध्ययनाचें कर्म अखेरपर्यंत करीत ९५ व्या वर्षी वारले. मोरयांचे गुरु त्यांचे वडीलच होत. सोळाव्या वर्षी तपानुष्ठानास मोरयांनीं आरंभ केला:—

मस्तकीं शोभे जटाभार । कंठी रुद्राक्षांचे हार ।
सर्वांगीं विभूति सुंदर । तेज अपार दिसतसे ।। १ ।।

मोरया गोसाव्यांचा जन्म मोरगांवीं झाला व तेथेंच त्यांनीं पूर्ववयीं तप आचरलें. पुढें ते चिंचवडास येऊन कांहीं वर्षें राहिले. गर्द जंगलांत व निर्मनुष्य एकांतांत त्यांनीं तीव्र तपानुष्ठान केलें. 'जग ब्रह्ममय सर्व । ऐसे पाहे तो सदैव. ।।' त्यांनीं एकदां ४२ दिवस आसन सोडलें नाहीं. व्याघ्र त्यांच्याजवळ सदय होत व सर्प निर्विष होत ! ऋद्धिसिद्धि सर्व मोरयांना अनुकूल झाल्या. त्यांनीं कित्येक चमत्कारही केले. एका गरीब पण सदाचारी ब्राह्मणानें आपली कन्या त्यांस प्रौढ वयांत विधीनें समर्पण केली. विवाहप्रसंगीं १०० विवाह पानांचा स्वयंपाक झाला होता, पण त्यावर हजार पान जेवलें व स्वयंपाक तसाच राहिला ! त्यांनीं अंधांस डोळस केलें, निपुत्रिकांस सपुत्रक केलें. यवनी अंमलामुळें पापमयी बनलेल्या महाराष्ट्रभूस पावन केलें व जनार्दनस्वामी व एकनाथमहाराज

यांच्याप्रमाणें लोक भक्तिमार्गास लावले. ते पूर्वी खडकामध्यें राहत, पण विवाहोत्तर ते गृहस्थाश्रमी झाले:—

मोरया गोसावी पवनातीरीं । स्वधर्मानुष्ठान नित्य करी ।
कुटुंबासहित निर्धारीं । स्वाश्रमामाजीं राहिले ॥ १ ॥

५. मोरया गोसावी. पुत्र जाहले, त्यांचा पुत्र चिंतामणि यास घरांतलाच श्रेष्ठ कित्ता गिरवायास सांपडल्यामुळें बाळपणापासूनच हरिभजनाचा छंद लागला:—

मेळऊनियां पोरें । नामाचा करी गजर ।
पाषाणाचे टाळ निर्धार । वाजवी साचार आवडी ॥ १ ॥

चिंतामणि महाराजांचा जन्म चिंचवडास झाला. मोरया गोसावी यांनीं तपानुष्ठान मोरगांव, थेऊर व चिंचवड येथें केलें व गृहाश्रम मात्र चिंचवडास चालविला. त्यांनीं सारा संसार—आपल्या पुत्राचा व वंशाचा—ब्रह्मरूप केला. नाथांप्रमाणेंच मोरयाही फार दयाळू होते. एकदां चिंचवडाहून मोरगांवास ते महिन्याच्या वारीच्या चतुर्थीस जात असतांना वाटेंत एक मनुष्य पोटशूळाच्या व्यथेनें गडबडा लोळत धरणीवर पडला होता. त्यास पाहून हे त्याचें पोट चोळीत जवळ बसले, त्यासाठीं त्यांनीं लांबून उदक आणलें व पोटशूळाचीच नव्हे, तर, अवघ्या संसाराची व्यथा दूर करून त्यास आनंदित करिते झाले !

आपुले आश्रमीं सुखेंकरून । गोसावी करी स्वधर्माचरण ।
भजनादि योगसाधन । नित्य नेमें करितसे ॥ १ ॥

मोरयांनीं आपल्या स्त्रीस ब्रह्मनिष्ठ केलें व स्वानुभवाचा कंद पुत्राच्या हातीं दिला. श्रीमोरया गोसावी यांच्या पश्चात् त्यांच्या पुत्रानें म्ह० चिंतामणि महाराजांनीं चाकणच्या मुसलमान सुभेदारास एकदां प्रत्यय आणून दिला. तो सुभेदार या हिंदु अवलियाचा छळ

करीत असे. शेंकडों लोक याच्या भजनीं लागले व यानें हिंदुधर्मनिष्ठा वाढविली म्हणून त्यानें त्यांचा छळ मांडला. गोमांसाचें पातेलें यांजपुढें आणून ठेवलें, व यांस विचारलें कीं 'आंत काय आहे ?' चिंतामणिदेव म्हणाले, 'आंत गुलाबाचीं फुलें आहेत !' वरचा रुमाल काढून पाहतात तों पातेलेभर खरोखरीच गुलाबाचीं फुलें निघालीं ! यानंतर तो सुभेदार शरण आला. शिवाजी, चिंतामणि देव व तुकोबा यांच्या भेटी झाल्याच्या कथा प्रसिद्ध आहेतच. मोरया गोसावी यांनीं गृहाश्रम ब्रह्मार्पणभावानें चालविला. स्त्री व पुत्र यांस ब्रह्मसाक्षात्कार करविला व हजारों जड जीवांचा उद्धार केला.

६. मोरया गोसाव्यांच्या वंशांत सात पुरुष ओळीनें एकामागें एकसारखे ब्रह्मनिष्ठ झाले, व त्यानंतर दत्तकास प्रारंभ होऊन कुळांतली सिद्धि संपली. आम्ही त्या सातही पुरुषांची शकवार माहिती मिळविली आहे ती अशी:

( १ ) मूळ पुरुष श्रीमन्मोरया गोसावी यांची समाधि शके १५७० मार्गशीर्ष वद्य ६. जन्मशक मिळत नाहीं.

( २ ) दुसरे पुरुष श्रीचिंतामणमहाराज थोरले, यांची समाधि पौष वद्य ४. जन्मशक मिळत नाहीं.

( ३ ) तिसरे पुरुष नारायणमहाराज थोरले, संस्थानची इस्टेट संपादन करणारे, यांचा जन्मदिवस माघ शुद्ध ७ व समाधि शके १६३२ भाद्रपद शुद्ध ७.

( ४ ) चौथे पुरुष धाकटे चिंतामण महाराज. समाधि शके १६५८ कार्तिक वद्य १२.

( ५ ) पांचवे पुरुष धरणीधर महाराज थोरले. समाधि शके १६९४ मार्गशीर्ष वद्य ६.

( ६ ) सहावे पुरुष धाकटे नारायणमहाराज ऊर्फ गवाजी देव समाधि शके १७२४ मार्गशीर्ष वद्य १२.

( ७ ) सातवे पुरुष चिंतामणमहाराज ऊर्फ बावामहाराज— समाधि पौष शुद्ध १४ या प्रमाणें औरस पुरुष सात. पुढें दत्तक.

७. चिंचवडास मुसलमानही चतुर्थीचें व्रत करितात हें प्रत्यक्ष आहे. यवनीराज्यांत परधर्मीयांवरही आपल्या तपोबलाचा पगडा बसवून सारख्या सात पिढ्या सिद्ध पुरुषांच्या चालविणारें संत-घराणें चिंचवडच्या देवासारखें दुसरें आढळणार नाहीं. मोरयांच्या चरित्रापासून एक गोष्ट जरी कुटुंबी लोक शिकले तरी पुष्कळ होईल. साऱ्या समाजाला व राष्ट्राला गवसणी घालूं पाहणाऱ्यांनीं अगोदर आपलें घर सुधारलें पाहिजे. आपलें सर्वस्व आचरणाच्या पद्धतीनें आपल्या स्त्रीपुत्रादिकांस दिलें पाहिजे. राष्ट्रशिक्षणाचा पाया गृहशिक्षण होय. शरीराला बाहेरून औषधें चोपडणारांप्रमाणें आमच्या साऱ्या बाह्य चळवळी होत आहेत. स्नानसंध्या, जपतप, स्वधर्मानुष्ठान, पंचमहायज्ञ,—हा संतांनीं चोखाळून दिलेला मार्ग सोडून आम्हीं आडरान घेतलें आहे, पण ते आम्हांला उलट खड्डयांत मात्र पाडील ! प्रत्येकानें आपल्या वर्णाश्रमधर्माप्रमाणें वागलें पाहिजे. गृहशुद्धि झाल्याशिवाय राष्ट्रशुद्धि नाहीं व राष्ट्रशुद्धीशिवाय राष्ट्रोन्नति नाहीं.

मोरया गोसावी व चिंतामणि महाराज यांच्या आरत्या, पदें वगैरे चिंचवडीं ऐकायला सांपडतात. त्यांची म्हणणी मोठी खणखणीत व वीरश्रीची असते. त्यांच्या चाली मात्र विशिष्ट प्रकारच्या असल्यामुळें बाहेरच्या लोकांस त्या समजणें जरा कठीण जातें.

# ३. राजा कुलशेखर

घुष्यते यस्य नगरे रंगयात्रा दिने दिने ।
तमहं शिरसा वन्दे राजानं कुलशेखरम् ॥

१. त्रावणकोरच्या सुप्रसिद्ध राजघराण्यांत वरील महात्म्याचा जन्म कित्येक शतकांपूर्वी झाला. त्रावणकोरचे राजे, आपण राज्याचे मालक आहोंत असें समजत नाहींत. सारें राज्य अनंताचें–पद्मनाभाचें–आहे व आपण त्याचे केवळ सचिव आहोंत असें अद्यापही ते मानतात. राजा रोज दोनदां पद्मनाभाच्या मंदिरांत जातो व आपल्या राज्यकारभाराची सर्व हकीकत श्रीपद्मनाभास निवेदन करितो. कलि २७ पराभव संवत्सरीं पुनर्वसु नक्षत्रावर कुलशेखराचा जन्म शेरघराण्यांत दृढव्रत राजाच्या पोटीं झाला.

तस्मादभूच्छेरकुलप्रदीपः श्रीकौस्तुभात्मा कुलशेखराख्यः ।
महीपतिर्माघपुनर्वसूद्यत् दिने हरेः पूर्णकटाक्षलक्ष्यः ॥
– दिव्यसूरिचरित ५–६ ॥

दृढव्रताला नारायणाच्या कृपेनें दीर्घ कालानंतर हा एकच पुत्र झाला. राजानें त्याला राजशासनविद्येंत निष्णात केलें, इतकेंच नव्हे तर वेदशास्त्रपारंगतही केलें. हा राज्यभार वाहण्यास समर्थ झाला असें पाहून राजानें त्याला गादीवर बसविलें व आपण ब्रह्मचिंतनासाठीं वनांत निघून गेला.

२. कुलशेखरानें बहुत वर्षें राज्य केलें. तो मोठा शूर व न्यायी होता. तो केवळ शेरांचाच नव्हे तर चौलांचा व पांड्यांचाही राजा झाला. त्याचें सैन्य व दारूगोळा यांचा सभोंवारच्या मोठमोठ्या

राजांनाही मोठा दरारा होता. त्यानें अनेक राजे आपले मांडलिक केले, व न्यायनीतीनें राज्य करून प्रजेस सुख दिलें. तो फार उदार होता. याप्रमाणें तो सर्वगुणसंपन्न असतांही प्रथम त्याचें परमेश्वराकडे लक्ष नव्हतें. तरी परमेश्वराचें त्याच्याकडे पूर्ण लक्ष होतें. तो नारायणास ओळखीत नव्हता, पण नारायणाचें त्याच्यावर लक्ष होतें. त्यानें त्याची संतमाहात्म्यांत गणना व्हावी अशी योजना केली होती ! ' यमेष वृणुते ' ह्या श्रुतिवचनाप्रमाणें भगवंत ज्याकडे कृपापांगानें एकवार पाहतील त्याचा जगांत जयजयकार होईल. भगवंताचा राजावर प्रसाद होऊं लागतांच त्याला संसाराचा एकदम वीट आला. हें सर्व दृश्य नश्वर आहे, नकली आहे, दुःखद आहे असें त्याला वाटूं लागलें व त्यावर वैराग्याची छबी उमटली. तो विषयांत रमेनासा झाला. देवाची ज्यावर कृपा होते त्याला प्रथम वैराग्य प्राप्त होतें. वैराग्यप्राप्ति ही भगवत्कृपेची पहिली निशाणी होय. हें जग मिथ्या अहंकारानें व दंभानें भरलें आहे असें त्यास आढळून आलें. त्याला सद्गुरु भेटले व त्यांनीं त्याला परमार्थमार्ग दाखविला. भगवत्प्रसादाचें अंजन त्याच्या डोळ्यांत पडलें व त्याला जग निराळेंच दिसूं लागलें. कनककांता किंवा अर्थकाम यांनीं लोक झपाटले आहेत, ' अर्थकामाभिभूतोऽयमुन्मत्त इव वर्तते ' असा हा संसार आहे, यांच्या संगतींत मला काय लाभ होणार ? असें वाटून त्याला एकांताची जरूर वाटली. राजवैभवानें त्याचें अंग पोळूं लागलें. राजोपचार त्याला नरकासारखे अमंगळ वाटले. तो नित्य रामायण वाचूं लागला. रामराम त्याच्या अंतःकरणांत शिरले व बिभीषणाच्या पुढील उक्ति त्याला सारभूत वाटल्या.

परित्यक्ता मया लंका मित्राणि च धनानि च ॥ रामा. ६-९-४
त्यक्त्वा पुत्रांश्च दारांश्च राघवं शरणंगतः ॥ रामा. ६-१७-१४

स्त्रीपुत्रांचा व जगाचा त्याग करून रामदर्शन घ्यावें अशी त्याच्या मनांत प्रबळ इच्छा उत्पन्न झाली. श्रीरंगम् येथें जाऊन त्या शेषशाई रंगनाथाचें दर्शन घ्यावें, त्याच्या भक्तांच्या मेळ्यांत मिसळावें, आनंदानें त्याचे गुण गावेत, त्याचा नामघोष करावा, अशी शुभेच्छा त्याच्या मनांत उद्‌भवली.

३. ह्याप्रमाणें जगाचा कंटाळा व देवाची आवड उत्पन्न होऊन वैराग्यानें व अभ्यासानें त्याचें लय रंगनाथाकडे लागलें. त्यानें देशोदेशीचे विद्वान् सद्‌भक्त आपल्या राजधानीस बोलाविलें व त्यांच्या संगतींत इतिहास, पुराणें, उपपुराणें सर्व वाचलीं व ऐकलीं; ह्या वाङ्मयाच्या महासागरांतून निवडक रत्नें वेंचून काढून मुकुंदमाला नामक एक स्तोत्र निर्माण केलें, त्यांतील पुढील पद्य पाहा:—

इदं शरीरं परिणामपेशलं पततत्यवश्यं श्लथसंधिजर्जरम् ।
किमौषधैः क्लिश्यसि मूढ दुर्मते निरामयं कृष्णरसायनं पिब ।।

वेदांनीं प्रतिपाद्य पुरुष जेव्हां रामरूपानें प्रकट झाला तेव्हां वेदांनींच रामायणाचें रूप घेतलें अशी कुलशेखराची दृढ श्रद्धा होती.

वेदवेद्ये परे पुंसि जाते दशरथात्मजे ।
वेदः प्राचेतसादासीत्साक्षाद्रामायणात्मना ।।

४. रामकथा श्रवण करितांकरितां त्याची रामचरित्राशीं इतकी तन्मयता झाली कीं एकदा चौदा हजार राक्षसांनीं रामरायाला एकटें गांठलें, 'एकट्या रामानें त्यांच्याशीं कसें लढावें बरें!' असा श्लोक पुराणिक बोवांच्या तोंडून ऐकतांच कुलशेखरांना रामरायाच्या सुरक्षितपणाची मनस्वी धास्ती वाटली व ते तीव्र वेगानें एकदम उभे राहिले व कळवळून म्हणाले, "माझा राम इतक्या दुष्टांशीं एकटाच लढत आहे. बंधु लक्ष्मण सीतामाईचें रक्षण करीत मागें राहिला आहे, राम संकटांत सांपडला आहे; त्याचें कांहीं बरें

वाईट झालें तर विश्वांत केवढा अनर्थ उडेल ! उठा, सैनिकांनों उठा ! घोर संग्रामास तयार व्हा, चला,धांवा,मी माझ्या रामाच्या सन्निध उभा राहून लढणार ! " राजसेवकांना राजाचें डोकें ठिकाणावर नाहीं असें वाटलें. वस्तुतः त्याचेंच डोकें ठिकाणावर आलें होतें व त्यांचीं डोकीं मायाभ्रमानें भ्रमलीं होतीं, पण राजाज्ञा कोण मोडणार ? सर्व सैनिक सज्ज झाले. ही स्वारी निघाली. कांहीं मार्ग आक्रमितांच दोन मुत्सद्यांनीं येऊन राजास बातमी दिली कीं एकटच्या रामानें सर्व राक्षस मारले व त्या विजयी वीरास सीतेनें प्रेमालिंगन दिलें !

तं दृष्ट्वा शत्रुहंतारं महर्षीणां सुखावहम् ।
बभूव हृष्टा वैदेही भर्तारं परिषस्वजे ॥ रामायण ३-३०-३९.

ही वार्ता ऐकतांच राजा आनंदित होऊन रामचिंतनांत मग्न झाला.

५. रामकथा ऐकतां ऐकतां रामायणांतील आनंदोत्सव राजानें समारंभानें पार पाडले, हजारों वैष्णवांस त्यानें धर्म केला, भोजन दिलें, रथाच्या मिरवणुकी काढल्या, नगरी शृंगारली, कथाकीर्तनें सुरू केलीं व सर्व लोकही राममय झाले. रावण सीतेला घेऊन समुद्राच्या पार गेला हें ऐकतांच तो धांवतच समुद्राकडे गेला; त्यानें समुद्रांत रामराम करीत उडी टाकली; गळ्याइतकें पाणी लागतांच रामराय प्रकट झाले :–

हांकेसरसी उडी । घालोनियां स्तंभ फोडी ॥ १ ॥
ऐसी कृपावंत कोण । माझे विठाईवांचून ? ॥ २ ॥

अशी ती भक्तवत्सल रामाई तेथें धांवून आली व तिनें आपल्या भक्ताला सागराच्या पार काढलें; भवसागराच्या पार नेणारी ती माउली ह्या क्षुद्र जलसागरांतून आपल्या भक्ताला तारील यांत काय आश्चर्य ! असो. ६७ व्या वर्षी कुलशेखर मानससरोवराकडे गेले.

४१८११ चरित्र
१३५८ १५/७/६८

# ४. दामाजीपंत

देवगडच्या जाधवांचें राज्य मोडल्यावर दक्षिणेंत सर्वत्र यवनी अंमल सुरू झाला. कलबुर्ग्यास बाहामनीशाहीची स्थापना शके १२६८ ( इ. स. १३४६ ) मध्यें होऊन सदर शाही १७५ वर्षें टिकली व शके १४४८ ( इ. स. १५२६ ) मध्यें तिचीं पांच शकलें होऊन मुसलमानी सत्ता पांच ठिकाणीं विभागली गेली. तेलंगण, वारंगळ व मुख्यत: विजयानगर येथील शूर राजांशिवाय द्वारपालचे बल्लाळ राजे, शिरके राजे, रायरी सोनखेडचे राजे, सुर्वे राजे, बागलाण, खानदेश व अशीरगड येथील राजे इत्यादि हिंदु राजे आपलें स्वातंत्र्य राखण्याकरितां व हिंदुधर्म आणि हिंदुप्रजा यांच्या संगोपनाकरितां मुसलमानी सत्तेशीं मोठ्या शौर्यानें लढले व ह्या सतत चालणाऱ्या लढायांमुळें दक्षिणेंतील प्रजेला सतत अत्यंत क्लेश भोगावे लागले. ह्या यवनी अमलांत पंढरीच्या विठ्ठल उपासकांना अर्थातच भारी त्रास भोगावा लागला व नामदेवाच्या समाधीनंतर १००।१२५ वर्षेंपर्यंत कोणी नामांकित विठ्ठलभक्त उदयास आला नाहीं. परंतु पुढें १४ व्या शतकांत जे एकामागें एक तीन मोठे दुष्काळ पडले त्यांपैकीं तिसऱ्या दुष्काळांत एक विठ्ठलभक्त उदयास आला व त्यामुळें भागवतसंप्रदायास पुन्हां मोठें चालन मिळालें. शके १३१८-१३९८ ( इ. स. १३९६–१४७५ ) पर्यंतच्या ८० वर्षांत चार मोठाले दुष्काळ दक्षिणेंत पडले, व त्यांतही दुर्गाडीचे ( दुर्गादेवीचे ) दोन भयंकर दुष्काळ पडून 'मुलुख वैरान होऊन बेचिराख जाहला!' पहिला बारा

वर्षांचा दुष्काळ शके १३१८ पासून शके १३३० पर्यंत पडला. दुसरा एक वर्षांचा दुष्काळ शके १३४२ मध्यें, तिसरा शके १३८० मध्यें व चौथा सात वर्षांचा दुष्काळ शके १३९० पासून शके १३९७ पर्यंत पडला. ह्यांपैकीं कोणत्या तरी एका दुष्काळांत सुप्रसिद्ध विठ्ठलभक्त दामाजीपंत होऊन गेले हें निर्विवाद आहे. दामाजीपंत मंगळवेढ्याचे कारभारी होते, तेव्हां वाहामनीचा दरबार बेदरला भरत असे. बाहामनीशाहानें बेदर शके १३५४ मध्यें वसविलें, त्या अर्थीं ह्या शकानंतरच्या दुष्काळांत दामाजीपंत असले पाहिजेत. वाहामनीशाहीचे तुकडे होऊन बेदर शहर शके १४१० नंतर मागें पडलें; तेव्हां शके १४१० च्या पूर्वीं दामाजीपंत असले पाहिजेत. म्हणजे अर्थातच शके १३९० पासून शके १३९७ पर्यंत सात वर्षें जो दुष्काळ पडला त्या दुष्काळांत दामाजीपंतांनीं मंगळवेढें व पंढरपूर येथील ब्राह्मण व इतर हजारों गोर-गरीब यांजकडून सरकारी धान्याचीं कोठारें लुटवून त्यांचे प्राण वांचविले हें ठरतें. सोलापूर गॅझेटीअरमध्यें शके १३८० च्या दुष्काळास दामाजीपंताचा दुष्काळ असें म्हटलें आहे. पण राजवाडे यांनीं शके १३९६ मधील हुमायून बादशाहाच्या सहीशिक्क्याचा एक फर्मान व दुसरा त्याच सालचा महजर प्रसिद्ध केला आहे त्यावरून दामाजीपंतांच्या वेळीं वेदरांत हुमायून बादशाहा होता असें ठरतें. पण हुमायून बादशाहा शके १३८२ (इ. स. १४६०) मध्यें वारला असें फेरेस्ता म्हणतो. तेव्हां राजवाड्यांच्या जवळचा फर्मान व फेरेस्ता हे दोघेही खरे ठरण्यास असा एक उपाय आहे कीं फेरेस्ताच्या म्हणण्याप्रमाणें हुमायूनशहा शके १३८२ मध्यें वारला तरी त्याच्या मुलाच्या (महंमदशहा हा गादीवर आला तेव्हां केवळ नऊ वर्षांचें अर्भक असल्यामुळें) कारकीर्दींत त्याच्या

वायकोनें आपल्या नवऱ्याच्याच नांवाचा शिक्का कांहीं वर्षें कायम ठेवला असावा. बेदरचा बादशहा मग तो कोणीही असो, हुमायून-शहा असेल किंवा महंमदशहा असेल, बेदरास असतांना जो भयं-कर दुष्काळ पडला त्यांत दामाजीनें परमौदार्यानें स्वतःचा जीव धोक्यांत घालून हजारों गोरगरिबांचे प्राण वांचविले व श्रीविठ्ठल-रायानें आपल्या भक्ताचे प्राण रक्षण करण्याकरितां विठू महा-राचें रूप घेऊन बादशाहांच्या दरबारांत विकल्या धान्याच्या सवाईचें मोल भरून पावती घेतली ! ही दामाजीची कथा सर्वत्र पसरून पंढरीच्या संप्रदायाचाही चोहोंकडे जयजयकार झाला व तुकोबांनीं म्हटल्याप्रमाणें दामाजीपंतांची ' राष्ट्रांत ते झाली कीर्ति मोठी. ' दामाजीपंतांची कथा प्रसिद्धच आहे. सदर कथा महिपती-बाबांनीं भक्तविजय अ. ४० मध्यें वर्णिली आहे. शिवाय यावर राघवाच्या २४ साक्या व जनार्दनाच्या २४ आर्या काव्यसंग्रहांत छापल्या आहेत. ' वारी संकट हरि दामाजीचें। कौतुक देवाचें, ' हें अमृतरायांचे शिष्य ब्रह्मगिरी यांचें भक्तिरसानें ओथंबलेलें असें अत्यंत प्रेमळ पद आबालवृद्धांच्या परिचयाचें आहेच. तुकाराम-महाराजांनीं ' दामाजीपंतांची रसद गुदरली। लज्जा सांभाळिली देवरायें ' या ३० चरणी अभंगांत ही सर्व गोष्ट सांगितली आहेच. दामाजीपंत मंगळवेढ्याचा ठाणेदार असतांना ' कठिण काल, (दुष्काळ) पडला तेव्हां :–

धान्याचीं भांडारें होतीं तीं फोडली। रक्षिलीं पंढरी दुष्काळांत ॥४॥
दुबळीं अनाथें तींही वांचविलीं। राष्ट्रांत ते जाली कीर्ति मोठी ॥५॥

दामाजीपंतांच्या हाताखालीं एक कानडा ब्राह्मण मुजुमदार[१]

---

१ ब्रह्मगिरी म्हणतो ' जैसा गज गाढव। न परे सर। कांदा कापूर। धर्म दुर्योधना जैसें वैर। सोमल साकार। '

होता त्यानें लगेच वेदरच्या दरबारीं फिर्याद लिहून चहाडी केली ! कागद पाहतांच तलीव करून चालविलें तो 'इकडे या विठ्ठलें माव केली.'

विकते धारणें सवाईचें मोल। धान्याचें सकळ द्रव्यें केलें ॥ ९ ॥
दामाजीपंताच्या नांवें अर्जदास्त। लिहून खलेति[1] मुद्रा[2] केली ॥१०॥
विठो पाडेवार[3] साह्य जाला। वेदरासी गेला रायापाशीं ॥ ११ ॥

ह्या विठो महारानें वेदरास जाऊन[4] दामाजीपंतांची रसद हजर[5] केली ती काढून बादशहास संतोष झाला. माप घेऊन तसरीफ व पावती देऊन त्यास परत पाठविलें. वाटेंत त्याची व दामाजीपंतांची चुकामूक झाली. दामाजी वेदरास गेले तेव्हां बादशहानें:—

काल गेला विठा वेगारी देऊन। तसरीफ देऊन जाब दिला ॥ २१ ॥
काय तुमचें काज सांगाजी सत्वर। बोलाजी निर्धार वचनाचा ॥२२॥

हे ऐकतांच दीनदयाळ पंढरीरायाची सर्व माव दामाजीपंताच्या लक्षांत आली:-

पाहातांचि जाव हृदय फुटलें। नयन निडारले राजा देखे ॥ २४ ॥
सांवळें सकुमार रूप मनोहर। माथा तेणें भार वाहियेला ॥ २५ ॥

---

१ खलिता २ शिक्का ३ महाररूपानें ४ अनंत ब्रह्मांडें ज्याचे पोटीं। सावळा जगजेठी। काळी घोंगडी काळी काठी। काळा दोरा कंठीं। बोली महाराची थेट मराठी। गांडिस लंगोटी। पायि वाहणा मोठा शाहणा, पतीत पावन नाम जयाचें ॥ ३५ ॥ वारी संकट हरि दामाजीचें कौतुक देवाचें ॥
५ 'विठो' महारानें दरबारांत रसद हजर करतांना जें भाषण केलें तें ब्रह्मगिरीच्या अमृतवाणीनेंच साग्र ऐकायला पाहिजे. प्रथमच तो म्हणतो:—

म्हणे 'मी पंताचा बहु कामाचा। विश्वासू घरचा। बंदा शरमिंदा आहें त्याचा। जन्मोजन्मींचा। नाजुक जरूर अडलें भिडलें। तेथें काम मज नफराचें' ॥ ३८ ॥ वारी संकट हरि दामाजीचें। कौतुक देवाचें।

दामाजीपंतांच्या सदाचरणाबद्दल बेदरच्या दरबारांतही सर्वांची पूज्यबुद्धि होतीच.

दामाजीपंतासी रायें सन्मानिलें । 'तो म्हणे आपुलें कर्म नव्हे ॥२६॥
आतां तुमची सेवा पुरे जी स्वामिया । शिणविलें सखया विठोबासी ॥२७॥

दामाजीपंतांनीं नौकरीचा राजीनामा देऊन ते परत आले.

निरोप घेऊनी आला स्वस्थळासी । उदास[1] सर्वांसी होता जाला ॥२८॥
दामाजीपंतानीं सेविली पंढरी । ऐसा त्याचा हरि निकटवर्ती ॥२९॥

ही कथा सांगून तुकोबाराय ह्या कथेपासून आपण कोणता निश्चय मनीं बाळगावयाचा तो सांगतात:--

तुका म्हणे विठो अनाथकैवारी । नुपेक्षी हा हरी दासालागीं ॥३०॥

दामाजीपंतांचें हें उदार व पावन चरित्र लवकरच सर्वतोमुख झालें व पंढरीसच श्रीविठ्ठलाच्या पायीं दडी मारून राहिलेल्या ह्या परमभक्ताच्या दर्शनार्थ हजारों लोकांचें प्राण वांचविण्याकरितां जो केवळ नौकरीवरच लाथ मारायला नव्हे, तर आपले प्राणही खर्ची घालायला तयार झाला व 'धर्मकार्यार्थीं मरण यावें याहून जिण्याचें

---

१ पंढरीनाथाला आपल्याकरितां असें ओंगळ रूप घ्यावें लागलें त्याबद्दल दामाजीला अत्यंत दु:ख झालें:--

नेत्रीं जळ वाहे जैसी गंगा । 'श्रीपांडुरंगा ! । राही रुक्मिणीच्या अंतरंगा । शंकरजीवलगा ! । परम अमंगळ लाजिरवाणें । किमर्थ करणें कर्म हीनाचें ॥ ५६ ॥ माझा जरि आतां जाता प्राण । तरि नवल कोण ? । धर्मकार्यार्थीं यावे मरण । हा हेतु प्रमाण । श्रीहरिचरणांची मज आण । याविण सार्थक काय जिण्याचें ॥ वारी संकट हरि दामाजीचें । कौतुक देवाचें ॥ ६१ ॥

दुसरें कोणतें सार्थक आहे ?' ह्या परमपवित्र भावनेनें जो प्रेरित झाला त्याचें संरक्षण काय भूतभावन दीनदयाळ परमात्मा करणार नाहीं ? पण एवढा विश्वासच सर्वांत उत्पन्न होत नाहीं हें जीवांचें दुर्भाग्य होय. अनाथकैवारी दासाला कधींही उपेक्षीत नाहीं हा बोध ह्या चरित्रापासून आपण घ्यावा व साडेतीन हाताच्या देहापुरतेंच संकोचून न राहतां ब्रह्मांडाचें आपोशन घेऊन सर्वभूताशयस्थित व्हावें असें तुकोबासारखे संतहृदयपरीक्षक व स्वत: संत आपणांस सांगतात. दामाजीचें चरित्र लाखों लोकांना चटका लावून गेलें आहे व धर्मनिष्ठा, परोपकार, व भगवद्भक्ति ह्या गुणांचा तें आदर्श झालें आहे. दामाजीच्या चरित्राचें कीर्तन चाललें असतांना श्रोत्यावक्त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंचे लोट वाहिल्याशिवाय राहत नाहींत. यवनांच्या करड्या अंमलांतही असे स्वधर्मनिष्ठ हरिभक्त झाले म्हणून हिंदुराष्ट्राची पवित्र परंपरा कायम राहिली आहे. असो! स्वत: दामाजीपंतांचें म्हणून वरील प्रसंगाला अनुलक्षून एक पद हरिदास म्हणत असतात ते येणेंप्रमाणें :—

**पद.**

(मजला वरील सुभद्रा काय—या चालीवर.)

हरहर विठ्ठल जगदुद्धार । जाहला महार मजसाठीं ॥ ध्रु० ॥ धन्य वेदरीचा बादशाय । त्याचा केला मीं अन्याय । धान्य लुटण्याचा अपाय । पूर्ण उपाय मजसाठीं ॥ १ ॥ षड्गुणैश्वर्य श्रीभगवान् । सांडुनि देवपणाचा अभिमान । पायीं घालुनि तुटकी वहाण । नेसला जीर्ण लंगोटी ॥ २ ॥ माथां बांधुनि चिंध्याभार । काळी कांबळी खांद्यावर । मुखानें म्हणत असे जोहार । काळा दोर निजकंठीं ॥ ३ ॥ ऐसें कां केलें देवा । माझ्या सुकृताचा ठेवा ।

महार झालासि रे माधवा। लाउनि वणवा मजसाठीं ॥ ४॥ ज्याचें धान्य लुटिलें जाण। तो तरि घेतां माझा प्राण। दामा म्हणे गुणनिधान ×××× जगजेठी ॥ ५ ॥

दामाजीसाठीं पांडुरंगानें पाडेवाराचें (महाराचें) रूप घेतलें ही कथा कदाचित् कठोरचित्त पंडितांना व चिकित्सकांना रुचली नाही तरी भक्तप्रेमाचें रहस्य जाणणाऱ्या वेदाला अमान्य अशी नाहीं असें सांगतांना पंत म्हणतातः—

दामाजीचा होउनि हरि पाडेवार बेदरा गेला।
पंडित रागेले, परि नच तत्प्रेमज्ञ वेद रागेला ॥ १०९ ॥

—महद्विज्ञापना.

नाथांनीं ही दामाजीपंतांची गोष्ट "जोहार मायबाप जोहार। मी दामाजीचा लेंकवळा महार" ह्या जोहारांत सांगितली आहे. (लेंकवळा म्हणजे अन्नावर वाढलेला आश्रित) "दुष्काळांत दामाजीनें पेवें विकून चिठ्ठीपैका देऊन मला पाठविलें आहे; वसूल घेऊन जमा करा व बाकी शून्य घालून जाब द्या" म्हणून विठू महारानें बादशहास बेदरास जाऊन सांगितलें व रसद घेऊन आला; तेव्हां ती रसद दामाजी बेदरास धरून नेतांना वाटेंत देवतार्चन करण्याकरितां दामाजी उतरले असतां नित्यनेमाची पोथी वाचीत असतांना त्यांत सांपडली ही हकीकत एवढीच सांगून नाथ म्हणतात 'एकाजनार्दनीं केला जोहार। मोडिला अविद्येचा थार। स्थापुनियां चराचर। भजनी सादर असावें कीं जी मायबाप ॥'

## ५. सीताराममहाराज मंगळवेढेकर

१. श्रीपंढरिनाथाची नगरी म्ह० सकल संतांचें माहेरघर–तेथें इ० स० १९०५ पर्यंत पांच वर्षें माझें वास्तव्य घडलें. तेथें या काळांत अनेक भक्तभाविकांच्या व प्रेमळांच्या गांठी पडल्या, पण त्या सर्वांत किंबहुना मी माझ्या आयुष्यांत पाहिलेल्या सर्व विभूतिमत् पुरुषांत श्रीसीताराममहाराज यांच्या कोटीचा संत दुसरा पाहिला नाहीं. संतांत कोटचा लावणें अप्रशस्त खरें, पण संतांविषयीं ज्या माझ्या कल्पना त्या सर्व कल्पनांना पुरून उरण्याइतकें पारमार्थिक ऐश्वर्य मी या महात्म्याच्या ठिकाणीं पाहिलें. 'वृत्तिशून्य योगेश्वर' या दोन शब्दांत महाराजांचें वर्णन करितां येतें. ज्याला ज्या पुरुषापासून कांहीं विशेष परमार्थलाभ घडतो त्याला त्याविषयीं विशेष आदर वाटणें साहजिक आहे. जगांत अनेक सत्पुरुष आहेत व कोणाचें कोणापासून काय कार्य होतें हें ज्याचें त्यालाच माहीत असतें. सर्व सत्पुरुष स्वरूपाकार झालेले महात्मे होत. मुमुक्षु-साधकांत मंद किंवा तीव्र असे भेद असूं शकतील, पण पोंचलेल्या साधूंत भेद कोठचा असणार? हें यद्यपि खरें, तथापि ज्याच्या दर्शनसमागमांत आपल्याला परमार्थाचा मार्ग लागतो, आपले कांहीं संशय जातात, कांहीं निश्चय वळावतो, त्याविषयीं आपल्याला विशेष प्रेम वाटतें. ब्रह्मपर्वतावरून निघालेली गोदा समुद्राला मिळेपर्यंत सर्वच ठिकाणीं सारखीच पावन असते, पण तिच्या तीरावर ज्या क्षेत्रीं आपली दीर्घकाळपर्यंत सुखानें वस्ती झालेली असेल त्या क्षेत्रावर आपलें विशेष प्रेम असतें. गंगा

एकच, पण आपल्या मर्यादित बुद्धिक्षेत्रामुळें आपली निवडानिवड होऊन जाते.

२. सीतारामहाराजांचा दर्शनसमागमलाभ सतत तीन महिने झाला. त्यांनीं कोठें मठ स्थापिला नाहीं, ग्रथ केले नाहींत, विशेष चमत्कार केले नाहींत, शिष्यशाखा वाढविली नाहीं, आपल्यामागें आपलें कोणतेंच स्मारक करून ठेवलें नाहीं, विशेषत्वाला येऊन त्यांनीं कांहींच केलें नाहीं; तथापि त्यांच्या ठायीं मुरलेपणाचीं लक्षणें स्पष्ट दिसत होतीं. 'वेडा सीताराम !' ह्या शहाण्यांच्या जगांत ते आपणांस 'वेडा सीताराम' म्हणवीत. खरेंच जगाच्या दृष्टीनें ते वेडे होते. विद्या, धन, लौकिक, व वायकापोरें यांपैकीं त्यांनीं कांहींच मिळविलें नाहीं ! जगाला बायका, पैका व प्रतिष्ठा हीं तीन फार प्रिय असतात, त्यांनीं यांपैकीं एकही जन्मांत कमावलें नाहीं. त्यांनीं फक्त हरि जोडला. ब्रह्मानंदांत ते सर्वकाळ निमग्न असत. त्यांच्या चेहऱ्यावर अलौकिक तेज झळकत होतें. त्यांच्या वाणींत पराकाष्ठेचें माधुर्य भरलें होतें. ते पूर्णानंदाचा जणुं समुद्रच होते. त्यांची वृत्तिशून्यता मोहक होती. देहांत असून ते पूर्ण विदेही होते. कसलाही संसारतप्त जीव त्यांच्याकडे गेला कीं त्यांच्या दर्शनाबरोबर त्याची उद्विग्नता पार नाहींशी होत असे. पोरांचे घोळके त्यांना पाहतांच आपले खेळ विसरून त्यांच्या समागमें धांवत असत. त्यांची बालवृत्ति असाधारण होती. बालाच्या आवाजापेक्षांही त्यांच्या आवाजांत विलक्षण माधुर्य होतें, मांजुल्य होतें, निर्व्याजता होती. मुलाबाळांत ते अधिक मिसळत. रामायणांत शरयूनदीचें वर्णन करितांना 'रमणीयं प्रसन्नं च सज्जनानां मनो यथा' याप्रमाणें तिच्या जळाचें वर्णन केलें आहे. त्यांतील 'रमणीय'

व 'प्रसन्न' हीं पदें सज्जनांनाही लावलीं आहेत. महाराजांना पाहतांच हीं पदें मला नेहमीं आठवत.

३. यांच्या वडिलांचें नांव बापूराव विनायक. ते नोकरीच्या निमित्तानें सातान्यास राहत. ते सातारचे सुभेदार. सातान्यास सुभेदारांचा वाडा आहे. महाराजांची जननी लहानपणीं वारली व सापत्न मातेनें सुरुचीप्रमाणें ह्या ध्रुवबाळाचे अतिशय अनन्वित छळ केले; घरांत सर्व अनुकूल असून तिनें याला कधीं उपाशीं ठेवावें, शिळेंपाकें खायला घालावें, गालगुच्चे घेऊन व मारून अवाच्य बोलावें, व हा पोर मरेल तर माझ्या मुलांच्या वाटेंतला कांटा उपटेल असें चिंतावें असें म्हणतात. बालसीतारामाला घरांत मायेचा शब्द मिळेनासा झाला. पुरुष दुसऱ्या वायकोच्या ताटाखालचें मांजर होऊन जातो हा साधारण नियम आहे, त्याप्रमाणें त्याच्या बापानेंही त्याची होत असलेली आबाळ निमूटपणें पाहिली ! बारा वर्षांचें वय झालें तेव्हां एके दिवशीं अमानुष छळाला कंटाळून सीतारामानें एका लंगोटीनिशीं घर सोडलें व पूर्वपुण्यबळानें त्यांना अक्कलकोटास खेंचून नेलें. तेव्हां अक्कलकोटचे स्वामी नुक्तेच प्रगट झाले होते ! स्वामींच्या दर्शनासाठीं चारपांचशें माणूस जमा झालें होतें. सीताराम अनवाणी चालत आलेला, वय कोमल, मूर्ति गौरवर्ण व अतिशय सुकुमार, प्रवासाच्या कष्टांमुळें व भुकेमुळें व्यथित झालेला, अशा स्थितींत स्वामींपासून दोन फर्लांगावर सीताराम आला. स्वामींची मुद्रा जरा चंचल झाली व "अरे ! जा जा ! त्या सित्याला लवकर आणा. मंगळवेढ्याहून आला आहे. भूक लागली आहे त्याला. आणा लवकर" 'असे शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडले. लगेच १०।२० मंडळी धांवली. सीतारामाला महाराजांजवळ आणतांच

वत्सधेनुसमागमाचा प्रकार लोकांस दिसला. सीताराम दुःख-क्लेशाच्या वणव्यांतून सुटलेल्या हरिणबालकाप्रमाणें धांवतच त्या महापुरुषाच्या सुखशीतल अंकछायेंत घुसला. महाराजांनीं अत्यंत प्रेमानें अवघ्राण केलें व त्याच्या जेवणाची व्यवस्था केली. स्वामींना या नवबालकाविषयीं वाटलेलें प्रेम पाहून मंडळीस थोर अचंबा वाटला, जनार्दनस्वामींकडे एकनाथ गेले तेव्हांचा प्रकार आठवला; पूर्वजन्माचे लागेबांधे असे असतात असें कित्येक म्हणाले. सीताराम स्वामींजवळ सहा वर्षें राहिले. महाराजांच्या मुद्रेकडे पाहत बसावें, ते देतील तेव्हां खावें, सांगतील तेव्हां निजावें. क्षुधा, तृषा व निद्रा इ० सर्व देहधर्म, प्राणधर्म, मनोधर्म जागच्या जागीं लोपले, नाहींसे झाले ! स्वामींच्या अमृतदृष्टीच्या वृष्टीमुळें सीतारामाच्या अंतःसृष्टींत पार बदल होऊन गेला. अठरा वर्षांच्या वयांत सीताराम कृतार्थ झाले. **'अरे ! जेथून आलास तेथें जा'** असें म्हणून डोक्यावर थापटचा मारीत स्वामींनीं सीतारामास रजा दिली. सीताराम मंगळवेढचास आले. सीताराम आले तेथें गेले, मूळस्वरूपीं बैठक मारून बसले. मंगळवेढचास ते चाळीस वर्षें होते. अखेर ३ महिने उत्पातांनीं (रुक्मिणीच्या पुजाऱ्यांनीं) त्यांना पंढरपुरास आणलें. मंगळवेढेकरांना त्यांचा सहवास फार घडला. 'वेडा सीताराम' सर्वांस माहीत होता. दामाजीपंत, चोखामेळा, कान्हूपात्रा, मौनीबुवा इत्यादि संतांची परंपरा त्या गांवांत चालत आलेली त्यांनीं पुढें चालविली. बारा वाजतां कोणाच्या तरी घरांत जाऊन 'आई ! टाक भाकरी' म्हणून त्यांनीं म्हणावें, उभ्याउभ्या अर्धी भाकरी खावी व पाणी पिऊन स्मशानांत जाऊन पडावें ! एका कलालानें त्यांना एकदां जबरीनें दारू पाजली होती तेव्हां ती फुंकणींत पाणी ओतल्याप्रमाणें

जशीच्या तशी सरळ अपानद्वारानें सगळी गळून पडली ! ते 'मी' कधीं म्हणत नसत. एकदां एकानें त्यांची आरती करण्यास प्रारंभ केला तेव्हां चुकून 'ए टोण्या, मी देव आहे कां रे ?' असं म्हणून त्यांनीं ती पाडून टाकली. त्यांनीं कोणाला उपदेश केला नाहीं. तथापि "रामराम म्हणावें, नामस्मरण करावें, व्युत्पत्तीच्या नादीं लागूं नये, तें ढोंग आहे" असें ते कधीं बोलले तर बोलत असत. मनुष्य पाहिल्याबरोबर त्याची भूमिका ते जाणीत व मनोगत नेमकें सांगत. एकदां तेथील एका अंमलदारानें रात्रीं एकांतांत आपल्या बायकोच्या थोबाडींत मारली होती. दुसऱ्या दिवशीं तो महाराजांच्या दर्शनास आला तेव्हा "ए, बायकोला मारूं नये. ती देव आहे, भूतमात्रीं हरीला पाहावें. काय करतोस वेदांताचीं बुकें ! मारूं नये ! छत् ! तें बोंगळ आहे" असे ते नेहमीच्या मनोहर वाणीनें म्हणाले. एक बाई दर्शनास आली असतांना 'रात्रीं ऽऽ पाशीं निजून माझ्या पाया (जवळ) पडायला आलीस होय ?' असें म्हणत तिच्या कपाळावर त्यांनीं पाय झाडले. बाईचें तोंड कोळशासारखें झालेलें पाहून महाराज किती खरें बोलले तें आम्हां प्रेक्षकांस सहज कळलें. असे किती तरी चमत्कार आम्हीं स्वतः पाहिले आहेत. महाराजांचें साधुत्व अपूर्व होतें. पांचशें वेळां मनुष्य दर्शन घेऊन बोलून गेला तरी त्याच्या मूर्तीचा फोटो त्यांच्या स्मृतीवर पडत नसे ! त्यांना नाम-रूपाची ओळख नव्हती, ते वृत्तिशून्य योगेश्वर होते. अखंडानंदा-नुभवांत ते निमग्न असत. त्यांच्या चेहऱ्यावर बालभावाचा रम्य आनंद उमटला होता. देहावसानाच्या पूर्वीं पंधरा दिवस ते सीता-राम जाणार' म्हणून म्हणाले होते. श्रीसीतारामाच्या चरणीं 'मुमुक्षू 'चे शतशः प्रणाम असोत.

त्याच वेळीं पंढपुरास **लक्ष्मण बोवा वाखरीकर** म्हणून एक सत्पुरुष असत. ते वाखरीस राहात. भोंवतीं केतकीचें बन होतें, त्यांत पुष्कळ सर्प असत. दोन चार सर्प नेहमीं त्यांच्या जवळ व अंगावर खेळत. त्यांनीं 'ये बेटा!' म्हणून सर्पाला उचलून घ्यावें व अंगाखांद्यावर खेळवावें. सर्प त्यांजपाशीं निर्विष असत. दर एका-दशीला ते पंढरीस येत. दर्शनोत्सुक लोकांची फार उपाधि वाढली तेव्हां ते गांवांत येईनासे झाले. लांब चंद्रभागेच्या पात्रांत कोठेंतरी स्नान करून माध्यान्हींच्या सूर्याला अर्घ्य देऊन व कळसाचें दर्शन घेऊन तसेच पळत ओलेत्यानें वाखरीस जात! अशा स्थितींत त्यांचें दर्शन आम्हांला घडलेलें आहे. हे जातीचे शूद्र असत; पण जाति, विद्या, कुल, रूप, कर्म, लिंग इ. भेद निजानंदीं पहुडलेल्या महात्म्यांच्या ठिकाणीं पाहण्याचें कोणासही भान उरत नाहीं.

# ६. विठोबाअण्णा

१. श्री. विठोबाआण्णा कऱ्हाडकर, दप्तरदार, यांची महाराष्ट्र काव्यवाचकांस व भाविकांस माहिती आहेच. यांचे (१) गजेंद्रचंपू (२) सुश्लोकलाघव, (३) हेतुरामायण, इत्यादि ग्रंथ व संस्कृत व मराठी पदें अत्यंत प्रसिद्ध आहेत. हे मोठे प्रेमळ, रसिक व विद्वान् होते. यांच्या काव्यांत भक्तिरस नितांत भरलेला असतो.

२. हैद्राबाद राज्यांत गुलबुर्ग्याजवळ बेंदर नामक एक छोटासा गांव आहे. त्या गांवावरून यांच्या घराण्याला बेंद्रे हें उपनांव मिळालें. बेंद्रे यांच्या घराण्यांत वरील सत्पुरुषांचा जन्म झाला हे शांडिल्यगोत्री देशस्थ ब्राह्मण. सवाई माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दींत बाळाजीपंत बेंद्रे यांची विद्वत्ता व कर्तव्यदक्षता पाहून यांना वऱ्हाडप्रांतीं दप्तरदारीची सनद देण्यांत आली होती. बाळाजीपंतांस महादाजी व त्र्यंबक हे दोन पुत्र झाले. महादजींनाही १४ व्या वर्षीं दप्तरदारीची जागा मिळाली. यांना 'तात्या' म्हणत व यांची कीर्ति त्यावेळीं पुष्कळ पसरली होती. तात्या हे मोठे कर्मनिष्ठ व सुशील होते. त्यांचा प्रथम पुत्र रामचंद्र हा मयत झाल्यावर पुष्कळ वर्षें अपत्य न झाल्यामुळें ते फार दुःखी होते. अखेर शके १७३४ पौष कृष्ण ३० ह्या दिवशीं त्यांच्या पोटीं विठोबा अण्णांचा जन्म झाला. हे बालपणीं मोठे खेळाडू होते. आईबापांच्या लाडांत वाढल्यामुळें लिहिण्यापुसण्याकडे यांचें लक्ष अगदीं नसे. यांचें अक्षर मात्र पुढें सुधारलें. ते फार दिव्य अक्षर लिहीत. सदाशिवगड येथील चिमाणाजीपंत विरमडकर यांची कन्या गयाबाई यांच्याशीं त्यांचा विवाह

वयाच्या १२ व्या वर्षी झाला. पुढें अण्णांना कसरतीचा शोक लागला. राघोपंत आपटे यांच्यापाशीं तालीम शिकून ते पटाईत झाले. ह्या उभयतांनीं स्वहस्तानें कृष्णातीरावर महावीराचें देऊळ बांधलें. अण्णा पुराणिक यांच्यापाशीं ते विद्या शिकूं लागले. थोड्याच दिवसांत रूपावलि, समासचक्र, रघुवंश इ. शिकून पुढें पंचमहाकाव्यांत ते निष्णात झाले. पुढें हे अनेक गुरूंपाशीं व्याकरण, वैद्यक, पूर्वमीमांसा हें शिकले. जात्या रसिक व भाविक असल्या-मुळें पुढें कीर्तन करूं लागले. हे शीघ्र कवि होते. कीर्तनसमयीं तत्काळ रचून श्लोक व पदें म्हणूं लागले. वाणी अत्यंत मधुर, गायनाचा उत्तम अभ्यास, शीघ्र कवित्वशक्ति, थोर विद्वत्ता, अलौ-किक रसिकता व उत्कट रामभक्ति ह्या गुणांमुळें ह्यांची कीर्ति महाराष्ट्रभर लवकरच फांकली.

३. पेशवाई नष्ट झाल्यावर अण्णांनीं पश्चात् सातारच्या महा-राजांच्या जवळ दुय्यम कारकुनाची नौकरी केली. अण्णांच्या वयाच्या २८ व्या वर्षी त्यांचे वडील आटोपले व वयाच्या ३० वर्षी त्यांच्या प्रिय पत्नीनें परलोकचा मार्ग सुधारला. ह्या वेळीं त्यांस दोन पुत्र व एक कन्या होती. वडील पुत्र ह्या वेळीं १२ वर्षांचा होता. अण्णांचा विचार अग्निहोत्र घेण्याचा होता पण तो सफल झाला नाहीं. अण्णांच्या आप्तेष्टांनीं दुसरा विवाह करण्याचा पुष्कळ आग्रह केला. पण अण्णांनीं कोणाचेंही या बाबतींत ऐकलें नाहीं. ते द्वितीय विवाहाच्या फंदांत पडले नाहींत. वयाच्या ३२ व्या वर्षी त्यांची माताही कैलासवासी झाली.

४. अण्णांनीं यानंतर संसाराचें एकेक बंधन कमी केलें व ईश्वर-भक्तींत ते तल्लीन झाले. अहोरात्र रामनामाचा घोष करण्यांत ते गुंगून गेले.

त्यांनीं श्रीबाबामहाराजांपाशीं वेदांतशास्त्राचें.अध्ययन केलें व त्यांजपासूनच त्यांनीं मंत्रोपदेश घेतला. मध्यंतरीं त्यांना अर्धांगवायूचा विकार जडला व तो कमींतकमी २५ वर्षें राहिला. अशा स्थितींत त्यांनीं आपली नौकरी सोडली व सर्वकाल ते भजन, पूजन, काव्य-रचना, पुराणश्रवणकथन इत्यादिकांत सारूं लागले. ह्याप्रमाणें ह्या सत्पुरुषाचें अल्पचरित्र पुण्यकर्माचिरणांत गेलें. ते शके १७९५ च्या चैत्र महिन्यांत दरसालचा आपला रामनवमीचा उत्सव मोठ्या समारंभानें आटोपून आजारी पडले व चैत्र वद्य १० रोजीं पाठींत एक विलक्षण कळ उठून क्लेश पावले. तथापि त्यांची रामभक्ति उत्कृष्ट असल्यामुळें ते अखेरपर्यंत ‘ राम राम ’ म्हणत होते. एका-दशीच्या दिवशीं सकाळीं ते रामरूप झाले.

●

## ७. साधु रंगदास

१. परमसुख ज्यांना प्राप्त झालें व मनुष्यजातीवर अत्यंत प्रेम असल्यामुळें ज्यांनीं आपला हा अनुभव जगास व्यक्त करून दाखविला, तसेंच आदरबुद्धि व पूज्यभाव यांनीं युक्त होऊन सर्व जग ज्यांच्या चरणीं नम्र होत आहे असे सत्पुरुष आपल्या या आशिया खंडांत किती तरी निर्माण झाले आहेत! **श्रीशंकराचार्य** हे केवळ बुद्धीचे सागर असून एका परमात्म्यावांचून या अखिल विश्वांत दुसरें कांहींच नाहीं असें यांनीं सिद्ध केलें. **श्रीरामानुज** हे विशाल अंतःकरणाचे होते, यांनीं परमेश्वराचे चरणीं सर्वभावें लीन होण्याचें महत्त्व वर्णन केलें. **बुद्धदेव** हे विरक्तांतील शिरोमणि. सर्वभूतीं सारखें प्रेम संपादन करण्यासाठीं त्यांनीं सर्वस्वाचा त्याग केला! पूर्ण श्रद्धा व शुद्धाचार यांच्यायोगानें परमेश्वरासमोर जाण्याची पात्रता अंगीं येते अशी **ख्रिस्त** योग्यानें द्वाही फिरविली. सर्व कर्में ईश्वरार्पण करून सतत प्रार्थना करीत राहण्याचा मुक्ति-मार्ग **महंमद पैगंबरानें** दाखविला. भक्तियोगाचा मूर्तिमंत अवतार जो **चैतन्यदेव** त्यानें तर भक्तिमार्गानें सहस्रावधि जीवांना आनंद-सागराची प्राप्ति करून दिली! अलीकडे भगवान् **श्रीरामकृष्ण परमहंस** ह्यांनीं सर्व धर्म एकच आहेत असें सिद्ध करून भक्तिमार्ग, योगमार्ग व ज्ञानमार्ग यांचा प्रसार केला. अशा सत्पुरुषांस प्रसव-णाऱ्या या भूमातेनेंच आपलें एक दिव्य पुत्ररत्न इ. स. १८९३ सालीं अमेरिकेंतील चिकागो शहरीं भरलेल्या सर्वधर्म–परिषदेस पाठविलें होतें. हें रत्न म्हणजे स्वामी **विवेकानंद** हे होत. मनुष्य-

मात्राची सेवा कशी करावी, याचें उत्कृष्ट उदाहरण ह्यांनीं घालून दिलें. आत्मा मुक्त व स्वतंत्र आहे ही गोष्ट त्यांनीं मोठ्या गंभीर वाणीनें आपल्या पाश्चिमात्य बंधुभगिनींना समजावून दिली, मुक्त होण्याचा खरा मार्ग दाखविला आणि पौर्वात्य राष्ट्रांचें ज्ञान व वेदांतशास्त्र हीं सार्वत्रिक होण्यास योग्य आहेत, अशी त्यांची खात्री पटवून दिली. ज्या ज्या सत्पुरुषांनीं ह्या भूमींत जन्म घेऊन तीस पावन केलें त्या सर्वांचीं नांवें नमूद करणें शक्य नाहीं. तथापि एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, जगांत निरनिराळ्या काळीं व निरनिराळ्या परिस्थितींत असे महात्मे उत्पन्न झाल्यामुळेंच आत्मज्ञानाचा प्रवाह चोहोंकडे सारखा सुरू राहिला आहे. अशाच एका थोर विभूतीचें चरित्र खालीं दिलें आहे. आत्मज्ञानाच्या प्रकाशानें " नॉर्दर्न सरकार्स " हा प्रांत पुनीत करणाऱ्या या साधुपुरुषाचें नांव **रंगदास** होतें.

२. मच्छलीपट्टण येथील मध्यम स्थितीच्या एका कुलीन घराण्यांत सन १८८० च्या जून महिन्यांत रंगदास जन्मास आला. त्याचे वडील गाड्यांच्या कारखान्यावर देखरेखीचें काम करीत असत. त्यांचें वर्तन साधें व धार्मिक होतें. प्रेमळ भक्त असल्याकारणानें साधूंचा समागम त्यांस नेहमीं आवडे. त्यांच्या तोंडांतून जन्मांत कधीं मिथ्या भाषण निघालें नाहीं असें सांगतात. रंगदासाच्या आईचें लक्ष केवळ परमार्थाकडे असल्यामुळें तिला तर लोक देवाप्रमाणें भजत. अशा परमधार्मिक, प्रेमळ, सत्यशील व भाविक मातापितरांच्या पोटीं रंगदासाचा जन्म झाला आणि आपल्या जीवनानें ही आर्यभूमि पवित्र करून २५ वर्षांच्या वयांतच त्यानें इहलोकाचा त्याग केला ! महात्म्यांच्या चरित्रांतील पूर्वभाग फार प्रसिद्ध नसतो. त्यांची बुद्धि व आत्मा यांचा विकास होऊन

परिपूर्णता अंगीं आल्याखेरीज ते जगाच्या निदर्शनास येत नाहींत. रंगदासाच्या चरित्रालाही हाच नियम लागू आहे. प्राथमिक शाळेंत तो पहिल्यानें जाऊं लागला त्या वेळच्या त्याच्या गुरूनें त्याचें चरित्र तेलगू भाषेंत लिहिलें आहे. तो म्हणतो कीं, "रंगदास फार थोडे दिवस शाळेंत राहिला. पण तेवढ्यांतही त्याचें वर्तन पोरकट नसे. घरीं भागवत वगैरे पुराणें रात्रीं वाचण्याचा परिपाठ होता त्या वेळीं तर तो नित्य हजर असावयाचा. भक्तांच्या व देवाच्या चित्तवेधक कथा ऐकून त्यानें इतकें हंसावें कीं, ह्यास वेड तर लागलें नाहींना असा पाहणारास संशय येई. त्याचें कोमल अंतःकरण आनंदानें सदोदित परिपूर्ण असे." इतक्या लहान वयांत असतांनाच त्याचे अंगचें अलौकिक तेज गुरूनें ओळखिलें आणि त्यास वाईट मुलांची संगत लागूं नये म्हणून विशेष काळजी बाळगिली. रात्रीं पुराणांत ऐकिलेल्या गोष्टी शाळेंतून आल्यावर आपल्या सोबत्यांस जमवून रंगदासानें सांगाव्या व नंतर हरिनामाचा गजर केल्याशिवाय एकाही मुलास त्यानें तेथून जाऊं देऊं नये. शाळेंत त्याचा अभ्यास फक्त साधारण लिहिणें, वाचणें व त्रैराशिकापर्यंत गणित इतकाच झाला. रात्रीची पुराणाची वेळ मात्र त्यानें कधीं चुकूं दिली नाहीं. रामायण, महाभारत व भागवतांतील प्रल्हाद, नारद, ध्रुव, अंबरीष, कुचैल, भीष्म, शुकदेव, श्रीकृष्ण अशा विभूतींच्या प्रेमळ कथा तो इतक्या लक्ष्यपूर्वक ऐके कीं, पुढें कित्येक वर्षांनींदेखील त्या चटकदार भाषेंत तपशीलवार पण बिनचूक त्यास सांगतां येत असत. त्याची स्मरणशक्तीच अपूर्व होती.

३. दीनदुबळ्या लोकांविषयीं रंगदासास अल्पवयांतही किती कळवळ वाटे, हें खालील एकदोन गोष्टींवरून दिसून येईल. एकदां त्याचे बापानें शाळेची फी नेऊन देण्यासाठीं त्याजवळ दिली. रस्त्यांत

एक मुलगा उपाशी आहे असें दिसतांच त्यास त्यानें ते पैसे देऊन टाकले व शाळेंत फीशिवाय शिक्षक बसूं देणार नाहींत म्हणून तो आपल्या घरीं येऊन बसला. असें वारंवार होऊं लागलें तेव्हां बापानें फीचे पैसे परभारें गुरुजीकडे पोंचते करण्याचें सुरू केलें. वाटेंत कोणी भिकारी भेटला कीं रंगदासानें आपल्या अंगांतील कपडा त्यास देऊन टाकावा आणि खुशाल उघडें घरीं परत यावें. त्याजवळ थोडे पैसे देऊन बाजारांतून कांहीं फळें आणावयास बापानें एकदां त्यास धाडिलें, पण रस्त्यांत चिंध्या पांघरलेलीं व भुकेनें व्याकुळ झालेलीं कांहीं माणसें त्याचे नजरेस पडतांच त्यांस ते पैसे बिनदिक्कत देऊन टाकून तो घरीं रिकामा परत आला. बापानें विचारलें, "फळें आणलींस का ?" रंगदास म्हणाला, "बाबा ! तुम्हांला अमरत्व प्राप्त करून देणारीं फळें मीं आज आणलीं आहेत." 'ह्याचा अर्थ काय' असें बापानें विचारतांच रंगदासानें उत्तर केलें, "घटकाभर तोंड गोड करणाऱ्या या फळांऐवजीं ते पैसे गरिबांस देऊन चिरकाल सुख देणारीं दिव्य फळें मीं आणलीं असें नाहीं का म्हणतां येणार ?" बापही मोठा धर्मशील होता. त्यास हंसूं आलें व त्याचें या उत्तरानें पूर्ण समाधान झालें.

४. कांहीं दिवसांनीं रंगदासानें शाळा सोडली. त्याचीं पुढील आठ वर्षे एकांतस्थळीं बसून गहन विचार करण्यांत गेलीं. तो अपरात्रीस उठे आणि दूर कोठें तरी जाऊन बसे. तो दुसऱ्या दिवशीं दुपारपर्यंतही घरीं परत येत नसे. घरच्या माणसांस वाटलें कीं, हा वेडा होत चालला आहे, म्हणून त्यांनीं त्याचें लग्न करण्याचें मनांत आणलें; पण या गोष्टीस तो राजी होईना. मोठमोठ्या लोकांच्या मुली त्यास सांगून आल्या, पण लग्नाची गोष्ट निघाली कीं, त्याला मोठा तिटकारा येई. त्याचे लहानपणचे गुरुजी त्यास कांहीं बोध

करून ताळ्यावर आणतील असा विचार करून त्यांजकडे रंगदासास बाप घेऊन गेला. त्या वेळीं गुरुशिष्यांमध्यें जो चटकदार संवाद झाला तो खालीं दिला आहे--

**गुरुजी** :—मुला ! आपलीं माणसें व घर सोडून वेड्यासारखें कोठें तरी भटकत राहावें व आईबापांस दु:ख द्यावें, हें तुला योग्य नाहीं.

**रंगदास** :—महाराज ! आपल्याच घरीं ऐकिलेल्या पुराणांतील गोष्टींवरून माझी ठाम खात्री झाली आहे कीं, मोक्षाची तीव्र इच्छा उत्पन्न होऊन खरा मुमुक्षु बनल्याशिवाय मुक्तीचा लाभ होणें नाहीं व त्यासाठीं मीं हा मार्ग पतकरला आहे व यांत माझ्या आड कोणीं येऊं नये, एवढेंच माझें मागणें आहे.

**गुरुजी** :—शास्त्राप्रमाणें पाहिलें तर संन्यास घेण्याची योग्यता येण्यास अगोदर गृहस्थाश्रमांत कांहीं काळ घालविला पाहिजे. परमार्थ साधून आत्मज्ञानहि त्या आश्रमांतच संपादितां येतें. त्यांत सुखदु:खादिकांचा जो जो नवीन अनुभव येतो, त्यानें साधकाचे मनावर सनातन सत्यतत्त्वाचा उत्तम ठसा वठतो. गृहस्थाश्रमांत मनुष्यजातीची सेवा घडते. बाकीच्या आश्रमांतील लोकांचा सर्व योगक्षेम या एका आश्रमावरच अवलंबून आहे. मुला, त्वां आपलें लग्न करून आमच्याप्रमाणें गृहस्थाश्रम अंगीकारावा आणि ऐहिक सुखदु:खांचा अनुभव घेतल्यानंतर मग ज्ञान व मोक्षप्राप्तीचा प्रयत्न करावा हें योग्य आहे. संन्यासरूपी भव्य इमारतीचा मजबूत पाया या कर्मानेंच घातला जाईल व संकटें आणि मोहरूपी वादळें यांशीं झगडतांना तुझें मन बिलकुल डगमगणार नाहीं.

**रंगदास** :—महाराज ! आपला हा सर्व उपदेश माझ्या मनांत चांगला बिबला, परंतु प्रपंचांत राहून त्यांतील कष्ट व दगदग सहन करूनही परमार्थाची प्राप्ति करून घेण्याइतकें माझें मन अद्यापि

समर्थ झालेलें नाहीं. प्रपंच व परमार्थ हे दोन्हीही एकाच वेळीं साधून घ्यावे हें चांगलें खरें, पण माझे अंगीं तितकी ताकद आली नाहीं; म्हणून लग्न न करतांच आपलें आयुष्य भक्तिमार्गांत घालवावें, असा विचार मीं मनांत आणिला आहे.

**गुरुजी** :—तुला परमेश्वरानें हातपाय दिले आहेत. तेव्हां दुसऱ्यावर आपलें ओझें पडूं न देतां स्वतः काम करून तूं आपला निर्वाह करावा. होतां होईल तों उद्योग करून मनुष्यमात्रावर उपकार करण्यांत आपला देह झिजविण्यासाठींच आपणांस हीं सर्व इंद्रियें देवानें दिलीं आहेत.

**रंगदास** :—आपण म्हणतां तसें वागण्यास मी असमर्थ आहे. परोपकारार्थ कामकाज करून शरीराचें संरक्षण करावयाचें एवढेंच जरी असेल तरी तें शरीरसंरक्षण अवश्य आहे असें मात्र मला वाटत नाहीं. दुसऱ्यावर ओझें पडण्याविषयीं म्हणाल तर मी एवढेंच सांगतों कीं, मी कधीं, कोणाचीही पोटासाठीं याचना करणार नाहीं; किंबहुना अन्न खाण्याकडे मी आपले हाताचा उपयोगही करणार नाहीं. कृपा करा व माझ्या मनास येईल तसें मला वागूं द्या.

**गुरुजी** :—दुसऱ्यानें अन्न दिलेंच तर तें नाहीं का तूं घेणार ? स्वतः निरुद्योगी राहून लोक आपल्या कष्टांनीं मिळविलेलें जें काय देतील तें आयतोजीसारखें खाऊन राहणें तुला शोभत नाहीं.

**रंगदास** :—महाराज, मी अन्नाची देखील वासना राहूं देणार नाहीं. त्यावांचून वाटेल तितके दिवस काढण्याची माझी तयारी आहे. आतां न मागतांच कोणी अन्न दिलें तर तें घेण्यास मला हरकत मात्र दिसत नाहीं. कांहींही होवो, मला पोटाचें कामकाज होणार नाहीं आणि मी लग्न तर करणार नाहींच नाहीं. कारण या गोष्टीनें आत्मज्ञानाच्या मार्गांत अडथळा येतो.

**गुरुजी :**—बाबा रे! मातापितरांचें ऋण फार मोठें असतें; त्याची फेड तू कशी करणार ?

**रंगदास :**—आत्मविद्या मला साधल्यास तीच त्यांना देऊन त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्याची खटपट मी अवश्य करीन.

**गुरुजी :**—बरें, अशा स्थितींत तूं काळ कसा घालवशील ?

**रंगदास :**—आत्मज्ञान (मुक्ति) प्राप्त होईपर्यंत मी आहे असाच राहावा असा आपला आशीर्वाद असावा.

५. निखालस साधेपणा, सतत उल्हास व नेटाचा दीर्घ उद्योग हे गुण रंगदासाच्या अंगीं कसे एकवटले होते हें वरील मनोवेधक संवादावरून स्पष्ट दिसून येईल. लग्न करावयाचें नाहीं असा त्याचा कृतसंकल्पच झाल्याचें पाहून त्याच्या विरुद्ध सहजवृत्तीचे आड आपण येऊं नये असें गुरूस वाटलें. त्यांनीं त्याचे आईबापांस सांगितलें कीं, 'तुम्ही आतां रंगदासास त्रास देऊं नका. तो केवळ महात्मा होणार यांत संशय नाहीं.' लग्नासंबंधीं रंगदासाविषयीं आणखी एक आश्चर्यकारक गोष्ट समजते. त्यानें लग्नास तयार व्हावें म्हणून पुष्कळ प्रकारांनीं खटपट सुरू असतां एकदां त्याचे बापाच्या बोटास कांहीं दुःख झालेलें होतें. पुष्कळ उपचार केले, परंतु गुण येईना. शेवटीं लिंबाच्या रसांत तें बोट बुडवून धरल्यानें बरें होईल असें एका वैद्यानें सांगितलें. रंगदास जवळच होता; तो म्हणाला, 'मीच बाजारांतून लिंबू घेऊन येतों.' पण निघावयाच्या पूर्वीं त्यानें अशी कांहीं खुबीदार युक्ति केली कीं, तिच्यायोगानें प्रपंचांत किती दगदग व जबाबदारी माणसावर पडते याबद्दल त्याचे बापाची खात्रीच पटून गेली. बापाच्या पुढें जाऊन तो म्हणाला 'बाबा! मी लिंबू तर आणतों; पण तें तुम्हांला कशाला हवें!' हें ऐकून बापास दम निघेना. तो त्रासून म्हणाला, 'मूर्खा! मी बोटाच्या दुःखानें अगदीं

व्याकुळ झालों आहे आणि वैद्यानें त्यास लिंबाच्या रसाचा उपाय सांगितला आहे हें काय अजून तुला समजलेंच नाहीं ?' यावर रंगदास म्हणतो, 'बाबा, तें आहे हो मला ठाऊक. पण वेदना तुम्हांला होत आहेत कीं मला ! समजा कीं मी लिंबू नाहीं आणिलें तर काय होईल !' या भाषणानें तर बापास अगदीं संताप येऊन तो ओरडून म्हणाला, 'काय ? तूं माझ्या मरणाची का वाट पाहत आहेस ! पण तुला काय त्याची काळजी ! दुःख मला होत आहे तेव्हां लिंबाची गरज मलाच आहे ! तूं आपला आनंदांत आहेस. मला किती वेदना होतात याची कल्पना तुला कशाला होईल ! म्हणूनच मला वाटतें तूं अशा गमजा चालविल्या आहेस.' यावर मुलानें शांतपणें उत्तर केलें, 'अहो बाबा ! तुम्हीं माझें लग्न केलें तर त्यापासून माझे किती हाल होणार याची तुम्हांला कल्पनाही करतां येणार नाहीं. तुमचें हल्लींचें दुःख एका लिबानें बरें होईल, पण माझी जी दशा होणार ती वैद्याच्या कोणत्याही औषधांनीं बरी होणारी नाहीं. मला तें दुःख जन्मभर भोगावें लागणार. मी गमजा करतों असें तुम्हांला वाटतें, पण माझ्या लग्नाची खटपट करणाऱ्यांनीं मात्र निःसंशय त्या चालविल्या आहेत. यास्तव बाबा ! कृपा करून लग्नाविषयीं मला यापुढें आग्रह करूं नका म्हणजे झालें. हा मी निघालोंच लिंबू आणायला !'

६. रंगदासाचा निश्चय ढळणें अशक्य आहे अशी त्याचे बापाची व भावाची आतां अगदीं खात्री झाली. कुटुंबामध्यें उपयोगी पडण्याजोगा कांहीं गुण त्याचे अंगीं येईल अशी आशा राहिली नाहीं. त्याला नेहमीं भटकत फिरण्याचा नाद होता. तेवढा तरी सुटण्यास अखेरचा उपाय म्हणून त्या उभयतांनीं रंगदासाला अगदीं निक्षून सांगितलें कीं 'तुला आम्ही आतां पोसणार नाहीं, तूं आपला वाटेल

तसा चरितार्थ चालव.' हें ऐकून रंगदास जो घराबाहेर पडला तो कित्येक दिवस पुन्हां परत आलाच नाहीं. मग बापास पश्चात्ताप होऊन त्यानें पुष्कळ ठिकाणीं शोध करून त्याचा पत्ता लाविला व त्यास फिरून घरीं आणिलें आणि त्यास आपले इच्छेप्रमाणें वागण्यास पुन्हां कधीं मना केलें नाहीं. घर सोडल्यापासून रंगदासानें कांहीं खाल्लें नव्हतें अथवा खाण्यासाठीं कोणास कांहीं मागितलेंही नव्हतें. तरी तो पूर्ववत् आनंदी असून पाहणारासही आनंदवीत असे.

७. या सुमारास गोपाळराव व इस्मायलदास नांवाच्या भगवद्भक्तांच्या भेटीस रंगदास नियमानें जाऊं लागला. या दोघां भक्तांचीं भजनें मच्छलीपट्टणांत त्या वेळीं चालू होतीं. रंगदासाची त्यांजवर अर्थात् श्रद्धा बसली आणि त्यांजकडून आत्मिक ज्ञान संपादून योगाच्या कांहीं मार्गांचा त्यानें त्यांजवळ अभ्यास केला. तथापि त्यापासून त्यास सर्वस्वीं समाधान झाल्याचें दिसून आलें नाहीं. इस्मायलदासाकडे जात असतांना तेथें एक संभावित स्त्री नित्य येऊन त्याचें भजन मोठ्या प्रेमानें व अगदीं लक्ष्यपूर्वक ऐकत असते असें रंगदासाच्या नजरेस आलें. ही महान् साध्वी असून बुद्धिमत्ता व पूर्ण विरक्तता तिच्या चर्येवर स्पष्ट दिसत असे. तिचीही इस्मायलदासावर निष्ठा असून त्यांजवळ योगमार्गाचा अभ्यास ती करीत असे. अध्यात्मविद्येंत हीं दोघेंही सहाध्यायी बनलीं. या स्त्रीचें नांव चंदाम्मा होतें; ती वस्तुतः एका कोळ्याची मुलगी होती तरी वरवर पाहणारासही ती मुमुक्षु आहे असें चटकन् दिसून येई. आत्मिक व परमेश्वरविषयक अनेक व्यापक व महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधानें तिला फार दिवस अगदीं तळमळ लागून राहिली होती, परंतु अध्यात्मज्ञानाच्या बाबतींत सुखरूपपणें आपणांस श्रेष्ठ पदवीस पोंचवील असा योग्य गुरु तिला अद्याप मिळाला

नव्हता. इस्मायलदासाच्या योगमार्गानें तिचें समाधान झालें नाहीं. कांहीं दिवसांच्या सहवासानें रंगदास हा मोठा महात्मा आहे असा तिचा ग्रह होऊन त्याजवर पूर्ण भरंवसा ठेवण्यास हरकत नाहीं असें तिला वाटूं लागलें. त्याचे अंगची विशेष भक्ति व कळकळ पाहून हा आपल्या सर्व शंकांचें परिमार्जन करील अशी तिची खात्री झाली. ही बाईही ज्ञानी असून तिच्या सहवासानें आपला खरोखर फायदा होईल असें रंगदासासही वाटलें. उभयतांच्या मनांत परस्परां-बद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न होऊन ज्ञानवृद्धीची दोघांसही आशा लागली. अर्थात् त्यांचा सहवास हळूहळू वाढत चालला. परमेश्वर, जीवात्मा आणि त्यांचे परस्परसंबंध अशा गूढ विषयांवरील एकमेकांचे विचार ते समजून घेऊं लागले. उभयतांच्या संभाषणापासून चंदाम्मास जितका फायदा झाला तितका रंगदासास झाला नाहीं; तरी तिला तो स्नेही समजून धर्मशिक्षणाच्या कामीं तिला सहाध्यायी मानीत असे. आत्मविद्येंत रंगदासाइतकी पारंगतता तिला आलेली नव्हती तरी पण वैराग्य तिच्या अंगीं पूर्ण बाणलेलें होतें. आपणास गुरुमंत्र द्यावा अशी तिनें इच्छा दर्शविली. चंदाम्माला 'मला मंत्र कसा असतो तें माहीत नाहीं.' असें रंगदासानें सांगितलें. ईश्वरी तंत्र कांहीं विलक्षणच असतें. चंदाम्माची ही मनीषा कशी तृप्त करावी अशा विचारांत एके दिवशीं रस्त्यांतून तो भटकत असतां कागदाचा एक तुकडा त्याच्या दृष्टीस पडला. त्यानें तो उचलून घेतला, त्यावर एक मंत्र (त्याचा जप कसा किती करावा या माहितीसहित) लिहिलेला होता. तो पाहून त्यास अत्यंत हर्ष झाला. चंदाम्माकडे जाऊन त्यानें तो मंत्र तिला लागलीच यथाविधि शिकविला. तीही राजयोगी होती. त्या योगाच्या अभ्यासांतील अपूर्व गुह्यें त्यास तिनें सांगितलीं व त्यावरहुकूम रंगदासानें काळजीपूर्वक अभ्यास चाल-

विला. आतां तिची योग्यता त्यास कळून आली. तीस गुरु करून संपूर्ण राजयोग त्यानें कांहीं दिवसांत उत्तम रीतीनें साध्य करून घेतला. भक्ति व वैराग्य यांचें वास्तव्य त्याचे अंतःकरणांत अगोदर होतेंच; त्यांत राजयोगानें प्राप्त होणाऱ्या शक्तींची—सिद्धींची—जी भर पडली तिनें तो त्रिकालज्ञ झाला व गुरूसही त्यानें मागें सारिलें.

८. यमदूत नेहमीं टपलेले असतात; अंतकाल कोणालाही अगोदर कळत नाहीं. वर लिहिलेल्या गोष्टीनंतर लवकरच चंदाम्मा मरण पावली; त्या योगानें रंगदासास अनावर दुःख झालें. त्यानें दरसाल तिची पुण्यतिथि पाळण्याचें पवित्र व्रत आजन्म चालविलें. तिच्या मरणानंतर एकांतवासांत कांहीं काळ घालविण्याचें मनांत आणून त्यानें मौन धारण केलें. या वेळीं त्यास सोबत काय ती आपल्या जीवाचीच. ऐहिक गोष्टींविषयीं तो एक शब्दही काढीत नसे. सहज कोणीं विचारलेल्या प्रश्नास उत्तर देणें देखील आपल्या चिंतनास अडथळा आणणें आहे असें त्यास वाटे. मोक्षप्राप्तीच्या उत्कट इच्छे-मुळें प्रपंची लोक असतील तेथें राहणें त्यास असह्य झालें. तेव्हां त्यानें एकांतवास व मौन यांच्या द्वारें आपले साध्य प्राप्त करून घेण्यासाठीं अतोनात परिश्रम केले. बुडणाऱ्यास हवेचा एक श्वास मिळण्याची, पतंगास दिव्यावर उडी घालण्याची, किंवा भुकेनें व्याकुळ झालेल्यास अन्नाची जशी उत्कट वासना होते तशीच या अनादि संसारचक्रापासून व जन्ममरणापासून निखालस मुक्त होण्याची उत्कंठा रंगदासास लागली. वीस वर्षांच्या वयांतच सर्व-व्यापी मायेचा त्यानें ठाव काढिला व मनोभावानें सत्याचा शोध करितांकरितां तो त्या मायेच्याही पलीकडे गेला. एवढ्या अल्प वयांत त्यानें आपल्या अंतरात्म्याचें संशोधन करून साधुजन वाखाण-तील अशी दैवी शक्ति प्राप्त करून घेतली. ह्या मार्गांत असतां

लोक आपल्याशीं कसे वागतात, बरें म्हणतात कीं वाईट म्हणतात, याविषयीं त्यानें कधींही फिकीर बाळगिली नाहीं. कोणी साधु म्हणो किंवा भोंदु म्हणो तिकडे त्याचें लक्षच नसे. तो नेहमीं आत्मतृप्त, ईश्वरैकनिष्ठ राहून आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या तंत्रानें वर्तत असे.

९. गूढ विचारांत आतां रंगदास अधिकाधिक निमग्न होऊं लागला. इष्ट हेतु साध्य करून घेण्यांत गुंग असल्यामुळें जगापासून तो बहुधा अलिप्त असे–अगदीं लहान मुलासारखी किंबहुना वाऱ्या-पुढें जशी पाचोळ्याची तशी त्याची स्थिति झाली होती. कोणीही माणूस अगर एखादा पांच वर्षांचा मुलगादेखील त्याचा हात धरून नेऊं लागला, तर त्याजबरोबर वाटेल तिकडे तो जाई. एकटा अस-ल्यास मनांत कांहीं एक हेतु नसतांही तो कोणीकडे तरी चालूं लागे; मग तो सुंदर फरशीवरून जावो किंवा एखाद्या कांटेरी झाडावरून जावो, त्याची त्यास शुद्धच नसे. त्याचें चित्त सदा परमेश्वराकडे असावयाचें, मग शरीर कोणीकडे कां जाईना. एवढें खरें कीं, अशा अवस्थेंत तो आपल्या बापाकडे कधीं गेला नाहीं. मग कदाचित् पुन्हां आपणांस मायामोह पडेल अशी त्यास भीति पडली असली तर नकळे.

१०. रंगदासाकडे आतां बऱ्याच लोकांचें लक्ष वेधलें व ते त्याचे-भोंवतीं जमून त्यास त्रास देऊं लागले. कांहींनीं म्हणावें, ‘ कांहीं तरी वेड्यावांकड्या कल्पना मनांत येऊन त्याची अशी स्थिति झाली आहे.’ कांहींना वाटे ‘यास वेड लागलें आहे.’ कोणी ‘ याचे अंगांत पिशाच्च संचरलें आहे,’ व कित्येक म्हणत ‘ हें सर्व ढोंग आहे ! याला कसास लावून पाहिलें पाहिजे.’ कांहीं थोडे लोक मात्र हा ज्ञानी आहे असें समजून त्याची परीक्षा पाहणें किंवा त्याचे वर्तनास अडथळा आणणें चुकीचें आहे असें म्हणत. ह्याच्या

या स्थितीचें कारण काय असावें हें समजून घ्यावें अशी लहानपणापासून त्याचा परिचय असलेल्या कांहीं गृहस्थांस इच्छा झाली व त्याचे मौनाचा कांहीं उलगडा झालाच तर पाहावा म्हणून त्यांनीं त्यास पुनः एकदां प्रथमचे गुरूकडे नेलें. त्या गुरुशिष्यांचा थोडाच पण मोठा गोड संवाद झाला. त्यावरून आत्मविद्येंत त्याची बरीच प्रगति झाली आहे असें गुरुजींस कळून आलें. त्यांनीं त्यास निक्षून सांगितलें कीं, ‘ तुझा हेतु साध्य होण्याची वेळ फार जवळ आली आहे. यास्तव लोकांची गर्दी तूं आतां आपल्या सभोंवतीं राहूं देऊं नकोस. ’ रंगदासास हा उपदेश पटला आणि एकांतांत जाऊन त्यानें आपलें चिंतन पुनः सुरू केलें.

११. यास कांहीं वर्षें लोटून गेल्यावर, आजवर जिची अतिशय उत्कंठा लागून राहिली होती अशा गहन शांतीचा–स्वस्वरूपस्थितीचा–रंगदासास लाभ झाला. त्या प्रसंगाचें यथार्थ वर्णन करणें शक्य नाहीं. तो पूर्ण ज्ञानी झाला, आत्मवैभवांत अगदीं निरिच्छ बनला आणि परमानंदांत पोहूं लागला. या साक्षात्काराचे वेळीं त्याची स्थिति अशी झाली कीं, जीवात्म्याचें परमात्म्याशीं ऐक्य होऊन देहभावनेचा पूर्ण नाश झाला, विश्वरूपाचें ज्ञान झालें, क्षुद्र अहंकार जाऊन सगळ्या विश्वाचा अहंकार आला, जीवशिवांचा (ईश्वराचा) भेद गळाला, अहं (मी) या भावनेनें जीवावर अज्ञानाचें जें पटल आलें होतें तें सोऽहं (मी तोच आहें) या भावनेच्या प्रकाशानें पार नाहींसें झालें, आणि रंगदास कांहीं वेळ अगदीं निश्चल–समाधिस्थ–राहिला. त्या वेळीं सहजासहजीं तेथें जे लोक जमले होते त्यांस रंगदासाचें देहावसान झालें असावें अशी शंका येऊन त्यांनीं वैद्यास बोलाविलें. परंतु वैद्यानें तो निःसंशय जिवंत आहे अशी तपासून खात्री दिली. तेव्हां सर्वांस वाटलें कीं, निर्विकल्प

समाधि म्हणतात तशा परब्रह्ममय स्थितीचा रंगदास अनुभव घेत आहे. कांहीं वेळानें समाधि उतरल्यावर आपणांस प्राप्त झालेल्या या अप्रतिम आनंदाचें वर्णन करण्याचा प्रयत्न तो करूं लागला; पण भाषेनें तेथें हात टेकले. शेवटीं ‘डम् डम् डम्–डम्’ असा त्यानें शब्द केला. हे शब्द त्यानें पुनः पुनः उच्चारावे व आनंदाच्या भरांत खूप हंसत राहावें, नंतर शुद्धि गेल्यासारखी होऊन जमिनीवर पडावें व पुन्हां मुलासारखें हंसूं लागावें. जमलेल्या लोकांवर त्याच्या परमानंदाची छाया पडून तेही त्याच्यासारखें ‘डम् डम् डम् डम्’ म्हणूं लागत. या ‘डम् डम्’चा अर्थ काय? असें पुष्कळांनीं विचारलें म्हणजे रंगदास एक गाणें म्हणे. या गाण्यांत आत्मज्ञान झालेल्या माणसाच्या अंतरंगांतले विचार गोंवलेले आहेत.

१२. ब्रह्मज्ञान झाल्यावर रंगदासास हें सर्व विश्व आपलें घर आहे असें वाटूं लागलें. भिल्लाची झोंपडी आणि श्रीमंताचा महाल यांत त्यास कांहींच फरक दिसेनासा झाला. जिकडे न्यावें तिकडे तो खुशाल जाई. कधीं शेतांत असावें, कधीं समुद्रकिनाऱ्यावर जावें! तो कोठें जाईल याचा नियमच राहिला नाहीं. एकदां बरोबरच्या कांहीं निवडक शिष्यांसह तो समुद्रकांठीं गेला. समुद्राचे दर्शनानें त्यास इतका अमर्याद हर्ष झाला कीं, देहभान विसरून शिष्यांस तेथेंच सोडून तो पाण्यांत शिरला व त्यांत धांवत सुटला. पाणी फार खोल लागलें, तेव्हां शिष्य घाबरले व त्यास परत फिरा असें म्हणूं लागले. अंमळशानें तो परत फिरला, पण जणूं काय जमिनीवरच चालत आहे, असा पाण्यावरून तो चालत असलेला पाहून सर्व लोक आश्चर्य करूं लागले! असे एक दोन प्रसंग शिवाय करून आपल्या सिद्धींचा किंवा मानसशक्तींचा उपयोग रंगदासानें कधीं फारसा केला नाहीं. यापुढें केव्हां केव्हां रात्रीस देहभान

विसरल्यामुळें निवडुंगामधून चालत गेल्यानें रंगदासाचे सर्वांगास कांटे टोंचलेले दिसून येत. मग कोणी त्यास बसवून घेऊन हळूच ते कांटे काढीत, त्यावर कांहीं औषध लावीत व पुन्हां त्यानें इकडे तिकडे जाऊं नये म्हणून त्याजवर कांहीं वेळ नजर ठेवीत. तो कधीं मैदानांत आनंदाच्या भरांत नागवाच फिरतांना दृष्टीस पडला म्हणजे एखाद्या प्रेमळ भक्तानें त्यास कांहीं नेसवून घरीं घेऊन यावें. असाच आत्मदर्शनाच्या आनंदांत गात व हंसत असतांना एखादे वेळीं दलदलीच्या जागीं तो गुडघ्याइतका किंवा छाती-इतकाही गाळांत फसलेला आढळून येई. अशा स्थितींत सकाळीं त्यास कोणीं पाहिलें म्हणजे त्यास बाहेर काढून त्याचें अंग धुऊन त्याला त्यानें घरीं पोंचतें करावें. कधीं कधीं तर अशाच तऱ्हेनें कालव्यांतून फिरत राहिल्यामुळें त्याचे सर्व कपडे ओलेचिंब होऊन जात. एके दिवशीं मोठ्या सकाळीं असें झालें कीं, रस्त्याच्या बाजूनें लावलेल्या नवीन झाडांभोवतीं निवडुंगाचें दाट कुंपण होतें त्याचे आंत जाऊन बसलेला रंगदास दृष्टीस पडला. पुन्हां बाहेर येण्यास मार्ग न सांपडल्यामुळें रात्रभर तो तेथें बसून राहिला. धनगराचीं दोन मुलें तेथें आलीं. तीं फार लहान होतीं. त्यांनीं आपल्या रानवट पण बोबड्या बोलानें त्यास कांहीं प्रश्न विचारले. रंगदासानें त्यांस उत्तर तर दिलें नाहींच, त्याचें हंसणें मात्र सुरू होतें ! मुलांस वाटलें कीं, हा वेडा असावा. न जाणों हा आपणांस त्रास देईल, या संशयामुळे त्यास बाहेर काढण्याची खटपट त्यांस करवेना. एक पोक्त गृहस्थ तिकडून जात होता त्यानें हें पाहून कुंपणावर एक फळी टाकली आणि तिच्यावरून रंग-दासास बाहेर काढिलें. आंत शिरतांना त्याचे अंगास कांटे इतके बोंचले होते कीं, ते काढण्यास बराच वेळ लागला व त्यामुळें

झालेल्या जखमा बऱ्या होण्यास तर कांहीं दिवस लागले. याप्रमाणें देहाचें भान न राहिल्यामुळें बहुधा रोज तो कोणच्या ना कोणच्या तरी अडचणींत सांपडे. तेव्हां त्याच्या जीवास एखादे वेळीं अपाय घडेल अशी त्याच्या पुष्कळ हितचिंतकांस भीति पडली व म्हणून त्यांनीं त्याच्याच घरांत त्यास कोंडून ठेविलें.

१३. रंगदास पूर्णपणें मायापाश तरून गेला. दिशा, काल व कार्यकारणसंबंध यांचें बंधन त्यास आतां उरलें नाहीं. त्याची देहात्मबुद्धीच नाहींशी झाली. मग तो वाटेल तिकडे बिनदिक्कत फिरूं लागल्यास किंवा कांटेरी झाडें आणि राजवाडा यांत कांहींच भेद त्यास न दिसल्यास नवल तें काय ? स्वामी विवेकानंद यांचे शब्दांत सांगावयाचें म्हणजे “ शरीर म्हणून कांहीं आहे ही त्याची कल्पनाच मुळीं नष्ट झाली. ” स्वार्थबुद्धीचा अत्यंत ऱ्हास आणि वासनांचा पूर्ण त्याग या गोष्टींचा पुष्कळ गौरव अलीकडे व्याख्यानांतून वगैरे केला जातो, परंतु वरच्यासारखी योग्यता प्राप्त झालेल्या सत्पुरुषांचे ठायीं मात्र ते सद्गुण खरोखर दिसून येतात. परमेश्वरावांचून ज्याच्या मनांत दुसरा विचारच नाहीं व तत्प्रीत्यर्थ ज्यानें जगाचा व ऐहिक सुखें आणि भोगेच्छा यांचा पूर्ण त्याग केला आहे त्यासच सत्पुरुष असें म्हणतां येईल. त्यास शरीराची काळजी किंवा पर्वा काय म्हणून असेल ! भगवान् श्रीरामकृष्ण म्हणतात, “ आपलें शरीर एक चिखलाचा पिंजरा आहे असें सत्पुरुष मानितो. परमेश्वरावर ज्याची निष्ठा असते त्याचें खरें शरीर आत्मरूप असतें, सामान्य मनुष्यासारखें भौतिक ( पंचमहाभूतांचें बनलेलें ) नसतें. ” यापुढें रंगदासास सर्वांभूतीं विश्वात्मा दिसूं लागला. लहान मुलांनीं त्यास कधीं कधीं सुंदर फुलांचे हार घालावे, त्यास नमस्कार करावे व त्याचे समोर आनंदानें आणि

मोकळ्या मनानें खेळत राहावें. एखाद्या धीट मुलानें त्यास कोणीकडे तरी ओढून नेऊं लागावें व रंगदासानेंही त्याजशीं मोठ्या आनंदानें हंसतखेळत राहावें.

१४. रंगदासाचें नांव शहरांत चोहोंकडे हळू हळू ऐकूं येऊं लागलें. उत्तरोत्तर त्याची माहिती होऊन लोक त्यावर इतकें प्रेम करूं लागले कीं त्याची चरणधूलि आपल्या घरास लागल्यास आपलें मोठें भाग्य असें त्यांस वाटे. रंगदास या नांवापेक्षां 'डम्डम्' या नांवाचाच जास्त प्रसार झाला! मच्छलीपट्टण येथील विवेकानंद मंदिरांत एके दिवशीं दुपारीं ४ वाजतां हरिभजन व्हावयाचें होतें. त्या प्रसंगीं कृपा करून येण्याविषयीं तेथील हिंदुमाताबालसमाजाच्या चिटणिसांनीं त्यास विनंति केली. तेव्हां रंगदासानें उत्तर केलें, "बाबारे! माझ्यावर काळाचें मुळींच बंधन नाहीं, अशी माझी पूर्ण खात्री झाली असून त्यांतच मी हल्लीं आनंद मानीत आहे. तसाच आनंदाच्या भरांत मी निमग्न राहिलों तर मला वाटतें तुमची ठरलेली वेळ माझ्या ध्यानांत येणार नाहीं; अथवा देवाच्या पूजेसाठींदेखील ठरीव वेळीं नेमका हजर होण्यास जरूर तेवढी काळजी ठेवायची बुद्धि मला होणार नाहीं." साधूंची स्वतंत्रता ती हीच! रंगदासाची वाणी आतां केवळ अमृतमय होऊन राहिली. त्याच्या तोंडचे शब्द कानीं पडावे असें सर्वांस वाटूं लागलें. कोणीही बोलाविलें तरी त्याची कोठेंही जावयास ना नसे. इतकेंच नव्हे तर स्त्री, पुरुष, ब्राह्मण, शूद्र कोणीही असो, त्यास त्याच्या भाषणापासून ज्ञानाचा लाभ सारखाच होत असे. काष्ठाचे ठिकाणीं अग्नि नेहमीं अंतर्भूत असतो; पेटविण्याचा मात्र अवकाश कीं तो प्रकट झालाच म्हणून समजावें. मग तो पेटविणारांस व जवळ येऊन बसणारांस उष्णता व प्रकाश यांचा काय तोटा? रंगदासाचें तेज

अग्नीसारखें होतें. साधुत्व पूर्णतेस पोहोंचून मानवजातीच्या पारमार्थिक उन्नतीसाठीं त्यानें आपणांस सदैव वाहून घेतलें होतें असें जगाच्या निदर्शनास आलें. हरिभजनाची तयारी करून कोणी त्यास भजनास बोलावीत, तेव्हां भजन ऐन रंगांत आल्यावर एखादें पद चालू असतां मध्येंच त्याची समाधि लागे व 'डम्‌डम्' या अक्षरांचा तो सतत उच्चार करीत राही. 'डम्‌डम्' हा प्रणवरूपी ॐकारच. केवढा हा अधिकार! श्रीरामकृष्णपरमहंस म्हणतात: "प्रभूचें नामस्मरण करतांच शरीरावर रोमांच उभे राहून ज्यांची शुद्धि हरपते–सहजसमाधि लागते–ते किती धन्य म्हणून सांगावें! मोक्षाची गुरुकिल्लीच त्यांस सांपडली असें म्हणण्यास हरकत नाहीं. समाधि उतरल्यावर रंगदासास भक्तिभावानें कोणी कांहीं खावयास देत. परंतु शरीरपोषणार्थ आपल्या अवयवांचा उपयोग करावयाचा नाहीं असें व्रत धारण केल्यामुळें तो हातांनीं कधींच खात नसे. कोणी कांहीं फळबिळ हातीं दिलेंच तर त्यानें तें वर हवेंत झोंकून द्यावें. खडीसाखरेचा खडा किंवा अगदीं लहानसें फळ कोणी तोंडांतच घातलें तर मात्र त्यानें तें खावें. पुन्हां कांहीं वेळानें त्यानें मोठ्या हर्षानें 'डम्‌डम्' म्हणूं लागावें व त्यांतच फिरून त्याची समाधि लागावी.

१५. भजन संपल्यावर मंडळी रंगदासास कांहीं प्रश्न विचारीत. त्यांचीं उत्तरें तो अगदीं मुद्देसूद व समर्पक देत असे. किंबहुना अशा रीतीनें त्याशीं संभाषण करण्यास सांपडावें हाच भजनसमारंभाचा उद्देश असे. रंगदासाच्या उत्तरांनीं सर्वांचें चांगलें समाधान होई. एकदां एक विद्वान् व प्रख्यात शास्त्रीबोवा फिरत फिरत मच्छलीपट्टणास आले. तेव्हां तेथील थिऑसॉफिकल सोसायटीनें त्यांचा व आमच्या चरित्रनायकाचा कांहीं तरी वादविवाद होईल असा योग

जुळवून आणिला. वादांत रंगदासाच्या अस्खलित, चटकदार व मुद्देसूद उत्तरांनीं प्रतिपक्षी अगदीं कुंठित व पराजित झाले. येथून पुढें रंगदासाचीं संभाषणें व प्रवचनें हमेश होऊं लागलीं. हा क्रम सकाळ–संध्याकाळ नित्य चालू असे. कोणत्या ना कोणत्या तरी तत्त्वान्वेषी गृहस्थाच्या घरीं रंगदासास लोक हात धरून सदैव नेत. असें होतां होतां अतिशय श्रमानें त्याची प्रकृति अगदीं बिघडून जाईल अशी भीति वाटूं लागली, तेव्हां वैद्यांनीं बोलणें अजिबात बंद ठेवावें म्हणून त्यास सांगितलें. परंतु त्यानें त्यास न जुमानतां कोणी केव्हांही आला तरी त्यास ब्रह्मज्ञानाचा उपदेश करीत राहण्याचा सपाटा चालविला. दिवसा कामधंद्यामुळें फुरसत नसलेले लोक त्याजकडे रात्रीं येत व आत्मज्ञानाचा त्यापाशीं अभ्यास करीत. त्याचें अंत:करण कोमल व उदार होतें. ठरींव मतें किंवा हटवादीपणा ज्यांत आहे अशा धर्माचें प्रतिपादन न करितां आत्मानुभव किंवा आत्मप्रत्यय हरएकाच्या व्यवहारांत जेणेंकरून गोचर होईल अशी स्थिति प्राप्त करून देण्यासाठीं तो मन:पूर्वक झटत असे. आपल्या अंत:करणांत आत्मज्ञानाची जी ज्योत पेटलेली होती तिचा प्रत्यय प्रत्येकास आणून द्यावा अशी त्याची मनीषा होती. परंतु दुर्दैवाची गोष्ट कीं त्याचा इहलोकचा वास संपत आला! रात्रीस अनेक वेळां रस्त्यांतून धांवत जावें आणि मोठ्यानें ओरडून सांगावें कीं, "अहो, गाढ झोपेंत घोरत पडलेल्या जीवांनो, उठा, जागे व्हा, आणि आपापली तयारी करा. मृत्यु केव्हां येईल हें कोणासही कळावयाचें नाहीं."

१६. आसपासच्या लहानमोठ्या गांवांत आतां रंगदासाची कीर्ति झपाट्यानें पसरत चालली. मच्छलीपट्टण येथें तर त्यास ओळखणार नाहीं असा एकही मनुष्य राहिला नाहीं. सार्वजनिक ठिकाणीं

होणारीं त्याचीं भाषणें ज्यांस ऐकावयास सांपडत नसत अशा कुलीन स्त्रिया त्याला आपल्या घरीं बोलावून त्याच्या मनोहर भाषणाचा व दर्शनाचा लाभ घेऊं लागल्या. त्यास नामांकित मिठाई किंवा सुंदर फळें त्या अर्पण करीत, पण तीं तेथेंच टाकून तो घरीं परत जाई ! उघडच आहे ! तो ‘आप्तकाम’ झाला ! एका परमात्म्या-वांचून कशाचीही वासना त्यास राहिली नाहीं. दिव्य ज्ञानामृताचें यथास्थित पान करण्यास ज्यास सांपडलें त्यास ऐहिक सुखांत गोडी कांहींच वाटावयाची नाहीं.

१७. रंगदासावर निष्ठा असलेल्या मंडळींपैकीं कांहींनीं त्याचा नित्य सहवास पत्करिला. त्यांपैकीं एकजण भजनानंतर होत असलेल्या त्याच्या संभाषणाचें टिपण करून ठेवी. अशा प्रसंगीं रंगदास तेलगू भाषेंत उत्तम कविता तेथल्या तेथें रचून म्हणूं लागला, ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे ! त्याची कविता प्रासादिक असून तिच्यांत अर्थगांभीर्य, शब्दयोजना, छंद, यमक वगैरे पूर्ण साधलेले असत. ह्या कविता त्याच्या गंटूर येथील भक्तांनीं छापून प्रसिद्ध केल्या आहेत. परमेश्वरास कोणतीही गोष्ट अशक्य नाहीं; मग त्याच्या कृपाप्रसादानें शाळेंत विशेष शिक्षण बिलकुल मिळालें नसतांही रंगदास उत्तम काव्यें करूं लागला यांत नवल तें काय !

१८. रंगदासास चित्रकलेचें मर्मही चांगलें कळत होतें असें म्हणतात. एकदां चंदाम्माची प्रतिवार्षिक पुण्यतिथि जवळ आली होती. त्या प्रसंगासाठीं तेलाच्या रंगांत तिची एक तसबीर काढण्यास त्यानें आपल्या भक्तमंडळींतील एका कुशल चित्रकारास सांगितलें. कधींही न पाहिलेल्या माणसाची तसबीर नुसत्या तोंडी वर्णनावरून काढणें कितपत शक्य आहे हें कोणताही चित्रकार सांगूं शकेल ! तथापि

त्या बाईची चर्या, वस्त्रें, भूषणें ध्यानाचे वेळीं बसण्याची तऱ्हा वगैरे गोष्टींचें वर्णन रंगदास इतकें सविस्तर स्पष्ट करूं लागला कीं एकवार प्रयत्न करून तर पाहावा असें त्या चित्रकारास वाटलें. तो रंगदासास आपल्या रंगशाळेंत घेऊन गेला व काम करीत असतां त्यानें त्यास चित्रापुढें बसवून ठेविलें. कोठें काय चूक होत आहे, इकडे लक्ष ठेवून रंगदासानें वेळोवेळीं त्याजकडून चित्रांत महत्त्वाचे फेरफार करून घेतले व चुकाही अशा शिताफीनें दुरुस्त करून घेतल्या कीं, शेवटीं तें काम फारच सुबक, हुबेहूब व आश्चर्य-कारक वठलें !

१९. हरिभजनाचे ठिकाणीं बसल्या वेळीं रंगदास आपण होऊन सुस्वर गायन करी. त्याचीं मधुर वचनें कधीं पद्याचे तर कधीं उद्यम गद्याचे रूपानें ऐकावयास सांपडत. देवी सरस्वतीच्या भक्ती-मुळें कालिदासाच्या अंगीं केवढी अलौकिक कविताशक्ति आली, हें आपणांस माहीत नाहीं काय ? इतकें लांब कशाला ! भगवान् श्रीरामकृष्ण यांचीच गोष्ट पाहाना ! नुसती सही करणेंही माहीत नसतां केवळ कालीमातेच्या अनन्यभक्तीच्या योगानें ते दिव्य-ज्ञानाचा उपदेश अधिकारयुक्त वाणीनें करीत असत ! धर्म व तत्त्वज्ञान यांजविषयीं उत्तमोत्तम सिद्धांत त्यांच्या सरळ व व्याव-हारिक भाषेनें प्रतिपादिलेले पाहून लहान मोठे सर्व प्रकारचे बुद्धिमान्, विद्वान व प्रमुख पंडित थक्क होऊन जात नव्हते काय ? मग सामान्य माणसाच्या प्रयत्नानें साधणार नाहींत अशा कविता व पद्यें रंगदासास जागचे जागीं करितां येत यांत नवल कशाचें !

# ८. भटजी बापू

१. एका अर्वाचीन आणि विद्यमान सत्पुरुषाची कथा थोडक्यांत सांगण्यांचें' मी आज योजिलें आहे. कांहीं वर्षांमागें हैद्राबादेस आमचा मुक्काम २–३ महिने होता. तेव्हां भटजी बापूंच्या संगतीचा आणि पंगतीचाही वारंवार लाभ होऊन जो आनंद झाला त्याचा अंश आमच्या वाचकांस देणें उचित वाटतें.

२. दक्षिण हैद्राबाद येथें दक्षिणी वस्ती बेताचीच आहे. पूर्वी यास भागानगर म्हणत. येथें श्रीरामदासपंचायतनांतले केशवस्वामी राहत. त्यांची समाधि शहरापासून दोन मैलांवर आहे व जवळच त्यांच्या राहण्याचें एक जुनें पडकें घर आहे. समाधिस्थानावर मंदिर उभारून पूजाअर्चेची व्यवस्था लावण्याचें तेथील श्रीमंत सद्‌गृहस्थ रा. वामन नाईक यांचे मनांत आहे. हैद्राबाद इलाख्यापैकीं औरंगाबाद जिल्हा व बीड जिल्हा हे पूर्ण मराठी आहेत, पण हैद्राबादेला मुख्य वस्ती तेलगू लोकांचीच आहे. तेलगू, कानडी, उर्दू व मराठी या चार भाषा बोलणारे लोक तेथें असून मराठी भाषा बोलणारे लोक सगळ्यांत थोडे आहेत. असो; भटजी बापू हे दक्षिणी व अर्थात् देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण आहेत. यांचें घराणेंच फार धर्मनिष्ठ आहे.

३. भटजी बापूंचे चुलते मोठे वैदिक, कर्मनिष्ठ व तपस्वी ब्राह्मण होते. हैद्राबादेस चंदूलाल हे दिवाण असतांना ६०–७० वर्षांमागें एक भयंकर दुष्काळ तिकडे पडला. जनावरें व माणसेंही अन्नपाण्यावांचून उपाशीं मरूं लागलीं. दुष्काळाचें वर्ष संपून नव्या

वर्षाचा पावसाळाही पावसावांचून चालला, तेव्हां लोकांचे डोळे पांढरे झाले. लहानथोर सर्व घाबरले. अनेक अनुष्ठानें व सप्ताहही हिंदुमुसलमानांनीं सुरू केले. शेवटीं चंदूलाल स्वत: त्यांजकडे गेले व त्यांनीं 'अनुष्ठानास दोन हजार ब्राह्मण सतत सात दिवस बसले असतां सातवे दिवशीं पाऊस पडेल' असें अभिवचन दिल्यावरून सरकारी खर्चानें ब्राह्मण अनुष्ठानास बसले. पाऊण लाख रुपये खर्च झाले. सातवे सायंकाळीं विपुल पाऊस पडून लवकरच सर्वत्र आबादानी झाली. ही गोष्ट निजामशाहींत जाहीर आहे.

४. असल्या पुण्यपरंपरेंत भटजी बापू वाढले. त्यांचें वय ७५ वर आहे. बाळपणापासून शरीराला दोन व्याधि आहेत, पण त्यांना न जुमानतां रोज सूर्याला १२०० नमस्कार, भागवताचे १२ अध्यायांचें पारायण व पार्थिव पूजा असा क्रम चार तपें त्यांनीं चालविला असून या वयांतही शेंपन्नास तरी नमस्कार घातल्यावांचून ते नैवेद्यवैश्वदेव करण्यास उठत नाहींत. त्यांची मूर्ति सतेज असून डोळे पाणीदार आहेत. भगवद्भक्तीचें तेज त्यांच्या समाधानी मुद्रेवर असून त्यांच्या दर्शनाबरोबर त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवावें अशीच प्रत्येकास बुद्धि होते. उलट श्रद्धापूर्वक सर्वांच्या पायां पडण्यानें त्यांची सर्वभूतीं भगवद्भावाची बुद्धि प्रतीत होते.

५. भटजी बापू उत्कृष्ट गवई आहेत. साऱ्या जन्मांत भगवंताच्या गुणवर्णनावांचून त्यांच्या गायनाला दुसरा विषय माहीत नाहीं हें कांहीं सांगायला नको. मोरोपंतांनीं आपली काव्यशक्ति आजन्म हरिसेवेंत खर्चिली, त्याप्रमाणेंच भटजी बापूंनीं आपली गायनशक्ति हरिसेवेलाच वाहिली. आपल्या ठिकाणचे विशेष गुण देवाचें देणें समजून भक्त देवालाच अर्पण करीत असतात. ज्याचें त्याला देणें हाच अनृणी होण्याचा उत्कृष्ट उपाय आहे.

६. भटजी बापूंना हैद्रावादचे श्रीमंत राजा रायराय यांजकडून सालिना ६०० रुपये मिळतात, पण हे त्यांना मिळतात म्हणण्यापेक्षां हरिसेवेलाच लागतात. नाथांच्या घरीं अन्नसंतर्पणाची काय पद्धति असेल याची कल्पना कोणासही भटजी बापूंच्या घरीं दोन दिवस राहिल्यानें येते. दिवसारात्रीं केव्हांही दोन–चार किंवा दहावीस अतिथि आले तरी तितक्यांना असेल त्यांत पण अत्यंत आदरपूर्वक भोजनाचा प्रसाद मिळतो. त्यांची भार्या, पुत्र व सून हे त्रिवर्ग या कार्यांत कायावाचामनानें झटत. कित्येक वेळां रात्रीं १२ वाजतां पंधरा पंधरा बैरागी व अतिथि आले असतांना ताजा स्वयंपाक करून त्यांना आस्थेनें वाढण्यांत येतो. ज्या दिवशीं जें घरांत असेल त्याचाच देवाला नैवेद्य व्हावयाचा व तेंच अन्न अगदीं प्रतारणा न करितां ब्राह्मणांपासून महारांपर्यंत सर्वांना, हिंदूंना, तसेंच मुसलमानांना, कळकळीनें प्रार्थनापूर्वक मधुरवाणीनें वाढलें जातें. 'भूतमात्रीं हरीवीण। न पाहेचि दूजेपण' हें भटजी बापूंच्या हृदयीं ठसलेलें त्यांच्या सप्रेम अन्नसंतर्पणाच्या निर्विशेष पद्धतीवरूनही लक्षांत येतें. दर द्वादशीला २-४ शें पान होतें. नारायण हें त्यांचें व्रत बिनबोभाट चालवीत आहे. भूतदया व अन्नसंतर्पण हें गृहस्थाश्रमाचें वर्म आहे असा त्यांचा सक्रिय उपदेश असतो. सत्पुरुषाच्या प्रसादाला गोडीही अनुपम असते व रावरंक त्याची इच्छा करितात. गोडी पदार्थांत नसते तर ते पदार्थ ज्या प्रेमानें दिले जातात त्या प्रेमामुळें पदार्थांना गोडी येते. 'वसन्ति हि प्रेम्णि गुणा न वस्तुषु' असें म्हटलेंच आहे. गृहस्थाश्रमाची शोभा काय आहे व मोक्षधर्मही तेथें वस्तीला कसे येतात हें नाथांचा किंवा भटजीबापूंचा संसार पाहिला म्हणजे कळतें. साधुजनांचा संसार ब्रह्मरूपच असतो. बाहेरच्या परिवारामुळें त्यांना संसारी म्हणायचे,

बाकी ते जीवन्मुक्तच असतात. भटजी बापू वाटेनें चालले तरी अंधपंगु, अतिथि–अभ्यागत कोणीही वाटेंत भेटले म्हणजे त्यांना कांहीं दिल्याशिवाय किंवा देवविल्याशिवाय त्यांचा अतिक्रम करून ते पुढें जात नाहींत. 'याला अमुक द्या' असे शब्द त्यांच्या तोंडून निघाल्यावर हा आपल्यावर बापू महाराजांचा प्रसादच झाला, हें पुण्यकर्म घडलें, असेंच देणाऱ्याला वाटून त्याला चित्तप्रसादाचा लाभ होतो. एवढी शक्ति त्यांच्या तपानें त्यांना लाभली आहे.

७. भटजी बापूंची उपासना श्रीकृष्णाची व भागवतावर त्यांचें अतोनात प्रेम. ते अयाचितवृत्तीनें राहतात, पण कधीं कधीं त्यांना सुपात्र वाटला तर हात जोडून पदर पसरून म्हणतात––"हें पाहा, मी एक भिक्षा मागतों तेवढी मला द्या. दुसरें कांहीं नाहीं. रोज सूर्याला १२ शें नमस्कार घालीन, भागवताचे १२ अध्याय वाचीन व एखादा तरी अतिथि पंक्तीला घेतल्याशिवाय जेवणार नाहीं–ही मला भिक्षा घाला. पाहा बरें, याचना विफल करूं नका ! म्हणा एकदां असें वागेन म्हणून." त्यांच्या सहज संभाषणांत भागवतांतली एखादी तरी गोष्ट यायची. पण ती अशी आत्मरंगभरित सविस्तर प्रेमानें सांगतात कीं तिचा ठसा बहुतकाळ श्रोत्यांच्या मनावर राहतो. एक रात्र त्यांचें कीर्तन ऐकण्याचा सुयोग आम्हांस आला. 'देरे हरि संतपदाची जोड' ह्या चरणावर साध्या सोप्या सप्रचीत बोलांनीं त्यांनीं दोन तास श्रोत्यांस तन्मय केलें. पण कीर्तन करतांना ते 'आपुलिया सुखस्वार्था' हरिगुणानुवाद परम आवडीनें गात होते. कीर्तनकार किंवा पुराणिक किंवा वक्ता श्रोत्यांकडे पाहून बोलत असेल तर त्याचा तोच रंगणार नाहीं मग श्रोते न रंगतील यांत नवल काय ? पण जो 'आपुलिया सुखस्वार्था' हरिकीर्तन करितो, आपले गुणानुवाद आपणच वक्ता होऊन आपणांसच

ऐकवितो–‘ होवोनियां श्रोता वक्ता ! आपुली आपण करी कथा ’– त्याच्या कीर्तनसुखाची अनुपम गोडी वाचेनें काय वर्णावी ? आपल्या बैठकीवर बसून कीर्तनास उभें राहावें ! तेथील स्फूर्ति उगमाचीच असल्यामुळें मूळचाच रंग साऱ्या कीर्तनांत उधळला जातो, श्रोते वक्ते बेभान होतात.

८. कर्ता करविता सर्व हरि आहे–‘ मी ’ कोठेंच नाहीं–अशा त्या हरीच्या निजरंगांत रंगलेल्या महात्म्याला सारा संसार ब्रह्मरूप भावत असतो. नामरूपांच्या ठिकाणीं त्याची आसक्ति नसते, त्यामुळें सुखदुःखें, जन्ममृत्यु, स्तुतिनिंदा यांचे त्याला धक्के बसत नाहींत. भटजी बापूंचा ३८ वर्षांचा एकुलता एक मुलगा वारला, त्या दिवशीं द्वादशी होती. ब्राह्मणभोजनाची तयारी होती. वैद्यडॉक्टरांनीं अखेरचा निकाल सांगून हात टेकले होते. भटजी बापूंचा पूजानैवेद्य-वैश्वदेव इ० नित्यक्रम रोजच्यासारखा शांतपणानें चालला होता. मुलास आसन्नमरण स्थितींत शेजारच्या बागेंतील मंदिरांत नेण्यास सांगून ब्रह्मणभोजन चाललें. नित्याप्रमाणें स्वस्थपणें श्लोक म्हणत आग्रह करीत समाराधना झाली, मागून अन्य जातींचे स्त्रीपुरुष प्रसाद घेऊन गेले व सायंकाळीं ५ वाजतां भटजीबापू मुलाकडे गेले ! तों तेथें काय ? सर्वच ग्रंथ संपला असून रडारड चालली होती. यांनींच सर्वांचें समाधान केलें व म्हणाले, “काका ! कां बरें रडतां ? अहो हें पाहा, माझें मडकें त्यानें धरावें किंवा त्याचें मीं धरावें हें खरें ना ? मग भगवंताची आज्ञा झाली कीं, मीं त्याचें मडकें धरावें तर मी त्याला तयार आहे. अहो, हरीचा संकल्प तेंच जीवाचें उचित. देवाच्या मनाला आलें, ठीक आहे.” नंतर मुलाच्या लग्नसोहळ्याला भटजीबापू ज्या उत्साहानें गेले त्याच उत्साहानें त्यांनीं त्याचा अंत्यविधि स्वकर्म म्हणून यथासांग अविकंपितचित्तानें

पार पाडला ! भटजी बापू भक्तांच्या कसोटीला उतरले. सून वारली. तेव्हांही भटजी बापूंना एकानें दोन पदें ऐकविण्याची विनंति केली व त्यांनीं आनंदानें हरिगुण गाण्यास प्रारंभ केला. भटजी बापूंसारखे उमजलेले व कर्मज्ञान उपासनामार्गाचे आदर्शभूत महात्मे या काळांत दुर्लभ आहेत. संतदर्शनाची इच्छा असेल अशा भाविकांनीं एकवार भटजी बापूंच्या घरच्या उच्छिष्टप्रसाद घेऊन धन्य व्हावें.'

●

# ९. श्रीगुलाबराव महाराज

जन्म :—आषाढ शुद्ध शके १८०३.

समाधि :—भाद्रपद शुद्ध १२ शके १८३७.

१. सत्संगावांचून विवेक उत्पन्न होत नाहीं व सत्संग रामकृपेवांचून लाभत नाहीं, असें तुळशीदासांनीं म्हटलें आहे. संतांचे अवतार होऊं लागले म्हणजे स्वधर्म-सूर्योदयाचा प्रभात झाला असें समजावें. संत हे खरे खरे राष्ट्राचे पुढारी आहेत. सद्‌भावना, प्रेम, सदाचार, विवेक, सौख्य, ऐक्य इत्यादि सद्‌गुणांची वाढ राष्ट्रांत सन्तांवांचून कोणीही करूं शकत नाहीं. लोकनायकांना सन्तांचा पाठिंबा असल्यावांचून त्यांच्या कार्याला यशाची जोड मिळत नाहीं, त्यांच्या कार्याला दैवी संपत्तीचें स्वरूप प्राप्त होत नाहीं. शिवाजीमहाराज अलौकिक योग्यतेचे खरे,पण तुकाराम रामदासांच्या सहवासाचा लाभ झाल्यामुळें त्यांच्या कार्याला अधिक दिव्यत्व प्राप्त झालें ही गोष्ट कोणासही नाकारतां येत नाहीं. सन्तांना ईश्वराचें मनोगत बरोबर समजतें व ते लोकांत पवित्र भावना, परस्परप्रेम व स्वधर्मजागृति उत्पन्न करून प्रपंचाला परमार्थाचें मनोहर रूप देतात.

२. असो. श्रीगुलाबरावमहाराजांची व माझी प्रथम भेट इ. स. १९०५ सालीं झाली. तेव्हांपासून त्यांच्या सहवासांत बराच काळ गेला. त्यांच्या भेटी वरच्यावर होत व कित्येक दिवस आणि रात्री त्यांच्या संभाषणसुखांत गेल्या आहेत. महाराजांचे प्रथम भेटीस जें प्रेम जमलें तें अखेरपर्यंत कायम होतें. तळेगांव व आळंदी येथें आम्ही बरोबर गेलों होतों, सरदारगृहांत तीन आठवडे मला त्यांचा

अहोरात्र समागम झाला. पुण्यास दोन वेळ ते माझ्या बिऱ्हाडींच उतरले होते. ह्या सर्व प्रसंगीं त्यांचें अनेक विषयांवरचें अगाध ज्ञान, त्यांची जिव्हाळ्याची प्रेमलक्षणाभक्ति, त्यांचें अतर्क्य वादपटुत्व, त्यांच्या बुद्धीची परमसूक्ष्मता ह्या गुणांचा प्रत्यय तर वेळोवेळीं आलाच; पण ह्या पुरुषाचें पूर्ण ज्ञान झालें असें मला केव्हांच वाटलें नाहीं. जों जों सहवास वाढत गेला तों तों त्यांची बुद्धिमत्ता अथांग असून तिची खोली अतर्क्य वाटूं लागली. त्यांची प्रेमळता कांहीं अवर्णनीय होती. ह्यांची नित्याची वाणीच प्रासादिक वाटे. त्यांचें बुद्धितेज अलौकिक होतेंच, पण बुद्धीच्या पलीकडची दिव्य स्फूर्ति ह्या लोकोत्तर विभूतीला प्राप्त झाली होती.

३. महाराजांचा शिष्यसम्प्रदाय बराच पसरला आहे. त्यांची अलौकिक बुद्धिमत्ता, गाढ विद्वत्ता, प्रेमळपणा, वक्तृत्व, प्रासादिकपणा इत्यादि गुणांमुळें त्यांना जे मानीत असेही हजारो लोक आज भरतखंडांत आहेत. श्रीगुलाबरावमहाराज ही एक अलौकिक विभूति होती यांत शंका नाहीं. नवव्या महिन्यांत त्यांना अंधत्व प्राप्त झालें, १२ व्या वर्षीं लग्न झालें, २४ व्या वर्षीं त्यांच्या पत्नीचा मृत्यु झाला–( त्यांना एक पुत्र आहे. )–तेथपासून दहा वर्षें ते विधुरावस्थेंतच होते. त्यांची विद्वत्ता, साधुत्व दोन्हीही अपूर्व होतीं व बहुधा सर्व विषयांवर ते अस्खलित प्रेमळ व निश्चयात्मक इतके सशास्त्र व सुंदर भाषण करीत कीं, तिथें सिद्धप्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वत दुभे । मग सकळ शास्त्रें स्वयंभें । निघती मुखें ' (ज्ञानेश्वरी ६–४५४) ह्या ज्ञानोबारायांच्या उक्तीची आठवण होई.

४. महाराजांची गाढी विद्वत्ता त्यांच्या भाषणांत व ग्रंथांत स्पष्ट दिसेच; पण हे जातीनें शूद्र, जन्मांध, वऱ्हाडसारख्या मागासलेल्या प्रांतांत वाढलेले, असें असून त्यांच्या ठिकाणीं एवढें अगाध ज्ञान

कोठून आलें याचें सर्वांसच गूढ पडे. त्यांना ग्रंथसंग्रहाची अत्यंत आवड–जवळ जवळ वेड होतें. उत्तम ग्रंथ ऐकला कीं तो इंग्रजींत असो, संस्कृतांत असो, फारशींत असो-पडेल ती किंमत देऊन तो ते घेत. ते दुसऱ्याकडून ग्रंथ वाचवून घेत असा कोणाचा तर्क आहे, पण स्वतः हजारों ग्रंथ वाचणाऱ्या डोळस पंडितालाही त्यांच्यापुढें हार खावी लागे–इतकें विविध विषयांवरचें सूक्ष्म व बिनचूक ज्ञान त्यांच्या ठिकाणीं कोठून आलें याचें अनेकांस कोडेंच पडे. सत्पुरुष-मालिकेंत त्यांच्यासारखा दांडगा ज्ञानी भक्त व सप्रेम वक्ता माझ्या पाहण्यांत दुसरा आला नाहीं. त्यांचें वादपटुत्वही असमान्य होतें. श्रुतिस्मृतिपुराणें, महाराष्ट्र, हिन्दी व संस्कृत वाङ्मय, फारशी व अरबी भाषेंतील धर्मवाङ्मय, ख्रिस्ती धर्म, महंमदी धर्म, जैन धर्म, लिंगायत पंथ, मानभावी पंथ, पाश्चात्य तत्त्वज्ञान, योगशास्त्र, सांख्यशास्त्र, वैद्यक, ज्योतिषशास्त्र, वेदान्त इ. अनेक विषयांचें ते इतक्या सुलभ रीतीनें सावतरण व सोदाहरण उत्कृष्ट प्रतिपादन करीत कीं, ह्या पुरुषाचें ज्ञान ह्या जन्मांत सम्पादिलेलें नसून प्राग्जन्माच्या अध्ययनाचें, दैवी कृपेचें व उपासनेचें तें फळ आहे असें वाटल्यावांचून राहतच नसे. कोणाही सत्पुरुषाचें स्वभाववैचित्र्य व वर्तनवैचित्र्य जरा बाजूला सारून त्याच्या अंतःकरणवृत्तींशीं एकरूप झाल्याशिवाय त्याचें हृदय फुलत नाहीं व त्यांतील खरें रहस्य कळत नाहीं. श्रीगुलाबराव यांना कोणींही सरळपणानें प्रश्न केला म्हणजे ते सरळ सुंदर भाषण करीत; पण कोणी छलबुद्धीनें, कपट-बुद्धीनें त्यांजकडे गेला म्हणजे त्याची वृत्ति ते चांचपून पाहत. त्यांची कृष्णोपासना होती व श्रीज्ञानेश्वरमहाराजांना ते 'तात' समजून स्वतःच्या ठिकाणीं गोपीची भावना ठेवीत असल्यामुळें ते आपणांस 'ज्ञानेश्वरकन्या' भावीत. त्यांच्या ठिकाणीं अगाध

ज्ञानाबरोबर भक्तीचा जिव्हाळाही विलक्षण होता. वर्णाश्रमधर्म व जातिधर्म उत्तम रीतीनें पाळले जाण्यांतच हिंदुधर्माचें संरक्षण होणार आहे असा त्यांचा निश्चय होता. महाराज सनातन हिंदु-धर्माचे पुरस्कर्ते होते; जे नवीन पंथ जातिभेदावर घसरणारे वगैरे आहेत त्यांजवर त्यांचा तीव्र कटाक्ष होता. 'संकरो नरकायैव' म्ह० वर्णसंकर झाल्यास व तो होऊं दिल्यास हिंदुराष्ट्राचा नाश होईल म्हणून वर्णधर्म, जातिधर्म संभाळून प्रत्येक पुढारी विद्वानानें आपलें आचरण ठेविलें पाहिजे असें ते म्हणत.

५. महाराजांची दांडगी विद्वत्ता त्यांच्या ग्रंथांवरूनही प्रतीत होते. 'अलौकिक व्याख्यानमाला' ह्या ग्रंथांतील त्यांचीं ९ व्याख्यानें व 'उपदेशामृत-पत्रें' ३८ हे दोनच ग्रंथ पाहिले म्हणजे त्यांचें विविध शास्त्रांवरील प्रभुत्व ध्यानांत येऊन वाचक चकित होतो. शब्दप्रामाण्य, युक्तिवाद, कोटिक्रम या सर्वांत त्यांचा हातखंडा असे. न्याययोगवेदान्तादि शास्त्रांचीं प्रमेयें त्यांनीं स्पष्ट, सुलभ व निःसंदेह-पणाच्या अधिकारयुक्त वाणीनें सांगितलीं आहेत. श्रीगुलाबराव-महाराजांकडे पाहिलें म्हणजे हा पुरुष हाच मूर्तिमंत चमत्कार आहे असें वाटे. स्पष्ट, निर्भीड व निर्लोभ अशी त्यांची शिकवण असे. कर्म, ज्ञान व उपासना ह्या तिहींचाही त्यांच्या भाषणांत व आच-रणांत इतका उत्कृष्ट मिलाफ असे कीं, त्यांना 'विदुराचा अवतार' म्हणावेंसें वाटे. त्यांची वाणी अत्यंत खणखणीत असून पराकाष्ठेची मधुर होती. यांचें बैठें कीर्तन व पुराण चाललें कीं, श्रोत्यांच्या वृत्ति अगदीं तन्मय होत. पुराणांत तात्कालिक स्फूर्तीनें शेंकडों ओंव्या व अभंग हे रचत रचत म्हणत. त्यांच्या बैठ्या कीर्तनांत एकदां सहज पुढील अभंग निघालेले मीं टिपून घेतले होते:

१

आधीं ओळखावें सोनें । मग करावीं भूषणें ॥ १ ॥
नाहींतरी नानासिद्धी । चोरोनियां नेती बुद्धि ॥ २ ॥
तैसें आधीं ब्रह्म जाणा । मग भजावें सगुणा ॥ ३ ॥
**ज्ञानेश्वर** मायबापें । कृपें दाखविलें सोपें ॥ ४ ॥

२

सवें हिंगाचिया कस्तुरीची माती । तैसी नासे भक्ति कामनेनें ॥१॥
भक्ति देवाविण श्रेष्ठ आन नाहीं । कामना विषयीं गुंतवीत ॥२॥
भक्तीचें लक्षण आपुला विसर । स्मरे अहंकार कामनेनें ॥३॥
**ज्ञानेश्वरस्वामी** निजपायांवीण । अन्य स्थळीं मन जाऊं न द्या ॥४॥

३

सकलचि वादी आपुलाले मतीं । सप्रमाण श्रुति दाखविती ॥१॥
अधिकारीभेदें तयाची व्यवस्था । गुरुविण दाता कोणी नाहीं ॥२॥
उपाधि पाहोनि करणें उपाय । ऐसी गुरुमाय कृपावंत ॥३॥
**आळंदीवल्लभ** सोयरा सज्जन । विश्वाचार्यपण पायीं त्यांच्या ॥४॥

४

वेळेवरी पाणी वर्षोत कां मेघ । धान्य पूर्ण सांग भूमि होवो ॥१॥
सर्वत्र देशांत वाढो कां स्वधर्म । विषयाचा काम हारपोनि ॥ २ ॥
सर्वत्र ब्राह्मण असोत निर्भय । वेद बापमाय रक्षावया ॥ ३ ॥
सपुत्र सधन होवो कां हे जन । मिळोनि भजन करावया ॥ ४ ॥
अनंत आयुष्य हो गाईगोपाळा । प्रगटो सांवळा कृष्णनाथ ॥ ५ ॥
**ज्ञानेश्वरस्वामी** कारुण्याची खाणी । सत्य माझी वाणी करा
ताता ॥ ६ ॥

६. महाराजांचें उत्कृष्ट चरित्र त्यांचे शिष्य ‘ त्रिपुरवार ’ यांनीं लिहिलें आहे. त्याच्या प्रस्तावनेंत मीं म्हटलें आहे :—

—" महाराज बोलूं लागले कीं, भक्तिप्रेमामृताचा नुस्ता पाऊस पडे. ते चर्चा करूं लागले कीं त्यांची निर्दोष वादसरणी, विलक्षण ज्ञान व युक्तिवाद पाहून मन कुंठित होई; ते प्रेमानें गाऊं लागले कीं मुलाच्या माधुर्यालाही लाजविणारी त्यांची अत्यंत मधुर वाणी ऐकून चित्त नागासारखें डोलूं लागे. पूजादि कर्में ते इतक्या सशास्त्र रीतीनें व सद्भावानें तासचे तास करीत कीं त्यांची कर्मनिष्ठा पाहून कर्मठालाही धन्यता वाटे. कर्म, ज्ञान, उपासना या तीनही बाबतींत त्यांचें अंतःकरण व आचरण इतकें बिनतोड असून अव्याजमनोहर होतें कीं, ही साधुमूर्ति लोकांना मार्ग दाखविण्यासाठींच अवतरली आहे असें भाविकांच्याच काय पण सुबुद्ध तार्किकांच्याही मनाला वाटे. ते आस्तिकाशीं व नास्तिकाशीं निर्विकारपणें वाद करायला हवे तेव्हां सिद्ध असत, पण कोणी छलबुद्धीनें परीक्षा पाहण्याच्या हेतूनें कांहीं कपट मनांत धरून आला कीं तत्काळ ओळखीत व मग आपल्या हृदयांतील सारी कोमलता आच्छन्न करीत व त्याशीं अशा रीतीनें बोलत कीं, त्याच्या स्वतःविषयीं त्याचा अनादर व्हावा! पुण्यांतील कित्येक विद्वानांना त्यांनीं अशाच रीतीनें धुडकावून लाविलें व हें ते एकदां मजपाशीं स्पष्ट बोललेही होते. अव्यंग कर्म, विशुद्ध ज्ञान, अलोट भक्ति ह्या तिहींचें एकीकरण सत्पुरुषांवाचून अन्यत्र कोठेंही दिसत नाहीं. ते महाराजांत होतेंच पण याशिवाय अर्वाचीन चिकित्सक दृष्टीलाही ज्याचा उलगडा होत नाहीं अशा कित्येक गूढ (mystic) गोष्टी त्यांजवळ होत्या. त्यांच्या सहवासानें ही एक लोकोत्तर विभूति आहे असें कोणाही पूर्वग्रहविमुक्त पुरुषास कबूल करावें लागे.

" उमरावतीस असतांना इ. स. १९०६ मध्यें मीं कात्यायनी व्रताच्या समाप्तिप्रसंगीं महाराजांच्या दर्शनास गेलों. तो भेटीचा

पहिला प्रसंग. बरोबर १०।१५ माणसें होतीं. प्रत्येकाची नाडी पाहून हे 'कोण' असें ते विचारीत व कोणीतरी नांव सांगे. असें होतां होतां मध्येंच कोठें तरी मी आलों, पण माझ्या नाडीवर बोटें ठेवतांच 'हे पांगारकर' असें म्हणून त्यांनीं मला बाहेर काढलें ! मी यानंतर 'महाराज ! आपणांस नाडींत पांगारकर कसा सांपडला ?' असें एकदां विचारलें; तेव्हां उत्तर कांहींच केलें नाहीं 'मी चुकलों तर नाहीं' एवढेंच म्हणून ते हंसले. दुसरे दिवशीं हवनानंतर माझा हात धरून त्यांनीं मला लांब एका हेमाडपंती देवळांत नेलें. बरोबर ४०–५० माणसें होतीं. आंत शिरतांच ते मला म्हणाले, 'तुम्ही द्याल त्या विषयावर आज तुम्हांला पुराण ऐकवावयाचें आहे.' मी 'हें विश्वचि माझें घर। ऐसी मती जयाची स्थिर। किंबहुना चराचर। आपण जाहला।' ही ज्ञानेश्वरींतील ओवी म्हणालों. त्यावर त्यांनीं तत्काळ स्वरचित हजार ओव्यांत निरूपण केलें ! दुसरे दिवशींही दुसऱ्या एका ओवीवर ८०० ओव्यांचें निरूपण केलें. ओवी प्रौढ व प्रासादिक होती. सर्व अर्वाचीन कवि त्यांच्या पायांवर घालावे असें मला तत्काळ वाटलें ! ज्ञानेश्वरमहाराज हे तात, श्रीकृष्ण (वासुदेवनामक) हे पति व स्वतः आपण गोपी अशी त्यांची उपासना पाहून कित्येक नवीनांस आश्चर्य वाटे, तथापि त्यांचा अत्युत्कट भक्तिप्रेमाचा जिव्हाळा पाहून मी त्यांतच दंग झालों. भोजनप्रसंगाचा आनंदही अनुपम होता. मी श्लोक म्हणावा व त्याचें त्यांनीं तत्काळ व त्याच वृत्तांत रचलेल्या श्लोकानें उत्तर द्यावें असें सारखें चाललें होतें. ती अद्भुत काव्यशक्ति, ती पराकाष्ठेची मधुर वाणी, ती अलोट कृष्णभक्ति, तो नांव घेण्याचा अपूर्व समारंभ—या सर्वांनीं माझें मन मोहून गेलें. गुलाबराव महाराजांच्या संगतींत 'अद्भुतं रोमहर्षणं' असा

भक्तिप्रेमानंद चांगला भोगायला सांपडला. ते नुस्ता 'ज्ञानेश्वर माउली' अशा साध्या नाममंत्राचा पूजापुराणोत्तर जो मंजुळ घोष करीत तो अजून माझ्या कानांत घुमत आहे. इतकें मधुर नामस्मरण अन्यत्र कोठें ऐकायला मिळालेंच नाहीं.

"इ. स. १९११–१२ सालीं महाराज आळंदीस जाण्याकरितां पुण्यास आले. तेव्हां चार दिवस त्यांचा माझे बिऱ्हाडीं मुक्काम होता. बरोबर ४–५ मंडळी होती. एके दिवशीं रात्रीं आम्ही गोष्टी सांगत निजायचे तयारींत होतों तों तेथें एक सर्प आला. महाराज डगमगले नाहींतच, पण त्यांनीं कोणासही त्यास मारूं दिलें नाहीं. दुसरे दिवशीं आम्ही पांच सहाजण आळंदीस गेलों. तेथें ज्ञानेश्वरमहाराजांच्या पादुकांना पंचामृत स्नान घालून महाराजांनीं पूजा बांधली. स्नानविधि चालला असतांना माझ्या हातांतील सल्ले पादुकांवर किंचित् खरखरले. तो ध्वनि इतका सूक्ष्म होता कीं, त्यांच्याशिवाय कोणाला ऐकूं गेलाच नाहीं. तथापि तो कानांवर पडतांच त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले व 'महाराजांच्या पायांला तुमचे सल्ले बोंचतात म्हणून ते स्नानसंपेतों काढून ठेवा,' असें त्यांनीं मला सांगितलें. उपास्याविषयीं उपासकाच्या मनाची किती कोमलता असते व असायला पाहिजे, हें मला ह्या प्रसंगीं समजून अत्यंत आनंद वाटला. तिसरे दिवशीं तळेगांवची कांचशाळा पाहून येण्याची महाराजांना इच्छा झाल्यावरून आम्ही तेथें गेलों. तेथील विद्यार्थ्यांनीं महाराजांचा सप्रेम सत्कार केला व 'आम्हांला कांहीं परमार्थ सांगा.' असें म्हणाले. त्यावर महाराजांनीं उत्तर केलें. 'रोज १०८ वेळां 'ज्ञानेश्वर माउली' एवढाच नाममंत्राचा जप करायचा असा निश्चय करून त्याप्रमाणें जो वर्षभर वागेल त्याला मी पुढच्या वर्षीं सांगेन. उगीच चावटी करण्यांत मतलब

काय ?' यानंतर कांच तयार करण्यास अवश्य लागणारा कच्चा मसाला जमिनींत कसा कोठें शोधावा यावर ते वराहमिहिरादि प्राचीन ग्रंथकारांच्या आधारें दीड तास बोलले ! तळेगांवाहून परत येतांना वाटेंत ४–२ लावण्याही त्यांनीं मजेनें म्हणून दाखविल्या ! चौथे दिवशीं स्नानाला पाणी उपसलें होतें. चार दोन स्वयंसेवक पाणी उपसण्यांत गुंतले होते, दर्शनास आलेल्या शेंपन्नास लोकांचा भोंवतीं गराडा पडला होता–अशा वेळीं मीं महाराजांस सहज प्रश्न केला कीं, आपल्या अध्यात्माच्या तोडीचें पाश्चात्य तत्त्वज्ञानांत काय आहे ?' यावर त्यांनीं प्लेटो, साक्रेटीस, डिसकार्टेस, कँट, हेगेल, स्पेन्सर, मिल्ल इ. अनेक तत्त्वज्ञान्यांच्या ग्रंथांचें विहंगम दृष्ट्या विवेचन करून म्हटलें कीं यांत कोणी कोणी लांबून चांचपडणारे सांपडतात, पण सूर्यप्रकाशासारखें आत्मज्ञान स्वच्छ असलेले महात्मे भरतखंडांतच उपजले आहेत. Plotinus हा कांहींसा जवळ जवळ गेलेला दिसतो" कोणी लघुलीपिलेखक जवळ असता तर कोण बहार झाली असती ? पाश्चात्य तत्त्वज्ञानावर इतकें उत्कृष्ट व्याख्यान देणारा प्रोफेसर कोणत्याही कॉलेजांत मिळायचा नाहीं, असे उद्गार श्रोत्यांच्या तोंडून निघाल्यास नवल काय ? सत्पुरुषांचीं ज्ञानेंद्रियें अत्यंत सूक्ष्म असतात व म्हणून सामान्य जीवांना अगम्य अशा गोष्टी त्यांच्या सूक्ष्म दृष्टीला सहज गम्य होतात. अनेक चमत्कारांचें बीज या एका गोष्टींत आहे. एका मनुष्याच्या आवाजावरून हा मद्यपि आहे असें त्यांनीं एकदा सांगितल्याचें मला स्मरतें."

महाराजांच्या ग्रंथांतून दोन चार अवतरणें खालीं देतों :–

(१) "सर्वांचें धर्मपुस्तक होण्याला जननी भगवद्गीताच योग्य आहे, तथापि पाश्चात्त्यविद्याविभूषित टीकाकार कर्मपर अर्थ लावून त्या साध्वीचा वाक्छल करीत आहेत ! शास्त्रीय कर्मच निष्काम

करावें असा वास्तविक गीतेचा अभिप्राय आहे. कोणतेंही कर्म मानलें तर मुलांचें अद्वातद्वा खेळणें, वेड्यांचें दगड मारणें हीं सुद्धां सर्व निष्काम कर्तव्यांतच येतील. एक उठतो तो सरकारी नोकरी आपलें निष्काम कर्तव्य आहे म्हणून गीतेचें उदाहरण देतो, तर दुसरा फाजील जहालपणा करणेंही आपलें कर्तव्य मानतो, पण 'ज्ञात्वा-शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि' ह्या गीतेच्या वचनाकडे सारेच दुर्लक्ष करतात. जीवाला काम स्वाभाविकच आहे, त्यामुळें तो कांहीं तरी कर्म करणार हेंही ठरलेलें आहे, म्हणून स्वतःच्या उद्धाराचेंच कर्म करणें त्याला श्रेयस्कर आहे. त्यांतही काम मिसळू दिला तर लोकांच्या प्रवृत्तीसारखेंच शास्त्रालाही बनविणें होईल ! वेदान्त व राजकीय तत्त्व एकच आहे असें लोक म्हणतात, पण वेदान्त स्वर्गालाही भिकारडें समजतो, मग येथील राज्याची त्याच्यापुढें मातब्बरी काय ? तथापि सूर्यप्रकाश सर्वत्रच असल्यामुळें सर्वांनाच मिळतो, त्याचप्रमाणें वेदान्ताचा आधारहि सर्वच घेतात." (साधुबोध, पृ. १०।१२).

(२) "जगदीशचंद्र बोस या बंगाली पुरुषानें 'जडचेतन-संवेदना' ( Response in Living and Nonliving ) या नांवाचा एक ग्रंथ केला आहे. त्यांत त्यानें शास्त्रनियमाला अनुसरून सर्व पदार्थांत आवडी अनावडी भरली आहे हें दाखविलें आहे. त्यानें म्हटलें आहे कीं मनुष्याप्रमाणेंच ह्या जडपदार्थांतही आपली इच्छा दर्शविण्याची शक्ति आहे. मनुष्य प्रतिकूल वस्तु पाहून त्या झुगारून देण्याचा यत्न करीत असतो, त्याप्रमाणेंच एखादी मेलेली मेंडकी घेऊन तिच्या पायाला गंधकाचें तेजाब लावलें असतां तो पाय तें तेजाब पुसून टाकण्याचा प्रयत्न करीत असतो ! तद्वत् एक मुळा घेऊन तो सदर्पणतडित्प्रवाहमापक ( Mirror galvanometer )

यंत्रांत घालून त्यांतील संवेदना पाहतां येते. तसेंच झाडाला झोप, खुषी, नाखुषी, मृत्यु वगैरे येत असतात. त्याप्रमाणेंच धातूंनाही श्रांति ( Fatigue ) वगैरे येते हेंही आपणांला कळतें. तात्पर्य मनुष्याला ज्याप्रमाणें अनुकूल घेणें व प्रतिकूल सोडणें ही शक्ति आहे, तद्वत् ती वृक्ष, धातु इ. जड पदार्थांनाही आहे.

ही गोष्ट नवीन शास्त्रानें जशी सिद्ध झाली आहे तशीच ती महाभारतांतही सिद्ध केली आहे. मोक्षधर्मांत ( शांतिपर्व ) असें सांगितलें आहे कीं चांगले शब्द ऐकले असतां झाडाला फळें फुलें येतात, त्याचीं पानें वगैरे टवटवीत दिसतात, भयंकर व वाईट शब्द ऐकून झाडें सुकून जातात. आतां शब्दाचें ज्ञान कानावांचून होत नाहीं यावरून झाडांना ऐकण्याचें ज्ञान आहे हें सिद्ध होतें... याप्रमाणेंच स्पर्श, रूप, इत्यादिकांचीं उदाहरणेंही त्याच अध्यायांत दिलीं आहेत. याच अध्यायाच्या नीलकंठी टीकेंत अनुकूल प्रतिकूल जाणण्याची शक्ति पाषाणांतही आहे हें मत्कुणरक्त लागलेल्या हिऱ्याच्या दृष्टान्तानें सिद्ध केलें आहे. मीही एक सुलभ युक्ति सांगतों. शरीराला कोठें दुःख झालें असतां त्यावर अल्प शक्तीचा लेप लावला तर लेप उडून जातो, आणि अधिक शक्तीचा लावला तर तो दुःखाला नाहीसें करितो. सर्व पदार्थांत अनुकूल व प्रतिकूल जाणण्याची व अनुकूल वस्तु ग्रहण करण्याची शक्ति आहे. मनाची अनुवृत्ति नसल्यामुळें प्रेमाची विशेषाभिव्यक्ति कळत नाहीं...विज्ञानभिक्षूंनींही आपल्या सांख्यसारांत असेंच म्हटलें आहे." (अलौकिक व्याख्यानमाला. व्याख्यान तिसरें).

(३) "भक्ति म्हणजे भगवंताचे ठिकाणीं एकसारखी प्रेमानें वृत्ति लावून राहणें. द्रवीभूत झालेल्या चित्ताची तैलवत् अविच्छिन्न

धारा परमेश्वराच्या चरणाकडेच गंगेसारखी वाहत जाणें म्हणजे भक्ति असें भक्तिरसायनांत सांगितलें आहे. ती ज्ञानसंयुक्त झाली म्ह. समाधि नसतांनाही अन्वयामुळें व्यक्तानंदाचा प्रत्यय येतो." (उपदेशामृत पत्रें. पत्र ८ वें).

# १०. जगदीशचंद्र बोस

१. आपल्या प्राचीन महर्षींनीं व संतांनीं जे सिद्धांत स्वानुभवाच्या अंगानें सहज सांगितले आहेत ते सांप्रतच्या चिकित्सक काळांत शास्त्रीय शोधांच्या दृष्टीनेंही खरे ठरत आहेत, हें वाचून हिंदुमात्रास आनंद झाल्याशिवाय राहणार नाहीं. सर्व विश्व चिद्रूप आहे, चैतन्यमय आहे, आत्मारामानें म्ह० विठ्ठलानें ब्रह्मांड व्यापलें आहे, हा आपल्या धर्माचा मुख्य सिद्धांत आहे व तो प्रो० बोस या बंगाली विद्वानानें शास्त्रीय रीत्या पाश्चात्यांच्याही गळीं उतरविला आहे, ही केवढी आनंदाची व अभिमानाची गोष्ट आहे ! 'ईशावास्यमिदं सर्व' ही श्रुति किंवा "या उपाधिमाजी गुप्त । चैतन्य असे सर्वगत । तें तत्त्वज्ञ संत । स्वीकारिती" ही ज्ञानेश्वर महाराजांची उक्ति शास्त्रीय दृष्ट्याही आतां सिद्ध होत आहे ! कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजचे शास्त्रविषयाचे अध्यापक प्रो० जगदीशचंद्र बोस यांनीं सगळ्या जगाला चकित करून सोडणारा आणि अत्यंत व्यवहारोपयोगी असा वनस्पतींविषयींचा एक अपूर्व शोध लाविल्याबद्दल अमेरिकेंत त्यांचें स्तुतिस्तोत्र गाइलें जात आहे ! प्रो० बोस किंवा डॉ. पी० सी० रॉय यांच्यासारखे त्रिखंडविश्रुत शास्त्रज्ञ हिंदुस्थानांत निर्माण होण्याला त्यांच्या बुद्धीची भूमिका जशी असावी तशीच योग्य आहे. प्रो० बोस यांनीं पांचचार वर्षांपूर्वीं Response of the living and non-living नांवाच्या आपल्या ग्रंथांत व प्रयोगद्वारा ही गोष्ट सप्रमाण सिद्ध करून दाखविली होती कीं, पाश्चात्य शास्त्रज्ञ ज्याला जडवस्तु म्हणतात त्या खरोखर जड

नसून सचेतन प्राण्यांसारख्याच त्यांना सुखदु:खांच्या भावना आहेत व त्यांच्या अंगांत विद्युत्संचार केला असतां त्या भावना रेखा-लेखनाच्या द्वारें त्यांना व्यक्तही करतां येतात. ह्या शोधाच्या योगाने त्यांनी आमच्या प्राचीन वेदान्तमताचें यथार्थ समर्थन करून दाखविलें होतें. विश्वांत सर्वत्र एकच चैतन्यतत्त्व भरलें आहे ही गोष्ट डॉ. बोस यांचा शोध प्रसिद्ध होईपर्यंत पाश्चात्यांना माहीत नव्हती. पण डॉ. बोस यांचा हा अपूर्व शोध पाश्चात्य शास्त्रज्ञांना मान्य करावा लागल्यापासून दुसरा असा एक आक्षेप पुढें आला कीं, डॉ. बोस यांचा शोध खरा असला तरी त्याचें स्वरूप आध्यात्मिक आहे, व्यावहारिक दृष्टचा त्यांच्या शोधाची किंमत काडीइतकी नाहीं ! डॉ. बोस यांनीं नुकत्या केलेल्या दुसऱ्या शोधाने हाही आक्षेप समूळ खोडून काढला आहे. त्यांच्या या नव्या शोधाचें स्वरूप थोडक्यांत असें आहे कीं, ज्याप्रमाणें मनुष्यादि सचेतन प्राण्यांच्या हृत्पिंडावर त्यांच्या सुखदु:खादि भावनांचा परिणाम घडून तो त्यांच्या कृतींत स्पष्ट दिसतो, तसाच परिणाम वनस्पतींमध्येही त्यांच्या कृतीच्या रूपानें दिसून येतो. हें सिद्ध करण्यासाठीं त्यांनीं एक यंत्र तयार केलें आहे व तें यंत्र इकडेच व हिंदी कारागिरांकडून तयार करविण्यात आलें आहे. प्राण्याला विषप्रयोग केला असतां त्याच्या शरीरावर ज्या प्रकारचा परिणाम क्रियारूपानें दिसतो तोच परिणाम ह्या यंत्राच्या योगाने विषप्रयोग केलेल्या वनस्पती आपल्या हस्तलेखांच्या द्वारें जगाला व्यक्त करून दाखवितात. अतिरिक्त आहाराने प्राण्यांच्या अंगीं जडत्व येतें, तसें वनस्पतींनाही येतें ! मादक द्रव्याच्या सेवनानें प्राण्यांना उन्माद चढतो, तसा वनस्पतींनाही तो चढतो ! व हा परिणाम त्यांना रेखाचित्रानें दाखवितां येतो. अलीकडे शेतकीची सुधारणा करण्याकडे अमेरिका व

हिंदुस्थान या देशांत जोरानें खटपट सुरू आहे. वनस्पतींची फलद्रूपता जंतूंच्या रासायनिक खतांच्या व विद्युत्संचाराच्या योगानें वृद्धिंगत करण्याचे यत्न सुरू आहेत; तथापि कोणत्या वनस्पतीला कोणतें खत मानवेल व किती प्रमाणांत तें दिलें तरच इष्टार्थसिद्धि होईल, हें अनुमानानें किंवा प्रयोगद्वारा हल्लीं ठरवावें लागतें. अनुमानांत चुका होण्याचा व निष्फळ प्रयोगांत निष्कारण खर्च होण्याचा संभव असतो. ही अनर्थापत्ति शोधानें दूर केली आहे. वनस्पतीला कोणती वस्तु हितावह होईल व तिचें प्रमाण किती असावयास पाहिजे, हें डॉ. बोस यांच्या यंत्राच्या द्वारें स्वतः वनस्पतीच आपल्या हस्तलेखाने व्यक्त करून दाखवितील, आणि अनुमानावर किंवा प्रयोगावर भिस्त ठेवण्याचें यापुढें कारणच राहणार नाहीं. या शोधानें पाश्चात्य शास्त्रज्ञांना, आजपर्यंत खऱ्या म्हणून उराशीं धरून ठेविलेल्या, अनेक भ्रामक समजुतींना रजा देऊन आपली चूक कबूल करावी लागणार आहे. उदाहरणार्थ—कार्बानिक ॲसिड गॅस नांवाचा वायु प्राण्यांना अपायकारक पण वनस्पतींना हितावह आहे अशी आजपर्यंतची शास्त्रज्ञांची समजूत होती; पण ही केवळ भ्रांति आहे! वनस्पतींचें याही बाबतींत प्राणिकोटीशीं पूर्ण साम्य आहे, असें डॉ. बोस यांनीं प्रत्यक्ष प्रमाणानें सिद्ध करून दाखविलें आहे! सारांश, डॉ. बोस यांचे हे शोध पाश्चात्य शास्त्रीय ज्ञानांत बरीच मोठी क्रांति करणारे व कृषिकर्माच्या उद्योगाला पुष्टि देणारे आहेत, याविषयीं आतां कोणाचाही मतभेद होणें शक्य नाहीं. डॉ. जगदीश यांच्यासारखे अनेक बुद्धिमान् व कल्पक लोक हिंदुस्थानांत असतील; त्यांच्या बुद्धीला अंकुर फुटण्यास अवश्य लागणारी साधनांची अनुकूलता श्रीजगदीशानें द्यावी म्हणजे झालें. डॉ. बोस यांच्या हातून असेच मनुष्यजातीवर महदुपकार करणारे शोध वारंवार

लावावे व त्या योगानें हिंदुस्थानच्या लौकिकांत भर पडावी एवढीच परमेश्वराजवळ आमची प्रार्थना आहे, आपल्या पूर्वजांना त्यांच्या परम शुद्ध आचारविचारानें जे सिद्धान्त प्रत्यक्ष झाले व ज्यामुळें त्यांना ‘ द्रष्टे ’ ही पदवी मिळाली ते सिद्धान्त सध्यांच्या भौतिक कालांत शास्त्रीय रीत्या कां होईना पण सिद्ध होऊन त्यांच्या सत्कीर्तींत अधिक भर पडत आहे व आपल्या सनातन धर्माची महती निर्मल रत्नाप्रमाणें पाश्चात्यांच्याही नजरेस येत आहे ही आनंदाची वार्ता आहे. आपल्या धर्माचे सिद्धांत स्वयंसिद्ध आहेत. त्यांची स्फूर्ति आपल्या हृदयांत होवो एवढेंच त्या चैतन्यस्वरूप पांडुरंगापाशीं आमचें मागणें आहे.

२. प्रो. जगदीशचंद्र बोस यांनीं आपल्या कलकत्त्यास बंगालचे गव्हर्नर यांच्या अध्यक्षतेखालीं दिलेल्या वरील विषयावरील व्याख्यानाचे शेवटीं म्हटलें आहे कीं, “The plant–world like the animal world is a thrill and a throb with responsiveness to all the stimuli which fall upon it.” विसाव्या शतकांतील हा एक अपूर्व शोध आहे. प्राणिकोटीप्रमाणें वनस्पतिकोटींतही चैतन्यतत्त्व भरलेलें असून नामरूपात्मक विविध सृष्टीच्या पोटांतून एकच ‘संविद्’ खेळत आहे, असें प्रो. बोस यांनीं ह्या व्याख्यानांत सिद्ध करून दाखविलें आहे. ही संविद्, आत्मा, चैतन्य, पुरुष, स्पिरिट–तिला काय वाटेल तें नांव द्या–ती योग्यांना दिसत नाहीं, भक्तांना ती वर्णवत नाहीं व शास्त्रशोधकांना तिची चिकित्सा करतां येत नाहीं ! विचारानें, ध्यानानें, तन्मयतेनें तिचा अनुभव घेऊन गप्प बसावयाचें आहे. ‘ठायींच बैसोनी करा एकचित्त’ किंवा ‘नाहीं तरी ठायीं उगा राहा’ असे अनुभवी सत्पुरुष सांगतात. प्राणिकोटि, वनस्पतिकोटि, उद्भिजकोटि अशा सर्व कोटींना व सर्व अवस्थांना

प्रकाशित करणारी, सर्वांतर्यामीं असलेली, अनंत नामरूपांचा उत्पत्तिस्थितिलय करणारी जी चैतन्यकला तिला ओळखून तिच्याशीं तन्मय होऊन महात्मे सुखरूप होतात.

३. डॉ. बोस हे पंजाब युनिव्हर्सिटीपुढील आपल्या व्याख्यानांत म्हणाले, "प्राणिवर्गामध्यें उद्भिजांपेक्षां अधिक उत्साह असतो. प्राणिवर्ग स्थानांतर करूं शकतो व जड वृक्षांना हें करतां येत नाहीं, अशी साधारण समजूत आहे. परंतु प्राणिवर्गावर जी हवा व जीं रविकिरणें आघात करीत आहेत, तींच वृक्षादिकांवर करीत असतात. यासंबंधानें वृक्षादिकांची प्रतिक्रिया (Response) काय असते, हें पाहणें मोठें मनोरंजक आहे. या अंतःस्थ प्रतिक्रिया अर्थात् डोळ्यांनीं पाहतां येणार नाहींत. विजेचा वगैरे प्रयोग केला असतां वृक्षादिकांची प्रतिक्रिया कशी असते, त्याचें या प्रश्नास उत्तर काय असतें, हें त्यांच्याकडून लिहून काढण्याचें मीं एक यंत्र केलें असून, या यंत्रावरून पुढील गोष्टी दिसून आल्या. रात्रीं थंड हवा पडल्या-नंतर वृक्षादिकांची प्रतिक्रिया मंद होऊं लागते व प्रथम प्रथम तर ती अगदीं अस्पष्ट असते. आघातावर आघात केल्यास त्यांमध्यें पुनः उत्साह उत्पन्न होऊन प्रतिक्रिया अधिक जोराची होऊं लागते. तसेंच वृक्षादिकांनीं जल व अन्न यांचें ग्रहण केल्यावर त्यांना प्राण्यां-प्रमाणेंच जाड्य येतें. पण कृत्रिम उपायांनीं त्यांच्या पोटांतून हें अन्न जर काढून घेतलें, तर त्यांना प्राण्यांप्रमाणेंच हलकें वाटून त्यांच्या प्रतिक्रिया अधिक उत्साहाच्या होतात. सहज प्रेरणेनें (Automatic) होणाऱ्या हालचालींमध्येंही प्राण्यांमध्यें व वृक्षादि-कांत साम्य दिसून येतें. दोघांमध्यें एकच नियम लागू पडतात. उष्णतेनें प्राण्यांमधील नाडी जोरानें वाहते. त्याप्रमाणें झाडांमधील भागांतही होतें. ईथरचा प्रयोग केला असतां दोहींची क्रिया सारखीच

बंद पडते. क्लोरोफॉर्मचा परिणाम ईथरपेक्षांही दोघांना अधिक भयंकर होतो. जें विष प्राण्याच्या हृदयांच्या क्रियेस अपाय करतें, तें विष वृक्षादिकांनाही त्याप्रमाणेंच अपाय करतें. मृत्यूचा झटका वृक्षांनाही बसतो."

## ११. आण्णासाहेब पटवर्धन

माघ शुद्ध ११ स १८३८ शुक्रवारीं सकाळीं ८॥ वाजतां आमच्या पुण्याचा पुण्यात्मा आण्णासाहेब पटवर्धन हे ७० वे वर्षी निजधामास गेले. बंडाच्या वेळेपासून आजपर्यंतचा राजकीय, सामाजिक, औद्योगिक व धार्मिक चळवळींचा इतिहास त्यांच्यासारखा कोणासच माहीत नव्हता. प्रपंचाविषयीं विरक्त होऊन त्यांना पुष्कळ वर्षें झालीं होतीं; तरी त्यांचा स्वदेशाभिमान अत्यंत जळजळीत होता. आपल्या देवाधर्मांविषयीं, आपल्या पूर्वजांविषयीं, आपल्या राष्ट्राविषयीं त्यांना पराकाष्ठेचा अभिमान असे. उत्तम कायदेपंडित व नामांकित वैद्य अशी त्यांची विशेष प्रसिद्धि होती व सार्वजनिक कामांत टिळकांनाही त्यांची सल्लामसलत बिनमोल होती. आण्णासाहेब गुरुपुत्र होते. आळंदीचे श्रीनृसिंहसरस्वती हे त्यांचे गुरु होते. त्यांची स्नानसंध्या, देवतादर्शन, आरतीधूपारती इ. नित्यनेम कधींही टळत नसे. एखादे वेळेस नित्यनेम टळला तर आण्णासाहेबांनीं दोन दोन दिवसांची संध्या एका वेळेस करावी व मग चालू दिवसाची करावी! त्यांची मुद्रा गंभीर पण आनंदी असे. त्यांच्या भाषणांत स्पष्टवक्तेपणा व क्वचित् विनोदही असे. परोपकारांत, गुरुसेवेंत व सदाचारांत त्यांचा जन्म गेला. उत्तम वैद्य, उत्तम भगवद्भक्त, उत्तम कायदेपंडित, उत्तम देशभक्त व उत्तम राजकारणपटु असा हा पुरुष नाहींसा झाल्यानें त्यांची जागा ओस पडली आहे व ती भरून निघणें दुर्घट वाटतें. वैद्य मिळेल, सभेला अध्यक्ष मिळेल, पण अस्सल जुन्या वळणाचा, स्वकर्तव्यनिष्ठ,

उत्साही, सच्छील, करारी, जुन्यानव्या विद्यांत पारंगत, तरुणांपुढें कित्ता ठेवण्यासारखा असा धर्मात्मा पुण्यांत आज दुसरा नाहीं ! मूर्तिमंत सद्धर्म नाहींसा झाला. 'पहिलें तें हरिभजन। दुसरें तें राजकारण' हें त्यांचें चरित्र होतें. त्यांच्या आत्म्याला सद्गति मिळालीच आहे. त्यांचें अनुकरण करण्याची बुद्धि परमात्मा सर्व तरुणांस देवो !

# १२. वासुदेवानंद सरस्वति

जन्म :—श्रावण शुद्ध ५ शके १७७६. समाधि :—ज्येष्ठ व. ३० शके १८३६.

१. सुप्रसिद्ध सत्पुरुष श्रीवासुदेवानंदसरस्वति ऊर्फ टेंभ्ये स्वामी यांनीं शके १८३६ ज्येष्ठ वद्य ३० मंगळवारीं रात्रीं ११॥ वाजतां हें मर्त्य शरीर सोडून अखंड समाधीचा अंगीकार केला. "मला समाधि येथेंच (गरुडेश्वरीं) द्यावी, शरीर आतां टिकेलसें दिसत नाहीं," असे उद्‌गार त्यांचे तोंडून कांहीं दिवस आधीं निघत. महात्म्यांचें देहावसान सामान्य जीवांच्या दुःखशोकाला कारण होणें स्वाभाविक आहे; तथापि त्यांच्या बाजूनें पाहतां ह्या भौतिक पिंडाच्या ठिकाणीं त्यांची अनास्था असल्याकारणानें त्यांना मरण-समयीं दुःखशोकाचा आवेग येणें अशक्य आहे. दृष्टोऽतस्तत्त्वदर्शिभिः' "गरुडेश्वरीं श्रीदत्ताचें मंदिर बांधून संन्याशांचा मठ स्थापन करण्याबद्दल स्वामीनीं शेवटीं आपल्या शिष्यवर्गास आज्ञा केली आहे" असें आम्हांस एका गृहस्थानें पत्रद्वारें कळविलें आहे.

२. स्वामींच्या दर्शनाचा व श्रवणाचा लाभ आम्हांला नरसो-बाचे वाडीस झाला होता. स्वामींची योग्यता फार मोठी होती. 'स्वाध्यायाभ्यसन' रूप वाङ्मयतप स्वामींचें अतिशय झालें होतें. स्वामींना योगाची, ज्योतिषाची, वैद्यकीची माहितीहि पुष्कळ होती. स्वामींच्या हातून थोर परोपकार झाले आहेत. स्वामीनीं पुष्कळ जीवांना शारीरिक व मानसिक क्लेशांपासून मुक्त केलें आहे. स्वामींचा शिष्यपरिवार फार मोठा असून त्यांच्याविषयीं सर्व

भरतखंडभर हजारों लोकांची पूज्यबुद्धि आहे. असा महात्मा भरत-खंडांत अलीकडच्या काळांत क्वचित्च झाला असेल. स्वामीना त्यांच्या भक्तमंडळींत श्रीदत्तावतारच समजतात.

३. स्वामींचे अनेक चमत्कार ऐकण्यांत येतात. स्वामींनीं चमत्कारांनींही कित्येकांचे रोग बरे केले आहेत. योगविद्या, औषध-पाणी व चमत्कारांच्या सिद्धि ह्या सर्व स्वामींपाशीं असल्यामुळें त्यांजकडे गेलेला रोगी अकृतकार्य क्वचितच परत आला असेल. एका मूळव्याध असलेल्या मनुष्याला एका आसनाच्या द्वारें तीन दिवसांत स्वामींनीं व्याधिमुक्त केलें होतें. काशीचे एक प्रख्यात संन्यासी स्वामींच्या दर्शनाची फार दिवस अपेक्षा करीत होते, तर स्वामींनीं मोठ्या तांतडीनें काशीस त्यांच्या देहपाताच्या पूर्वी ४ तास जाऊन त्यांची भेट घेऊन त्यांना समाधान दिल्याची गोष्ट एका काशीकर पंडिताच्या तोंडून आम्हीं ऐकली आहे.

४. श्रीवासुदेवानंद स्वामींचा जन्म शके १७७६ मध्यें श्रावण शु० ५ स २६ घटकांनंतर सावंतवाडी संस्थानांत निर्मला नदीच्या तीरीं माणगांव येथें झाला. त्यांना जन्म देणारे आईबाप धन्य होत. त्यांच्या मातोश्रीचें नांव रमाबाई व वडिलांचें नांव गणेशभटजी हें होय. हे जातीचे कऱ्हाडे ब्राह्मण होत. यांचें गोत्र अत्रि. माणगांवा-जवळच 'सिद्धपर्वत' नांवाचा एक डोंगर आहे. त्यावर एक गुहा आहे, ती स्वामींची तपोभूमि होय. स्वामींचें वेदाध्ययन बाळपणींच झालें; पण तेव्हांपासून वेदांनीं स्वामींचें तोंड कधींच सोडलें नाहीं. "जरी कोणी करी पुसणें। तरी होआवें ऐसें बोलणें। नातरी आवर्तणें। निगम कां नाम ॥ २२१ ॥ ऋग्वेदादि तिन्ही। प्रति-ष्ठिजती वाग्भुवनीं। केली जैसी वदनीं। ब्रह्मशाळा ॥ २२२ ॥" (ज्ञानेश्वरी अ. १७) हें बोलणें वासुदेवानंद स्वामींना पूर्णपणें

लागू पडतें. त्यांच्यासारखा तपस्वी, विरक्त, शुद्धाचरणी, स्वाध्याय-निरत व साक्षात्कारी दत्तभक्त असा दिव्य ब्राह्मण ह्या काळीं दुसरा आढळणें कठीण आहे. स्वामींचें नरसोबाच्या वाडीस नेहमीं जाणें असे व तेथेंच त्यांना श्रीदत्तदर्शन प्रथम झालें. स्वामींनीं माणगांवास एक सुंदर दत्तमंदिर बांधलें आहे. स्वामींनीं तत्पूर्वी एक वर्ष म्हणजे शके १८०४ मध्यें अश्विनमासांत स्वतः चांद्रायणव्रत केलें होतें. स्वामींचा विवाह त्यांच्या वयाच्या २१ व्या वर्षी झाला होता व १५ वर्षांनीं त्यांचें कुटुंब सौ. अन्नपूर्णाबाई शके १८१२ वैशाख कृष्ण १४ दिवशीं वैकुंठवासी झाल्या. त्यानंतर लवकरच म्हणजे आपल्या वयाच्या ३६ व्या वर्षी संन्यासाश्रमाची त्यांनीं दीक्षा घेतली !

५. वासुदेवानंद सरस्वति स्वामींचे नरसोबाची वाडी, नरसी, बढवाई, गरुडेश्वर इत्यादि ठिकाणचे चातुर्मास खूप गाजले आहेत. हजारों लोकांनीं त्यांच्या दर्शनाचा, उपदेशाचा व भजनपूजनाचा लाभ घेतला आहे. स्वामीमहाराजांसारखा एक महात्मा धर्मप्रसाराचें जेवढें काम करतो तेवढें हजारों वक्त्यांस व लेखकांस मिळूनही करतां येणार नाहीं. महात्म्याच्या भोंवतालचें वातावरणच आधीं एवढें पवित्र होत असतें कीं, तेथें गेल्यावर मनुष्याचे नित्याचे दुर्विकार त्याला कांहीं काळ तरी सोडून जातात. स्वामींची ग्रंथ-संपत्तिही विपुल आहे. पण त्यांच्या ग्रंथांपेक्षां त्यांच्या विभूति-मत्वाचीच लोकांस वहुत काळ आठवण राहील. स्वामींचें वैराग्य तीव्र होतें. परदुःखनिवारणार्थ झटण्याच्या कामीं ते थोडीही कसूर करीत नसत. परमात्मा अशा महात्म्यांची परंपरा भरतखंडांत अविच्छिन्न ठेवो अशी त्याच्या चरणीं प्रार्थना आहे.

६. श्रीस्वामीमहाराजांनीं केलेले ग्रंथही बरेच असून त्यांचे बोलही अमोल आहेत. श्रींची स्वारी सर्व भरतखंडभर नेहमीं फिरत

होती. त्यांनीं लिहिलेले ग्रंथ ठिकठिकाणीं असावेत असें वाटतें. त्यांपैकीं कांहीं ग्रंथ सावंतवाडीकरांनीं व नृसिंहवाडीकरांनीं व स्तोत्रें वगैरे बडोदेकरांनीं छापून प्रसिद्ध केलीं आहेत.

त्यांच्या ग्रंथांचीं नांवें

१. द्विसाहस्री श्रीगुरुचरित्र (संस्कृत सटीक)
२. श्रीदत्तलीलामृताब्धिसार (प्राकृत) ओवीबद्ध
३. सप्तशती श्रीगुरुचरित्र (प्राकृत)
४. माघमाहात्म्य (प्राकृत) नर्मदास्तोत्रासह
५. वेदपादस्तुती (संस्कृत सटीक)
६. कुमारशिक्षा (संस्कृत सटीक)
७. पदसमूह (स्तोत्रें, अष्टकें वगैरे)
८. स्त्रीशिक्षा (गद्य) प्राकृत
९. समश्लोकी श्रीगुरुचरित्र, श्रीगुरुसंहितासचूर्णिक
१०. श्रीदत्तमाहात्म्य (प्राकृत ओवीबद्ध)
११. श्रीदत्तपुराण सटीक (संस्कृत)
१२. दत्तचंपू सटीक (संस्कृत)
१३. श्रीकृष्णालहरी सटीक (स्तोत्रपंचक)
१४. षट्पंचाशिका (संस्कृत)
१५. एकावन्नश्लोकी श्रीगुरुचरित्र (संस्कृत)
१६. करुणात्रिपदी–पंचपदी भजन
१७. नर्मदालहरी (आरती, अनसूयास्तोत्रें, शंकराचार्यस्तुति, वगैरे)
१८. दत्तात्रेयआख्यानबोधक श्लोक (नक्षत्रमालिका व प्रार्थनातारावली)
१९. श्रीदत्तभावसुधारस (संस्कृत) घोरसंकष्टहरणस्तोत्रासह

२०. आत्मानात्मविचार पूर्वार्ध–ज्यांत नवरत्नमाला चित्त-सद्बोधनक्षत्रमाला आहे.

२१. प्राकृतमननसार (गद्य)

२२. श्रीगुरुस्तुति संस्कृत (प्राकृत टीकेसह)

याशिवाय छापून निघालीं नाहींत अशीं श्रीव्यंकटेशस्तोत्र, श्रीरामस्तोत्र, पांडुरंगस्तोत्र, गोदास्तोत्र, प्रत्येक नद्यांचे हारबंध वगैरे आहेत.

## १३. विष्णुबुवा जोग

पुण्याच्या तालमीविषयीं प्रसिद्ध असलेल्या जोग घराण्यांत यांचा जन्म झाला. हे आपल्या वयाच्या ५४ व्या वर्षीं १९२० च्या फेब्रुवारींत वैकुंठवासी झाले. तालीम सुटून यांना परमार्थाचा नाद लागला. वै. नानामहाराज साखरे यांच्यापाशीं यांनीं ज्ञानेश्वरी ऐकली व पुढें वेदांतविषयाचा व्यासंग यांनीं घरीं स्वतःच वाढविला. बोवांचें ब्रह्मचर्य, निर्लोभता, साधी वर्तणूक, मोकळी वृत्ति व निरूपणाची उत्कृष्ट हातोटी हे गुण वाखाणण्यासारखे होते. लोभी, दांभिक व लबाड 'गुरूं'वर यांची नजर फार करडी होती व त्यामुळें ते कांहीं फडवाल्यांत अप्रिय असत. श्रीज्ञानेश्वरचरणीं यांची निष्ठा होती. वारकरी मंडळांत त्यांच्या तोडीचा वजनदार मनमिळाऊ व परोपकारी मनुष्य आणि निस्पृह कीर्तनकार सांपडणें कठीण. अविवाहित राहून ज्ञानेश्वरीचें अध्ययन व अध्यापन करण्याचा त्यांनीं संकल्प केला होता व तो आजन्म तडीस नेला. यांचा स्वभाव कित्येकांसीं निस्पृह व कित्येकांसीं प्रेमळ व मोकळेपणाचा होता. २५ वर्षें पंढरी, आळंदी, देहू, त्रिंबक येथील वाऱ्या करून त्यांनीं हजारों लोकांस कीर्तनसुख मिळवून दिलें. त्यांचें वक्तृत्व खणखणीत व परिणामकारक होतें. सर्व जातींच्या लोकांत ते मिळूनमिसळून वागत. तुकोबांचा गाथा, अमृतानुभव, हरिपाठ आणि चांगदेवपासष्टी हे त्यांनीं सार्थ छापले आहेत. त्यांची कीर्तनपद्धति आबाळसुबोध, ठसठसित असून वारकऱ्यांवर त्यांची छाप विलक्षण होती. वारकऱ्यांच्या शिक्षणासाठीं त्यांनीं आळंदीस वारकरी शिक्षण-

संस्था स्थापन केली असून त्यासाठीं दोन वर्षांत १५–२० हजार रुपये त्यांनीं मिळविले होते. अमृतानुभवाचें निरूपण ३ महिने त्यांच्या तोंडून मला ऐकायला मिळालें होतें.

## १४. भक्त तिरुपन्नाल्वर

१. कावेरी नदीच्या दक्षिण तीरावर निसलपुरी नांवाचें एक गांव होतें, त्याला सांप्रत उदेयूर म्हणतात. हें श्रीरंगनाथाच्या समोरच आहे. त्या नगरींत प्राचीन काळीं सूर्यवंशीय राजे राज्य करीत होते. धर्मवर्मा राजाचा पुत्र सोल हा राज्य करीत असतांना त्याला एक सुंदर गुणवती कन्या झाली. राजा स्वत: श्रीरंगनाथाचा उत्तम भक्त असल्यामुळें मलीला भक्तीचें वाळकडूंच मिळालें होतें. त्या राजकन्येला राजानें धर्मशिक्षण चांगलेंच दिलें होतें. तिची श्रीरंगनाथावर निस्सीम भक्ति जडली होती. ती उपवर झाली तेव्हां बापास एकदां लडिवाळपणानें म्हणाली 'महाराज ! मला दुसरा वर शोधण्याच्या खटपटींत न पडतां माझें श्रीरंगनाथाशींच लग्न लावून द्या.' बापाला हें कन्येचें वाक्य ऐकतांच फार आनंद झाला. त्यानें श्रीरंगनाथाचें मंदिर उत्तम प्रकारें शृंगारलें. देवाच्या अंगावर उंची वस्त्रें व रत्नभूषणें घातलीं व आपल्या कन्येचें श्रीरंगनाथाशीं मोठ्या समारंभानें लग्न करून दिलें. त्या वेळेपासून ती श्रीरंगनाथाची मनोभावें सेवा करूं लागली.

२. त्याच सुमारास तिरुपन्नाल्वर याचा एका पंचम जातीच्या म्ह. निकृष्ट घराण्यांत जन्म झाला. ही गोष्ट गतकलि ३४३ या सालीं झाली. त्याचें जन्मापासूनच श्रीरंगनाथावर निरतिशय प्रेम बसलें. पण त्याची जात हलकी असल्यामुळें श्रीरंगनाथाच्या मंदिरांत त्याला पाऊल टाकतां येईना. म्हणून कावेरीच्या दक्षिण तीरावर बसून हातीं वीणा घेऊन तो श्रीरंगनाथाच्या स्तवनपर उत्तम उत्तम

पदें म्हणत असे. तो भक्तिप्रेमांत तल्लीन झाला म्हणजे त्याला तहानभूक व थंडीवारा यांचें भानही राहत नसे.

३. एके दिवशीं राजकन्येनें श्रीरंगनाथास प्रेमानें विचारलें, 'हा तुझा भक्त इतका कां बरें दूर बसतो ! देवा ! त्याला आपल्या जवळ येण्यास कोणती हरकत आहे !' यावर श्रीरंगनाथानें त्याला बोलाविलें, पण तो जवळ जाईना. देवास त्याच्यावांचून चैन पडेना ! देवानें श्रीरंग शारंग महामुनींद्र यांच्या स्वप्नांत जाऊन सांगितलें कीं, 'हा तिरुपन्नाल्वर माझा परम भक्त आहे. जातिभेद मनांत न आणतां तूं त्याला खांद्यावर घेऊन मजकडे ये !' श्रीरंग मुनींद्र पहांटेस उठला व स्नानसंध्या उरकून कावेरीच्या दुसऱ्या तीरावर गेला आणि त्या भक्ताच्या पायांवर लोटांगण घालून त्याला म्हणाला, 'भक्तोत्तमा ! ज्याच्या प्रेमानंदांत तूं नित्य डुबून राहिला आहेस त्या श्रीरंगनाथानेंच तुला नेण्यासाठीं मला पाठविलें आहे.' तिरुपन्नाल्वर दूर सरला व म्हणाला, 'काय ? मी नीच जातींत जन्मलों असून श्रीरंगनाथाच्या पवित्र मंदिरास मी आपले पाय कसे लावूं !' यावर मुनींद्र म्हणाला, तुला पाय लावावयाचें कारणच नाहीं. तूं माझ्या खांद्यावर बैस, मला तुला घेऊन येण्याची प्रभूची आज्ञा झाली आहे. हें ऐकतांच तो भक्त आनंदातिरेकानें बेहोष झाला, अष्टसात्त्विक भाव त्याच्या शरीरावर उमटले, त्याचें देहभान गेलें व अशा स्थितींत मुनींद्रानें त्याला खांद्यावर घेतलें आणि तो श्रीरंगाच्या मंदिरांत आला. तो मंदिरांत येतांच त्या लक्ष्मीनारायणानें त्याला आपलें विश्वस्वरूप दाखविलें. तेव्हां त्या भक्तराजानें ईश्वरस्तुतिवर दहा पद्यें रचून म्हटलीं व तीं म्हणत असतांनाच परमात्म्यानें त्याला सर्व लोक पाहत असतांनाच सदेह वैकुंठास नेलें.

# १५. श्रीनारायणमहाराज केडगांवकर

१. पुणें जिल्ह्यांत केडगांवनजीक बेटावर श्रीनारायणमहाराजांच्या बंगल्यासमोर पूर्वाभिमुख बांधलेल्या रम्य मंदिरांत श्रीदत्तात्रेयाची प्राणप्रतिष्ठा वैशाखांत (१८३५) मोठ्या अपूर्व समारंभानें झाली. समारंभासाठीं १५० पासून २०० पर्यंत निवडक वैदिक ब्राह्मण ठिकठिकाणांहून बोलाविण्यांत आले होते. सर्व व्यवस्था दिद्वद्वर्य कृष्णशास्त्री उप्पिनबेटगिरि यांजकडे सोंपविली होती व शास्त्रीबोवांनीं महिनाभर कायावाचामनानें निरपेक्षपणानें झटून एकंदर व्यवस्था फार उत्तम ठेवली होती. नागपूर, वऱ्हाड, खानदेश, मुंबई इत्यादि ठिकाणांहून महाराजांचे शिष्य व इतर भाविक व निमंत्रित लोकही पुष्कळ जमले होते. वेदशास्त्रपद्धतीला बरोबर धरून एकंदर समारंभ सर्वोत्कृष्ट झाला. मुख्य स्थापनेच्या दिवशीं म्हणजे रविवारीं एकंदर समाज २०–२५ हजारांपर्यंत जमला होता ! ह्यापैकीं पांच हजार तर ब्राह्मणसमुदाय होता. अठरापगड जातींच्या सर्व लोकांची भोजनादिकांची व्यवस्था उत्तम ठेविली होती. मंदिरासमोर प्रशस्त विहीर बांधली असून सभोंवार सुंदर बगीचा तयार केला आहे, त्यांत तुळशी वगैरेचीं मोठमोठालीं अनेक रोपें वाढलीं आहेत. जवळच विस्तृत धर्मशाळा यात्रेकरूंसाठीं बांधली असून ह्या प्रसंगासाठीं ४–५ विस्तृत मंडपही मुद्दाम उभारले होते. शनिवारीं सकाळपासून दर्शनेच्छु लोकांची गर्दी वाढूं लागली. रात्रीं श्रीदत्तमंदिरांत सभा भरून वेदमंत्र झाले व आमंत्रित गृहस्थांपैकीं महाराजांच्या आग्रहावरून रा. रा. पांगारकर यांचें ‘ भक्तियोग ’

या विषयावर व्याख्यान झालें. मंदिरांत आंतवाहेर लोकांची खेंच झालीच होती. रविवारीं प्रतिष्ठेच्या पूर्वांगभूत अधिवास वगैरे कृत्यांचें अनुष्ठान व नवकुंडी होम होऊन मोठ्या नामगजरांत श्रीदत्तदेवाची प्राणप्रतिष्ठा झाली. त्या वेळचा एकंदर देखावा अवर्णनीय व भक्तिभावोद्दीपक होता. पहिली पंगत सायंकाळीं पांच वाजतां पडली, तेथपर्यंत मंदिराच्या प्राकारांत होमहवनाचा व वेदमंत्रांचा सुस्वर व पवित्र ध्वनि सर्वत्र ऐकूं येत होता. ऋग्वेदी, यजुर्वेदी व सामवेदी ब्राह्मण जमले होते. ब्राह्मण लांबून लांबून बोलाविले होते. सोमवारीं सकाळीं पालखीची मिरवणूक निघून अभ्यंगस्नान व अवभृतोत्सव होऊन अनुष्ठानसमाप्ति झाली. भोजनोत्तर मंदिरांत आरती व वेदमंत्र झाले. नंतर श्रीमदाचार्यांच्या दरबाराप्रमाणें वैय्याकरणी, नैय्यायिक, पूर्वमीमांसी, वेदांती, गायक इत्यादिकांच्या हजिऱ्या होऊन **श्रीशिवगंगामठाचे आचार्य श्रीगंगाधरभारती स्वामी** यांचें आलेलें आशीर्वादपत्र सभेस वाचून दाखविण्यांत आलें. त्या पत्रांत श्रीमदाचार्यांनीं म्हटलें आहे, "आपणांकडून विनंतिपत्र आलें त्यांत वैशाखमासीं शुक्लपक्षीं तिथौ पंचमी शुभदिनीं श्रीक्षेत्र बेट येथें श्रीदत्तात्रेयदेवता प्रतिष्ठा करावयाची आहे, हें श्रुत होऊन आम्हांस फार संतोष झाला. आपण साक्षात् अवतारी पुरुष असल्यानें राजाराष्ट्रांना क्षेम व्हावें एतदर्थ आपण महत्प्रयत्नानें केलेलें पुण्यकार्य निर्विघ्नपणें परिपूर्ण व्हावें म्हणून श्रीशारदाचन्द्रमौलीश्वरांचा पूर्ण अनुग्रह आहे व आम्हींही निरंतर आपणांकरितां श्रेयःप्रार्थना करून आहों. प्रकृत श्रीसंस्थानाकडून एक धोतरजोडा पाठविला आहे तें वस्त्र श्रीदत्तात्रेय मूर्तीस परिधान करावें. पीठाविषयीं भक्तिश्रद्धा एकनिष्ठ ठेवून इतोधिकश्रेयः पुण्यास पात्र व्हावें." शेवटीं रा. पांगारकर यांनीं उपसंहारात्मक

भाषण करून 'धर्मजागृति आणि देव व संत यांच्या अवतारांचें कार्य' ह्या विषयाचें स्पष्टीकरण केलें व महाराजांच्या तर्फे जमलेल्या ब्रह्मवृंदांचे व स्वयंसेवकांचे आभार मानले. मंगळवारीं सकाळीं महारुद्र होऊन सायंकाळीं ब्रह्मवृन्दसंभावना होऊन ब्रोळवण झाली.

२. श्रीनारायणमहाराजांची वृत्ति सर्वदा शांत, गंभीर व आनंदी असते. त्यांच्या दर्शनार्थ लोकांची उत्सुकता अतिशय असल्यामुळें त्यांच्यासाठीं उंच व्यासपीठ केलें होतें. देवमामलेदारांप्रमाणें यांचीही शांति अभंग आहे. यांच्या वृत्तीला डोल नाहीं, हा एक यांचा अमोलिक गुण आहे. सर्व कार्यांवर यांची स्वतःची देखरेख असून प्रत्येकाशीं 'ज्याचे त्यापरी' वागण्याची यांची हातोटीही विलक्षण आहे. हे मोठे दक्ष, चतुर, दयाळु व गोड स्वभावाचे आहेत. कोणाशींही कठोर भाषण नाहीं. रुंद कपाळपट्टी, पाणीदार डोळे व आनंदी स्वभाव यांमुळें यांच्या दर्शनानेंही प्रेक्षकांस समाधान वाटतें. यांच्या शिष्यवृंदाबाहेरच्या लोकांसही यांच्या दर्शनसंभाषणानें प्रेमादरच उत्पन्न व्हावा अशी यांची सहजरम्य राहणी आहे. यांच्या चमत्कारांच्या अनेक कथा यांच्या शिष्यमंडळींतून ऐकूं येतात. कांहीं तपाचें, सिद्धीचें, प्रेमाचें बळ या पुरुषापाशीं असावें असें प्रत्येकास वाटतें. यांच्यासंबंधानें अनेकांचे अनेक तर्क व दुराग्रहही आहेत हें आम्हांस माहीत आहे, तथापि बरेच दुराग्रह सहवासानें दूर होण्याचा संभव आहे. येथें एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, रामदासतुकाराम यांसारखे महाराजांनीं कांहीं ग्रंथ लिहिले नाहींत; विवेकानंदांसारखे ते कांहीं धर्मावर प्रवचनें देत नाहींत अथवा धर्मगुरूसारखे एखाद्या अधिकारयुक्त गादीवर अधिष्ठित झालेले नाहींत, अथवा ज्योतिष्याप्रमाणें भविष्य कथन करीत नाहींत; तर मग ते जेथें जातील तेथें असा जनसमुदाय त्यांच्या दर्शनाकरितां नुसता उत्सुक असतो

इतकेंच नाहींतर वारंवार दर्शन घेण्याकरितां निर्विकार मनानें इतका हपापलेला कां असतो ? दर्शनाबरोबर हजारों लोकांच्या चित्ताला प्रशस्ति वाटणें ही गोष्ट कांहीं साधारण नाहीं. महाराजांचें वयही लहान आहे. त्यांच्या शिष्यांत मोठमोठे पदवीधर व अधिकारी लोक आहेत. महाराजांनीं अगदीं बालवयांत गाणगापूरला अनुष्ठान केलें होते व ते साक्षात्कार झालेले आहेत यांत शंका नाहीं. त्यांची उपासनाही चालू आहे. रात्रीं ते सारे एक प्रहर निजतात, उत्तर रात्रीं त्यांचा ध्यानयोगाचा अभ्यास चालू असतो. त्यांच्या सहवासांत माझे कांहीं दिवस गेले आहेत. महाराज अत्यंत कोमळ मनाचे, दयाळु, तसेच दक्षही आहेत. कोणाविषयींही कुशब्द मुखांतून निघणें तर काय, पण ऐकणेंही त्यांना आवडत नाहीं. बेटावर महाराजांच्या वातावरणांत निंदाद्वेषादि दुर्विकारांना यत्किंचित्‌हि थारा कधीं मिळत नाहीं. ते ज्ञान बोलत नाहींत पण अविकृत जीवांना त्यांच्या सन्निधानांत पवित्र विचारांची उशी मिळते ही गोष्ट कांहीं सामान्य नाहीं. वृत्ति व मुद्रा सर्व काळ अचल, निर्विकार व निर्मळ असते. साधुसंतांच्या प्रेमळ कथा त्यांना फार आवडतात व भगवत्प्रेमनिरूपणप्रसंगीं त्यांचे नेत्र पाहण्यासारखे असतात.

३. यांच्या भक्तमंडळांत यांना अवतारी समजतात. आमच्या देशाला धर्मजागृतीशिवाय दुसरा तरणोपाय नाहीं. श्रीवासुदेवानंदसरस्वति, श्रीगुलाबराव, श्रीनारायणमहाराज यांच्यासारखे लोकमान्य व वंद्य पुरुष धर्मजागृतीचें कार्य करण्यास जर पुढें सरसावत आहेत तर हें देशाचें भाग्य आहे असें आम्ही समजतों. संतांचे आचार सामान्य जीवांना मार्गदर्शक होतात, म्हणून ज्यांची नीतिमत्ता अत्यंत प्रखर, ज्यांचें वैराग्य धगधगीत, ज्यांची राहणी अत्यंत शुद्ध-

ज्यांचे भक्तिज्ञानवैराग्य निःसंदेहकोटींतलें, ज्यांचें दर्शन तापहारक, ज्यांचा उपदेश परिणामकारक, असे महात्मे आम्हा जीवांच्या उद्धारासाठीं तो धर्मप्रभु श्रीशेषशायी नारायण भरतभूमीवर पाठवो, अशी त्याची मी प्रार्थना करितों.

# १६. संत सूरदास

१. श्रीकृष्णभक्त सूरदासजी यांचें नाव आबालवृद्धांस महशूर आहे. हे जन्मांध होते, पण यांनीं पाहिलें तें फारच थोड्या सभाग्यांनीं पाहिलें असेल ! यांची वाणी अत्यंत मधुर असून उत्तर हिंदुस्थानांतील लोकांच्या अत्यंत परिचयाची आहे.

२. यांचा जन्म संवत् १५४० मध्यें झाला असून यांचा प्रयाणकाळ संवत् १६२० हा सर्वमान्य आहे. संवत् मध्ये १३५ वजा केले म्हणजे शालिवाहन शक मिळतो, अर्थात् शके १४०५–१४८५ हा यांचा काळ होय. महाराष्ट्रांत हा काळ श्रीदत्तोपासनेचा होता. जनार्दनस्वामी व नाथांच्या चरित्राचें पूर्वार्ध म्हणजे सूरदासांचा काळ होय. उत्तरेकडील हे परम श्रीकृष्णभक्त शके १४८५ मध्यें समाप्त झाले, तेव्हां श्रीनाथमहाराज पैठणास प्रकट झाले होते व तदनंतर दहाच वर्षांनीं त्यांचा भागवतधर्मसूर्यप्रकाश असा 'श्रीनाथभागवत' हा महाप्रासादिक ग्रंथ शके १४९५ मध्यें महाराष्ट्रांत प्रकट झाला. सूरदासांचा प्रख्यात सूरसागर उत्तरेकडे गुप्त झाला व जणुं भागवतरूपानें दक्षिणेंत प्रकट झाला !

३. सुरदासास सहा बंधु होते, ते यवनांशीं युद्ध करतांना परमगतीला पावले. सूरजचंद म्ह० सूरदास हे जन्मांध असल्यामुळें यांना युद्धास जातां आलें नाहीं व यांची प्रकृतिही युद्धसन्मुख नसून सत्त्वस्थ होती. हे एका कूपांत पडले तेथें सहा दिवस स्वस्थ हरिचिंतनांत निमग्न होते, यांनीं ओरड मुळींच केली नाहीं ! सातव्या दिवशीं यदुपतीनें यांचें रक्षण केलें. हे जन्मांध होते का पुढें अंध झाले हें

निश्चित समजण्यास मार्ग नाहीं. सूरदास हे पूर्ववयीं एका सुंदरीला पाहून मोहित झाले, तेव्हां या दोषाच्या परिहारार्थ त्यांनीं आपले डोळे स्वहस्तानें काढून टाकले अशी एक आख्यायिका आहे, व शिवाय यांच्या कवितेंत विविध रंग, ज्योति, अनेकानेक हावभाव यांचें इतकें मनोरम वर्णन आलें आहे कीं तें बाह्य सृष्टि त्यांनीं प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्यांना करितांच आलें नसतें असें 'हिंदीनवरत्न' ग्रंथांत (पृ. १४८) लिहिलें आहे; पण ह्या म्हणण्यांत आम्हांला कांहींच अर्थ वाटत नाहीं. जन्मांध अशा वै. श्रीगुलाबराव महाराजांच्या संगतींत आमचे अनेक दिवसरात्र गेले असल्यामुळें ज्यांचे अंतश्चक्षु हरिप्रसादानें खुले झाले आहेत त्यांना अंतर्बाह्य कांहींच अदर्शनीय नाहीं अशी आमची समजूत आहे व म्हणून वरील आख्यायिकेवरही आम्ही विश्वास ठेवीत नाहीं. सूरदासासारखे जे अनेक जन्मसंसिद्ध महात्मे जन्माला येतात त्यांच्या पूर्वचरित्रांत खोडचा काढायचा सामान्यांचा स्वभाव दिसतो, पण तो योग्य नाहीं.

४. सूरदासांचा व्रतबंध आठव्या वर्षी झाला. ते ब्राह्मण होते. कांहीं काळानें त्यांचे आईबाप त्यांना घेऊन मथुरेस गेले. तेथें सूरदासांच्या पूर्वजन्मसिद्ध कृष्णभक्तीला पूर आला व त्यांनीं आईबापांबरोबर परत घरीं (दिल्लीजवळ सीहीग्रामीं) जाण्याचें नाकारलें. 'अब मुझे यह रहने है' असें त्यांनीं मातापित्यांस सांगितलें तेव्हां ते रडूं लागले. 'तुमके अकेले किसके सहारे छोड जावे?' असा त्यांनीं प्रश्न केला. यावर त्या बालभक्तानें उत्तर केलें. 'कृष्णचंदका सहारा क्या थोडा है?' इतक्यांत एक साधु म्हणाला कीं 'मैं इस बालकको अपने साथ रख्खूगा.' नाइलाज होऊन आईबाप गांवीं गेले व त्या व्रजपतीला आपला प्रेमरूप बाल-

भक्त संगतीला मिळाला ! मथुरा, वृंदावन व गोकुळ या ठिकाणीं सूरदासांनीं अनेक वर्षें श्रीकृष्णभक्तीचा आनंद भोगला, व आपल्या अखंड कृष्णभक्तिसुधावृष्टीनें संसार (आपला व जनांचा) सुखरूप करून सोडला. शके १४३५ त यांच्या काव्यवृष्टीस प्रारंभ झाला असें म्हटलें तर सतत ५० वर्षें ही सुधावृष्टि होत होती असें म्हटलें पाहिजे.

५. श्रीवल्लभाचार्य हे यांचे गुरु होते व विठ्ठलनाथ नामक साधूचाही यांना समागम झाला होता. सूरदासांची सर्व वाणी श्रीकृष्णगुणगान करण्यांत खर्च झाली. त्यांना एकदां एका गुरुभक्तानें विचारलें कीं, 'आपने अपने गुरूका कोई छन्द क्यौं नहीं बनाया ?' यावर त्यांनीं उत्तर केलें, 'मैंने सब छन्द गुरुजीहीके वनाये हैं, क्यों कि मेरे गुरुजी और श्रीकृष्णचन्दमें कोईभी भेद नहीं है !' हें उत्तर विचार करण्यासारखें आहे. माझी सर्व कविता गुरुस्तुतिपरच आहे; कारण कीं माझे गुरु व श्रीकृष्ण यांत लवमात्र भेदच नाहीं हें उत्तर उपासनामार्गांतल्या गुरुभक्त भाविकांना पटण्यासारखेंच आहे, पण अलीकडचे विद्वान् यांसंबंधानें—हा मार्ग माहीत नसल्यामुळें—विलक्षण तर्क काढीत असतात. ज्ञानेश्वरींत व एकनाथी भागवतांत सर्वत्र गुरुस्तुति असून विठ्ठलस्तुति नाहीं या कारणास्तव ते विठ्ठलोपासक नसून निर्गुणभक्त आहेत, असें म्हणणाऱ्यांना ज्ञानेश्वरनाथांनीं उत्तर दिलें असतें कीं, "काय हा तुमचा भ्रमरूप प्रश्न ! अहो ! आम्हीं ज्ञानेश्वरींत व भागवतांत सारी विठ्ठलस्तुति केलीच आहे, कां कीं विठोबा आणि गुरु यांत मुळींच भेद नाहीं." बरें तुकोबांच्या अभंगांत सर्वच विठोबाची स्तुति असून गुरूची कां नाहीं यालाही तुकोबांनीं उत्तर केलें असतें कीं, 'बाबारे ! मीं सर्व अभंग गुरुपरच केले आहेत, कां कीं, माझे गुरु आणि विठोबा यांत तिळमात्र भेद

नाहीं !' तात्पर्य काय कीं गुरु आणि उपास्य एकरूप आहेत हीच भावना गुरुदेवभक्तांच्या मनीं नित्य असते.

६. सूरदासांची ग्रंथरचना पुष्कळ आहे. सूरसागर, सुरसारावलि, साहित्यलहरी व नलदमयंती हे त्यांचे मुख्य ग्रंथ असून या सर्वांत सूरसागराची प्रसिद्धि अत्यंत आहे. सूरसागरांत एक लाख पद्यें आहेत अशी प्रसिद्धि मात्र आहे, पण तुकोबांच्या अभंगांप्रमाणें त्यांतलीं सारीं पांचचार हजार पद्येंच आज उपलब्ध आहेत ! सूरदासांची सर्व कविता भक्तिरसप्रधान आहे हें कांहीं सांगायला नको. ही सारी कविता व्रजभाषेंत असून व्रजभाषा अत्यंत मधुर आहे. श्रीकृष्णांच्या बाललीला तर यांनीं परमावधीच्या मधुर वाणीनें वर्णन केल्या असून त्यांत उत्कट काव्यगुण सर्व प्रकट झाले आहेत. माखनचोरी, उखलबंधन, रासलीला, मथुरागमन, उद्धवसंवाद इत्यादि विषयांचें यांनीं असें प्रभावशाली वर्णन केलें आहे कीं, वाचक तत्तत्प्रसंगीं तन्मय होतो. भक्तिगांभीर्य, प्रकृतिनिरीक्षण, शीलगुणवर्णन फारच उज्ज्वल प्रकारचें आहे. जाति, विद्या, कुल, धन इ० सर्व शुद्ध भक्तीपुढें तुच्छ आहेत अशी यांची आपल्या सर्व संतांसारखीच शिकवण आहे.

**पद**

तजो मन हरिबिमुखनको संग ।। ध्रु० ।।
जाके संग कुबुधि उपजति हैं परत भजनमें भंग ।।
कहा होत पयपान कराये विष नहि तजत भुजंग ।।
कागहि कहा कपूर चुगाये स्वान न्हवाये गंग ।।
खरको कहा अरगजालेपन मरकटभूषण अंग ।।
सूरदास खलकारी कामरि चढत न दूजो रंग ।।

* * *

भजनबिनु कूकर सूकर जैसा ।
जैसे घर बिलाव के मूसा रहत विषय विष वैसो ।।
उनहूके यह सुत दारा हैं उन्हें भेद कहु कैसो ।।

सूरदास 'त्यज मन हरिबिमुखनको संग' म्हणून जें सांगतात तेंच ज्ञानोबारायांनीं 'म्हणोनि गा पार्था। जे विमुख या परमार्था। तयांसी भापण सर्वथा। करावें ना' या ओवींत सांगितलें आहे. भजनाविण मनुष्य पशु आहे व त्याचे कान उंदराच्या बिळासारखे आहेत. या कल्पना नाथतुकारामवामनांच्या ग्रंथांत आहेत.

७. तुळसीदासांच्या वाणींत दास्यभक्तीचा रंग आहे तर सूरदासांच्या कवितेंत सख्यभक्तीची मौज आहे. सूरदास अधिक निर्भयपणें व निर्भीडपणें बोलतात. हिंदीचे पहिले संतकवि सूरदासच आहेत. उपमेपेक्षां रूपक त्यांना अधिक आवडतें. यशोदानंदन व गोपीवल्लभ श्रीकृष्ण यांच्या बाललीलांचे सर्व प्रसंग सूरदासजी अतिललित व श्रुतिमधुरवाणीनें वर्णितात; हे स्वतः जणुं त्या त्या प्रसंगीं तो सुखसोहळा भोगायला समक्ष हजर होते ! असतीलही कदाचित्, कोणीं सांगावें ! यशोदेचें वात्सल्य, श्रीकृष्णाच्या खोड्या, लोणी चोरणें, चंद्राविषयीं झगडा, यशोदा रामचरित्र श्रीकृष्णाला सांगते तो प्रसंग, उखलबंधन, कालीपराजय, दावानलपान, गोपींचें चीरहरण, रासक्रीडा व राधाकृष्णांची प्रीति, मुरलीचें वर्णन, श्रीकृष्णांचें नेत्र इ० विषयांवर सूरदासांनीं इतकें हृदयग्राही, हुबेहुब, सविस्तर, सूक्ष्म, मधुर वर्णन केलें आहे कीं, हिंदी ग्रंथकारांनीं सूरदासांना हिंदीचे वाल्मीकि म्हटलें आहे तें समुचित आहे असेंच वाटतें.

सूर सूर, तुलसी ससी, उडगन केसवदास ।
अबके कवि खद्योत सम जह जह करत प्रकास ।।

उत्तमपद कवि गंगके उपमाको बरबीर ( बिरबल )
केसव अरथगंभीरता सूर तीनि गुन धीर ॥

इत्यादि पद्यें हिंदी भाषेंत प्रसिद्ध आहेत. सूरदास हे सूर्य, तुळसीदास चंद्र, केशवकवि गुरुशुक्र व बाकीचे कवि खद्योत आहेत! पदलालित्य कवि गंग यांचें, उपमा बिरबलाची, अर्थगांभीर्य केशवकवीचें व तीनही गुण सूरदासांचे. इ० प्रकारें हिंदी जनतेनें सूरदासांचा गौरव केला आहे. प्रेमप्रीतीचें वर्णनपर सूरदासांचें एक पद पाहा :—

प्रीति करि काहू सुख न लह्यो । ( ध्रु० )
प्रीति पतंग करी दीपकसो आपै देह दह्यो ॥
अलिसुत प्रीति करी जलसुतसो संपति हाथ गह्यो ॥
सारंग प्रीति करी नादसो सन्मुखबाण सह्यो ॥
हम जो प्रीति करी माधवसो चलत न कछू कह्यो ॥
सूरदासप्रभु बिनुदुखदूनो नैननि नीर बह्यो ॥

**श्रीकृष्णस्वरूप**

( १ ) देखु सखि सुंदरताको सागर ।
बुधिविवेकबल पार न पावत मगन होत मन नागर ॥
तनु अति स्याम अगाध अम्बुनिधि कटिपटपीत तरंग ।
चितवत चलत अधिक रुचि उपजत भवर परत सब अंग ॥
मोरमुकुटमनिनग आभूषण कटि किंकिनि नखचंद ।
मनु अडोल बारिधि मैं बिंबित राका उडगनबृंद ॥
देखि सरूप अमल गोपीजन रही बिचारि बिचारि ।
तदपि सूर तरि सकी न सोभा रही प्रेम पचि हारी ॥

( २ ) श्यामकर मुरली अतिहि विराजत ।
परसत अधर सुधारस प्रकटत मधुर मधुर सुर बाजत ॥
लटकत मुकुट भौंह छबि मटकत नैन सैन अति छाजत ।

ग्रीव नवाय अटकि बंसीपर कोटिमदनछबि लाजत ॥
लोल कपोल झलक कुंडलकी यह उपमा कछु लागत ॥
मानहु मकर सुधासर क्रीडत आपु आपु अनुरागत ।
वृंदावन विहरत नंदनंदन ग्वाल सखन संग मोहत ।
सूरदास प्रभुकी छबि निरखत सुरनरमुनिमन मोहत ॥

# १७. सोहिरोबानाथ आंबिये

## शके : १६३६–१७१४

१. हे महासिद्ध पुरुष जातीचे सारस्वत ब्राह्मण होत. हे मूळचे राहणारे गोवा प्रांतांतले, पण यांचे वडील धंद्याच्या निमित्तानें सावंतवाडी संस्थानांत आले. बांदें ऊर्फ एदिलाबाद हे गांव वाडीपासून चार कोस आहे व तेथें विजापूर सरकारच्या वेळचीं घुमट, कबरी वगैरे दगडी कामें अद्याप प्रेक्षणीय आहेत. बांदें गांवीं सोहिरोबांचा जन्म झाला व तेथेंच त्यांच्या आयुष्याचा पूर्वार्ध सुमारें २० वर्षें कुळकर्णीपणाचें काम करण्यांत गेला. असें सांगतात कीं, तेव्हां सावंतवाडीचे राजे खेम सावंत हे अल्पवयी असल्यामुळें प्रजेंत अप्रिय झालेला त्यांचा चुलता सोम सावंत ऊर्फ साहेब सर्व कारभार पाहत असे. त्यानें सोहिरोबांसही परोपरीनें त्रास दिला असें सांगतात कीं त्यानें सोहिरोबांस वाड्यांत बोलावून 'देव दाखीव नाहीं तर ठार करतों' अशी धमकी दिली. सोहिरोबांनीं देवाचा धांवा केला. अकस्मात् एक ज्वाला उत्पन्न झाली व सावंताचे डोळे दिपले. तेव्हां सोहिरोबा म्हणाले 'ईश्वरी कोपाची मूर्ति अशी ही ज्वाला लवकरच अनर्थ उत्पन्न करील!' कांहीं काळानें राजानें दारूच्या पीपावर बसून त्यास स्वतःच आग लावली व त्यांत तो जळून मेला! सोहिरोबा सेवाधर्मास व प्रपंचास आधींच कंटाळले होते आणि सोम सावंतानें छळूनही त्यांजवर उपकारच केला. त्यांचें वैराग्य व भगवद्भक्ति यांच्या पुष्टीस वरील छल कारण झाला. एकदां सोहिरोबा गर्द अरण्यांत एकटे बसले

असतांना एकदम ‘ बाबू हमकू कुछ देता है ?’ असा ध्वनि त्यांचे कानांवर आला व मागें वळून पाहतात तों एक भव्य व सिद्ध मूर्ति त्यांस दिसली. सोहिरोबा तेव्हां एक फणस फोडून त्यांतले गरे खाण्याच्या बेतांत होते. त्या दिव्य तपस्व्याचा तो प्रश्न ऐकतांच सोहिरोबानें सर्व फणस त्याच्या पदरांत टाकिला. त्या फकीरानें त्यांतले चार गरे सोहिरोबास खायला दिले व सोहिरोबाची वृत्ति एकदम पालटली. त्या सिद्धानें सोहिरोबाची मुमुक्षा पाहून त्यावर कृपा केली व योगमार्गाचा त्यास उपदेश केला. कालांतरानें सोहिरोबा मोठे योगसिद्ध झाले. सोहिरोबांच्या गुरूचें नांव गैबीनाथ हें होय. हे आदिनाथ मच्छेंद्रनाथ या परंपरेंतले होत. गैबीनाथ हे सोहिरोबांच्या फार पूर्वींचे खरे पण त्या प्रसिद्ध गैबीनाथापासून हे गैबीनाथ भिन्न असतील, किंवा समाधिस्त होऊन तीस वर्षानंतर जन्मलेल्या तुकारामास बाबाजी चैतन्यानें—स्वप्नांत अनुग्रह केला तसा कांहीं हा प्रकार असेल, किंवा हृदयभूमिका परम शुद्ध पाहून वामनपंडितावर परमेश्वरानें मलयपर्वतावर सच्चिदानंद यतिवेषानें अनुग्रह केला त्याप्रमाणें गैबीवेषानें ईश्वरानें सोहिरोबावर अनुग्रह केला असेल किंवा पहिले गैबीनाथ योगसामर्थ्यानें कित्येक शतकें वांचले असतील ! कसेंही असो. गैबीनाथ नांवाच्या नाथसांप्रदायी सिद्धानें सोहिरोबांवर अनुग्रह केला ही गोष्ट सिद्ध आहे. ‘ नव्हे नरनारी, गैबी सूत्रधारी, ’ ‘ गैबीप्रसादें गैबीच झालों, ’ वगैरे सोहिरोबांच्या पदांतल्या चरणांवरूनही ही गोष्ट सिद्ध होते. शके १६७१ मध्ये सोहिरोबांस अनुग्रह झाला. त्यांनीं नंतर कुळकर्णी-पणाचें काम सोडलें व भगवद्भजनीं लागले.

२. शके १६९६ च्या सुमारास सोहिरोबा उत्तर हिंदुस्थानांत तीर्थयात्रा करण्याचे निमित्तानें घराबाहेर पडले. त्यांची विधवा सून

त्यांची प्रेमपुरस्पर सेवा करीत असे. तिला हे जातात म्हणून फार वाईट वाटलें व ती म्हणाली, 'आपण जातां, पण मी अनाथ काय करूं ? माझा एकुलता एक मुलगाही मरणोन्मुख झाला आहे,' ही सुनेची दीनवाणी ऐकून सोहिरोबा तसेच परत फिरले व त्या आसन्नमरण झालेल्या मुलाच्या पाठीवरून त्यांनीं हात फिरविला. सूनबाईस आश्वासन दिलें. मुलगा चांगला झाला. सोहिरोबा कीर्तनें करीत उत्तर हिंदुस्थानांतलीं तीर्थें व क्षेत्रें फिरून शके १७०१ चे सुमारास ग्वाल्हेरीस आले. तेथें महादजी शिंदे यांचे महाप्रतापी सेनापति जिवबादादा बक्षी हे होते. जिवबादादा हिंदुस्थानांतले परम विख्यात योद्धे व मुत्सद्दी होते व पोवाडयांत त्यांना 'भारती योद्धा' म्हणून संबोधिलें आहे. जिवबादादाही सारस्वत होते व शिवाय दोघेही गोवे प्रांतांतले राहणारे. सोहिरोबांची ग्वाल्हेरीस फार ख्याती झाली व जिवबादादाही त्यांची वृत्ति पाहून आनंदले. सोहिरोबा साधु कवि म्हणूनही फार गाजले. ते कविता तर तत्काळ स्फूर्तीनें सहज बोलतां बोलतां करीत. महादजी शिंदे यांनीं मोठ्या सत्कारानें सोहिरोबांस बोलावून दरबारांत आणले. महादजींसही थोडी कविता करण्याचा नाद होता, तेव्हां दरबारीं जातांना जिवबादादा सोहिरोबांस म्हणाले, 'शिंदे हे काव्यप्रिय आहेत व ते आपली कविता तुम्हांस दाखवितील, तर तुम्ही ती चांगली आहे असें म्हणा.' जिवाबादादांचा हेतु असा कीं, सोहिरोबांची चांगली संभावना व्हावी, पण दरबारची गोडबोली तऱ्हा व साधूची निर्भीडपणाची वर्तणूक यांतला भेद त्यांच्या लक्षांत आला नाहीं. सोहिरोबा फारच वरच्या प्रतीचे साधु व अस्सल योगी होते, त्यांना राजाचें व दरबारचें लौकिक ऐश्वर्य काय होय ! आत्मसुखांत निमग्न असणाऱ्या साधूला पाचहिरेमाणके हे सामान्य दगडापेक्षां भिन्न

थोडेंच वाटणार! महादजींची कविता पाहून सोहिरोबांनीं आपला स्पष्ट अभिप्राय निर्भीडपणानें सांगितला; 'कवितेंत प्रसाद नाहीं व सच्चिदानंद परमात्म्याच्या गुणवर्णनावांचून जी कविता ती तुच्छ होय, ती आम्हांस आवडत नाहीं.' महादजींस सोहिरोबांच्या स्पष्ट-वक्तेपणाबद्दलचा राग आला. तेव्हां सोहिरोबा म्हणाले :—

**पद**

दौलत देख दिवाना मेरी। अपना मौज न करना फेरी ॥ ध्रु०॥
कोई दिन बनियाके दुकान। कोई दिन पर्वतके ठिकान ॥ १ ॥
तनके करत कारभार। हमारे छत्तिस खिजमतगार ॥ २ ॥
मनपवनकी पागा। सोहं पिलखानेकी जागा ॥ ३ ॥
करम कारखाना। हमारा नशीब जामदारखाना ॥ ४ ॥
जब सोहिरा तख्तपर बैठे। तब सब दुनिया...पर बैठे ॥ ५ ॥

"तुझ्या ऐश्वर्याला मी मुळींच भुललों नाहीं. अरे वेड्या! माझें ऐश्वर्य तर पाहा, आम्हीं स्वेच्छाचारी योगी कांहीं दिवस शहरांत राहतों व कांहीं दिवस पर्वतशिखरावर राहतों. आमचे छत्तीस खिजमतगार आमच्या शरीराची अहर्निश सेवा करतात. (पंचमहाभूतें, अहंकार, बुद्धि, प्रकृति, दश इंद्रियें, दश विषय, मन, इच्छा, द्वेष, सुख, दुःख, संघात, चेतना, धृति (गीता अ० १३ विषयस्पष्टीकरणार्थ ज्ञानेश्वरी पाहा.) आमची पागा मनपवनाची आहे; आमची जागा सोऽहं पिलखाना आहे; आमचा कारखाना कर्म हा आहे व आमचा जामदारखाना आमचें नशीब आहे. आम्ही जेव्हां आमच्या तख्तावर बसतों तेव्हां सारी दुनिया आम्हांपुढें तुच्छ आहे."

याच प्रसंगाचें 'अवधूत नही गरज तेरी। हम् बेपरवा फकीरी' हेंही पद प्रसिद्ध आहे. सोहिरोबा यानंतर हिंडत हिंडत उज्जनीस

आले व तेथें मठ बांधून राहिले. तेथें ते दहा वर्षे राहिले. त्यांची शिष्यशाखाही पसरत चालली, पण ते एकाएकीं शके १७११ सालीं मठांतून उठून चालते झाले ते कधीं परत आले नाहींत. ते गुप्त झाले तेव्हां त्यांचे बिछान्यावर पुढील पद एका चिटोरीवर लिहिलेलें सांपडलें असें म्हणतात :—

दिसणें हें सरलें । अवघें प्राक्तन हें मुरलें ॥ ध्रु० ॥
आलों नाहीं गेलों नाहीं । मध्यें दिसणें हे भ्रांती ।
जागृत होतां स्वप्नचि हरपे । कर्पूरन्यायें जग हरलें ॥ १ ॥
दिसणें हाचि जन्म योगिया । ना दिसणें हा मृत्यु म्हणा ।
गैबिप्रसादें गैबीच झाले । आपआपणामधें लपलें ॥ २ ॥
मच्छिंदर गोरख जालंदर । न्याया आले स्वस्वरूपीं ।
जातां जातां गगनग्राम तें । समूळ कोठें ना गमलें ॥ ३ ॥
म्हणे सोहिरा सत्रा चवदा । मधुमासाच्या नवमदिनीं ।
सगुण स्वरूपीं निर्गुण ठेलें । अनुभव हरले स्वरूप कळे ॥४॥

शके १७१४ च्या चैत्र ( मधु ) मासांत शुद्ध ९ ला सोहिरोबा ब्रह्मस्वरूप झाले.

३. सोहिरोबांची बहुतेक कविता रा. भगवंतराव पै या सद्‌गृहस्थांनीं फार परिश्रमानें मिळवून प्रसिद्ध केली आहे. यांची कविता गोवें प्रांतीं फार पसरलेली आहे. यांचे पांच ग्रंथ मुख्य आहेत :— (१) 'अक्षयबोध,' प्रकरणें ८, हा शके १६७१ मध्यें रचला आहे. याची ओवीसंख्या ४८० आहे व यांत समाधिराजयोग, अद्वैतयोग, वैराग्ययोग, ज्ञानयोग, सद्विवेकयोग, विवेकयोग, बोधलक्षणयोग व मुक्तलक्षणयोग, या आठ विषयांचें विवेचन आठ प्रकरणांत अनुक्रमानें केलें आहे. (२) महदनुभवेश्वरी,' अध्याय १८ ओवीसंख्या सुमारें ९००० आहे. हा ग्रंथ वेदांतपर आहे. हा शके १६७२ मध्यें

रचिला. (३) 'पूर्णाक्षरी,' शके १६७३, यांत सिद्धांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. (४) 'अद्वयानंद,' शके १६७५, या वेदांतपर ग्रंथाचीं १० प्रकरणें असून याची ओवीसंख्या एक हजारावर आहे. (५) 'सिद्धांतसंहिता.' शके १७६८, याचे अध्याय १८ आहेत व ओवीसंख्या पांच हजार आहे. यांच्या सर्व ग्रंथांत हा ग्रंथ अधिक प्रसिद्ध आहे व याच्या ओवींची रचनाही सुबोध व सरळ आहे. याचें नांव 'सिद्धांतसविता' आहे असेंही कोणी म्हणतात. याशिवाय अभंग, पदें, कटिबंध, सवाया, श्लोक, आरत्या वगैरे प्रासंगिक कविता पांच हजारांवर आहे. देहाचे रचनेवर यांनीं एक उत्कृष्ट बखर रचली आहे ती 'सोहिरोबांची बखर' या नांवानें प्रसिद्ध आहे. सोहिरोबांना गाण्याची उत्कृष्ट माहिती होती, यामुळें यांचीं पदे रागरागिण्यांत बसविलेलीं आहेत, व उत्तमोत्तम गवयांना हीं म्हणायला फारच आवडतात, गोव्याकडील वारांगनांच्या तोंडींही यांतील बरीच पदें आहेत, मी स्वतः कांहीं ऐकलीं आहेत. एकदा यांनीं समाधी लावली कीं चार दिवस ती टिकत असे असें सांगतात.सोहिरोबा योगी होते, ब्रह्मनिष्ठ होते. भगवद्भक्त होते. यामुळें योग, आत्मविद्या व भक्ति या तीनही प्रकारांचा एकवट रंग यांच्या ग्रंथांत सांपडतो. 'विश्वचित्राचा चितारी' जो परमेश्वर त्याला हे नित्य मागतात की :– 'अनन्यभावें, तुजला ध्यावें, रूपिं रिझावें, तद्रुप व्हावें, सदैव कीर्तननर्तन करुनी, परमानंदी निमग्न व्हावें.' यांचें 'हरिभजनाविण काल घालवूं नको रे' हें पद सर्वांच्या ऐकण्यांत आहेच. भक्तिपर व वेदांतपर पदांत यांचा थोर अधिकार स्पष्ट दिसून येतो. हे 'निरंजनगांवचे रहिवासी' झाल्यावर यांच्या परमभाग्याला काय उणें राहिलें ? 'लय हें भगवंतीं जरि लाय। मग हा प्रपंच तरि काय असा यांचा जनांस बोध असे. आत्मकळा न कळतां 'प्रपंच सगळा

शिकोनि पोट भरी हें सुणें रे ' हें त्यांचें म्हणणें सर्वस्वी खरें आहे. स्वतःच्या आत्मप्राप्तीबद्दल त्यांचे उद्‌गार जागोजाग आहेत. मला प्राप्तव्य प्राप्त झालें, ब्रह्मानंदीं माझे मन विरघळून गेलें, अशा त्यांच्या उक्ति आहेत. ' आनंद जिराला, चिन्मयबोध मुराला ' अशी शांतावस्था प्राप्त झाल्यावरच्या या त्यांच्या उक्ति आहेत, हें उघड आहे. सोहिरोबोवांची वाणी अनुभवाची आहे, त्यांत नुस्तें फोल कवित्व नाहीं. त्यांच्या भाषेंत गोव्याकडले कांहीं शब्द आहेत. त्यांचे अभंग, आरत्या व सवायाहि फार सुरेख आहेत. ' हरिभेटीसाठीं साधनआटाटीं । तो अज शेवटीं आंतुडला; ' ' आनंदाचें जळें भरियेले डोळे । चैतन्यसोहळे भोगियेलें; ' हे यांचे अभंग उत्तमोत्तम आहेत. ' देवाहुनी थोर नाहीं निरंतर । ऐसे हें अंतर निर्वाळिजे ।। भक्तीचिया भावा भेटे स्वयमेवा । आत्मानुभवा पाविजे तो, ' सोहिरा म्हणे दुजें कांहींच नसावें । होऊनि असावे देवरूप, ' वगैरे कित्येक साधे पण गोड चरण वारंवार पाहावेसे वाटतात. सर्व साधु आपल्या अवतारांचे हेतु स्पष्ट जाणत असतात. ' आम्हीं परब्रह्मींचे भाट । जगा दावूं मोक्षवाट, । आत्मा साहेब येतो घरा । दृश्याहूनि परते सरा ' ।। या अभंगांत त्यांनीं सांगितल्याप्रमाणें आत्मारामाची व जीवाची गांठ घालून देण्यासाठीं त्यांचा जन्म होता, ' म्हणे सोहिरा गुरुनाथ हा माझ्या हृदयीं ठसून । जनांसि उद्धरावयाकारणें वचन सांगतो कसून. '

४. सोहिरोबांची एक बहीण त्यांच्या संगतीनें मोक्षाची अधिकारीण झाली होती. सोहिरोबांच्या तोंडून कविता निघाली कीं ती तिनें स्वहस्तें लिहून ठेवायची. काव्यानंदांत सर्वकाळ निमग्न असणारा इंग्रजी कवि वर्डस्वर्थ याला एक डोरोथा नांवाची बहीण होती. ती जन्मभर अविवाहित राहिली व भावाच्या संगतीनें काव्यानंदाचा

स्वाद घेण्यास शिकली. पुढें पुढें तर ती स्वतःहि कविता करूं लागली. या बंधुभगिनींच्या जोडीप्रमाणेंच ही आमच्याकडील बहीण-भावांची जोडी आहे. सोहिरोबांची कविता त्यांच्या बहिणीनें लिहून घेतली तिची मूळ प्रत रा. भगवंतराव पै यांस मिळाली होती. मराठी कवितेची गोष्टच फार निराळी आहे. काव्यानंद आणि ब्रह्मानंद या दोन्ही आनंदांचा मिलाफ मराठी कवितेंत झाला आहे.

●

# १८. छोटूमहाराज

शके १८४३ च्या श्रीहनुमज्जयंतीप्रीत्यर्थ मिरजेस माझें जाणें झालें व तेथें छोटूमहाराज ह्या सत्पुरुषाचें दर्शन झालें. हे छोटू-महाराज मूळचे पंजाबकडील असून नामांकित तालिमबाज होते. २५।३० वर्षांपूर्वी पुण्यास व इतरत्र यांनीं अनेक कुस्त्या मारल्या असून हे पहिलवान मंडळींत फार प्रसिद्ध होते. पुढें हे मिरजेस असतांना तेथें एक परमहंस आले. त्यांच्याशीं यांचा सहा महिने सहवास घडला. त्यांजपासून यांना परमार्थलाभ झाला. वर्षभर यांच्या कुस्त्या बंद झाल्या व भाषण व इतर व्यवहारही बंद पडत गेला आणि शेवटीं ‘ आतां आम्हांला अविद्येशीं कुस्ती खेळायची आहे ’ असे त्यांचे तोंडून उद्‌गार निघाले ! ‘ उद्यापासून कोणाशींही भाषण करायचें नाहीं कीं जागेवरून उठायचें नाहीं. ’ असें बोलले त्यास पंचवीस वर्षें झालीं. महाराज एका आसनावर बसलेले आहेत. अधोमुख व अधोदृष्टि आहेत, अर्धोन्मीलित नेत्र आहेत ! शौच अगर लघ्वी यांसाठीं जागेवरून उठतात, याशिवाय जागेवरून उठत नाहींतच; पण आसनहि बदलत नाहींत. खायला कांहीं मागत नाहींत, कोणीं तोंडांत आणून घातलेंच तर मात्र खातात. क्षुधा-तृषादि देहधर्माच्या ते पार गेले आहेत यांत शंका नाहीं. भाषण, पाहणें, ओळखणें कांहींच नाहीं. जमीनीला पाठ टेंकीत नाहींत. अशा स्थितींत छोटूमहाराज सतत २५ वर्षें बसलेले आहेत ! ! यांची प्राणोपासना चालली असावी. हे अध्यात्मांतहि मल्ल झाले, असून दोन तपें सतत ‘ अविद्येशीं कुस्ती खेळत ’ आहेत एवढें खरें. जोर, बैठका, लाठी, बोथाटी, कुस्ती यांच्या तरुणपणांतील अभ्या-सामुळें पिळदार बनलेलें शरीर आजही प्रेक्षणीय आहे. ●

# १९. श्रीनारायणमहाराज जालवणकर

जन्म :– गुरुवार, आषाढ वद्य ५, शके १७२९

निर्याण :– गुरुवार आषाढ वद्य ५, शके १७८९.

१. श्रीनारायणमहाराज जालवणकर यांचा जन्म झांशीनजीक जावलण म्हणून गांव आहे तेथें झाला. यांचे वडील तात्या पुराणीक यांनीं सत्पुत्रप्राप्तीच्या वासनेनें श्रीमद्भागवताचीं १०० पारायणें केलीं व त्या तपाच्या प्रभावानेंच ह्या महासिद्ध पुरुषानें त्यांच्या पोटीं जन्म घेतला. हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण. श्रीनारायणमहाराज एक वर्षाचे असतांनाच त्यांची माता ब्रह्मरूप झाली व त्यानंतर त्यांच्या आजीनें त्यांचा प्रतिपाळ केला. वडिलांनीं त्यांच्या वयाच्या ८ व्या वर्षी त्यांची मौंज केली व १० व्या वर्षी लग्न करून दिलें. परमार्थाची परम प्रीति हा यांचा उपजत धर्म होता. अनेक जन्मसंसिद्ध अशा महापुरुषांच्या हृदयांत भगवत्प्रीति स्वभावसिद्ध असते, ती त्यांना बाहेरून शिकावी लागत नाहीं. पूर्वसंस्कारबलानें नारायणास बालपणापासूनच देवाचें वेड लागलें. नारायण पांच वर्षांचा होतांच तासचे तास फडताळांत जाऊन डोळे मिटून बसे, व 'येथें बसून काय करतोस' असें आजीनें विचारलें म्हणजे मी 'देव पहात होतों' असें उत्तर देत असे! विवाहोत्तर वैराग्यलाभ होऊन हे घराबाहेर पडले. मथुरेस गोवर्धनबाबा नांवाचे हठयोगी होते त्यांजपाशीं ते हठयोग शिकले, व त्यांनींच यांना ध्यानोपासनादि मार्ग दाखवून दिला. चार वर्षे तेथें राहिल्यावर व अभ्यास यथासांग केल्यावरही 'समाधान झालें नाहीं' असें

त्यांनीं गोवर्धनबावांस निर्भयपणें सांगितलें, तेव्हां 'श्रीदत्तदर्शन होईल तेव्हांच तुझें समाधान होईल' असें त्यांनीं उत्तर केलें. यानंतर बापाच्या बोलावण्यावरून हे दोन वर्षें पुन्हां घरीं जालवणास गेले. तेथें त्यांस एक पुत्र झाला. पण पुत्र व त्याची माता दोघेही आठ दिवसांतच निवर्तल्यामुळें ते संसारपाशांतून मोकळे झाले. नारायणमहाराज यानंतर गिरनार पर्वतावर गेले व तेथें त्यांनीं श्रीदत्ताची उपासना मनोभावें केली. त्यांचें कडक अनुष्ठान व तीव्र भक्ति पाहून श्रीदत्त प्रसन्न झाले. त्यांनीं १४ दिवस अन्नपाणी वर्ज्य करून श्रीदत्तदर्शनासाठीं ते धरणें धरून बसले, व धांवे करून दत्तदेवास पुष्कळ आळविलें. शेवटीं दत्तदर्शन होत नाहीं असें पाहून ते निराश झाले व १४ व्या दिवशीं पर्वताच्या कड्यावर उभे राहून देहत्यागाचा संकल्प केला. इतक्यांत श्रीदत्त साक्षात् प्रकट झाले. 'मुला ! हें काय करतोस ?' या प्रश्नास 'श्रीदत्तात्रेय भेटत नाहींत म्हणून देहत्याग करतों' असें त्यांनीं उत्तर केलें. 'नुसत्या स्थूल देहाच्या त्यागानें दत्त भेटतील काय ?' या प्रश्नास 'मला कांहींच कळत नाहीं, पण देवभेटीवांचून मला हा देह नकोसा झाला आहे' असें त्यांनीं उत्तर केलें. मग श्रीदत्तांनींही हात धरून त्यांस गुंफेंत नेलें व निजरूप दाखवून समाधान केलें. चारी देहांचें निरसन होऊन नारायण नारायणरूप झाले. साक्षात् श्रीदत्तांनीं त्यांस ब्रह्मविद्येचा बोध केला तेव्हां ते कृतकृत्य झाले. गिरनार पर्वतावर निरंजनस्वामी म्हणून एक दत्तभक्त होते. त्यांचाही त्यांस सहवास झाला. तेथें चार वर्षें राहून श्रीदत्ताज्ञेनें ते लोकोद्धारार्थ बाहेर पडले.

२. त्यांनीं दक्षिणोत्तर सर्व तीर्थक्षेत्रांच्या यात्रा केल्या व जेथें जेथें संसारतप्त जीव शरण आले तेथें तेथें त्यांनीं ब्रह्मोपदेश करून त्यांचा उद्धार केला. कांहीं संन्यासीही शरण आल्यामुळें त्यांच्या-

साठीं त्यांनीं परमहंस दीक्षा घेतली. कांहीं काळ ते ब्रह्मावर्तास राहिले; हरिद्वार, ग्वाल्हेर, काशी येथेंही राहिले. त्यांचे शिष्य धार, देवास, इंदोर, बडोदा, झांसी, काशी इकडेच अधिक होते.

३. महाराजांचे कांहीं चमत्कारही प्रसिद्ध आहेत. ते ब्रह्मावर्तास असतांना तेथें शिष्यमंडळी पुष्कळ झाली. नित्यश्रवणास इतर लोकही जमत. तेथें महादेव आपटे नांवाचा एक कुतर्की ब्राह्मण महाराजांची पाठीमागें खूप निंदा करीत असे. एके दिवशीं तो महाराजांचा पोषाख अंगावर घालून आरशांत तोंड पहात बसला होता तोंच महाराज तेथें आले. ते म्हणाले, "महादेवा! तूं उन्मत्तपणानें निंदा करतोस पण मुका होशील व तुझा हा देह निरुपयोगी होईल!" सत्पुरुषाची वाचासिद्धि अमोघ असते. महादेव लगेच मुका झाला. पुढें तो शरण आला व पुनरपि कोणाचीच निंदा न करतां वाणी नामस्मरणाला वाहीन असें त्यानें कबूल केलें तेव्हां त्याला पुन्हां वाचा आली. महाराज रात्रीं गंगातीरीं चौरंगावर बसून ध्यानस्थ होत. ते दर मार्गशीर्ष पौर्णिमेस श्रीदत्तजयंतीचा उत्सव करीत, त्यावेळीं दहापांच हजार पान होत असे. महाराजांची शिष्यीण बाळाबाई एकनिष्ठ उपासक होती, तिला महाराजांनीं हरिद्वारास जातेवेळीं पादुका दिल्या त्या ग्वाल्हेरीस त्यांचे घरीं (आप्पा-कानड्याच्या बाजारांत बक्षी यांचे शेजारी) आहेत. महाराज धौम्यारण्यांत बारा वर्षे एकान्तांत राहिले. तेथें असतांना ते जेवीत नसत. धारच्या राजानें महाराजांचा उपदेश घेतला. राजाची भक्ति पाहून त्यांनीं त्यास बोधामृत पाजिलें. राजानें महाराजांची पूजा केली व त्यांवर मोहोरांचा अभिषेक केला व पुष्कळ जवाहीर अर्पण केलें. महाराजांनीं नंतर तें शिष्यमंडळीस देऊन टाकलें. महाराजांस काशीस 'चिमटेबोवा' म्हणत. अंगावर भगवें वस्त्र,

पायांत पादुका, पायापर्यंत लोंबणारें रेशमी वस्त्र, हातांत चिमटा, बोटांत आंगठ्या, कपाळास केशरी गन्ध व मधें दोन लाल टिळे, लहानशी दाढी—असा यांचा थाट असे. यांच्या शिष्यांत रत्नागिरी येथील नारायणबावा, कल्याण येथील सखारामबावा, मुंबई येथील राधाकृष्ण तोरणे, इंदूर येथील लक्ष्मण बावा, इ. मंडळी कृतकार्य झालेली होती. लक्ष्मण महाराजांचा मठ इंदूर येथें आहे. त्यांचे शिष्य बलभीमबोवा साडेकर हे पुढें प्रसिद्धीस आले.

४. यांचे ग्रंथ अद्याप त्यांच्या योग्यतेच्या मानानें प्रसिद्धीस आलेले नाहींत. यांची वाणी अत्यंत प्रासादिक आहे हें कांहीं सांगावयास नको. यांचीं अष्टकें, पञ्चकें व श्लोक मात्र बरेज प्रसिद्ध आहेत. यांचीं दहाबारा अस्सल पत्रें मुमुक्षूंत प्रसिद्ध झालीं आहेत. ‘विसरूं कसा मी गुरुपादुकाला’ हें यांचें ‘गुरुपादुकाष्टक’ व ‘सुविचारमाला’ यांची ओळख महाराष्ट्राला झालीच आहे. सुविचारमालेंतलीं,

(१) संसारीं असतां प्रवाहपतितद्वंद्वासि त्रासूं नको।
(२) भूलोकांत महाप्रसंग पडतां तूं सत्त्व सोडूं नको।

इ. मौक्तिकें बिनमोल आहेत. अभंगांपैकीं एक दोन देतों :—

१

संतचरणतीर्थी करीन आंघोळी। ऐसें वनमाळी करी मज ॥ १ ॥
संतचरणरजांमाजी मी लोळेन। ऐसें नारायणा करी मज ॥ २ ॥
म्हणे **नारायण** गुरु निरंजन। दास म्हणवीन संतांचा मी ॥ ३ ॥

२

तुझे हातीं दिले हात। नको करूं माझा घात ॥ १ ॥
तुझे पायीं माथा। ठेवियेला सद्‌गुरुनाथा ॥ २ ॥

कैसा तरी तुझा। अंगीकार करी माझा ॥ ३ ॥
भेट देई **नारायणा**। दत्तदेवा निरंजना ॥ ४ ॥

'**बोधाष्टकांत**' महाराज उपदेश करितात :–

तूतें देह नसे शुभाशुभ कदा तत्कर्म तेंही नसे।
ऐसें हें निजमानसीं समजतां प्रारब्धरेषा पुसे।
शुद्धात्मा विलसे सदा त्रिभुवनीं अद्वैत तें पाहणें।
ब्रह्मानन्द अगाध चिन्मय सुधासाम्राज्य तें भोगणें ॥ ५ ॥

'**निर्वाणपञ्चकांत**' ते सांगतात :–

निर्वाणबोधरवि हृत्कमलीं उदेला
मायांधकार सविकार विकल्प गेला।
दुर्द्वैत दुःखशिण अंतरिंचा निवाला
आरण्य घोर गृह थोर समान त्याला ॥ १ ॥

'**सिद्धयोगाष्टकांत**' ते म्हणतात :–

वैराग्य भाग्य तरि श्लाघ्य म्हणूं तयाला
भोक्ता न भोग्य गुरु योग्य वदे जयाला।
जो निरंजनपदींच अखंड राहे
आनंदमग्न सम चिन्मय डोलताहे ॥ २ ॥

महाराजांची १६९ ओव्यांची 'परमार्थदीपिका' व 'अभंग–चाळिसी' सुंदर आहेत.

५. यांचे मुख्य ग्रंथ सात आहेत व ते 'सप्तसागर' या नांवानें प्रसिद्ध आहेत. **१. ज्ञानसागर**–यांत मनुष्याचे चार वर्ग अधिकार-परत्वें सांगून त्यांचे कर्तव्याचा विचार केला आहे. **२. विज्ञानसागर**–यांत कर्म व ज्ञान हीं साधनें भगवत्प्राप्तीस अवघड आहेत व भक्ति हेंच साधन सुलभ आहे याचें विवरण केलें आहे. **३. बोधसागर**–यांत सद्गुरूनें मुमुक्षूस केलेला बोध दिला आहे. **४. कैवल्यसागर**–

यांत तोच बोध जास्त विस्तारानें व आधार दाखवून केला आहे. या ग्रंथासारखा आत्मस्वरूपबोध करून देणारा सुलभ दुसरा ग्रंथमराठी भाषेंत मिळणें कठीण आहे असें मला वाटतें. ५. **आनंदसागर**– यांत स्वरूपानंदाचें वर्णन आहे. ६. **शांतिसागर**–यांत अपरोक्ष ज्ञाननिष्ठ व शांत पुरुषाचीं लक्षणें सांगितलीं आहेत. ७. **करुणासागर**–यांत शेवटीं भगवद्भक्तानें भगवंताची करुणा भाकिली आहे. हा ग्रंथ मोठा चित्तवेधक आहे. याचे दोन खंड असून पूर्वार्धांत १८९३ व उत्तरार्धांत १५७७९ मिळून १७६७२ ओव्या आहेत. पूर्वार्धाचे शेवटीं :—

निरंजनाचे चरण । भावें वंदी नारायण । पूर्वार्ध झाला संपूर्ण । भाविकांचा हितकर्ता ॥ जे कां भावें वाचिती । त्यांचे मनोरथ ऐसेचि पुरती । जैसे माझे श्रीपती । पुरविता झाला निजांगें ॥

अशा दोन ओव्या आहेत. ह्या ग्रंथाची एकच प्रत बडोद्यास श्री. कृष्णराव रघुनाथ धारकर यांचे घरीं आहे. यांचे तीर्थरूप श्री. रा. रघुनाथ बापूजी ऊर्फ भाऊसाहेब धारकर महाराजांचे थोर अधिकारी शिष्य होते. हा ग्रंथ अप्रसिद्ध असून बाकीचे सहा कोठें कोठें छापले गेले आहेत. सर्वच ग्रंथ मुंबईचे रा. सा. टाकी छापविणार आहेत असें समजतें.

## २०. सोनगीरचे महाराज

खानदेशांतील प्रसिद्ध महंत सोनगीरचे गोविंद महाराज हे होत. यांची तिकडे सर्वत्र प्रसिद्धी आहे. महाराजांचे दर्शनास मी एकवार आमच्या धुळेकर मित्रमंडळीसह गेलों होतों. हे महाराज १८५७ चे धामधुमीनंतर २५ वर्षांनीं सोनगिरीस वस्तीस आले व समाधि-कालीं त्यांचें वय ८४ चे पलीकडे होतें असें समजतें. ते ८४ चे पैलपार गेले होते यांत शंका नाहीं ! त्यांचें पूर्वचरित्र माहीत नाहीं, त्यांनीं स्वमुखानें त्याचा कधीं उच्चार केलाच नाहीं, त्यांची मूर्ती भव्य व धिप्पाड असून मुद्रेवर-विशेषत: नेत्रांत-विलक्षण तेज खेळत होतें. 'महाराज ! मनोजयाचा कांहीं उपाय सांगा ?' असें आम्हीं त्यांस *विचारलें होतें.* तेव्हां ते क्षणभर चकित झाले व म्हणाले 'ऐसी नामर्दकी वात क्यूं कहते हैं ?' यावर 'महाराज ! गोष्ट खरी आहे. सर्व कळतें पण वळत नाहीं, मन जागेवर स्थिर रहात नाहीं याला काय करावें ?' असें म्हणतांच 'अच्छा ! राम राम बोलो, राम राम बोलो' असें उद्गारले. हे साधु पंजाबी नानक-पंथी क्षात्र वृत्तीचे शीख होते असें म्हणतात. यांचीं चार नांवें ऐकण्यांत आहेत. पहिलें छटुसिंग गुरु बटुसिंग, दुसरें सोनगीरकर बुवा, तिसरें रामदासस्वामी व चौथें गोविंदमहाराज. त्यांची शरीरयष्टि निकोप, फार उंच नाहीं, मध्यम ठेंगणी, कांति श्यामवर्ण, कांहींशी भीति उत्पन्न करणारी. अशी होती. कोणाजवळ कांहीं न मागणें, कोणीं कांहीं दिल्याची पर्वा व क्षिति न बाळगणें, आहार मिळाला न मिळाला, अंगावर वस्त्र आहे नाहीं, अशी स्थितीच

जास्त. अलीकडे ६।७ वर्षे ते दिगंबर वृत्तीनेंच राहत, रोज स्नान करून मारुतीचें देऊळ व शिवालय झाडून साफ करीत व पूजाअर्चा करीत. कृमिकीटकांसंबंधानेंही ते 'बच्चे रमते हैं' असे प्रेमळ उद्‌गार काढीत!—'मातृवत् परादारेषु परद्रव्येषु लोष्टवत्। आत्मवत् सर्व भूतेषु' अशी त्यांची शिकवण व वृत्ति होती. वायका-माणसें मुलाबाळांसह धुळ्याहून सोनगिरीस १३ मैल महाराजांच्या दर्शनास पायीं चालत जात. कोणाच्या दुर्गुणांचें हिडीस स्वरूप दिसलें तर कानउघाडणी करतांच चर्पटपंजरीचा–यष्टीचाही प्रसाद देत! अभक्ष्य माहीत नव्हतें, पवित्र हस्तें पवित्र अन्न घेत. त्यांचा बाणा आत्मैक्यभाव, निस्पृहता, वैराग्य, असा होता. परवस्त्वपहार करणारांस 'पराई माल अपना नहीं' असा बोध करून ते मार्गावर आणीत. यांची मूर्ति दिसण्यांत उग्र व भयप्रद दिसे पण आंत हे फार सदय असत. १८५७ च्या धामधुमींत हे चार हात खेळले असून धामधूम उधळून गेल्यावर २५ वर्षें जाऊन राहिले व तेथें यांनीं योगाभ्यास केला होता. यांच्या दर्शनाला मोठी यात्रा जमते व बड्या कामगारांच्या सरबराईचा त्रास होतो म्हणून सोनगीरच्या पाटलानें यांना खूप मारलें होतें. पुढें लोकांनीं चिडून पाटलावर खटला भरला, तेव्हां पाटलाची दया येऊन यांनीं त्याच्या विरुद्ध 'ब्र'ही काढला नाहीं. अपकारकर्त्यावरही संत असे उपकार करतात. ते गुडगुड्या नारळांसारखे आंतून सुटलेले असतात व म्हणून हर्षविषादरहित असतात. असो. महाराज ता. ७।६।१९२० रोजीं (ज्येष्ठ वद्य ६ शके १८४२) समाधिस्थ झाले.

●

## २१. कृष्णशास्त्री उप्पिन बेटिगिरी

धारवाडचे सुप्रसिद्ध विद्वद्रत्न वेदशास्त्रसंपन्न कृष्णशास्त्री उप्पिन बेटिगिरी हे एक अलौकिक पुरुष होते. प्रयाणकाळीं (नाथषष्ठी शके १८४२ ) यांचें वय ६५ वर्षांचें होतें. यांचें अध्ययन धारवाड, शृंगेरी व काशी येथें झालें होतें. हे अत्यंत विद्वान् तर होतेच, पण यांच्या ठिकाणीं साधुत्वाचेही उत्कट गुण वसत होते. धारवाडच्या पाठशाळेंत यांनीं बहुत वर्षें विद्यादानाचें पुण्यकर्म केलें. त्यांनीं खरोखरीच 'विद्यादान' केलें, कारण विद्यादानाच्या बदला त्यांनीं जन्मांत कोणापासूनही केव्हांही कसलाही प्रतिग्रह घेतला नाहीं ! त्यांना दोन पुत्र असून तेही अधीत आहेत. कृष्णशास्त्री सकलशास्त्रपारंगत असून देशकालज्ञ चतुरस्र पुरुष होते. संस्कृत, कानडी व मराठी या तीनही भाषांत त्यांचें अस्खलित वक्तृत्व चाले. पण विद्वत्तेबरोबर निष्परिग्रहता, समयसूचकता, विनयसम्पन्नता, साधुता इ० त्यांच्या थोर गुणांचा विचार करतां हा पुण्यपुरुष खरोखरीच लोकोत्तर होता असें म्हणावें लागतें. 'विद्याविनयसंपन्न समदर्शी पंडित' ह्या श्रीभगवद्वाणीप्रमाणें हा पुरुष सर्ववंद्य होता. मागें दरभंग्याच्या महाराजांनीं मोठा यज्ञ केला होता, त्या प्रसंगीं तेथें जमलेल्या विद्वन्मण्डळांत कृष्णशास्त्री मेरुमण्याप्रमाणें चमकले. कोणत्याही शास्त्रार्थाचा प्रश्न निघाला, कांहीं विषय चर्चेसाठीं निघाला कीं कृष्णशास्त्री आपल्या अगाध विद्वत्तेनें तेव्हांच निर्णय लावीत, पण तो लावतांना त्यांचा विनय व सौजन्य या गुणांची विद्वानांवरही अशी मोहनी पडे कीं सर्व त्यांना सहज वश होत.

श्रीनारायणमहाराज हे यांना अत्यंत मानीत व हेही शिष्यवृत्तीनें त्यांच्याशीं वागत. कृष्णशास्त्र्यांसारखे जुन्या वळणाचे थोर पुरुष जुन्यानव्या पंडितांत अत्यंत दुर्मिळ आहेत.

# २२. वेदांतकविशिरोमणि अक्खा

१. गुजराथ प्रांतीं आज जितके वेदांती कवि झाले त्या सर्वांत **अक्खाची** प्रमुखत्वानें गणना केली जाते. इतक्या स्पष्टपणानें वेदांतविषय लोकसमूहापुढें मांडणारा कवि इतरत्रही खरोखर विरळाच सांपडेल. गुजराथप्रांतीं अक्खाच्या खालोखाल प्रीतम कवीची गणना करण्यांत येते; अक्खासारखी अपूर्व प्रतिभा एकदशांशानेंही प्रीतममध्यें नाहीं. शिवाय प्रीतम कवीनें वेदांताबरोबर शृंगाराचीही जोड घातली, परंतु अक्खा तर निव्वळ वेदांतज्ञानमयच होऊन राहिला होता! गुजराथप्रांतीं अक्खाच्या लोकप्रियतेबद्दल इतकेंच सांगणें पुरें आहे कीं, सुशिक्षित वर्गामध्येंच नव्हे तर अशिक्षित वर्गामध्येंही त्याच्या काव्यामृताचें पान न केलेला विरळाच मनुष्य सांपडेल. **अक्खा हा गुजराथेंतील वामन–पंडित** होय. अशा महापुरुषाचा परिचय महाराष्ट्रबंधूंस करविणें अवश्यक वाटल्यावरून त्याचें त्रोटक चरित्र देत आहों.

२. अक्खा हा जातीनें सोनार होता. त्याच्या मूळ गांवासंबंधींही बराच मतभेद आहे; परंतु कित्येक लोकांचें म्हणणें आहे कीं, तो अमदाबादजवळील जेतलपूर येथील राहणारा होय. त्याचा जन्मकालही अद्याप अनिश्चित आहे. त्यानें लिहिलेली 'अक्षयगीता' विक्रम संवत् १७०५ मधील चैत्र शुद्ध नवमीस लिहून पूर्ण झाली असें त्याच्या मूळ ग्रंथावरूनच कळतें. वरील ग्रंथ त्याच्या वयाच्या ३०–३५ वर्षांच्या परिपक्व अनुभवाचें फळ होय.

३. अक्खा आपल्या वयाच्या १५ व्या वर्षी आपल्या मूळ

गांवाहून अमदाबादेस येऊन राहिला. त्याचा बाप व त्याची प्रेमळ बहीण हीं त्याचेबरोबरच होतीं. बापाच्या मृत्यूनंतर त्याची प्रेमळ भगिनीही थोड्याच दिवसांनीं त्यास सोडून परलोकीं चालती झाली. त्याच वेळीं त्याची पत्नीही मृत्यु पावली. अक्खावर एकामागून एक पर्वतप्राय दुःखें कोसळल्यावर तुकोबांप्रमाणें त्यास सारें जग 'दुःखमयच' भासूं लागलें. तरी पण संसाराचे अनुभव घेण्यासाठीं म्हणून मुद्दाम त्यानें दुसरा विवाह केला. लवकरच त्याची दुसरी पत्नीही निवर्तली, तेव्हां त्याच्या हृत्पटलावर 'संसार ए जन्ममृत्यूनी घटना छे' ही म्हण पूर्णपणें प्रतिबिंबित झाली. तेव्हांपासून तो संसारापासून सर्वस्वी अलिप्त राहूं लागला.

४. गुजराथ प्रांतीं एक अशीही दंतकथा आहे कीं, अक्खास एक मानलेली बहीण होती. तिजवर त्याचें विशुद्ध प्रेम होतें. तिनें अक्खाजवळ ३०० रुपयांची ठेव ठेविली होती. ती ठेव त्याचकडून काढून घेण्यासाठीं म्हणून मुद्दाम तिनें अक्खास त्या ३०० रुपयांची एक सोन्याची कंठी करून आणण्याविषयीं सांगितलें. अक्खानें त्या रकमेंत आपल्या जवळचे १०० रुपये आणखी मिळवून एकंदर ४०० रुपयांची कंठी बहिणीस आणून दिली. गुजराथ प्रांतीं ही म्हण सर्वत्र प्रचारांत आहे कीं, "सोनी तो सगी मानोम साल्लो काढी ले" म्हणजे सोनार स्वतःच्या आईच्या डागिन्यांतूनसुद्धां सोनें चोरावयास कमी करीत नाहीं ! अक्खा हा जातीनें सोनारच होता, म्हणून त्याच्या बहिणीच्या मनांत अक्खाविषयीं अविश्वास उत्पन्न झाला व तिनें त्या कंठीची परीक्षा करण्याचें ठरविलें. कंठीस काप देऊन पाहिलें तेव्हां परीक्षेअंतीं ती ४०० ची ठरली. तेव्हां त्या बहिणीस आपल्या कृतकर्माबद्दल अत्यंत पश्चात्ताप झाला. अक्खासही आपल्या बहिणीच्या कृतीची खरी बातमी कळ-

तांच सांसारिक मोहपाशापासून पूर्णपणें वीट आला. त्या वेळीं तो एका टांकसाळींत नोकरीस राहिला होता. तेव्हां त्याजवर त्याच्या बऱ्याच शत्रूंनींही आळ घातला कीं तो सोन्याचांदीच्या नाण्यांत भेसळ करीत आहे ! परंतु परीक्षेअंतीं अक्खा निर्दोषी ठरला. त्या वेळीं अक्खास ह्या मिथ्या जगाचा इतका पूर्ण वीट आला कीं, तेव्हांपासून तो संसारापासून अगदीं अलिप्त राहूं लागला. संतांच्या संगतींत आपला काळ घालविण्यासाठीं म्हणून मुद्दाम तो तीर्थयात्रेस निघाला. पहिल्यांदां तो जयपुरास गेला व तेथेंच त्यानें गुरुमंत्र घेतला असावा असें त्याच्या ‘ गुरू कीधा मे गोकुलनाथ ’ ह्या पदावरून कळतें. पुढें तो काशीस गेला. ‘ कामिनीकांचनापासून अलिप्त राहणाराच खरा साधु होय ’ हें तत्त्व पूर्णपणें याच्या हृदयावर बिंबलें गेलें होतें, म्हणून तो प्रत्येक साधु म्हणविणाऱ्याची परीक्षा घेत असे. शेवटीं त्यास एका सद्‌गुरूची गांठ पडली.

५ काशीस इकडे तिकडे फिरत असतांना त्यानें एके दिवशीं एका मठांत एक जीवन्मुक्त महात्मे वेदांताची चर्चा करीत असतांना पाहिले. तेव्हां अख्खासहि साहजिकपणेंच त्या महात्म्याचे उपदेश श्रवण करण्याची इच्छा झाली. परंतु तो संन्यासी मुमुक्षूंस रात्रींच्या वेळीं उपदेश करीत असे, तेव्हां त्या वेळीं आपणास आंत घेतील किंवा नाहीं अशी शंका अक्खाच्या मनांत उद्‌भवली व त्यानें गुप्त रीतीनेंच उपदेश श्रवण करण्याचा निश्चय केला. तो अनेक साधुसंतांस द्रव्याची लालूच दाखवून त्यांची परीक्षा पहात असे. त्याप्रमाणें त्यानें स्वामी ब्रह्मानंदजीचीही परीक्षा पाहिली, परंतु स्वामीजींनींच अक्खावर जय मिळविला. तेव्हांपासून अक्खाची भक्ति स्वामीजींवर फारच जडली. एके दिवशीं कांहीं आकस्मिक प्रसंगामुळें स्वामीजींस अक्खाचा सुगावा लागला व त्यांनीं त्यास

समक्ष भेटून त्याची सदिच्छा पाहून आपल्याजवळ ठेवून घेतलें.

६. सदगुरूच्या संगतींत त्यानें उपनिषदांचीं व वेदशास्त्रांचीं अनेक पारायणें केलीं व शेवटीं अक्खा मुरलेला वेदांती झाला. नंतर तो आपले पूर्वगुरु श्रीगोकुलनाथजी यांच्या भेटीस निघाला तों तडक जयपुरास आला. त्याचे पूर्वगुरु थोडे लोभी होते व पूर्वीं अक्खानें त्यांस बरीच द्रव्याची मदतही केली होती. परंतु ह्या वेळीं अक्खाजवळ एक कपर्दिकही नसल्यामुळें गुरुजीनें त्याजकडे नुसतें ढुंकूनही पाहिलें नाहीं ! तेव्हांपासून तर तो अखिल सांसारिक बंधनांपासून मुक्त राहून रात्रंदिवस वेदांतज्ञानांतच रत राहूं लागला. ह्याप्रमाणें सांसारिक बंधनांपासून मुक्त होऊन तो चित्स्वरूपीं लीन झाला. त्याला सांसारिक मायाजालाचा खरा खरा वीट येऊनच त्यानें आपल्या अमूल्य जीवनाचें सार्थक केलें.

७. अक्खाची बहुधा सर्व कविता वेदांतपर व गूढ आहे. त्याच्या खऱ्या सांसारिक अनुभवाचें त्यांत प्रतिबिंब उठलें आहे. त्याचे अक्खे गीता, पंचीकरण, ब्रह्मलीला, अनुभवबिंदु, चित्तविचार-संवाद, इत्यादि छोटेखानी वेदांतपर काव्यग्रंथ फारच बहारीचे आहेत. तो गुजराथी असून त्याचें हिंदी भाषेंतही बरेंच काव्य उपलब्ध आहे.

## गुजराथी

ब्रह्मरस ते पीओ रे, जे आपत्यागी होय ।
भगळ विद्या नट खेल छे, ते खेले अखेला कोय ।। १ ।।

केसरी कुरव थी संचरे, अने बांका रे महावीर ।
ते गर्जनाओ गजराज नासे, सोंघल छंडे धीर ।। २ ।।

सात सायर सहेजे तरे, जेने एक अंजली नीर ।
बुडे नही कहुं बिर्द भांखी, त्रवेणीनें तीर ।। ३ ।।

संग्रामे शूरा लडे, जेना धडपर होय न शीश ।
धार अणी अटके नहीं, जेने रोमे रोमे जगदीश ।। ४ ।।

महा परमावधी तेने कहिये, जे सर्वने करे संत ।
कहे, **अक्खो** ' महातेज माहे, ते मळी रह्या महंत ।। ५ ।।

## २३. गंगाधरशास्त्री तैलंग

१. आपलें हिंदुस्थान हें विद्यादेवीचें परमप्रिय निवासस्थान आहे अशी याची फार प्राचीन कालापासून ख्याति आहे. अनेक कारणांनीं संस्कृतविद्येचा प्रस्तुत ऱ्हास जरी होत आहे तरी अजून-देखील मोठमोठे दिग्गज पंडितमण्डळ येथें आहे. इतर विद्या शिकून होणाऱ्या लाभाकडे पाहिलें व त्याची आमच्या पंडितवर्गाच्या योग्यतेशीं व परिश्रमांशीं तुलना केली तर मातृभाषेच्या सेवेस आयुष्याचा मुख्य भाग अर्पण करणारांच्या स्वार्थत्यागाची प्रशंसा करावी तितकी थोडीच होणार आहे. न्याय, व्याकरण, वेदांत, मीमांसादि शास्त्रांच्या अध्ययनांत आयुष्य घालविलेले मोठमोठे पंडित लोक केवळ कुटुंबनिर्वाहासाठीं पै पैसा मागत घरोघर हिंडत असतात हें देशाचें दुर्दैवच होय. **महामहोपाध्याय पं. गंगाधरशास्त्री**-बोवा यांचें त्रोटक चरित्र पुढें देतों.

२. न्याय, व्याकरण, वेदान्त, मीमांसादि समग्र शास्त्रें, शास्त्री-बोवा विद्यार्थ्यांना फारच उत्तम रीतीनें शिकवीत असत. शिवाय ते वेदविद्या कर्मकांड यांतही निष्णात होते. त्यांची स्मरण-शक्ति अलौकिक होती. जो ग्रन्थ ते एक दोन वेळां वाचीत तो त्यांस अगदीं मुखोद्गत होत असे. विस्मृति कशी ती त्यांना माहीतदेखील नव्हती. संस्कृत विद्येची आणि काशी येथील गव्हर्न्मेंट कॉलेजच्या संस्कृत विभागाची त्यांनीं बरीच उन्नति करून दाखविली. ह्यांच्या प्रभावानें पूर्वींपेक्षां दसपट अधिक विद्यार्थी ह्या कॉलेजच्या परीक्षेस बसूं लागले.

३. विद्यार्थ्यांना शास्त्रीबोवा अगदीं पुत्रतुल्य मानून वागवीत असत. त्यांच्या अन्नवस्त्राची व पुस्तकादि साहित्यसंभाराची ते आनंदानें स्वतः व्यवस्था लावून देत असत. कित्येक विद्यार्थ्यांच्या लग्नादि मंगलकार्यांसही ते द्रव्यसाह्य करण्यास मागेंपुढें पाहत नसत. शिवाय अनेकांना ते गुप्तपणें चांगलें साह्य करीत. विद्यार्थ्यांवर त्यांचें प्रेम अकृत्रिम होतें. त्या प्रेमाच्या आड देशादि कृत्रिम भेद कधींही येत नसत. छात्रगणांपैकीं कोणाकडून कांहीं अपराध घडल्यास ते स्वतःच त्यास क्षमा करीत. कोणत्याही अध्येय विषयांत विद्यार्थ्यांस कितीहि लहानमोठी शंका आली, तो विषय त्यास चांगला न समजला, तर आपल्या अधिकारयुक्त व प्रेमळ रसाळवाणीनें तो विषय अत्यंत सरळपणें त्यास शास्त्रीबोवा आनंदानें सुबोध करून सांगत. विद्यार्थ्यानें उपेक्षा केली तरी ते उपेक्षा करीत नसत. अशा कारणांनीं शास्त्रीबोवांचे शेंकडो विद्यार्थी अखिल भरतखंडावर पसरलेले आहेत. विद्यार्थ्याचा शिक्षणक्रम संपून तो विद्वान् झाल्यावर त्याच्या जीविकेविषयींही शास्त्रीबोवा चांगला यत्न करीत असत. शास्त्रीबोवांच्या विद्यार्थ्यांपैकीं कित्येक जण आज दरमहा चारचारशें रुपये पगारांच्या मोठमोठ्या जागांवरदेखील आहेत. विद्यार्थ्यांकडून घरगुती कामें करून घेणें शास्त्रीबोवांना कधींही आवडत नसे, इतकेंच नव्हे तर त्यांना यथायोग्य आदरानें वागवीत. कित्येक आचार्य आणि अनेक राजगुरु ह्यांचे शिष्य आहेत. शास्त्रीबोवा अद्वैतमतानुयायी असूनदेखील तद्विरुद्ध शास्त्रांचें शिक्षण ते लक्षपूर्वक देत असत. मतांतरांचें शिक्षण देत असतांना शास्त्रीबोवा जणों त्या त्या मताचेच आहेत कीं काय असें वाटे ! प्रायः प्रत्येक पर्वकाळीं, विशेषतः, अक्षय्यतृतीया, गणेशचतुर्थी, नवरात्रादि प्रसंगीं तर शास्त्रीबोवा चांगलाच दानधर्म

करीत. नेपालादि अनेक देशस्थ राजे, महाराजे, मोठमोठे आचार्य, शास्त्रीबोवांचे दर्शनासाठीं उत्सुक असत; परंतु ते कांहीं कधींच उठून कोणाकडे गेले नाहींत. श्रृंगेरीमठाचे ब्रह्मीभूत श्रीशंकराचार्यांची ह्यांजवर मोठी प्रीति असे.

४. शास्त्रीबोवांनीं "शाश्वतधर्मदीपिका" वगैरे अनेक सुंदर ग्रन्थ केले आहेत. त्यांचा शेवटचा ग्रन्थ म्हणजे "अलिविलाससंलाप" हा होय. दर्शनीय विषयावर असा प्रौढ ग्रन्थ दुसरा कोठे पहाण्यांत नाहीं. संस्कृत गद्यपद्यात्मक लेख लिहिणें व बोलणें या गोष्टी शास्त्रीबोवांना अगदीं सहज होत्या. याशिवाय इतर कित्येक भाषा ते बोलत असत. जगप्रसिद्ध शीघ्र कवि पंडित गट्टूलालजीदेखील यांची शीघ्रकवित्वशक्ति पाहून चकित होत असत. शास्त्रीबोवांच्या कमलवन्धादि चित्रकाव्यांत इतका प्रसादगुण भरला आहे कीं, तसा तो अनेक प्राचीन काव्यांतही दिसून येत नाहीं. ह्यांनीं एक श्लोक पांचच अक्षरांत केला होता; ही गोष्ट कांहीं सामान्य नव्हे.

५. महामहोपाध्याय गंगाधरशास्त्रीबोवा अलाहाबाद विश्वविद्यालयाचे फेलो व एम्. ए. परीक्षेचे संस्कृत परीक्षक होते. यांचा वक्तशीरपणाही प्रशंसनीय होता. त्यांत एका मिनिटाचादेखील कधीं फरक होत नसे. शास्त्रीबोवांना निद्रा फार थोडी येत असे. सर्व वेळ देवतार्चन व अध्यापन ह्यांतच व्यतीत होई. 'न स्वाध्यायविरोध्यर्थमीहेत नयतस्ततः' असें ते नेहमीं म्हणत. सरकारांतही शास्त्रीबोवांची मानमान्यता चांगली होती. संस्कृत विषयासंबंधानें अलाहाबादचे लेफ्टनंट गव्हर्नरही ह्यांचा अभिप्राय विचारीत असत. काशीच्या राज्याचे ते जहागीरदार होते. कोणताही अभिप्राय अगदीं स्वतंत्रपणें ते देत असत. ह्यांचे ज्येष्ठ पुत्र ढुंढिराजशास्त्री

अकालीं कैलासवासी झाले त्या वेळीं दिसून आलेलें त्यांचें मनोधैर्य केवळ असाधारण होतें. या वेळीं त्यांनीं आपल्या वेदांतालोचनाची सार्थकता करून दाखविली. हा प्रसंग येण्यापूर्वी कांहीं वर्षांपासून शास्त्रीबोवांनीं पुष्कळसे लौकिक व्यवहार सोडून दिले होते. युरोपांतील संस्कृत रसिकजनदेखील काशीस आल्यावेळीं त्यांची भेट घेऊन आपल्या शंका निवृत्त करून घेत असत. छात्रगणांना पाठ सांगतांना पाठ्य विषयांचें चित्रच त्यांच्यापुढें ते उभें करीत. पाठ न समजला तरी शास्त्रीबोवांची रसाळ वाणी श्रवण करण्यापासून मन कधीं विन्मुख होत नसे. शास्त्रीबोवा एकाच वेळेला एक ग्रन्थ सुरू करीत, दुसरा ग्रन्थ श्रवण करीत व निरनिराळ्या ग्रंथांचे पाठही विद्यार्थ्यांस देत !

६. शास्त्रीबोवांचा जन्म संवत् १९१० च्या जेष्ठ शुक्ल दशमीचे दिवशीं झाला. त्यांचे वडील श्रीनृसिंहशास्त्री हे एक साहित्यशास्त्रप्रवीणांपैकीं मुख्य विद्वान् होते. त्यांना लोक आधुनिक कालिदास म्हणत. त्यांनीं शास्त्रीबोवांच्या तिसऱ्या वर्षी अक्षरारंभ व पांचव्या वर्षी शास्त्रारंभ करविला ! हे मोठे होतकरू असल्यामुळें बाल्यावस्थेंतही चांगले बुद्धिमान् होते. वयाच्या चौदाव्या वर्षापूर्वीच ह्यांचे वेद व साहित्यशास्त्र यांचें अध्ययन पूर्ण झालें होतें ! साहित्यशास्त्रासंबंधीं विशेष ग्रंथ शास्त्रीबोवांना मुखोद्गत झाले होते. ह्या अल्पवयांत ते साहित्यशास्त्रांत इतके निष्णात झाले होते कीं, ह्यांची कविता मोठमोठे विद्वान् लोकदेखील फार पसंत करीत होते.

७. ह्यांनीं सुप्रसिद्ध विद्वान् राजारामशास्त्रीबोवा यांचेपाशीं व्याकरणादि अनेक शास्त्रांचें अध्ययन करून परीक्षा दिल्या होत्या. त्यांचें अक्षर अत्युत्तम असल्यामुळें कॉलेजचे प्रिन्सिपॉल तें पाहून

फार खुष होत असत. जगत्प्रसिद्ध बालशास्त्रीबोवांपाशींही यांनीं कांहीं अध्ययन केलें होतें. हे उभयतां विद्वान् धर्मशास्त्रविषयक जी व्यवस्था देत ती लिहिण्याचें काम त्यांजकडे सोंपवीत.

८. अध्ययनसमाप्तीनंतर शास्त्रीबोवांना सन १८७९ त काशीच्या कॉलेजांत अध्यापक नेमण्यांत आलें. ह्यांनीं आरंभापासून देहावसान होईपर्यंत अध्यापनकार्य फारच उत्तम रीतीनें चालविलें. कॉलेजांतून घरीं आल्यावरदेखील ते विद्यार्थ्यांस शिकवीत असत. ज्येष्ठ शुद्ध १ संवत् १९७० ( ता. ५।६।१९१३ ) रोजीं हे ब्रह्मणोत्तम परंधामीं गेले.

# ३४. मौलवीसाहेब हमाल

यांचा जन्म मोमीन कुळांत नांदेड येथेंच झाला. हे लहान-पणापासूनच वली होते. यांना लिहितां वाचतां कांहीं येत नव्हतें किंवा वडिलोपार्जित विणकामाचा धंदाही येत नव्हता. लग्न झाल्यावर हे हमालीचा धंदा करूं लागले. ओळखी किंवा अनोळ-खीच्या कोणाही गृहस्थानें यांचेकडून धान्य वगैरे आपल्या घरीं किंवा बिऱ्हाडीं नेऊन पोंचविण्यास सांगितलें तरी तें त्यांनीं बिन-चूक नेऊन पोंचतें करावें. साऱ्या जन्मभर यांनीं स्वकष्टार्जित अन्ना-शिवाय सेवन केलें नाहीं. पूर्वीं सरांत होऊन गेलेल्या शहासाहेबांची अजगरवृत्ति होती. त्यांनीं कोणी कांहीं आणून दिल्यास खावें, नस-ल्यास पडून राहावें. फिरत फिरत मौलवीसाहेबांची स्वारी सरांत गेली व तेथील देखावा पाहून ते शहास म्हणाले, 'अरे बगैर मेहनतके खाना अच्छा नहीं.' पूर्वींपासून लहान मुलांवर यांची जास्त प्रीति होती. त्यांचे अंगावर नेहमीं ४–५ मुलांनीं राहावें. कित्येक ऑफिसर मौलवीसाहेबांनीं आपल्या घरीं यावें म्हणून शिपाई वगैरे लोकांकडून प्रयत्न करीत असत. कधीं अकल्पित प्रसंग घडून आल्यास मोठ्या प्रेमानें यांना नानातऱ्हेचा मेवा आणून देत. यांनीं 'नकोरे नकोरे' म्हणून उठून चालतें व्हावें. यांचें मुद्दाम दर्शन घ्यावें म्हणून अलीकडे कांहीं लोक टपत असत. भेट घ्यावी म्हटल्यास होऊं नये. केव्हांतरी अकल्पितच स्वारीची भेट व्हावी. मौलवीसाहेबांच्या शरीराचा बांधा गिड्डा असून वळकट होता. गौरवर्ण, चेहरा तेजस्वी, हास्यमुख. गांवांत लोक सांगतात कीं

आज ४० वर्षांपासून मौलवीसाहेब आहेत तसेच आहेत, शरीर बिलकुल उतरल्यासारखें दिसत नव्हतें. कमरेस हात दीड हाताचा पंचा गुंडाळावा व एक पागोटें किंवा शेला अंगावर घ्यावा, कधीं उघडेंही फिरावे. यांची वृत्ति नेहमीं आनंदी असे. हे वयाच्या ८२ वे वर्षी नांदेड येथेंच फाल्गुन वद्य १ शके १८३८ सालीं निवर्तले.

## २५. राजकवि यशवंतराव पवार

मालवचक्रवर्ति प्रसिद्ध भोजदेव यानें धारानगरीस आपल्या राजधानीचें स्थान बनविलें तेव्हांपासून प्राचीन राजधानी उज्जयिनी हिचें माहात्म्य कमी होऊन धारानगरी ही विद्येचें एक मुख्य पीठ बनली. तेव्हां अनेक देशांहून अनेक पंडित कवि व धारेस येऊन दानशूर भोजराजापासून योग्य संभावना मिळवून संतुष्ट होत. खुद्द भोजराजाचीही कवींत गणना होत असे. भोजराजा हा परमारवंशीय क्षत्रिय होता. विद्याव्यासंग, विद्योत्तेजन आणि औदार्य या गुणांविषयीं हा राजवंश इतिहासप्रसिद्ध आहे. माळव्यांत परमारांची सत्ता सुमारें पांचशें वर्षें नांदून पुढें सुमारें पांच शतकें मुसलमानांचा अंमल राहिला. इसवी सनाच्या अठराव्या शतकाचे आरंभीं आपल्या मराठे वीरांनीं पुन्हां या देशांत हिंदुपदपादशाहीची मुहूर्तमेढ रोविली आणि थोड्याच दिवसांत हा उत्तर हिंदुस्थान देश त्यांचे हस्तक होऊन शिंदे, होळकर आणि पवार यांच्या संस्थानांचा पाया श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे यांनीं घातला. त्यांत पवार घराण्याची आपली वडिलोपार्जीत धारानगरीच पुन्हां हस्तगत झाली हें चमत्कारिक व अपूर्व कर्मधर्मसंयोगाचें उदाहरण आहे. असें इतिहासांत दुसरें उदाहरण सांपडणें कठीण आहे.

अस्तु. या नवीन महाराष्ट्रीय परमार ( पवार ) घराण्यांत आपल्या पूर्वजांची कीर्ति व अभिमान जागृत होता ही गोष्ट आरंभापासून त्यांचे घराण्यांत व्यक्त होत आहे. या घराण्यापैकीं आठवे पुरुष श्रीमंत यशवंतराव रावसाहेब पवार इसवी सन १८३५

सालीं धार संस्थानचे गादीवर बसले. त्यांनीं आपल्या बावीस वर्षांचे कारकीर्दींत यथाशक्ति व यथानुकूल श्रीभोजदेवाचें अनुकरण केलें. भोजराजाचे सभेंत चौदाशें पंडित होते अशी प्रसिद्धि आहे. रावसाहेबांनींही आपले दरबारीं उत्तम निवडक पंडितांस आश्रय दिला. भोजराजाचा आवडता पंडित कालिदास पदधारी होता; रावसाहेबांनींही आपल्या पदरच्या बुद्धिमान् प्रतिभाशाली तरुण पंडितास ती पदवी दिली होती. भोजराजाप्रमाणें रावसाहेबही कालिकाभक्त असून त्यांनीं श्रीकालिकेचे उत्सव व पूजानैवेद्य नीट चालण्याकरित्तां तीन गांवें अर्पण केलीं. भोजराजा स्वत: उत्तम कविता करी, त्याप्रमाणें रावसाहेबही संस्कृत प्राकृत कविता करूं लागले. भोजराजाचे मरणानंतर बखेडे उत्पन्न होऊन राज्य रसातळास गेलें, रावसाहेबांचे मरणानंतर धारेस शिपायांचें बंड होऊन राज्य कांहीं काळ जप्त झालें होतें! परमाराचे राज्याचा एका परमार वीरानेंच उद्धार केला. रावसाहेबांचें राज्यही त्यांचे पुण्यशील बंधु श्रीसंत आनंदराव महाराज यांस परत मिळालें. हें उभयतांतील साम्य येथेंच संपलें नाहीं. भोजराजापासून तिसरा पुरुष रणशूर उदयादित्य यानें तें राज्य भरभराटीस आणिलें. रावसाहेबांचे मागून त्यांचे नातु हल्लींचे राजे श्रीमंत महाराज सर उदाजीराव पवार यांचे वेळीं धारसंस्थानची भरभराट झाली आहे. हें नामसादृश्य अकल्पित रीतीनें उत्पन्न झालें हें पाहून कोणासही आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. रावसाहेबांचें भोजदेवाशीं वर लिहिल्याप्रमाणें साम्य आहे, परंतु भोजराजापेक्षांही रावसाहेबांचे अंगीं एक वरचढ गुण होता तो त्यांचे काव्यांत स्पष्ट दिसत आहे. त्यांच्या कविता भक्तिरसपरिप्लुत आहेत. हा गुण भोजराजाचे कवितेंत असल्याची प्रसिद्धि नाहीं. तींत अद्भुत कल्पनाशक्ति

आहे, परंतु रावसाहेबांचे काव्यांत ईश्वरविषयक प्रेम चमकत आहे व त्यांचे अंगीं प्रजावात्सल्य असामान्य प्रमाणानेंच वसत होतें यामुळें रावसाहेबांस कविराज म्हणण्यापेक्षां भक्तराज म्हटलें असतां वावगें होणार नाहीं.

### १ पद ( राग खमास )

झडकरि तूं धांव पाव कालिका माता ।। ध्रु० ।।
तूंचि मात, तूंचि तात, तूंचि भगिनि, तूंचि भ्रात, ।।
तुजविण मज नाहिं कोणी या त्रिभुवनांत ।। १ ।। झडकरि ०
तूंचि उमा तूंचि रमा तूं शांकरि तूंचि भिमा ।
तूंचि जळीं तूंचि स्थळीं व्याप्त गिरिसुता ।। २ ।। झडकरि ०
तूं आकाश पृथ्विवरी तूं रसातलांतरीं ।
तूं भवजलधींत तरी तारी मज आतां ।। ३ ।। झडकरि ०
सेवक **यशवंता**वरि दृष्टि कृपायुक्त करी ।
भक्तजना सौख्यकरी रक्षि निजसुता ।। ४ ।। झडकरि०

### २ पद ( राग सोहनी )

किस बिधहूं भवपार हो मैया मैनाजातू अंबा ।। धृ० ।।
भवसागरमे बहो जात हूं तुमबिन कोन लगावे पार ।। मै० १ ।।
हमको तुम्हारे नामको आधार तरगये नामसू अपार ।। २ ।।
दास **यशवंत** मैं शरण तुमको तुमबिन कोन करे उद्धार ।। मैय्या

### ३ पद (राग भूप)

मजला तारी जगन्माता झडकरी धांवे ।। धृ० ।।
व्यर्थ मायेचा व्यापार यांत झालों निमग्न फार ।
तुजविण कोण करिल उद्धार म्हणुनि चरण सेवी हो ।। मज १

अंबे मी तुझे धरिले पाय सांग मजला चुकलों काय।
माझा पदोपदीं अन्याय याचें ब्रीद तूं सांभाळी ॥ मज ॥ २ ॥

फार चुकलों मी आतां चरणीं तव ठेविला माथा।
याची लाज रक्षि सर्वथा तरिच सार्थक होई ॥ मज ॥ ३ ॥

चरण सेविन मी काली मज **यशवंता** प्रतिपाळी।
यास न विसंबे कदा काळी ही विज्ञप्ती परिसावी ॥ मज ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक ............... वि: ....................
क्रमांक .......................... नोंद दि: ...............

# २६. श्रीमत्सुब्रह्मण्यानंदतीर्थ

१. मडगांवांतील सुप्रसिद्ध यतिमहाराज श्रीमत्सुब्रह्मण्यानंदतीर्थ यांचें चरित्र मननीय आहे. गोव्यांत जे कांहीं बोटांवर मोजण्याइतके सच्छील विद्वान् झाले त्या सर्वांत ते अग्रगण्य तर होतेच, परंतु गोव्याबाहेरील विद्वानांत सुद्धां यांची पुष्कळ चहा होती. वैद्यकींतील त्यांचें प्रावीण्य तर सर्वांस माहित आहेच. वेदांतविषयक प्रश्न तर ते इतक्या कुशलतेनें सोडवीत होते कीं, त्यांचें तें प्रावीण्य पाहून मोठमोठ्या विद्वानांस त्यांजपुढें थक्कच व्हावें लागत असे.

२. यतिमहाराजांचा जन्म शके १७७६ चैत्र कृष्ण पंचमीस झाला. ते सारस्वत ब्राह्मण. त्यांच्या बापाचें नांव लक्ष्मण नाईक असें होतें. त्यांचीं आईबापें लहानपणींच वारल्यामळें त्यांच्या शिक्षणाचा भार त्यांच्या आजोबांवरच पडला व देशीभाषेंतील त्यांचा प्राथमिक अभ्यास त्यांच्याच हाताखालीं होऊन आठव्या वर्षीं त्यांचा व्रतबंध-संस्कार उरकला. पुढें त्यांस पोर्तुगीज शिकविण्यास घालण्यांत आलें, परंतु कांहीं कारणांमुळें त्यांस एकाच वर्षांत शाळेला राम राम ठोकणें भाग पडलें व ते लॅटीन शिकूं लागले. तोही अभ्यास दोन वर्षांपुरताच करून त्यांनीं त्यांच्या सर्व लौकिकास कारण झालेली संस्कृत भाषा शिकण्यास आरंभ केला, सुदैवेंकरून त्यांस गुरुही चांगले लाभले. त्यांच्या गुरूचें नांव निळकंठबोवा जांबटकर असें होतें. सुब्रावराव अगोदरच तीव्र बुद्धीचे, तशांत उत्तम गुरूचा लाभ; मग काय विचारतां ? संस्कृतांत त्यांनीं, न्याय, मीमांसा, वेदांत, वैद्यकी व ज्योतिष या शास्त्रांचा अभ्यास करून त्यांतही प्रावीण्य

मिळविलें. पुढें त्यांचा विशेष कल वैद्यकी व वेदांत यांकडे दिसून आला, व यांत तर ते इतके कुशल झाले. पुढें त्यांच्या पंधराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. द्वितीय पत्नीपासून त्यांना एक कन्यारत्न झालें होतें. आर्यवैद्यकावर जो एकप्रकारचा गोव्यांतील ख्रिश्चन किंवा हिंदुलोकांचा अविश्वास बसला होता तो पार उडवून लावण्यास हेच कारण झाले, इतकेंच नव्हे तर खुद्द युरोपियनांसही यांनीं आर्यवैद्यकाची योग्यता कोणत्याही बाबतींत कमी नाहीं हें कबूल करण्यास भाग पाडलें.

३. रा. सुब्रावराव यांची जनसमुदायावर तर छाप होतीच, परंतु पर्तगाळमठाधिपति श्रीमत्पद्मनाभतीर्थ व श्रीमदिंदिराकांततीर्थही यांच्या गुणाला लुब्ध होऊन कोणत्याही महत्त्वाच्या कामांत त्यांचा सल्ला घेतल्याशिवाय रहात नसत. सुब्रावरावांत विद्या, विनय, धैर्य, समयसूचकता इत्यादि जे अनेक गुण वसत होते त्या सर्वांत विशेष म्हटला म्हणजे त्यांची भूतदया, गरिबांविषयीं कळकळ आणि नम्रता हीं होत. कोणीही अतिथि अभ्यागत किंवा गरिबगुरीब दारीं आला असतां त्यास कधींही विन्मुख परत जावें लागलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर एखादा प्रवासी असो किंवा एखादा उदरंभरु असो, एखादा साधु असो किंवा ब्रह्मचारीसंन्यासी स्वमतप्रतिपादनार्थ फिरणारा असो, ‘ सुब्रावनायकका घर किदर है ’ म्हणून आलाच त्यांना शोधीत. ब्रह्मीभूत श्रीमद्विवेकानंद स्वामीही हिंदुस्थानचा प्रवास करीत असतां मडगांवीं पोंचल्या वेळीं यांच्याच येथें उतरले होते. यांची परोपकारबुद्धि यांच्या गृहस्थाश्रमाला शोभवीत असे. एखाद्यास औषध पाहिजे असल्यास किंवा रोग्यास पाहण्यास जाणें प्राप्त असल्यास त्यांनीं कधीं रात्र अपरात्र म्हटलें नाहीं, किंवा फीची व वाहनाचीसुद्धां अपेक्षा केली नाहीं. आपण दिलेल्या औषधाची किंमत

अमूकच आहे असें त्यांनीं केव्हां म्हटलेलें ऐकिवांत नाहीं. तर जो जें कांहीं हात उचलून देई त्याचा मोठ्या आदरानें स्वीकार व्हावयाचा. गोरगरिबांस तर औषध फुकट देण्यासही ते सदैव तत्पर असत.

४. रा. सुब्रावनाइकांची राहणी एखाद्या संस्थानिकाप्रमाणें जरी असे तरी ते कोणास कधीं चुकूनही अपशब्द बोलले नाहींत. ते मोठे धार्मिक, बोलके व उत्तम लेखक असल्यामुळें कोणासही त्यांच्या विरुद्ध त्यांच्या समोर बोलण्यासही प्राज्ञा होत नव्हती; एकंदरींत रा. सुब्रावराव हे विद्वान्, उत्तम बोलके, मार्मिक लेखक, स्पष्टवक्ते, उत्तम मसलती, व अतिशय समयसूचक होते यांत तिळप्राय संशय नाहीं. अशा रीतीनें कालक्रमणा करीत असता वेदान्त व भगवद्गीतेच्या वारंवार वाचनानें त्यांचें मन विरक्त होऊं लागलें. १९१० नोव्हेंबर महिन्यांतच त्यांनीं संन्यास घेतला. तेव्हांपासून पुढें त्यांनीं आपला सर्व काळ वेदाध्ययनांत व भजनपूजनांत घालविला. त्यांना इहलोक सोडीपर्यंत वेदान्त किंवा गीतावाचनाचा इतका नाद होता कीं गीतेवर प्रसिद्ध झालेल्या सर्व भाष्यें, टीका व इतर सर्व पुस्तकें त्यांनीं वाचल्याशिवाय ठेविलीं नाहींत. नुक्ताच प्रसिद्ध झालेला टिळकांचा कर्मयोगशास्त्र किंवा गीतारहस्य हा ग्रंथ त्यांनीं अंथरुणावर असतांना एक वाचक ठेवून पंधरा दिवसांच्या आंत वाचून घेंतला. त्या ग्रंथाविषयीं त्यांचा अभिप्राय उत्तम होता, परंतु त्यांतील ‘ज्ञानी लोकांनीं कर्म केलेंच पाहिजे, असें जें टिळकांनीं प्रतिपादलें आहे तें ‘ज्ञानी लोकांकडून कर्म घडतें’ असें प्रतिपादन केलें असतें तर तो ग्रंथ त्यांना एकंदरींत फारच मान्य झाला असता, ता. २ जानेवारी १९१६ रोजीं ते नारायणरूप झाले.

## २७. सिद्धारूढ स्वामी

१. श्रीआरूढ स्वामीमहाराजांचा जन्म मोंगलाईंतील एका प्रांतांत झाला. त्यांचे वडील श्रीमान् असून मोठे भाविक होते. घरी नित्य भागवत व वेदान्त यांचें श्रवण चालत असे. सिद्धाप्पाची (हें त्यांचें मूळचें नांव ) बुद्धि फार तीव्र असून त्यांचे ठिकाणीं विरक्तीचीं चिन्हें लहानपणापासूनच दृग्गोचर होऊं लागलीं. ते नित्य श्रवणास बसत. श्रवण संपल्याबरोबर त्यांच्या वयाच्या इतर लहान मुलांप्रमाणें ते खेळण्यास न जातां एकांतांत जाऊन बसत. जेवणाकरितां त्यांना शोधून आणावें लागे. ह्याप्रमाणें १४ वर्षें आईबापांच्याच घरीं ते राहिले. इतक्या अवधींत झालेल्या श्रवणानें व पूर्वसंस्कारानें वैराग्याचा परिणाम होऊन ते एकाएकीं कोणालाही कळूं न देतां घरांतून जे पसार झाले, ते पुनः घरीं गेलेच नाहींत. घरांतून निघाल्यावर सिद्दापा कंबरेस एक कांवळ्याची लंगोटी व अंगावर एक फाटकें रगटें अशा वेषानें भूक लागेल तेव्हां कोठें तरी गांवांत जाऊन करतलभिक्षा करावी, व रात्रीं मशिदींत, देवळांत, अगर झाडाखालीं पडावें, असें फिरत फिरत आवड्यानागनाथापर्यंत गेले. तेथें एका सिद्ध पुरुषाची संगति होऊन लवकरच ते कृतार्थ झाले ! अगोदर तप्त व बीजारोपण झालेली भूमि, त्यांत अमृतोदकसिंचन झाल्याबरोबर अंकुरोत्पत्ति झाली, हें यथायोग्यच झालें. तेथून सिद्दापा परत निघाले ते फिरत फिरत विजापुरास आले. येथेंही ते आपली चर्या लोकांस जडांधबधिरवत् दाखवीत राहिले. दिवसा करतलभिक्षा करावी, व रात्रीं किल्ल्यांतील नृसिंहाच्या देवळांतील ओरींत जाऊन

निजावें, ही त्यांची दिनचर्या. एका रात्रीं नित्याप्रमाणें ते निजण्याच्या जागीं जात असतां वाटेंत एका सावकाराची वरात चालली होती. वरातींतील एक हिलालवाला हिलाल टाकून निघून गेला होता. तेव्हां मंडळीनीं ह्यांस बेगारीस धरून त्यांच्या हातीं हिलाल दिला ! यांचें नाहीं होय कोणीं म्हणावें ? त्यांनी तो हिलाल मुकाट्यानें हातीं घेऊन इतर हिलालवाल्यांप्रमाणें ते चालूं लागले. वरात मुक्कामास पोंचल्याबरोबर हिलाल खालीं ठेवून ते पळून गेले. मालक त्यांस कांहीं पोटगी द्यावी म्हणून पाहूं लागले तों त्यांचा पत्ता नाहीं.

२. अशा चर्येंत कांहीं वर्षें विजापुरांत राहून तेथून पुन्हां संचारास निघाले ते फिरत फिरत गोकर्णास गेले. वाटेनें एक एक दोन दोन दिवस कांहींएक न खातां, उन्हांत, थंडींत पडून रहावें; कधीं कधीं नुसतें दूध पिऊनच रहावें; कधीं उदकावरच रहावें; अशा प्रकारें प्रवास करीत कधीं कोणाशीं फारसें बोलत नसत. नेहमीं स्वरूपानंदांत निमग्न असून दृष्टीस पडेल तें पहावें, कशानें तरी क्षुधाशांति करावी, मिळेल त्या फाटक्यातुटक्या वस्त्रानें शीतोष्णनिवारण करावें, अशी त्यांनीं वृत्ति स्वीकारली होती. गोकर्णांत एकदां कांहीं उपद्व्यापी लोकांनीं त्यांच्या कपाळीं भलामोठा मळवट भरून अंगाला अमंगळ पदार्थ फांसून, गाढवावर बसवून त्यांची मिरवणूक काढली होती ! परंतु ते एक चकार शब्दही बोलले नाहींत किंवा त्या लोकांच्या इच्छेविरुद्ध त्यांनीं कांहीं हालचाल केली नाहीं ! ! धन्य आहे या साधूंची सहनशक्ति ! !

३. गोकर्णाहून ते पुन्हां फिरत फिरत निघाले तों हुबळीस आले. येथें आल्यावर त्यांनीं फिरण्याचें सोडून दिलें व ते तेव्हांपासून हुबळींतच कायमचे राहिले आहेत. धन्य ते हुबळीकर कीं ज्यांना

त्यांचा सहवास लाभला आहे ! ! हुबळींत जुन्या गांवापासून १॥ मैलावर एक आंबराई आहे व तींत एक लहानसें तळें आहे. गुराखी पोरांची खेळण्याची ती जागा. तेथें एका सिद्ध पुरुषाची एका खणाची छावणी घातलेली एक समाधि आहे. त्या गुराखी पोरांत ते खेळत असत. गांवांतून तुकडे आणावेत अथवा एखादे वेळीं गुराखी पोरांची शिदोरी घेऊन, ती तळ्यावर बसून खावी, आणि रात्रीं त्या समाधींत जाऊन निजावें. हा त्यांचा हुबळींतील पूर्वी-क्रम होता.

४. एकदां ते नित्याप्रमाणें भाकरी मागण्यास एका गृहस्थाचे घरीं गेले असतां तेथें आकस्मिक योगाचें श्रवण चाललें होतें व श्रवणांतील कांहीं विषय श्रोत्यावक्त्या उभयतांस न कळल्यामुळें ती सर्व मंडळी स्तब्ध बसली होती. तेव्हां दैवयोगेंकरून त्यांस बोलण्याची स्फूर्ति होऊन, त्यांनीं तो विषय तसेंच उभे राहून त्या मंडळींस समजेल अशा उत्तम वाणीनें सांगितला. मंडळी अधिकारीच होती. त्यांनीं लागलीच त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून हे कोणी-तरी सिद्ध पुरुष आहेत असें जाणिलें. घरच्या मालकानें तर त्यांस त्या रात्रीं आपल्या घरीं ठेवून घेऊन त्यांचा फार सत्कार केला व राहण्याविषयीं आग्रह केला. ते कांहींएक न बोलतां रात्रीच्या रात्रीं तेथें राहून पहांटेस कोणी जागे होण्यापूर्वींच तेथून निघून रानांत गेले. त्या मंडळींस त्यांच्या भाषणाचा चटका लागला आणि ती रोज त्यांच्या खेळण्याच्या जागीं जाऊन श्रवण सुरू करूं लागली; श्रवण सुरू झाल्यावर त्यांस सहजच स्फुरण येऊन ते खेळ सोडून देऊन मंडळींत येऊन बसत आणि उत्तम प्रकारचें निरूपण करीत, अर्थात् सर्व मंडळी त्यांच्या श्रवणानें फार आनंदित होत. असा क्रम चालू झाला व मंडळी त्यांच्या भक्तीस लागली. तेही खेळणें बंद करून

नित्यनिरूपण करूं लागले. त्यांची ब्रह्मनिष्ठा पाहून मंडळी त्यांस सिद्धारूढ म्हणूं लागली आणि तेव्हांपासून ते आतां त्याच नांवानें प्रसिद्ध आहेत.

५. सिद्धारूढ महाराजांचें वर्तन फार साधें, निरपेक्ष व अत्यंत वैराग्यशील आहे. त्यांचा परिग्रह म्ह० एक लंगोटी, एक धोतर व डोकीचें दोन हात फडकें ! देहाबद्दल ते फार उदासीन असतात, म्ह० देहाला कितीहि मोठें दुखणें आलें तरी ते औषध बिलकूल घेत नाहींत. अनशन हेंच त्यांचें औषध. त्यांचें निरूपण अनुभवयुक्त, सोपें व मुमुक्षुजनांच्या कळवळ्याचें असतें. त्यांच्या भाषणांत इतका कांहीं विलक्षण शक्तिपात आहे कीं, श्रवणानें श्रोतृजनांचीं मनें तल्लीन होऊन जातात व सर्वजण आनंदित होतात. सर्व श्रोतृमंडळाचे हरएक प्रकारचे संशय निवारण होतात. साधनांच्या खटपटी अगर योगजाल त्यांच्या निरूपणांत कधींही येत नाहींत. " बाबारे ! तूंच ब्रह्म आहेस, सर्वजणच आनंदयुक्त आहेत, कांहीं करूं नकोस, उगीच बैस, म्ह० साधकांनीं जें जें कांहीं व्हावें म्हणून अपेक्षा करावी तें तें सर्व पूर्वींच सिद्ध आहे " हा त्यांच्या भाषणाचा इत्यर्थ असतो. ' नामरूपात्मक जग । झालेंची नाहीं सर्वथा सोंग । आहे तें ब्रह्मचि अभंग ॥ ' हें त्यांच्या निरूपणाचें धोरण असतें.

६. महाराजांस कानडी, तेलगु, तामीळ, अरबी, मराठी आणि हिंदुस्थानी इतक्या भाषा चांगल्या बोलतां येतात. त्यांच्या भाषणांत अद्वैताशिवाय दुसरा विषयच येत नसल्याकारणानें श्रवणास सर्व जातींचे म्ह० ब्राह्मण, लिंगाईत, सोनार, पटेगार, मुसलमान स्त्रीपुरुष येतात व सर्वजण एकभावानें त्यांची भक्ति करतात. महाराजांची वृत्ति इतकी कांहीं शांत आहे कीं, त्यांच्या दर्शनाबरोबर मनुष्य अंतरीं कितीही दुष्ट असला, तरी तो समाधान पावून

आनंदितच होतो. ते फार उदासीन वागतात. तथापि मठांत परस्थळांहून येणाऱ्या भक्तजनांचें स्वागत करण्यांत ते तत्पर असतात. महाराज लौकिक गोष्टी क्वचितच बोलतात. त्यांना संस्कृत येत नाहीं, तथापि भाष्यादि गहन ग्रंथांतील शास्त्रीय विषय ते इतकी फोड करून सांगतात कीं, त्यांचें सांगणें ग्रंथांतील प्रतिपादनाशीं अगदीं जुळतें--नव्हे ग्रंथांत नसलेले विषयही त्यांच्या प्रतिपादनांत येतात ! हें पूर्वसंस्कारांचें कार्य आहे. त्यांची वाणी प्रतीतियुक्त असल्यामुळें तिचा परिणाम श्रोतृजनांवर त्वरित व उत्तम होतो.

७. महाराज कांहीं चमत्कार करीत नाहींत किंवा कांहीं अकल्पित क्रियाही करीत नाहींत. येथें हें नमूद करणें जरूर वाटतें कीं, चमत्कार करणें, लोकांस दाखले दाखविणें, रोग बरे करणें, नवसास पावणें, दुसऱ्याचें मनोगत सांगणें, इ. ज्ञानाचीं कार्यें नव्हेत किंवा तीं संतांचीं खास लक्षणेंही पण नव्हेत. वाघावर बसून सापाचा चाबूक करणें हें जसें ज्ञानाचें कार्य नव्हे, त्याचप्रमाणें निर्जीव भिंत चालविणें किंवा रेड्यामुखें वेद बोलविणें अथवा स्वर्गींचे पितर जेवण्यास आणणें हेंहि पण ज्ञानाचें कार्य नव्हे. तें तपःसामर्थ्य आहे व हें तप ज्ञानोत्पत्तीस अवश्य असणाऱ्या तपाहून अगदीं भिन्न आहे. (पहा पं. द. ध्यानदीप श्लो० १०९) ज्ञानाचें कार्य अज्ञाननिवृत्तिद्वारां शोकभंग आणि निरंकुशतृप्ति हेंच होय.

८. पृथ्वीच्या पाठीवर अनेक ब्रह्मनिष्ठ पुरुष असतील, परंतु साधारण असा अनुभव आहे कीं, स्वरूपसाक्षात्कार झाल्यानंतर ब्रह्मवेत्त्यांची वागणूक बालोन्मत्तपिशाचवत् राहते. उदा० अक्कलकोटचे स्वामी, फलटणचे हरिबुवा, वाईचे गोपाळबुवा, इ० अशा स्थितींत त्या ब्रह्मनिष्ठांपासून दर्शन व स्पर्शन यांचाच लाभ होतो, संभाषणाचा लाभ क्वचितच घडून येतो. परंतु सिद्धारूढ महाराजांत

जें काहीं विशेष आहे, तें हेंच कीं ते ब्रह्मविद्वरिष्ठ कोटींतील असूनही त्यांचा वर्तनक्रम अगदीं साध्या मनुष्याप्रमाणें आहे. राहणीही शुद्ध म्ह० त्यांना तपकिरीची चिमूट नको किंवा सुपारीचें खांडही लागत नाहीं. ते अंगांत शिवलेला कपडा घालीत नाहींत किंवा पायांत कांहीं पादत्राणही घालीत नाहींत. आणखी साधेपणा तो काय सांगावा ? ह्याप्रकारें त्यांचा वर्तनक्रम असल्याकारणानें येथे दर्शन, स्पर्शन आणि संभाषण असा त्रिप्रकारचा लाभ होतो.

९. भागवतांत सांगितल्याप्रमाणें ते 'शाब्दे परेच निष्णातं' असे आहेत व त्यांची वृत्ति श्रीसमर्थांनीं म्हटल्याप्रमाणें 'करी वृत्ति जो संत तो संत जाणा। दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा ॥१॥' अशी आहे. महाराजांवर प्रसिद्ध वेदांती श्रीबाबा गर्दे यांनीं ते हुबळींत असतांना एक पद केलें आहे तें शेवटीं दिलें आहे. पदांत वस्तुस्थितीचा भागच सारा आहे.

१०. श्रीमहाराजांचें सहज बोलणेंच किती उपदेशपर असतें. त्याचें दिग्दर्शन खालीं त्यांचीं थोडीं **सूत्रवाक्यें** देतों त्यांवरून होईल. ह्या सूत्रवाक्यांत प्रचीति किती भरली आहे हें तज्ज्ञांस सांगणें नकोच:—

१. आंतील ताप असूं नये, बाहेरील तापाची पर्वा नको.

२. मिताहार करणें हाच सात्विक आहार होय.

३. प्राणरक्षणास एकभुक्त असणें पुरें आहे, शक्तीची अपेक्षा असल्यास निशिभोजन करावें.

४. क्षुद्रबोध आपल्या प्रयत्नांवाचून होतो. तच्छांतिहि तशीच होते.

५. आपण कोण आहों हें समजलें, तर दुसरा कोण हें सहज समजतें, सबब 'तूं कोण' असा कोणास प्रश्न करूं नये.

६. मनुष्याची परीक्षा नेत्रांवरून, संभाषणावरून आणि सहवासावरून होते. ह्यांत उत्तरोत्तर कनिष्ठ परीक्षा समजावी.

७. दोषांस दोष दिसतात, म्ह० दोष स्वतः आपण अनुभविल्यावांचून ते दिसत नाहींत ; याकरितां पराचे दोष पाहण्याची संवय लावून घेऊं नये; त्या संवयीचा परिणाम गुरुदोषदर्शनापर्यंत जातो.

८. क्रिया पालटण्याचा क्रमः—प्रथम क्रिया घडल्यानंतर विवेक होतो. दुसऱ्या वेळीं क्रियेकाळींच विवेक होतो आणि पुढें क्रिया होण्यापूर्वींच विवेक होतो; अर्थात् क्रिया बंद होते.

९. कनक, कांता, पुत्र, इ० वस्तु निसर्गतःच मोहक आहेत. नेणते मोहास वश होऊन दुःख पावतात; जाणते हा वस्तुस्वभाव असें जाणून निर्मोह राहतात.

१०. प्राप्तभोगमोह, भुक्तभोगस्मरण आणि अप्राप्तभोगेच्छा. ह्या त्रयीचा त्याग केला म्हणजे सुख नको म्हटलें तरी पाठ सोडणार नाहीं.

११. स्त्रीपुत्रादि विषयांचे ठायीं जी आसक्ति त्या विषयासक्तीचा त्याग हेंच वैराग्य होय.

१२. जें जसें आहे तें तसेंच समजणें हेंच ज्ञान !

१३. मनोजयाची इच्छा टाकणें हाच मनोजय.

१४. वासनेशीं आपलें असंगत्व समजणें हाच वासनात्याग.

१५. अहंकार जगदंतःपाति अतएव मिथ्या असें समजणें हाच अहंकारत्याग.

१३. प्रतिबंध नसल्याठिकाणीं प्रतिबंध आहे असें समजणें हाच प्रतिबंध.

१७. सुखाची कबुली झाल्याशिवाय मनाची प्रवृत्तीच होत नाहीं; म्हणून जिकडे जिकडे मन जातें जिकडे तिकडे सुखच आहे.

१८. विषय सुखाचें साधन नव्हेत; तसें असतें, तर सुषुप्तींत विषयाभावीं सुख झालें नसतें.

१९. वर्तमान परिस्थितींत योगसाधन करणें म्हणजे अंगणांतील सूर्यप्रकाश पाहणें टाकून तो प्रकाश गवाक्षरंध्रांतून पाहणें होय.

१२. असो. आंबराईंतच आतां भक्तजनांनीं महाराजांकरितां मठ बांधला आहे. मठाचें आवार मोठें विस्तीर्ण आहे. २००-३०० माणसांस राहण्याची सोय होईल इतका तो मठ मोठा बांधला आहे. मठाची जागा, अंगण वगैरे इतकें कांहीं झाडूनझुडून स्वच्छ ठेवलेलें असतें कीं, ती जागा सोडून जाऊं नये असेंच प्रेक्षकास वाटतें. मठांत नित्य सायंप्रातः निरूपण चालतें. महाराज गांवांत भिक्षेस जातात अथवा परस्थळाचें कोणी येऊन त्यांनीं मठांतच पाकनिष्पत्ति केली तर तेथेंच जेवतात. मठापुढें एक तळें आहे, त्यांत बारा महिने पाणी असतें. परस्थळाचे लोकांची राहण्याची सर्व सोय मठांत आहे. मठांत शिवरात्रीनिमित्त दरवर्षी माघ महिन्यांत वद्य अष्टमी-पासून सात दिवस नामसप्ताह होत असतो. त्या वेळीं जत्रा फार मोठी जमते, रथोत्सव होतो, नामसप्त्यांत ‘ ॐ नमःशिवाय ’ ह्या-शिवाय दुसरें कांहीं म्हणत नाहींत. श्रीपुढें वेदांतश्रवण चाललेलें असतें, संध्याकाळीं हरिदासांचें कीर्तन होतें. सर्व आंबराई माणसांनीं गजबजून गेलेली असते. नैमिषारण्यांतील ब्रह्मसूत्रच आहे कीं काय असें वाटतें !

### पद

आरूढ, सत्पदारूढ, तमोमयमूढ, जगीं जन भरला। त्या मुक्त कराया सांबचि जणुं अवतरला ॥ ध्रु० ॥ जरी रोड, आकृति गोड, पाहतो कोड, पुरति नेत्रांचे। तद्भाषण वाटे सार ब्रह्मसूत्रांचें ॥ आरूढ० ॥ १ ॥

कोणी म्हणती जातीचा वाणी त्याजला। कोणी म्हणती कोष्टी-कुलवंशीं जन्मला। परी अधिक द्विजाहुनि वाटे तो मला। समदृष्टी, सदा संतुष्टी, असो तो कोष्टी विप्र कीं वाणी। तो वंद्यचि मजला, चिद्रत्नांची खाणी ॥ आरूढ० ॥ २ ॥

वहु दिवस, असा सहवास, कराया नवस चित्त करि माझें। तो योग आणला सहजचि सद्‌गुरुराजें। संगती, ज्याचि सद्‌गती, देउनी मती शुद्ध करि खाशी। तो राहुनि येथें हुबळीची करी काशी ॥ आरूढ० ॥ ३ ॥

असतील शेंकडों ज्ञानी महिवरी। मुक्तचि झाले स्वज्ञानें ते जरी। उपकारी क्वचितचि होतील ह्यापरी। शिशुपरी, खेळ कुणि करी, वदति वैखरी, पिशापरि कोणी। कोणी बसती मुक्यापरी, स्तंभुनी आपुली वाणी ॥ आरूढ० ॥ ४ ॥

ही माय दुभती गाय, वंदिता पाय, ज्ञानपय देई। गुण, अंग, जाति, काळ, वेळ, नच पाही। जन भरती, ऐकुनि कीर्ती, पहाया मूर्ती, रथावरि याची। दरवर्षीं भरे ती जत्रा कशि मौजेची ॥ आरूढ० ॥ ५ ॥

प्रार्थना जनांनो तुम्ही ऐका। हा कल्पतरू तुम्हांला लाभला फुका। ही संधि हातिची जाऊं देऊं नका। जा शरण धरा तच्चरण व्हावया तरण, भवांबुधिमांजी। ही **कृष्णसुताची** विनंति ऐकुनि घ्याजी ॥ आरूढ० ६ ॥ (बाबा गर्दे)

# ३८. दाजी महाराज टाकळीकर

१. निजामच्या राज्यांतील सुभा औरंगाबाद जिल्हा परभणी तालुका वसमतपैकीं मौजे धनगरटाकळी येथें व्यंकटेश ऊर्फ दाजी महाराज ह्या नांवानें प्रसिद्ध असलेले महान् सत्पुरुष रहात आहेत. हे वसिष्ठगोत्री ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण असून ह्यांच्या बापाचें नांव लक्ष्मणभट आणि आईचें नांव रखमाबाई असें होतें. यांच्या कुटुंबाचें नांव सौभाग्यवती पार्वतीबाई असून यांना दोन मुलगे आहेत; त्यांपैकीं वडील मुलाचें नांव राजेश्वर ऊर्फ भाऊभटजी व धाकटचाचें नांव रामभटजी. ह्यांस एक मुलगीही आहे, तिचें नांव गुजाबाई असें आहे. अशीं तीन अपत्यें आहेत. मौजे धनगरटाकळी येथें यांची जोशीपणाची वृत्ति आहे. कोणाचीही याचना न करितां वृत्तीच्या उत्पन्नावर त्यांच्या कुटुंबाची उपजीविका चालू आहे. वृत्तीसंबंधीं काम यांचे वडील बंधु अप्पाभटजी हे पाहत असतात. दाजीमहाराज यांचा जन्म इ. स. १८६६ मध्यें झाला. ह्या महापुरुषाजवळ निस्पृहता, समदृष्टि, भूतदया आणि ईशभक्ति इत्यादि गुण मूर्तिमंत वास करीत आहेत. हे वेदविद्येंत निष्णात असून त्रिकालज्ञानीही आहेत. दाजीमहाराज ह्यांच्याजवळ पूर्ण वैराग्य आणि त्रिकालज्ञता इत्यादि अनेक गुण असल्याची कीर्तीही सर्वत्र पसरली गेली आहे. त्यामुळें इहलोक आणि परलोक साधण्यास लागणारें साहित्य पाहणारी दूरदूरची भाविकमंडळी त्यांजकडे येत असतात व त्यांना त्यांचा अनुभव आल्यामुळें महाराजांचा अतिशय लौकिक वाढला आहे. भूतभविष्य विचारण्याकरितां जी मंडळी येते त्यांना

महाराजांकडून तत्काळ उत्तर मिळतें व त्याप्रमाणें भाविक लोकांना प्रचीतीही येत आहे. भवतापानें संतप्त होऊन पश्चात्ताप पावलेले आणि मोक्षाची इच्छा धारण करून शरण आलेले अशा मुमुक्षुजनांस इच्छित गति मिळण्याविषयीं सुमार्ग दाखविण्याची ह्यांची शैली फारच वर्णनीय आहे.

२. दाजी महाराज यांच्याजवळ वेदाध्ययनासाठीं शिष्यवर्ग वराच मिळत असतो व यांच्याकडून विद्यार्थ्यांना वेदाचें शिक्षणही उत्तम प्रकारें मिळत असतें; नित्य नियमानें ह्यांच्या धर्मशाळेंत ठरलेल्या वेळीं वेदघोष चालू असतो. महाराजांनीं शेंकडों लोकांच्या भूतबाधा दूर केल्या; महान् वैद्यांकडून असाध्य ठरलेले शेंकडों लोकांचे रोग दूर केले; अनेक लोकांच्या इच्छित् मनकामना पूर्ण केल्या; अशा गोष्टी हजारों लोकांच्या प्रचीतीस येऊं लागल्या आहेत. त्यांपैकीं एक दोन तरी चमत्कार येथें देणें योग्य वाटल्यावरून त्यांचें येथें कांहीं थोडें दिग्दर्शन करितों.

३. मुक्काम उंबरखेड इलाखा इंग्रजी येथें वेदशास्त्रसंपन्न गोविंदबुवा अयाचित अग्निहोत्री यांचे येथें शके १८२६ या वर्षीं वैशाख वद्यांत संहितास्वाहाकार झाला. त्या वेळीं दाजी महाराज यांनाही पाचारण असल्यामुळें यांची स्वारी तेथें गेली होती. त्या वेळीं उंबरखेड येथें श्रीआईनाथ महाराज ह्यांच्या समाधीजवळ भूतबाधा असणारी मंडळी अनुष्ठानास बसली होती. त्यांत खामगांवकर नानासाहेब कारकून यांचें कुटुंबही अनुष्ठानास बसलें असतां समाधीकडून त्या बाईस असा दृष्टान्त झाला कीं, तूं टाकळीकर दाजीमहाराज यांचेकडे जावें, म्हणजे तुझ्या अंगभूत असलेली बाधा दूर होईल. त्याप्रमाणें त्या बाईनें शरण येऊन भक्तिपुरःसर सेवा केली. त्यावरून महाराजांनीं कृपाळू होऊन त्या बाईची बाधा दूर केली.

४. तसेंच हैद्राबाद गोदावरी रेल्वेपैकीं स्टेशन बासर येथून सुमारें एक मैलावर श्रीसरस्वतीचें अप्रतिम जागृत ठिकाण आहे. तेथें एक ब्राह्मण ज्याचें वय साठ पासष्ट वर्षांचें आणि त्याची पत्नी जिचें वय सुमारें पन्नास वर्षांचें–हें दंपत्य विवाह झाल्यापासून संतानहीन असल्यामुळें अतिशय दु:खी होऊन मुलगा व्हावा या इच्छेनें अनुष्ठानास बसलें होतें. खरोखर निपुत्रिक दु:खी असण्याचें आश्चर्य तें कोणतें, कारण 'अपुत्रस्य गतिर्नास्ति' असें वचन आहे. वरील दम्पत्य अनुष्ठानास बसलें असतां मातोश्रीनें असा दृष्टान्त दिला कीं, तुम्ही उभयतां टाकळीस दाजीमहाराज यांचेकडे जाऊन त्यांची सेवा करावी, म्हणजे तुमची इच्छित कामना पूर्ण होईल. त्याप्रमाणें तें उभयतां टाकळीस येऊन श्रीसरस्वतीचे आज्ञेप्रमाणें त्यांनीं कांहीं दिवस राहून सेवा केली. त्यायोगानें महाराजांकडून त्यांना प्रसाद मिळून पुत्ररत्न प्राप्त झालें. असे अनेक चमत्कार या महापुरुषाकडून घडलेले आहेत.

५. मिति माघ शुद्ध ४ रोज गुरुवार शके १८२८ या दिवशीं आलिजनाथ श्रीमहाराज किशनप्रसाद बहादूर दिवाणसाहेब दक्षिण हैद्राबाद–हे औरंगाबादेहून रेल मार्गानें येत असतां त्यांनीं दाजी महाराज यांची अगणित वाढलेली सुकीर्ति ऐकिल्यावरून पूर्णा स्टेशनावर उतरून दिवसाच्या दोन वाजण्याच्या सुमारास मुक्काम धनगरटाकळी येथें त्यांची स्वारी दाखल झाली. तेथें धर्मशाळेंत महाराजांचें दर्शन घेऊन कांहीं नजराणा ठेवण्यास आणि येथील भिक्षुक मंडळींना धर्म करण्यास आज्ञा व्हावी असा हेतु दर्शविला. तेव्हां महाराजांनीं याचें उत्तर असें दिलें कीं "मला कोणत्याही प्रकारची इच्छा नसून मुख्य आज आपलें दर्शन झालें हेंच मोठें सुदैव समजलें पाहिजे. आपल्या इच्छेस वाटल्यास धर्म करावा." हें

ऐकून दिवाणसाहेब यांस यांचे निस्पृहतेबद्दल आश्चर्य वाटून एक थैली रुपयांची, आणि कांहीं अक्रोड, पिस्ते, बदाम, खारीक, केळी इत्यादि फळफळावळ दाजीमहाराज यांच्या पुढें ठेविली. तेव्हां हे निस्पृह संत म्हणाले, ' हें पुढें ठेविलेलें घेऊन आपणच धर्म करावा. '

# २९. श्रीपरमहंस तैलंगस्वामी

संत आनंदाचें स्थल ! संत सुखचि केवळ ।
नाना संतोषाचें मूळ । ते हे संत ॥ —श्रीसमर्थ

१. रत्नगर्भा भारतभूमीचे पोटीं आध्यात्मिक उन्नति करणारी जी सन्तमालिका झाली, त्यांत परमहंस तैलंगस्वामी यांचें नांव बरेंच प्रमुखत्वानें येईल. मद्रास इलाख्यांत **होलिया** नामक एक गांव आहे. तेथें एका ब्राह्मणकुलांत यांचा जन्म झाला. नृसिंहदेव यांना फार दिवस अपत्यसुख प्राप्त झालें नाहीं म्हणून त्यांनीं द्वितीय विवाह केला. परंतु ही गोष्ट त्यांच्या प्रथम पत्नीला लागून ती पुत्रप्राप्ती-करितां व्रतें–अनुष्ठानें करूं लागली. ईश्वरकृपेनें तिला दिवस राहिले आणि एक पुत्र झाला. त्याचें नांव **शिवराम** ठेविलें. हेच आमचे चरित्रनायक परमहंस तैलंगस्वामी होत. शिवरामाची आई बुद्धिमान्, धार्मिक आणि सद्गुणी होती. तेच गुण शिवरामांतही उतरले. बालपणापासून खोटें बोलणें अथवा कुत्सित व्यवहाराचें वारेंही याला नव्हतें. वयाच्या पांचव्या वर्षींच शिवरामाला पितृ-वियोग झाला. पित्याचें आधारछत्र नष्ट झाल्यावर शिवरामाच्या मातेनें त्याला शाळेंत घातलें. बुद्धीचे तीक्ष्ण असल्यानें शिवरामानें आपला अभ्यास फारच लौकर संपविला.

२. मातेच्या आग्रहानें शिवरामानें विवाह केला आणि ते संसार-शकट चालवूं लागले. परंतु कांहीं दिवसांतच त्यांची माता वारली. मातेची अंतिमक्रिया करीत असतांना शिवरामाच्या मनांत इतकें वैराग्य उत्पन्न झालें कीं मग ते घरीं परतलेच नाहींत ! त्यांच्या

सावत्र भावानें आणि इतर मंडळींनीं त्यांची बहुत समजूत घातली. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. पैसाअडका सावत्रभावाच्या स्वाधीन करून शिवराम त्याला म्हणाले, "भाऊ ! मी आतां ह्या पापी संसारांत राहूं इच्छीत नाहीं. आतांपर्यंत मात्राज्ञा मिळाली नव्हती म्हणून पिंजऱ्यांतील पक्ष्याप्रमाणें मी संसारांत बद्ध होतों, पण आतां मला आईची अनुमती मिळाली आहे, तेव्हां माझ्या इच्छेविरुद्ध मला संसारांत राहतां येत नाहीं."

३. शिवराम आपल्या प्रतिज्ञेपासून हालणारही नाहीं अशी बंधूची समजूत झाल्यावर त्यानें एक लहानशी कुटी बांधून त्यांत शिवरामाची व्यवस्था करून दिली. सांसारिक तापापासून मक्त झालेले शिवराम आतां आनंदानें योगाभ्यास करूं लागले. कांहीं वर्षें याप्रमाणें लोटल्यावर शिवराम तीर्थयात्रेला निघाले. वाटेंत त्यांची एका महात्म्याशीं गांठ पडली. योगशास्त्रांत संतमहाराजांचें नैपुण्य पाहून शिवरामानें त्यांचें शिष्यत्व पत्करलें. अनायासें गुरु-पदप्राप्ति झाली म्हणून शिवरामाला फार आनंद झाला. शिव-रामावर गुरुमहाराजांचा अनुग्रहही झाला. शिवरामाने तेव्हांपासून "तैलंगस्वामी" हें नांव धारण केलें. याच नांवानें ते पुढें प्रसिद्ध होते.

४. गुरुमहाराज समाधिस्थ झाल्यावर तैलंगस्वामी सेतुबंध रामे-श्वराला गेले. त्यांचे तेथें अनेक शिष्य झाले. आपलें जीवन तेथेंच घालवावें अशी स्वामींची फार इच्छा होती; पण ती फलद्रूप झाली नाहीं; कारण स्वामींनीं दाखविलेले यौगिक चमत्कार लोकांना पटूं लागल्यानें स्वामींच्या बिऱ्हाडीं नित्य भक्तमंडळ जमूं लागलें; पण त्या कारणानें स्वामींच्या योगाभ्यासांत व्यत्यय येऊं लागला. तेव्हां ते नेपाळांत गेले ! भक्तमंडळानें त्यांना तेथेंही सोडलें नाहीं ! शेवटीं त्रासून ते तेथून तिबेटांत गेले; आणि मानस

सरोवरावर जाऊन तेथें आनंदानें योगाभ्यास करूं लागले. कांहीं दिवस याप्रमाणें योगाभ्यास करून सिद्धि मिळविल्यावर ते काशी-क्षेत्रीं आले.

५. हुगळी जिल्ह्यांत श्रीरामपूर नांवाचें एक गांव आहे. जय-गोपाळ नामक तेथें एक लोहार रहात असे. मनांत वैराग्याचा उदय होऊन त्यानें संसारभार आपल्या ज्येष्ठ पुत्रावर सोंपवून काशीक्षेत्रीं प्रयाण केलें. तेथें आल्यावर त्यानें स्वामींचें नांव ऐकलें आणि तो नित्य स्वामींचे दर्शनास येऊं लागला. बरेच दिवसांनंतर जयगोपाळाकडे स्वामींची दृष्टि वळली. स्वामींचा अनुग्रह प्राप्त करून जयगोपाळ आपल्याला धन्य समजूं लागला. एक दिवस जय-गोपाळ स्वामींजवळ येऊन म्हणाला, "गुरुमहाराज ! आज माझ्या हृदयांत धडपड होत आहे. काय असेल कोणास ठाऊक ! कांहीं तरी अमंगल झालें असावें असा माझा तर्क वाहतो." याप्रमाणें जयगोपाळ चिंतेनें व्याकुळ झालेला पाहून स्वामी म्हणाले, 'जरा थांब, आतांच तुझ्या घरची बातमी तुला आणून देतों. तूं फराळ करून सायंकाळीं ये.' जयगोपाळ आपल्या बिऱ्हाडीं गेल्यावर स्वामींनीं समाधि लाविली. सायंकाळीं जयगोपाळ आल्यावर स्वामी त्याला म्हणाले, "आज सकाळीं सहा वाजतां तुझ्या पुत्राला विषू-चिकारोगानें देवाज्ञा झाली; आणि आज रात्रीं तुला तो स्वप्नांत दिसेल !" स्वामींच्या तोंडचे हे शब्द ऐकून जयगोपाळाचे छातींत एक-दम धस्स झालें आणि तो लहान पोरासारखा रडूं लागला. परंतु स्वामींनीं त्याला समाधानाचे दोन शब्द सांगून त्याचें सांत्वन केलें. त्या रात्रीं जयगोपाळाला त्याचा मृतपुत्र स्वप्नांत दिसला. दुसऱ्या दिवशीं त्यानें आपल्या घरीं तार केली आणि स्वामींनीं सांगितल्या-प्रमाणेंच उत्तर आलें.

६. ऐन शरदृतूंत स्वामी रात्रीच्या रात्री गंगेंत उभे असत, आणि भर दोन प्रहरीं ग्रीष्मऋतूंत ते उन्हांत तप्त शिलेवर निद्रा करीत ! काशींत आल्यापासून ते आपल्या निवडक शिष्यांखेरीज कोणाशींच बोलत नसत, आणि भक्त लोक जें त्यांच्या मुखांत घालीत तेंच ते खात असत. कांहीं कुटाळ लोकांनीं ह्यांची परीक्षा पाहावी म्हणून शेरभर अफु दुधांत घोळून स्वामींना पियावयास दिली; स्वामींनी हें कपट ओळखून घेतलें परंतु मोठ्या आनंदानें तें विषारी दूध ते प्याले ! हा चमत्कार पाहून कुटाळ लोक घाबरले आणि स्वामींचे पाय धरून ते त्यांची क्षमा मागूं लागले. थोड्या काळांतच स्वामींनीं तें विष लघुशंका करून काढून टाकलें !

७, स्वामी सदां नग्न असत. एकदां त्यांना एका पोलीस शिपायानें धरून चावडीवर नेलें. दुसरे दिवशीं त्यांना मॅजिस्ट्रेटपुढें उभें करण्यांत आलें. ही वार्ता स्वामींच्या शिष्यांना कळतांच त्यांनीं ताबडतोब एक दोन वकिलांची व्यवस्था केली. वकिलांनीं मॅजिस्ट्रेटला स्वामी निर्विकार परमहंस आहेत हें समजावून सांगितलें, परंतु मॅजिस्ट्रेटचें समाधान होईना. इतक्यांत स्वामींनीं आपल्या हातावरच शौच करून ते आम्लवदन न करितां सर्वांसमक्ष भक्षण केलें हें पाहून मॅजिस्ट्रेटनीं त्यांना सोडून दिलें.

८. संवत् १८०५ त स्वामींनीं एका शिवलिंगाची आपल्या आश्रमांत स्थापना केली. हा आश्रम पंचगंगा घाटावर असून त्यांतील शिवलिंग सरासरी दोन पुरुष उंच आणि वीस फूट चौरस आहे. या आश्रमांतच स्वामींच्या शिष्यांनीं यांच्या पाषाणमूर्तीची स्थापना केली आहे. पौष शुक्ल एकादशी संवत् १८०७ ला स्वामींनीं समाधि घेतली. ह्यांनीं केलेला "**महावाक्यरत्नावली**" नांवाचा एक संस्कृत ग्रंथही प्रसिद्ध आहे.

# ३०. रामसनेही ( स्नेही ) रामचरन

१. राजपुतान्यांत रामसनेही (रामस्नेही) नांवाचा एक वैष्णव पंथ प्रचलित आहे त्या पंथाचे मुख्य मठ तीन आहेत :–

(१) मारवाडांत केडापा येथें रामदासजींचा.

(२) माळव्यांत उज्जयनी येथें दर्याविजींचा.

(३) मेवाडांत सायपुरा येथें रामचरणजी यांचा.

या तिन्ही पंथांतील साधूंचीं मुख्य मतें एक असून राहणींत थोडा फार फरक झालेला आहे. तिन्ही मठांत थोडेंबहुत मालिन्य आलें आहे, तथापि रामचरणजी महाराज यांचे पंथांत अद्यापि बरेच तेजस्वी पुरुष आढळतात. इंदूर येथें तिन्ही शाखींचे मठ विद्यमान आहेत.

२. रामचरणजी महाराज यांचे अनुयायी मोठे त्यागी असतात. ते सिद्धान्नाची भिक्षा करितात. भिक्षेसमयीं रस्त्यांतून जातांना रामनामाचा उच्चार करून गृहस्थाचे दारापुढें क्षणैक उभे राहतात. कोणीं भिक्षा दिल्यास ती घेऊन पुढें जातात, व न दिल्यास तसेच पुढें चालते होतात व ते कांहीं नियमित घरची मात्र भिक्षा घेतात. निरंतर रामभजन करणें हें त्यांचें व्रत असतें. पैसा टक्का घेतांनाही लंगोटी, पाणी गाळण्याचें वस्त्र, दोनतीन छाटया, एक कांबळा आंथरण्याकरितां, व एक धाबळी पांघरण्याकरितां व पाण्याकरितां एखादा लांकडी कमंडलू वाडगा यापेक्षां फारसा अधिक परिग्रह ते कधीं बाळगीत नाहींत. अनवाणी चालतात यामुळें जोडयाची त्यांस गरज लागत नाहीं. जवळ एक लांकडी मण्याची माळ आणि

रामचरणजी महाराज यांच्या वचनांचा गुटका हीं दोन साधनें ते नेहमीं जवळ बाळगितात.

३. रामचरणजी यांचें मुख्य स्थान मेवाडांत सायपुरा हें आहे. तेथें त्यांच्या भक्तांनीं लक्षावधि रुपये खर्च करून मोठी संगमरवरी दगडाचे कामाची छत्री बांधिली आहे. तीस १०१ स्तंभ असून समाधीवर टोलेजंग शिखर बांधिलें आहे. समाधीचे आसपास दुसऱ्या जागा बांधिल्या आहेत त्यांत साधु राहतात. तेथें हमेशा चारपांचशें साधु असतात. चातुर्मास्यांत मात्र ते आपापल्या ठिकाणीं जातात. त्यावेळीं या मठांत ३०-४० पेक्षां अधिक मूर्ति आढळत नाहींत. फाल्गुनांत मोठा मेळा होतो. तेव्हां मोठा साधुसंग जमा होऊन दरबारी गृहस्थही पुष्कळ जमतात. रंगपंचमीपावेतों समाधीचा उत्साह, पूजाअर्चा होते. त्यावेळीं छत्रीवर कपडा, बतासे, मिठाई, सफेत मारवाडी कांबळे भक्तलोक चढवितात. देशोदेशच्या हुंड्या एका सावकाराकडे येतात. त्याची वर्दी गादीवरील मुख्य महाराजांस दिली जाते. त्यांजकडून आज्ञा होते कीं, 'ठीक आहे. उद्यां भंडारा करा.' तेव्हां रसोई होऊन प्रसाद वांटला जातो. उत्सवाचे दिवस सावकारांनीं वाटून घेतले आहेत. रामनवमीपावेतों मुक्काम करून नंतर साधुलोक आपापले ठिकाणीं जातात. जातांना प्रत्येक साधूस पांघरण्याकरितां पंधरा हात लांबीची चादर, पाणी गाळण्याकरितां एक एक गळणा ( रुमाल ) आणि नेसण्याकरितां पांच हाताचा लंगोट याप्रमाणें बिदागी मिळते; कांहीं मोठ्या साधूंस कांबळाही मिळतो.

४. या पंथाचे लोक मारवाड, दिल्ली, आग्रा, गुजराथ, माळवा, धुंडाड ( जयपूर ) इत्यादि सर्व ठिकाणीं आढळतात. त्यांचे भजनाचे जागेस शमद्वारा म्हणतात. ते राजपुतान्यांत गांवोगांवींच बांधिलेले

असतात. त्यांत मोठाल्या माळा असतात. कधीं कधीं माळेचे मणके नारळापेक्षांही मोठे असून माळेंत हजारों मणि असतात. ह्या माळा पवित्र ठिकाणीं ठेवलेल्या किंवा टांगलेल्या असतात. जो रामद्वारांत येईल त्यानें भजन करावें व रामनाम स्मरून माळेचे मणके ओढावे. कधीं कधीं मठांत श्रवणही चालतें.

५. या साम्प्रदायांत चेले दोन प्रकारचे असतात. एक खुषीनें दीक्षा घेतात ते आणि दुसरे आईबापांनीं खुषीनें महंतास वाहिलेले असतात. ते महंत जहागीर वगैरे देणगी घेत नाहींत. " रामनाम यहही हमारी जहागीर, परमहंसदीक्षा यह हमारा व्रत, इसवास्ते एकादशी व्रत और सेवापूजा इत्यादि हम कुछ नहीं करते. एक रामनामका ध्यान करना, पुस्तक पढना, कथावार्ता करना, नही तो नामस्मरण करना, यही हमारा नित्य नेम है. " असें ते म्हणतात. या मताचे साधु हल्लीं सुमारें एक हजारांवर असतील. त्यांपैकीं फाल्गुनांत उत्सवसमयीं सहाशें—सातशें साधु साहेबपुरा येथें एकत्र होतात. ते भिक्षेला रामरोटी म्हणतात. भांगभुरका, तंबाकू, तपकीर वगैरे कोणतेंही व्यसन बहुधा त्यांत आढळावयाचें नाहीं. साधु हातांनीं स्वयंपाक करीत नाहींत. या साधूंचा वेष कांहीं अंशीं संन्याशासारखा असतो. यांचे अनुयायी बहुतकरून बनिये महाजन असतात.

६. राजपुतान्याशिवाय इतरत्र व विशेषतः महाराष्ट्रांत या सांप्रदायाची माहिती विशेष नाहीं म्हणून पाल्हाळ करण्यांत आला; त्यावरून त्यांचें स्वरूप लक्षांत येईल. आतां रामचरणजी महाराज यांचें संक्षिप्त चरित्र व त्यांचे उपदेशाचा थोडा मासला वाचकांपुढें मांडितों. आपले देशांत श्रीज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास व तुकाराम या विभूतींनीं जें काम केलें, तेंच काम राजपुतान्यांत रामचरणजी-

महाराज यांनीं केलें. इतकें सांगितल्यावर त्यांचे कामगिरीचा अधिक विस्तार करण्याची गरज नाहीं.

७. रामचरण यांनीं बिजावत म्हणजे बिजावर्गी जातींच्या एका गरीबशा वैश्यकुलांत संवत् १७७६ सालीं मार्गशीर्ष शुद्ध १४ शनिवार या शुभ दिवशीं जन्म घेतला. योगभ्रष्ट असल्यामुळें बालपणापासूनच भगवद्‌भजनाकडे त्यांचे मनाचा कल होता. दिवसानुदिवस प्रपंचाविषयीची विरक्ति अधिक अधिक वाटूं लागली. प्रपंचांतील व्यापारउदीम करण्याविषयींचा आईबापांचा निर्बंध एकीकडे आणि भगवद्‌भक्तीकडील स्वाभाविक मनाची ओढ दुसरीकडे अशी ओढाताण कांहीं दिवस त्यांचे अंतःकरणांत होती. आपण काय करावें ह्याचा निश्चय होईना. परंतु दैववशात् त्यांस एक सुंदर स्वप्न पडलें, त्यामुळें कोडें सुटून निकाल झाला. ती मनोहर कथा अशी :—

८. "एके दिवशीं गांवचे हाटांत मी आपले दुकानावर बसलों असतां भर दोनप्रहरीं मला झोंप येऊन एक स्वप्न पडलें. मी एका महानदींत स्नान करीत असतां प्रवाहांत सांपडून वेगानें वाहत चाललों आहें. तेव्हां कोणी मला वांचवा म्हणून मोठमोठ्यानें मी ओरडूं लागलों. शेवटीं अगदीं बुडण्याचा प्रसंग आला तेव्हां माझी केविलवाणी हांक किनाऱ्यावरील एका साधूनें ऐकून ताडकन् उडी टाकून मला वांचवून कांठावर आणिलें. इतक्यांत माझी झोंप उघडून पाहतों तों नदी नाहीं आणि साधुही नाहीं. तेव्हां मला कळलें कीं तें सारे स्वप्न होतें. पण त्या स्वप्नानें माझे अंतःकरणांत विशेष प्रकाश पडला. संसार ही महाप्रचंड नदी असून त्यांत आपण गटांगळ्या खात वाहत जात आहों, त्यांतून आपणांस साधुसंतांशिवाय कोण सोडविण्यास समर्थ आहे ? हें माझे लक्षांत आलें." हें स्वप्न पुढें ते आपल्या शिष्यांपाशीं सांगत.

**तात्पर्य :** " उलट उलट माघारा प्राण्या फिर गोते खाशी ॥ भरला पूर मायेचा लोंढा वाहुनियां जाशी ॥ " या मुक्ताबाईच्या उपदेशाचें तत्त्व त्यांचें मनांत ठसलें व पुढील इतिकर्तव्यतेविषयीं संशय उरला नाहीं. त्यांनीं दुकानास रामराम ठोकून वनाची वाट धरली, आणि ज्या साधूनें आपला जीव वांचविला होता त्याचा शोध आरंभिला. क्षेत्रोक्षेत्रीं व मठोमठीं ते भटकले. स्वप्नांत भेट-लेली मूर्ति त्यांस कोठें आढळली नाहीं. शेवटीं ते हाडोती प्रांतांतील दांत्रा या गांवीं आले. तेथें कृपाराम या नांवाचे महान् सत्पुरुष आपल्या शिष्यांसहवर्तमान राहत असत. त्यांस शरण जाऊन विनंति केली कीं, " महाराज ! मला संसारतापापासून मुक्त करावें. " त्यांच्या वयाकडे पाहून कृपाराम महाराजांनीं प्रथम त्यास परत घरीं जाण्याविषयीं पुष्कळ उपदेश केला. हा मुलगा रुसून किंवा घरच्या तापामुळें वैतागून आला आहे, हें क्षणिक वैराग्य ओसरून गेल्यावर " घरका न घाटका " अशी त्याची दुर्धर स्थिति होऊन त्याची विटंबना आणि पंथाचा उपहास होईल या भीतीनें त्यांनीं पुष्कळ आढेवेढे घेऊन त्यांची परीक्षा पाहिली. शेवटीं त्यांचा दृढ-निश्चय पाहून त्यांस वैराग्यदीक्षा दिली. ते आपल्या तत्पर व भक्तियुक्त सेवेनें गुरूचे लाडके शिष्य बनले. गुरूची रसोई (स्वयं-पाक) बनविण्याचें काम त्यांजकडे आलें. एके दिवशीं सर्पणांत एक लांकूड चुलींत घातलें होतें त्यांतून लक्षावधि मुंग्या जीव वांच-विण्याकरितां आपलें घर सोडून सैरावैरा धांवत होत्या ! त्यांस पाहून त्यांचे चित्तांत दयेचा उमाळा आला आणि ते आपल्याशीं म्हणूं लागले कीं, घर सोडून येथें मठांत येऊन राहिलों तरी पाप-रूप संसार मला सोडीत नाहीं. हजारों जीवांची हत्या करून माझें कल्याण कसें होईल ? असें म्हणून स्वयंपाकाचें काम बंद ठेवून ते

गुरूपाशीं गेले आणि प्रश्न करूं लागले कीं, "हाच मोक्षाचा मार्ग आहे कीं अन्य कोणचा आहे हें कृपा करून कळवावें!" त्याची उत्कट आणि तीव्र भूतदया पाहून कृपारामजींनीं त्यास राममंत्रोपदेश देऊन उपाधिरहित होण्याकरितां एकांतांत जाऊन अभ्यास करण्यास सांगितलें. गुर्वाज्ञेप्रमाणें योगाभ्यास करून शेवटीं ते भिलवडी येथें येऊन राहिले. तेव्हां त्यांचें वैराग्य आणि समाधिस्थिति यांचा लौकिक पसरूं लागला. जवळच साहेपुरा किंवा सायपुरा नांवाचें लहानसें रजपूत संस्थान आहे. तेथील अधिपति यांची रामचरणावर भक्ति जडली. त्यानें साहेपुऱ्यास चलण्याबद्दल त्यांस पुष्कळ आग्रह केला, पण उपाधीचा कंटाळा असल्यामुळें पुष्कळ दिवस रामचरणानें त्यांचे विनंतीकडे लक्ष दिलें नाहीं. शेवटीं त्याची भक्ति आणि निर्बंध पाहून कबूल केलें की सायपुऱ्यास चलूं परंतु आमचा वास तेथें स्मशानांत राहील. राजानें ही होष्ट मान्य केल्यावरून रामचरण सायपुरा येथें नदीचे कांठीं जाऊन राहिले. तेथें एक अत्यंत जरठ व शरीरानें जर्जर झालेला साधु राहत होता त्याची सेवा रामचरणानें आरंभिली. त्या साधूनें संतुष्ट होऊन मरणसमयीं रामचरणांस आशीर्वाद दिला कीं 'तुझे हातून जगदुद्धार होईल. आणि तुझा पंथ शंभर वर्षांवर उज्ज्वल राहील.' हें भाकीत खरें झालें. कारण शंभर वर्षांनंतर या पंथास ग्लानि येऊं लागली आणि त्यांतील पहिली तेजस्विता राहिली नाहीं.

९. या वृद्ध साधूच्या मरणानंतर रामचरण यांचा अभ्यास व ख्याति वाढूं लागली. तीन तीन दिवस तो एकसारखा समाधींत राही, त्याच्याजवळ शिष्यही बरेच जमले. त्यांत रामजन नांवाचा शिष्य होता. तोच रामचरणाचे मागून स्वामी रामजन नांवानें प्रसिद्ध होऊन मठाधिपति झाला. समाधींत असतां रामचरणाचे

मुखांतून स्फूर्तियुक्त भजनवाणी निघे, ती त्याचे शिष्य कागद, भिंत, कपडा इत्यादि जें साधन मिळेल त्यावर लिहून ठेवीत. असें करून त्यांनीं बराच संग्रह केला होता. एके दिवशीं व्युत्थानकालीं त्यानें आपल्या शिष्यांस कांहीं लिहितांना व परस्परांचे लेख काढून पाहतांना पाहिलें, आणि हें काय करितां म्हणून विचारतां शिष्यांनीं खरी हकीकत कळविली. तेव्हां स्वामींनीं रागावून सर्व संग्रह नदींत सोडून देण्यास सांगितलें आणि नकळत कवित्वाचा फुंज उत्पन्न झाला त्याची क्षमा होण्याकरितां देवापाशीं विनवणी केली. तेव्हां तो म्हणाला :-" जो कुछ करता रामजी मैं तो करता नही। रामचरन यदि मैं करू तो बडी चूक मुझमाही " असें झालें तेव्हां-पासून शिष्यांनीं त्यांची स्फूर्तीची वाणी उतरून घेऊन गुप्त ठेवण्याचा परिपाठ चालविला. यामुळें गुरूंच्या दिव्य ज्ञानाचा व दिव्य उद्-गारांचा सांठा जगाचे कल्याणाकरितां कांहीं उरला आहे. तो त्यांच्या अनुयायांनीं संभाळून ठेविला असून त्याचे पठणपाठण आणि चिंतनानुचिंतन या पंथांत आजपर्यंत चाललें आहे. या ग्रंथास 'वाणी' अशी संज्ञा असून तो वेदतुल्य मानला जातो. त्यांतील पद्येंच काय, पण अक्षरें देखील त्यांनीं मोजून ठेविलीं आहेत.

१०. स्वामी रामचरणजी महाराज हे आपल्या वयाच्या ७९ या वर्षीं संवत् १८५५ त वैशाख वद्य ५ गुरुवारीं समाधिस्थ झाले. त्या वेळीं पुष्कळ चमत्कार घडले ते त्यांचे चरित्रांत लिहून ठेविले आहेत. दहनाकरितां त्यांचा देह उचलला तेव्हां रामनामाचा मोठा प्रचंड ध्वनि उत्पन्न होऊन त्यानें सर्व आकाश दणाणून गेलें, आणि चितेच्या भस्मांतून त्यांचे कौपीन आणि माला न दग्ध होतां जशाच्या तशाच सांपडल्या. त्यांची रक्षा बनासनदींत विसर्जन करण्याकरितां नेली तेव्हांही तसाच रामानामाचा गजर झाला. ज्या ठिकाणीं

त्यांच्या देहाचें दहन झालें त्या ठिकाणीं सायपुऱ्याचे राजानें त्यांची टोलेजंग समाधि बांधिली आहे. तिला ' रामनिवास ' ही संज्ञा असून तिचे सभोंवार शिष्यांचे निवासाकरितां अनेक मठ बांधिलेले आहेत. हें रमणीय स्थान या पंथांतील साधु आणि गृहस्थाश्रमी यांचें यात्रेचें मुख्य स्थान झालें आहे. चैत्रांत येथें मोठा मेळा भरतो, त्याचें वर्णन वर आलेंच आहे. या स्थानाचें दर्शन तीन वर्षांत निदान एकदां तरी प्रत्येक साधूनें घेतलेंच पाहिजे असा निर्बंध आहे. रामचरण यांचे शिष्यांत रामजन नांवाचे महायोगी होते. तेच त्यांचे पीठावर त्यांचे मागून अधिरूढ झाले, व त्यांसही रामचरणजी महाराजांप्रमाणेंच पूज्य मानितात.

११. याप्रमाणें या साधूचें संक्षिप्त चरित्र सांगण्यांत आलें आहे. आपले मागून आपली गादी व महंतपरंपरा चालावी अशी रामचरणजी महाराज यांची इच्छा नव्हती. ते आपणांस यःकश्चित् क्षुद्र रामभक्त मानीत असत, व म्हणूनच त्यांनी आपले कवित्वास एके वेळीं जलसमाधि दिली; परंतु अशा कामांत मागील शिष्य प्रेमातिशयानें गुरूच्या आज्ञेचा भंग करीत असतात. शिवदिननाथ केसरी हेही आपल्या कवितेस याचप्रमाणें श्रीगोदेस अर्पण करीत असत, तथापि त्यांच्या तत्पर आणि भक्तिमान् शिष्यांनीं त्यांचें बरेंच काव्य संभाळून ठेविलें आहे, तें त्यांचे संप्रदायांत आज उपलब्ध आहे. श्रीरामचरणजी महाराज यांचे मागून १ रामजनजी, २ दुलेरामजी, ३ पतरदासजी, ४ नारायणदासजी, ५ हरिदासजी, ६ हिमतरायजी, ७ दिलसुखरामजी, ८ धरमदासजी, ९ दयारामजी, व १० जगरामदासजी असे दहा महंत झाले. हल्लीं अकरावे महंत निर्भेरामजी त्यांचे गादीवर विद्यमान आहेत. यांपैकीं बहुतेक महंत मोठ्या योग्यतेचे पुरुष होऊन गेले.

१२. या पंथास रामसनेही हें नांव आहे. या पंथांत निर्गुणोपासना चालत असून मूर्तिपूजा, आर्तीधूपार्ती इत्यादि उपासनेचीं बहिरंगें मुळींच चालत नाहींत. निर्गुण ॐकारात्मक रामाचें स्वरूप, ज्ञान व ध्यान हेंच त्यांचें मुख्य तत्त्व असून आचारांत अहिंसा आणि कडक यतिधर्म ते पाळितात. या पंथांत गुरूचें माहात्म्य फार मानिलें जातें आणि गुरु हाच मुक्तीचें मुख्य साधन आहे असा त्यांचा पूर्ण विश्वास असतो. सद्गुरुमाहात्म्य खुद्द स्वामी रामचरण यांनीं येणेंप्रमाणें वर्णिलें आहे.

प्रथम कीजे गुरुकी सेवा ता संग लहे निरंजन देवा ।
गुरुबिन ज्ञान कहो किन पाया बनेसेनकर गुरु समझाया ॥

ते सद्गुरूस देवापेक्षांही अधिक मानतात :–

" गुरु गोविंदसुं अधिकाहि होई । या सुनी रीस करो मति कोई ।
प्रथम गुरूसुं भाव बढावे । गुरु मिलिया गोविन्दकु पावे ॥ १ ॥

या अर्थाची दुसरीही साधूक्ति आहे ती अशी :–

गुरु गोविन्द दोनो खडे । किसके लागूं पाथ ॥
बलिहारि दे गुरु देरकी । गोविन्द दियो बताय ॥ २ ॥

मोक्षाकरितां गुरुनिष्ठा हें पहिलें साधन सांगून एकाग्र चित्त करून निर्गुण रामस्वरूपाचें भजन करावें हें दुसरें साधन त्यांनीं प्रतिष्ठिलें आहे. त्यांनीं आपले 'नामप्रताप' आणि 'शब्दप्रकाश' या ग्रंथांत भजनसमाधिस्थितीच्या निरनिराळ्या पायऱ्या वर्णिल्या आहेत, आणि मनखण्डन नांवाचे प्रकरणांत मनोजय कसा करावा हें दाखविलें आहे. या प्रकरणाचे शेवटीं ते म्हणतात :–

**दोहा**

मन खण्डे रामहि भजे तजे जगत गृहकूप ।
रामचरन तब परसिये आतम शुद्ध स्वरूप ॥

# ३१. बलभीमबोवा साडेकर

१. हल्लींचे कांहीं लोकांची समजूत अशी आहे कीं जगांत साधुसंत नाहींतच; व जर कदाचित् असले तर ते गिरिगव्हरांत असतील व अशा पुरुषांची व आपली गांठ कोठची होणार? साधु म्हणविणारे बहुतेक लोक भोंदू व कार्यसाधू असतात, परंतु श्रीतुकाराम-रामदासांसारखे लोकांत राहून लोकांचें कल्याण करणारे साधु शोधूं गेलें असतां तुरळक तुरळक सांपडतात. अशा बिरळ संतांपैकींच '**बलभीमबोवा साडेकर**' हे होत.

२. आपले धर्मांत कर्म, उपासना व ज्ञान असा अधिकारपरत्वें तीन पायऱ्यांचा मुक्तिसोपान रचून ठेविला आहे, यासच कधीं कधीं तीन योग असेंही म्हणतात. या तिन्ही साधनांचा भक्ति हा जीव आहे. ती असेल तरच हीं तिन्ही साधनें सफल होतात, नाहींतर व्यर्थ जातात. भक्ति व ज्ञान दोन्ही एकच म्हटलें असतां चालेल. यास्तव भक्तियुक्त ज्ञानमार्ग हा सर्वांत श्रेष्ठ आहे. सर्व साधुसंतांचे ग्रंथांत त्याचीच प्रतिष्ठा आढळते. शिष्यपरंपरा अज्ञानी झाली म्हणजे साधूंनीं स्थापलेल्या बोधसांप्रदायांतील कर्म व उपासना हीं बाह्य अंगें मात्र राहतात व भक्तिज्ञानाचा लोप होतो. अविवेक माजला कीं, सर्व अनर्थपरंपरा आंत शिरतात, तथापि बोधसांप्रदाय अगदींच लुप्त होत नाहीं. बलभीमबोवांजवळ जसें विमलज्ञान, भक्ति व वैराग्य होतें तसें फार थोड्यांजवळ असेल.

३. श्री. बाजीराव बळवंतराव देशमुख हे ता० करमाळे पैकीं मौजे साडे येथील देशमुख होते. त्यांचें लग्न भुईंजपिंपरी येथील

रा० बाबाजीराव कुळकर्णी यांचे कन्येबरोबर झालें. बाजीराव व त्यांची पत्नी सखुबाई हीं उभयतां श्रीमारुतीरायाचे पूर्ण उपासक होते व सदैव भजनपूजनांत निमग्न असत. यांस एकंदर बारा मुलें झालीं, परंतु तीं सर्व मृत्युमुखीं पडलीं; तेव्हां यांचे पत्नीस फारच दुःख झालें व त्यांनीं श्रीमारुतीरायाची एकनिष्ठपणें सेवा आरंभिली. नित्य सहस्रप्रदक्षिणा घालण्याचा क्रम सुरू करून त्यांनीं अन्नग्रहण करणेचें सोडून दिलें. याप्रमाणें सहा महिने झाल्यावर श्रीमारुतीरायांनीं स्वप्नांत येऊन एक आंबा व कुंकवाची पुडी देऊन सांगितलें कीं, 'आतां सेवा पुरी कर' तुझे मनोरथ पूर्ण होतील' परंतु ह्या स्वप्नांतील दृष्टांतावर भरंवसा न वसल्यामुळें पूर्ववत् अन्न वर्ज करून सेवा चालू ठेविली. तेव्हां ७।८ दिवसांचे आंत प्रत्यक्ष श्रीमारुतीराय प्रगट होऊन एका कुंकवाचे डबींत दोन मोतीं (एक जोंधळ्याएवढें व एक बाजरीएवढें होतें) घालून ती डबी सखुबाईचे स्वाधीन केली व एक आपली मूर्ती हवालीं करून सांगितलें कीं, "तुझे सेवेनें प्रसन्न होऊन तुला एक मोठें मोतीं दिलें आहे आतां स्वस्थ अस." नंतर मारुतीराय अदृश्य झाले. एका वर्षाचे आंत सखुबाईस पुत्ररत्न झालें. तें श्रीमारुतीरायाचे प्रसादेंकरून झालें म्हणून त्या मुलाचें नांव 'बलभीम' असें ठेविलें. बाजीराव यांची मुख्य तीन व्रतें होतीं :--

(१) श्रीमारुतीरायाशिवाय अन्य दैवतास न भजणें. (२) परस्त्री मातेसमान मानणें. (३) खोटें कधींही न बोलणें.

४. एक वर्ष पुरें होतें न होतें तोंच सखुबाई निवर्तल्या, त्यामुळें दोन्ही नात्यांनीं बलभीमाची सर्व प्रकारें व्यवस्था करणें त्यांचेकडेसच आलें. बालपणचीं ५।६ वर्षें गेल्यानंतर त्यांस शाळेंत घातलें, परंतु या मुलानें लहान मुलें एकत्र जमवून दिंडी काढावी व मारुतीरायाचें

भजनच करीत बसावें ! यामुळें अभ्यास कांहींच झाला नाहीं. पुढें मुलगा जसजसा मोठा होत गेला, तसतशी घरांतील सर्व कामें करण्याचेंही त्याच्याच अंगावर पडूं लागलें. बलभीम हा बापाचे अर्ध्या वचनांत राहत असे. भगवद्भक्तीचे छंदामुळें व वतनदार लोकांच्या विद्येविषयीं असलेल्या अनास्थेमुळें बलभीमास त्या काळीं खेड्यांत उपलब्ध असलेली लघुविद्या देखील प्राप्त झाली नाहीं. पुढें ते वारंवार मौजेनें सांगत कीं, " मी मराठी दुसरी इयत्ता पास आहें ! " योग्य काळीं बलभीमाचें उपनयन व लग्न बाजीरावांनीं केलें. याप्रमाणें काळ क्रमीत असतां शके १७९५ सालीं बाजीराव निवर्तले. मरतेसमयीं त्यांस बलभीमानें धैर्यानें सांगितलें कीं, " तुमचा श्रीमारुतीरायावर भरंवसा आहेना ? मग तुम्ही कष्टी कां होता ? मला त्यांचेच ओटयांत घाला म्हणजे तोच संरक्षण करील. " हें ऐकून बाजीरावास आनंद झाला व त्यांनीं बलभीमास मारुतीरायाचे ओटयांत घालून प्राणोत्क्रमण केलें.

५. बलभीमास लहानपणापासून भजनाचा छंद असल्यामुळें गांवांतील सर्व मुलें गोळा करावीं व श्रीतुकारामज्ञानेश्वर इत्यादि साधुसंतांच्या पालख्या काढून गांवांत खूप नाचत सुटावें; हा क्रम असल्यामुळें सर्वांची या मुलावर फार प्रीती जडली होती. एक भागीदार घेऊन या मुलानें वाण्याचें दुकान काढलें व कांहीं कार्यानिमित्त परगांवीं गेले असतां पाठीमागें भागिदारानें दुकानाचें दिवाळें काढलें, व या मुलावर ६०० रुपये कर्ज दाखविलें. मुलगा परत गांवीं आल्यावर सर्वत्रांस ही हकीगत कळली त्यामुळें त्यांस फार दुःख झालें. तेव्हां या मुलानें न डगमगतां सर्वांस सांगितलें कीं ' तुम्ही कांहीं चिंता करूं नका. स्वस्थ असा ' मग एका सावकारास आपली जमीन गहाण लावून देऊन रु. ६०० काढले व कर्ज फेडून टाकलें. नंतर हे घरांतून बाहेर

पडले ते उदरनिर्वाहाकरितां वऱ्हाडांत एका श्रीमान पाटिलाचे घरीं त्यांचे मुलास शिकविण्यास राहिले. त्याचें सचोटीचें व प्रेमळ वर्तन पाहून पाटीलबोवाचें बलभीमावर अत्यंत प्रेम व विश्वास बसला. तो इतका कीं बलभीमानें खुशाल घरांतील बायांत घरच्या-प्रमाणें वागावें व खजिन्याच्या किल्ल्याही पाटलानें त्याजपाशी खुशाल ठेवून जावें. शेवटीं त्याच पाटलानें यांचें सर्व कर्ज फेडून जमीनजुमला सोडविला व बलभीमाचे बायकोस आणवून उभय-तांचे पोटाची व्यवस्था लावून दिली. गांवीं आल्यावर कांहीं दिव-सांनीं बलभीमाचे भोळेपणाचा फायदा घेऊन लुच्चे लोकांनीं त्यांस पुन्हां पेचांत आणिलें व जमीनजुमला पुन्हां गहाण लावून देऊन बायको व मुलगा यांस बरोबर घेऊन हे घराबाहेर पडले. ते रस्त्यानें दारिद्र्य, दुखणें इत्यादि अनेक ताप सोशीत खानदेशातून माळव्यांत इंदूर येथे दाखल झाले. गांवांत ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकारामादि साधूंचीं अभंग पदें गाऊन नाचतां नाचतां त्यांचे मनांत येई कीं, हें बाहेरील सोंग खरें झालें पाहिजे ! अनुभवाचे इच्छेनें साधुसंतांकडे जाऊन नम्रतेने प्रश्न करण्याचा त्यांस नाद असे, परंतु प्रश्नाचा उलगडा करणारा कोणी मिळेना म्हणून त्यांस नेहमीं तळमळ वाटत असे. त्यांचें मुमुक्षुत्व तीव्र झालें. इंदूर मुक्कामीं असतांना बलभीमानें भजनाचा खूप सपाटा चालविला, त्यामुळें भजनी मंडळींची व याची तत्काळ ओळखहोऊन प्रेम जडलें. याने भक्तिज्ञानाची चर्चा करावी व कोणासही त्याचे प्रश्नाचा नीट उलगडा करतां येऊं नये. शेवटीं इंदोर येथील प्रसिद्ध संत '**श्रीलक्ष्मण महाराज**' यांचे घरीं श्रवणास जाऊं लागले. त्यांचे निस्पृहपणाची धाटी व प्रेम पाहून त्यांची भक्ति लक्ष्मणमहाराज यांजवर बसून लवकरच त्यांनीं त्यांचा अनुग्रह घेतला. लक्ष्मणमहाराज हे प्रसिद्ध

नारायणमहाराज जालवणकर यांचे पट्टशिष्य होत !

६. दोन वर्षें गुरुसन्निध वास करून त्यांची मनोभावें सेवा केली. नंतर गुर्वाज्ञा घेऊन ते तेथून निघून संस्थान धार येथें गेले. तेथें भजनानंदांत कांहीं दिवस गेले. नंतर यांनीं सावकारास पत्र लिहिलें; तें पाहून त्यानें यांस गांवीं बोलाविलें. बलभीमाचें भगवत्प्रेम व गुरुभक्ति पाहून व परमार्थविचार श्रवण करून सावकारही आनंदानें नाचूं लागला व त्यानें सांगितलें कीं "माझे सर्व रुपये पावले. तूं आपल्या जमिनी वाटेल त्यास खंडानें लाव." नंतर गहाणखत फाडून सर्वांसमक्ष त्यानें बलभीमाचे हवालीं केलें.

७. पुढें थोडे दिवसांनीं बलभीमबुवा हे इंदोर येथें गुरुदर्शनास गेले व तेथून पुन्हां धारेस गेले. ते रघुनाथपुऱ्यांत जुन्या दिवाणाचे दत्तमंदिर आहे तेथें राहिले. गांवांत जाऊन भिक्षा मागून आणावी व रात्रंदिवस हरिकीर्तन व भगवद्भजन करीत असावें. दुपारीं भागवत, योगवासिष्ठ वगैरे पुराण सांगावें. भाविक लोक श्रवणास येऊं लागले. पूर्ण सद्गुरुकृपा झाल्यामुळें यांच्या पुराणांत जें प्रेम उत्पन्न होई व होई व दोन्ही नेत्रांवाटे आनंदाश्रु निघत व हे नामछंदानें नाचूं लागत. त्यामुळेंही कित्येक मंडळींची यांचे सत्यपणाबद्दल खात्री झाली. कोणी अनेक प्रश्न विचारावे व सद्गुरुकृपेनें त्यांचीं यथार्थ उत्तरें त्यांस मिळावीं, थोडथोडी मंडळी यांची उपदेशित होऊं लागली.

८. याच वेळेस धारेस **कृष्णराव बापट** या नांवाचे एक सत्पुरुष नुकतेच आलेले होते. त्यांस बालपणापासून भगवत्भक्तीचा छंद असल्यामुळें नोकरी सोडून देऊन श्रीगुरूचा शोध करीत असतांना गोकर्णक्षेत्रीं श्रीपद्मनाभमहाराज यांची व त्यांची भेट झाली होती व त्यांनीं यांस कृतार्थ केलें होतें. यांचे चुलत्यानें

कृष्णरावजींनीं नोकरीबद्दल अर्ज करून ती मिळवून प्रपंच चालवावा म्हणून त्यांना धार येथें असलेले रा. काशिनाथपंत लेले यांचेकडे जाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ते अर्जाबद्दल माहिती विचारण्यास आले, परंतु त्यांची व लेले मास्तर यांची गांठ पडतांच अर्जाबद्दल कांहींच न बोलतां हे ज्ञानपर गोष्टी बोलूं लागले व भागवत, ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथांतील आधार दाखवून परमार्थचर्चा करीत सुटले. याप्रमाणें २–३ दिवस क्रम चालला, तेव्हां लेले मास्तर यांनीं विचारलें कीं, 'या धारानगरींत या विषयाचा भोक्ता तुम्हांस कोणी मिळाला काय ?' तेव्हां त्यांनीं नाहीं म्हणून उत्तर दिलें. तेव्हां मास्तर म्हणाले, 'दत्तमंदिरांत एक बुवा आहेत त्यांचेकडे चलावें !' मग हे बुवांचे घरीं गेले. १–२ तास दोघांचें भाषण झालें व दोघांचें इतकें प्रेम जडलें कीं, जणुं काय हे अगदीं बालपणापासूनच स्नेही आहेत. नंतर दोघांनीं भजननामघोष वगैरे खूप प्रेमानें करीत सुटावें. याप्रमाणें दोघांनीं एकमेकांस एक पळभरही न विसंबतां भजनानंदांत निमग्न होऊन धारेंत आनंदीआनंद करून सोडला. नंतर उभयतां मास्तर यांचे घरीं येऊन वारंवार परमार्थचर्चा करीत असत. त्यामुळें मास्तरसाहेब यांचेंही पूर्ण लक्ष लागून ते बलभीमबोवासाहेब यांचे शिष्य झाले. कृष्णरावजी यांचीही तिकडे बरीच शिष्यशाखा आहे.

९. बलभीमबोवांबद्दल दोन गोष्टी सांगतों:—

(१) पोषाख अगदीं साधा. फाटके तुटके कपडे जरी असले, तरी त्याची कांहीं पर्वा नाहीं. कोणी प्रश्न केल्यास म्हणत कीं, 'शरीररक्षण झालें म्हणजे झालें.' अंगांतील कपडे मळले म्हणजे दुसऱ्यानें जबरदस्तीनें ते काढून घ्यावेत व धुवून साफ करून यांस घालावेत ! देहबुद्धि जाळून ते स्वरूपीं रमलेले होते. (२) आपले

अगर दुसऱ्याचे शिष्य जरी असले, तरी त्यांत भेदभाव न बाळगतां हे मोकळेपणानें सर्वांस सर्वकाळ सारखा बोध करीत. (३) परस्त्रीस मातेसमान व परद्रव्यास विष्ठेप्रमाणें मानून त्यास स्पर्शही न करणें वगैरे अनेक लोकोत्तर गुण त्यांचे अंगीं सहज होते. (४) त्यांचा प्रेमळपणा व निरहंकारवृत्ति सर्वांसच मोहून टाकी. (५) अहोरात्र परमार्थाचा उपदेश बोलत बसण्याचा व भक्तिरसांत रंगून राहण्याचा स्वभावच बनला होता. (६) यांच्या येथील शेवटच्या दुखण्यांत हे रा. पांगारकर यांशीं ज्या प्रेमानें बोलत त्याच प्रेमानें गोखले या प्रार्थनासमाजिष्टाशीं व प्रो. कर्वे यांसारख्या सुधारकाशीं बोलत असत. सर्वांच्या मनांवर त्यांच्या प्रेमळ साधुत्वाचा ठसा सारखाच उमटला होता. त्यांचें अजात-शत्रुत्व विलक्षण होतें. यांची भाषापद्धति नेहमीं पूर्ण बोधयुक्त असल्यामुळें कोणत्याही धर्माचे, पंथाचे, मताचे लोक असले, तरी हे तेव्हांच मिळून जात.

१०. नरसिंगगडीं गेल्यावर भाद्रपद वद्य ११ शके १८३१ रोजीं रात्रौ ८ वाजतां बोवासाहेब ब्रह्मनंदीं निमग्न होऊन इहलोकची यात्रा आनंदानें त्यांनीं समाप्त केली. (१) मुखानें निर्लज्ज नामस्मरण (२) सर्वांभूतीं भगवद्भाव व (३) ध्यानाची एकाग्रता ठेवून सुखें संसार करावा असा त्यांचा उपदेश असे.

## ३३. यशवंतरावमहाराज जालनापुरकर

१. महाराज यशवंतराव यांचा जन्म शके १७५५ सालीं झाला. यांचें राहण्याचें मूळ गांव जामखेड जि० नगर हें होय. यांच्या वडिलांचें नांव कृष्णाजी राजाराम नवकोटनारायण. यांच्याकडे नेवासें तालुक्यांतील मालेसिंचोली गांवचें कुळकर्णीपण असे. यांची वृत्ति सात्त्विक असून हे संन्यास घेऊन पुष्कळ वर्षें नाशिकास जाऊन राहिले होते. महाराजांना त्यांच्या वडिलांकडून गुरूपदेश मिळाला होता. नगर जिल्ह्यांतकडे तालुक्यामध्यें दिवाणी कोर्टांत प्रथम यशवंतराव महाराजांनीं नोकरी धरली. नंतर वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षाच्या सुमारास निजामचे राज्यांत हैद्राबाद येथें करोडगिरी ऑफिसांत ३० रुपयांवर नोकरी धरिली. पुढें सात वर्षांनीं रु. ७५ पगार होऊन नळदुर्ग येथें करोडगिरी मोहतमीमचे ते शिरस्तेदार झाले. तेथें त्यांनीं सतरा वर्षें उत्तम प्रकारें नोकरी केली. नंतर जालनापूर येथें बदली होऊन तेथेंही सतरा वर्षें नोकरी केली व नंतर पेन्शन घेतलें. पेन्शन घेतल्यावर ९ वर्षें ते हयात होते. कार्तिकीस पंढरीस जाण्याचा त्यांचा क्रम सतत चाळीस वर्षें अव्याहतपणें सुरू होता, तसेंच पैठणास नाथषष्ठीस जाण्याचा क्रमही तसाच पंचवीस वर्षें सुरू होता. त्यांच्या वारीस नोकरींत असतांना रजा वगैरे मिळण्याच्या अडचणी अथवा अलीकडील प्लेगादि आपत्तींनीं उत्पन्न केलेले निर्बंध केव्हांही बाध आणूं शकले नाहींत. मोगलाईत करोडगिरीसारख्या मोहोत्पादक खात्यांत अत्यंत प्रामाणिकपणें व लोकांच्या सोयीसाठीं आपणांस श्रम पडले तरी हरकत नाहीं अशा रीतीनें

सेवाधर्म बजावणारांमध्ये ते अग्रेसर होते. निकोप मनाप्रमाणेंच त्यांची शरीरप्रकृति व सर्व इंद्रियें वय ८० च्या जवळ जवळ आले असूनही निकोप होतीं. त्यांची शिष्यशाखा मोंगलाईत विशेष आहे.

२. योगसामर्थ्यानें चमत्कार दाखविणें हेंच साधुलक्षण होय असें समजणारेही लोक आहेत, परंतु ही समजूत भ्रामक आहे असें अनेक संतांनीं स्पष्ट सांगितलें आहे. विद्युत्संदेश, भाषणोद्ग्राही यंत्रें हेही चमत्कारच आहेत; पण यांच्या जनकास कोणी साधु म्हणेल काय ? मनाची तळमळ निववविण्याचें सामर्थ्य या अगर इतर चमत्कारांत आहे काय ? योगसामर्थ्यानें त्रैलोक्याचें राज्य मिळालें; तरी पण अठराविश्वे द्रारिद्र्यांतही सुख देणारी समचित्तवृत्ति जर नसेल तर त्या ऐश्वर्याचा व त्या ऐश्वर्यास प्रसवणाऱ्या चमत्कृतिजनक सामर्थ्याचा तरी काय उपयोग ? सत्पुरुष म्हटला म्हणजे त्यास देहधर्म असू नयेत, त्याचें डोकें दुखूं नये, त्याचे आप्तेष्ट मरूं नयेत त्याजवर सामान्य लोकांवर येणाऱ्या आपत्ति येऊं नयेत ही आम्हां अल्पज्ञ जनांची तत्त्वतः कल्पना ! सत्पुरुष अगर संत आणि सामान्यजन यांच्या बाह्यस्थितींत फारसा फरक नसतो; आम्हांस जसे शरीरभोग आहेत तसें त्यासही देह आहे तोपर्यंत ते आहेतच. आम्हांस जसे सुखदुःखाचे प्रसंग येतात, तसे त्यांसही येतात. त्यांच्यांत व आम्हांत फरक इतकाच कीं, त्यांस शारीरिक अगर इतर दुःखें झालीं तरी त्यांच्या मनास उद्वेग उत्पन्न नाहीं अगर सुखानें ते हुरळून जात नाहींत. ते सुखप्राप्ति झाली म्हणून आनंद मानीत नाहींत; अर्थात् उलट प्रकार झाला म्हणून दुःखही मानीत नाहींत. सारांश, सत्पुरुषांच्या प्रारब्धजनित स्थितींत व इतरांच्या स्थितींत फरक नसतो, फरक वृत्तींत असतो ! यशवंतरावमहाराजांची वृत्ति नेहमीं

समचित्त असे. ‘ मानअपमान यांचे गोवें अवघे गुंडाळून ठेवणारे ’ ते होते. आपण इतरांहून श्रेष्ठ ही भावना त्यांना कधींच शिवली नाही ‘ वासुदेवः सर्वमिति ’ हा मंत्र त्यांच्या जिव्हाग्रीं व अंतः-करणपटावर सदा वास्तव्य करीत असे. ‘ परोपकारू न बोले । न मिरवी अभ्यासिले । न शके विकूं जोडलें । स्फीतीसाठीं ।। ’ अशा तऱ्हेचें अंदभित्व यांचें ठायीं पूर्णपणें नांदत होतें. यशवंतराव-महाराज हे सत्पुरुषदर्शनार्थ जाण्यास नेहमीं तत्पर असत. दुसऱ्याचें मन दुखवावयाचें नाहीं मग त्याकरितां आपणांस श्रम अगर त्रास पडला तरी हरकत नाहीं, अशा तऱ्हेची उज्ज्वल अहिंसा महा-राजांचे ठायीं होती.

३. ब्रह्मलोकपर्यंत सर्व ऐश्वर्य नाशिवंत आहे, तेव्हां या पली-कडील ऐश्वर्याचा मार्ग आपलासा करण्यासाठीं आंत व बाहेर खरे रहा असें त्यांचें नेहमीं सांगणें असे. ऐहिक सुखाविषयीं त्यांच्या ठायीं यत्किंचित्‌ही आकांक्षा नसून व्यवहारांत कसें वागावें हें ते उत्तम जाणत. द्रव्येच्छा नसणें हें फार कठीण आहे. पण त्यांच्या ठिकाणीं सर्व नश्वर वस्तूंविषयीं अनासक्ति इतकी परिपूर्ण होती कीं त्यांना कांहीं देणें जवळजवळ अशक्यच होतें. उपदिष्ट शिष्या-पासून धर्माज्ञेचें उल्लंघन होऊं नये यास्तव दक्षिणा घेणें जरूर आहे म्हणून ते एक पैसाच दक्षिणा घेत असत ! मग शिष्येतरांविषयीं तर बोलावयासच नको. सारांश, भगवद्‌भक्तीच्या आनंदांत सदा निमग्न, ऐहिक वस्तूंविषयीं विरक्त, बुद्धिभेद न व्हावा म्हणून शास्त्रप्रणीत कर्ममार्गांत तत्पर, व्यवहारज्ञ, निरभिमान, दीनांचा सखा व प्राणिमात्रांचा मायबाप हीं जीं सत्पुरुषलक्षणें तीं त्यांच्या ठिकाणीं नांदत होतीं, हें त्यांच्या समागमानें कोणाच्याही ध्यानांत येत असे. बाह्यतः सारा जन्म नोकरींत व प्रपंचांत जाऊनही

सज्जनांना अंतर्यामीं कसें मोकळें राहतां येतें हें त्यांच्या चरित्रावरून कळतें. यांची व मुमुक्षुकर्ते रा. लक्ष्मण पांगारकर यांची भेट व बोलणेंचालणें शके १८३० सालीं झालें होतें. हे फाल्गुन १२ शके १८३४ मध्यें रामरूप झाले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
........ दि: ........
........ नोंद दि: ........

# ३३. भोरचे दत्तंभटमहाराज

१. महाराजांचा जन्म कोठें व केव्हां झाला, हें निश्चयात्मक लिहितां येत नाहीं. समाधिकाळीं (शके १८३४) त्यांचें वय ९० वर्षांचें होतें. महाराजांस विचारलें असतांही ते स्वत:बद्दल कोणाजवळ कांहींच बोलत नसत. ते कुसूर गांवचे राहणारे असून पिंगे आडनांवाचे कऱ्हाडे ब्राह्मण होते. यांनीं सर्वतीर्थें केलीं व नर्मदेच्या तटाकीं बरींच वर्षें वास्तव्य केलें होतें. यांच्या दर्शनास काशीहून व लांवलांबून लोक येत. ही परमहंसमूर्ति शेवटचीं कांहीं वर्षें भोरांत असून समाधिकालापर्यंत त्यांच्या प्रकृतींत कोणत्याही प्रकारें वार्धक्याची छटा दिसत नव्हती ! त्यांच्याबद्दलच्या आख्यायिका बऱ्याच आहेत. लोकांस दृष्टांत होऊन त्यांनीं हजारों कोसांवरून येऊन सेवा करावी व आधिव्याधींपासून मुक्त व्हावें व स्वदेशीं परत जावें. कांहींजणांनीं ह्यांचे कान हालतांना पाहिले आहेत ! श्रीमुरलीधराचे देवालयांत ह्यांचें वास्तव्य असतां एकाच काळीं दोन स्थळीं हे भक्तांस दिसत. ते धन हें मृत्तिकेसमान मानीत असत, लौकिकाकरितां केवळ पंचा परिधान असत; करीत बाकी दिगंबर असत. ह्यांस थंडी, उन्हाळा, पावसाळा हे सारे काळ सारखे असत. त्यांपासून त्यांच्या प्रकृतीवर कोणत्याही प्रकारें समाधिकालपर्यंत अनिष्ट परिमाण झाला नाहीं. हे सदैव एकभुक्त असत. आहार अल्प असून जेवावयास मिळालें तर मिळालें, नाहींपेक्षां अन्नाचीही यांना पर्वा नसे. ते बालब्रह्मचारी असून वेदाध्ययन, गायन व वादन इत्यादि कलांमध्यें निपुण असत. ते एकांतप्रिय असून भक्तजनांस रोज दर्शन

मिळेल व त्याकरितां महाराज थांबतील अशी आशा कोणी करावयास नको ! मनांत येईल तेव्हां हंसावें व मनांत येईल तेव्हां बोलावें अशा प्रकारची त्यांची नेहमींची स्थिति असे. मनांत आलें म्हणजे कोणाबरोबर तरी कांहीं तरी बोलावें; परंतु ह्यांच्या भाषणाचें अर्थगांभीर्य अज्ञ जनांना काय समजणार ? तथापि त्यांच्या बोलण्यांतला अर्थ पुढील होणाऱ्या क्रियेवरून पुढेंपुढें विवेकवंतांना तत्काळ कळत असे.

२. हे महातपस्वी व वेदस्वाध्यायनिरत महात्मे पराकाष्ठेचे विरक्त व स्वसुखैकनिष्ठ असत. एकदां कोंकणांत अचानक एका खेडयांत गेले व रात्रीं एका ब्राह्मणाच्या घरीं राहून पहांटे त्याच्या जन्मांध मुलीच्या डोळयांवरून हात फिरवतांच तिला दिसूं लागलें. हे लगेंच तेथून पसार झाले. हे महाडास दोन वेळ गेले होते. दर्शनाची अतोनात गर्दी उसळत असे. तेथें एकानें त्यांच्या हातावर चवली ठेवली ती घेऊन ते गेले बाजारांत. एका दुकानदारापुढें चवली टाकून दिली. “ दे रे ” म्हणाले. तो म्हणाला, “ काय देऊं ?” “ दे ” म्हणाले, “ कांहीं तरी. ” त्यानें खुर्दा दिला. तो घेऊन घरीं आले व बराच खुर्दा पडला होता त्यांत टाकून दिला. वाहवारे ! बाजारांत जाऊन खुर्दा करून घरीं आणला, पण आणला कशाला ? कोणास ठाऊक ? तें देव जाणे. दत्तंभटास काय त्याचें ? कांहीं तरी करणें, पण निर्हेतुक. एखादवेळ पैसा कोणी हातावर टाकला तर खालीं वर निरखून बघत, जणूं कांहीं तो पारखून घेताहेत ! कोणी कोरा पंचा आणून दिला तर त्याच्या चिंध्या करीत बसत ! त्यांच्या चेहऱ्यावर अत्यंत तेज व प्रसन्नता सर्वकाळ दिसे. कधीं कांहीं पुटपुटतांना दिसत. ते यदृच्छेनें कोठें जात–येत असत. त्यांचें चालणें वाऱ्यासारखें असे. यांचा विशेष नाद हा कीं, समोर शेगडी

सदोदित पेटलेली पाहिजे. भोरासही ज्या खोलींत ते बसत त्या खोलींत नेहमीं शेगडी असे व जाळानें भिंती तापून गेलेल्या असावयाच्या, दर्शनास येणाऱ्या जनांचीं पापेंच जणूं काय पेटून जात आहेत !

# ३४. अक्कलकोटचे स्वामीमहाराज

१. अलीकडच्या काळांत श्रीअक्कलकोट स्वामीमहाराजांसारखी दिव्य, पारमेश्वरी सिद्ध विभूति क्वचितच पाहण्यांत आली असेल. स्वामींचें इतिवृत्त कांहीं समजत नाहीं, त्यांचे चमत्कार मात्र रा. स. वा. मराठे यांनीं स्वामींच्या चरित्रांत पुष्कळ संग्रहित केले आहेत. त्यांचा वर्ण गौर होता, ते आजानुबाहु होते, त्यांची मुद्रा अत्यंत तेजस्वी होती, लोक त्यांना श्रीदत्तावतार म्हणूनच भजत, त्यांच्या विपरीत चेष्टाही लोकांचें कल्याणच करीत, या गोष्टी सर्वश्रुत आहेत. त्यांचें सहज चालणें इतकें वेगाचें असे कीं, इतरांस त्यांच्या-बरोबर धांवावें लागे ! ते हातानें क्वचित् जेवत, त्यांना भरवावें लागे. स्वामी प्रथम अक्कलकोटास आले, तेव्हां मालोजीराजे गादीवर होते. ते प्रथम मंगळवेढयास प्रगट झाले, तेथून सोलापुरास आले व नंतर अक्कलकोटास येऊन जाहीर झाले. तेथूनच त्यांच्या अगाध लीलांस आरंभ झाला. भरतखंडांतल्या सर्व भागांतून हजारों लोक दर्शनास येऊन कृतार्थ झाले. त्यांच्या तोंडचा प्रत्येक शब्द व त्यांची प्रत्येक कृति चमत्कारमय असे. त्यांचे आई-बाप, गांव, जन्म याविषयीं एक अक्षरही कधीं कोणास कळलें नाहीं. ते पूर्वी अनेक नांवांनीं अनेक ठिकाणीं होते असें म्हणतात. ‘ चंचलभारती ’ असें त्यांचें पूर्वनाम होतें. ते पूर्वकालीं दक्षिणोत्तर यात्रा करून आले असावेत. श्रीगुरुचरित्राच्या ५१ व्या अध्यायांत श्रीनृसिंहसरस्वती गाणगा-पुराहून निघून कर्दळीवनांत शके १३८० मध्यें गुप्त झाले असें वर्णन आहे, तेच पुन्हां या रूपानें प्रगट झाले अशी लोकांची समजूत आहे.

२. एकदां एका विद्वानानें महाराजांस प्रश्न केला कीं, ‘ ब्रह्मतदाकारवृत्ति कशानें होते ? ’ ते कांहींच बोलले नाहींत. त्याच रात्रीं त्या विद्वानास पुष्कळ विंचु आपल्या अंगास चावल्याचा स्वप्नांत भास झाला व तो ओरडत उठला. दुसरे दिवशीं सकाळीं तो महाराजांच्या दर्शनास गेला तेव्हां महाराज म्हणाले, “ हात गाढवा ! स्वप्नांत विंचु चावल्यानें बोंब मारीत उठतोस आणि वेदांताच्या गोष्टी सांगतोस ! वाचाळपणानें कुठें ब्रह्मतदाकारता होते काय ? ” गृहस्थ लगेच मनांत उमगला. मुंबईच्या ठाकुरद्वारचे ठाकुरदासबोवा ऊर्फ श्रीकृष्णबोवा हे उत्तम विद्वान् कीर्तनकार असून दत्तोपासक होते. ते वारंवार गाणगापुरीं जात. एकदां अंगावर श्वेतकुष्ट उठल्यामुळें वैतागानें गाणगापूरचें शेवटचें दर्शन घेऊन काशीस जाऊन देह ठेवावा असा बेत करून ते गाणगापुरास गेले. मुंबईहून जातांना श्रीदत्तास अर्पण करण्यासाठीं उत्तम कस्तूरी बरोबर घेतली होती, पण तेथें गेल्यावर पादुकांची पूजा व ब्राह्मण-संतर्पण करण्याचे गडबडींत कस्तूरीची पुडी तशीच राहून गेली. ठाकुरदासांस रात्रीं श्रीदत्ताचा स्वप्नदृष्टांत झाला कीं ‘ तूं अक्कलकोटचे स्वामींकडे जा म्हणजे तुझा कुष्टरोग जाईल. ’ बोवा यानंतर स्वामींकडे आले. बोवांस पाहतांच ‘ हमारी कस्तूरी अबीके अबी लाव ’ असें महाराज म्हणाले ! हे पाहतांच खूण पटून बोवांनीं कस्तूरी महाराजांस अर्पण केली व त्यांनीं ती मुलांत वांटून टाकली. बोवा व त्यांचे कुटुंब (सौ. राधाबाई) उभयतां महाराजांची सेवा करीत राहिले. एके दिवशीं महाराजांनीं पेटलेल्या धुनींतून एक जळतें लांकूड घेऊन बोवांचे अंगावर फेंकलें. महाराजांच्या सेवेकऱ्यांनीं बोवांस सांगितलें कीं ‘ तुमचें कार्य झालें. लांकूड उगाळून त्यांत गाणगापुरचें भस्म घालून रोज अंगास लावीत जा म्हणजे

रोग जाईल.' याप्रमाणें करितां ठाकूरदासबोवा रोगमुक्त झाले. यानंतर एकदां महाराजांनीं डोकीची टोपी काढून राधाबाईचे ओटींत फेंकली. बाई भावार्थ समजून तिनें ती टोपी प्रसाद म्हणून ग्रहण केली. बाईस एका वर्षाचे आंत मुलगा झाला. त्याचें नांव गुरुनाथ ठेवलें. मुलगा स्वामींचे प्रसादानें झाला. असें समजून पितरांनीं त्याची मुंज स्वामींचे सन्निध शके १७९२ चे शिवरात्रीस लावली. ठाकुरदासबोवांची अत्यंत निष्ठा स्वामींवर वसली. त्यांनीं स्वामींच्या पादुका ठाकुरद्वारीं स्थापन केल्या आहेत. स्वामींनीं उपदेश करावा म्हणून बोवांनीं व इतरांनीं पुष्कळ प्रयत्न केले, पण स्वामी उपदेश देत नसत. "हम् पंतोजीपण नही करते. गाटके गुरु बाटके चेले हम् करते नही." महाराजांच्या अंतरसाक्षित्वाच्या व मनकवडेपणाच्या गोष्टी अनेक प्रसिद्ध आहेत. महाराजांचा अनुग्रह झालेले सीतारामममहाराज (पृ० ४१–४५) यांच्या सान्निध्यांत अशा अनेक गोष्टी मीं स्वतः अनुभविल्या असल्यामुळें मला त्या विश्वास्य वाटतात. ज्यांचा अंतरात्मा सर्व जीवांना पोटांत घेण्याइतका विशाल झाला त्यांना हें अशक्य नाहीं, त्यांच्यापासून मनुष्यांस कांहींएक चोरतां येत नाहीं. महाराजांना पाहून चिंतोपंत टोळ यांचे मनांत आलें कीं हे कोणी सिद्ध पुरुष असावेत, कीं स्वामी लगेच उद्गारले; 'मी सिद्ध असो नाहीं तर कोणी असो, तूं आपल्या वाटेनें जा.' त्याच्या नंतर मनांत आलें 'हे मनकवडे दिसतात.' स्वामी लगेच म्हणाले 'मी मनकवडा असलों तर तुला काय करायचें आहे?' तो बिचारा स्तंभित झाला! पुढें होणाऱ्या गोष्टींच्या आगाऊ सूचना ते कधीं कधीं देत. त्यांनीं एकदां एक खेळ चालविला. एरंडाचे वीत वीत लांबीचे तुकडे करावे, त्याच्या पोकळींत दुसऱ्या लाकडांनीं माती ठांसून भरावी, मग ५–६ तुकडे त्रिकोणा-

कृति उभे करून त्यावर बंदुका ठेवल्याप्रमाणें ते पूर्वोक्त तुकडे ठेवावेत, व हें काय करतां म्हणून कोणीं विचारलें तर ‘ पलटणी तयार करितों ’ म्हणून म्हणावें ! असा खेळ चार महिने चालला. होता. दोन महिन्यांतच १८५७ ची बंडाळी उठली व बंदुकातोफांच्या गडगडाटानें सारें हिंदुस्थान हालून गेलें तेव्हां महाराजांच्या वरील खेळाचा अर्थ लोकांस कळून आला ! ते जीवन्मुक्त होते. विश्वांतल्या लीला पाहत आपल्या स्वानंदसाम्राज्यपटावर निरंतर आरूढ होते. ते कोणाच्याही घरीं जाऊन जेवीत, व जेवण्याची त्यांना पर्वाही नसे. अक्कलकोटास राजाराणीपासून रंकापर्यंत सर्व त्यांना अत्यंत मानीत; त्यांच्या अद्‌भुतलीला व चमत्कार पाहून आश्चर्य व आनंद यांनीं युक्त होऊन त्यांच्या चरणीं नम्र असत. त्या नगरीची प्रसिद्धि खरोखर महाराजांमुळें झाली. गांवोगांवचे हजारों लोक त्यांच्या दर्शनासाठीं व इष्टकामनासिद्धीसाठीं नित्य येत असत. देव व संत यांच्याकडे जाणारांत आर्त, अर्थार्थी व जिज्ञासु असेच फार; निष्काम भक्त कोठेंही विरळच असायचे ! स्वामींची तब्येत कधीं अत्यंत सौम्य व दयार्द्र व कधीं अत्यंत कठोर व निष्ठुर दिसे, पण ते अंतर्यामीं दयासागरच होते. सर्वांचें कल्याण व्हावें, सर्वांनीं सुखी असावें यापरती साधूंची इच्छा कोणती असणार ?

३. स्वामी आळशी मनुष्यास फार रागें भरत. कोणी पोटार्थी बाबा आला तर ‘ आयतें खायला हुडकतो मादरचोद ! बापाची मत्ता ’ असें म्हणत. श्रम करून शेतांत राबून पोट भरावें व देवास भजावें हा त्यांचा उपदेश असे. कोणी उतावळा पाहिला तर ‘ उतावळा सो बावळा धीर सो गंभीर ’ म्हणत. कोणी दुराचारी मनुष्य पाहिला कीं त्याची फार टर करून त्याला लाजवीत, त्याचें वर्म

उघड करीत. त्यानें सन्मार्ग धरावा हाच हेतु. एका पुराणिकास वाटे कीं 'हे संन्यासी म्हणवितात मग यांना मऊ गादी कशाला हवी ?' कांहीं दिवसांनीं त्या पुराणिकास घेऊन महाराज डोंगराच्या कपारींत गेले. थंडी मी म्हणत होती. बुवा हिवानें घाबरे झाले, दांतखिळ वाजूं लागली. महाराज दगडावर स्वस्थ निजून म्हणतात 'गादी कशी मऊ मऊ आहे अं !' त्यांना गादी, दगड व कांटे सारखेच आहेत. हें पाहून बोवा नरमले. एकदां एक वेदांतीमण्डळ नित्याप्रमाणें पंचदशी वाचीत असतां एका श्लोकावर अडले व चर्चा करीत बसले. महाराज अनाहूत तेथें आले व उत्कृष्ट उलगडा करून त्यांनीं सर्वांचें समाधान केलें. त्यांचें अगाध अनुभवज्ञान पाहून मंडळी थक्क झाली व आपण प्रत्यक्ष 'ज्ञानस्वरूप आहांत' म्हणून सर्वांनीं त्यांचे पाय धरिले. महाराजांना ज्ञानचर्चा आवडत नसे, त्यांना भक्तभाविक फार प्रिय असत. अहंकार, डामडौल पाहिला कीं हे खरडपट्टी काढीत. एकदां राजेसाहेब हत्तीवर बसून दर्शनास आले. महाराजांनीं त्यांच्या श्रीमुखांत भडकाविली व 'असले बुद्धिबळांतले राजे मी पुष्कळ उत्पन्न करीन' असें म्हणाले ! त्या वेळेपासून राजेसाहेब पालखी वगैरे लांब ठेवून अनवाणी दर्शनास येत. मुंबईचे डॉक्टर वामन गोपाळ, श्री. दादासाहेब विंचूरकर, पुण्याचे प्रसिद्ध वेदांती माटेबोवा, आबाजीबोवा तडवळकर रामदासी, इ० अनेक विद्वान् महाराजांचे भक्त झाले. त्यांचें योग सामर्थ्य अतुल होतें, सकल सिद्धि त्यांच्या पायापाशीं लोळत होत्या. आळंदीचे सुप्रसिद्ध श्रीनृसिंहसरस्वतीस्वामी दोनदां स्वामींचे दर्शनास अक्कलकोटास गेले होते. उभयसिद्धांच्या भेटीचा तो रंग काय बहारीचा ! 'जवळिकेचीं सरोवरें। उचंबळिलिया कालवती परस्परें।' असा (ज्ञाने० १०–१२१) प्रकार होऊन आनंद-

कल्लोळांची नित्य वेणी पडत असे. सूर्यानें सूर्याला ओवाळावें, किंवा चंद्रानें चंद्रास क्षेम द्यावें, किंवा तुल्यबल गंगायमुनासरितांचे ओघ एकवटावे त्याचप्रमाणें सारख्या योग्यतेच्या महात्म्यांच्या भेटींत महासुखाची पौर्मिणा होत असते. श्री.देव मामलेदारांच्या व स्वामींच्या भेटींतही तीच मौज उडाली. नृसिंहसरस्वतीस पाहतांच स्वामीमहाराज 'क्यौं रंडी छोडी नहीं ?' असें म्हणाले व 'महाराज ! रंडी छोडनेके वास्ते एही इलाज चला है, आपकी कृपा होना' असें उत्तर मिळालें. रंडी सिद्धी अगर मूळमाया. स्वामींनीं योगांतील कांहीं गूढ रहस्यें नृसिंहसरस्वतींस सांगितलीं असें म्हणतात. स्वामींच्या दर्शनास लांबलांबून लोक येत. त्यांना राजारंक समान होते. ग्वाल्हेरचे जयाजीराव शिंदे व इंदोरचे तुकोजीराव होळकर हेही महाराजांच्या दर्शनास येऊन गेले. मुंबईची मंडळी फार येत. स्वामींची निस्पृहता, वैराग्य, सिद्धचमत्कार सर्वच कांहीं अचाट होतें. स्वामींना 'आपण कोण ?' म्हणून विचारणारेही कांहीं भेटत. एकदां एकानें असाच प्रश्न केला तेव्हां 'मूळ पुरुष वडाचें झाड दत्तनगर' असें बोलले. 'आपली जात कोण ?' या प्रश्नास एकवार त्यांनी सरळपणानें 'आम्ही यजुर्वेदी ब्राह्मण, नांव नृसिंहभान, काश्यप गोत्र, मीन-रास' असें उत्तर देऊन पुन्हां लगेच म्हणाले, 'आणखी विचार-शील तर टाळक्यांत पायपोस !' पुण्याचे प्रसिद्ध काळबोवा हे महाराजांच्या कृपेंतले असून त्यांच्यासारखीच यांचीही वृत्ति होती हें पुणेकरांस माहीत आहे. हे 'काळ आला काळ आला' असें नेहमीं म्हणत. अक्कलकोटास बाळाप्पा व मुंबईस हरिभाऊ ऊर्फ स्वामीसुत यांनीं महाराजांची सेवा अपूर्व केली. स्वामीसुत हे जातीचे मराठे होते. यांचें वैराग्य व एकनिष्ठपणा सर्व गुरुभक्तांनीं कित्ता घेण्यासारखा होता. यांनीं स्वामींचा मठ स्थापून स्वामींचा

उत्सव सुरू केला व अनेक लोकांस गुरुभजनास लावलें. चिपळूणचे गोपाळबोवा हेही महाराजांचे अनुग्रहीत असून यांनीं ४० वर्षें मठीं एकनिष्ठ सेवा केली. आपल्या अद्भुत लीलांनी हजारों लोकांस समाधान देऊन स्वामीमहाराज मंगळवार चैत्र वद्य १३ शके १८०० या दिवशीं तिसऱ्या प्रहरीं निजधामास गेले.

# ३५. श्रीमाणिकप्रभु

१. श्रीमाणिकप्रभूंचा अवतार मोंगलाईंत लाडवंती येथें मनोहर नायक व बयादेवी या पुण्यशील दंपत्याच्या उदरीं मार्गशीर्ष शुद्ध १४ शके १७४३ रोजीं झाला. यांचें उपनाम हरकुडे. हे देशस्थ ऋग्वेदी श्रीवत्सगोत्री ब्राह्मण. यांचे पूर्वज कल्याणी येथें सावकारीचा धंदा करून रहात असत. यांच्या घराण्यांत नृसिंहदेव याची उपासना चालत होती. घराणें अत्यंत पवित्र. मनोहर नायक वेदवेदांतांत निष्णात होते व योगाचाही त्यांचा चांगला अभ्यास होता. त्यांच्या थोर पुण्यानें त्यांस माणिकप्रभूंचा लाभ झाला. श्रीमाणिकप्रभु हे साक्षात् श्रीदत्तावतार होत अशी तिकडे सर्वजनांची श्रद्धा आहे.

२. बाळपणापासूनच यांचें दिव्य चरित्र प्रगट होऊं लागलें. यांचे अनेक चमत्कार मोंगलाईंत लोकांत प्रसिद्ध आहेत, एकदां एक माळीण पाटींत आंबे घेऊन विकायला जात होती. प्रभूंची बालमूर्ती वाटेंत खेळत होती. त्यांनीं आंबे मागितले, पण त्यांजजवळ पैसे नव्हते म्हणून ती बाई आंबे न देतां तशीच चालूं लागली. प्रभू मंजुळ वाणीनें म्हणाले 'जिला मुलें पाहिजेत तिनें आम्हांला आंबे द्यावेत व जितकीं मुलें पाहिजेत तितके आंबे द्यावेत!' त्या बाईला मूल होत नव्हतें. बाई थबकली व तिनें ११ आंबे दिले व म्हणाली, 'बाळा! तुझी वाणी सोन्याची होवो!' बाळाची वाणी खरी झाली हें सांगणें नकोच. लाडवंतीच्या लोकांस बाललीलांचा चटका लावून प्रभूंची स्वारी नंतर कल्याणीस राहण्यास गेली, त्यांच्या वडील

बंधूंचें नांव हणमंतराव व धाकट्या बंधूंचें नांव नृसिंहराव. मनोहर नायक यांचा काल भगवद्‌भजनांत जात असतां त्यांचे शिष्य हैद्राबादचे हिरदेराम लाला यांचे दर्शनास आले. यांची गुरुभक्ति इतकी विलक्षण होती कीं गुरूच्या प्रयाणाबरोबर आपलें प्रयाण व्हावें, आपण एक क्षणही मागें राहूं नये अशी यांची उत्कट इच्छा होती; त्याप्रमाणें मनोहर नायक त्यांनीं शके १७५३ मध्यें इकडे कल्याणीस देह ठेवला तों तिकडे याच वेळीं हैद्राबादेस लालाजींचें देहावसान झालें ! पुढें प्रभूंचें मौंजी बंधन झालें. त्यांचें वय होत चाललें तरी ते शाळेंत जात नाहींत, विद्याभ्यास करीत नाहीत, यांचें पुढें कसें होणार अशा चिंतेनें त्यांचे मामा त्यांस उपदेश करूं लागले तेव्हां:—

प्रभुविण कोण कुणाचा वाली ।। ध्रु० ।।
कर्ता हर्ता तो करवीता । 'मी' मिथ्या जनबोली ।।प्रभु० ।। १ ।।
कोण कुणाचा चाकर मालक । व्यर्थचि भाषण खाली ।। २ ।।
माणिक म्हणे मातेच्या उदरीं । नवमास रक्षण केली ।। ३ ।।

हे पद प्रभूंच्या मुखातून सहज निघाले तेव्हां विद्या करून नोकरी करण्याचा उपदेश याला करणें उचित नाहीं असें मामा समजून चुकले ! तथापि मामांनीं सायर चौकीवर केशवाला (माणिकप्रभूंचें पाळण्यांतलें नांव) नौकरीवर अडकविलेंच. तेथें थोडें दिवस काम केल्यावर त्यांनीं एके दिवशीं दौत, कलमदान, दप्तर व झोपडी याला आग लावली व राख कपाळाला लावून बाहेर पडले ! !

३. माणिकप्रभु जन्मसिद्ध होते त्यामुळें बाळपणापासून त्यांच्या सिद्धाईच्या गोष्टी चोहोंकडे पसरूं लागल्या. त्यांना नवस होऊं लागले व ते नवसाला पावूं लागले. त्यांच्या दर्शनासाठीं लांबलांबून मंडळी येऊं लागली. प्रभूंचा धाकटा भाऊ नृसिंह यांच्या मुंजीच्या

वेळीं घरांत साहित्य कांहीं नव्हते, तथापि ऐन वेळीं कोणी व्यंकापा नवस फेडण्यास आला व साहित्याचे थैले व बाळलेणीं यांची रास घरांत येऊन पडली. घरीं अन्नसंतर्पणाचा सपाटा चालला. कोठून साहित्य येतें याचा लोकांस अंदाजही होईना. जगदंबेनें प्रभूंना झोळी व योगदंड दिल्याची प्रसिद्धी झाली व प्रभूंच्या भंडारखान्यांत कसलीच तूट पडेनाशी झाली. नित्य येणारे अतिथि, पांथस्थ, तडी-तापडी, अंधपंगु, रोगी, महारोगी या सर्वांना हें विश्रामस्थान झालें व याप्रमाणें प्रभूंचें संस्थान वाढत चाललें. दरिद्रीजनांचें दारिद्रय जावें, रोगी निरोगी व्हावे, संसारक्लांत जीव समाधान पावावे, असें होऊं लागलें. प्रभू भिक्षेला बाहेर पडत तेव्हांचें त्यांचें राजैश्वर्य पाहून भाविक लोकांचे नेत्र आनंदानें भरून येत. कोणाला नवसाला पावले, कोणाचे मनोरथ पूर्ण झाले म्हणजे त्यानें भंडारखान्यांत धनधान्य आणून टाकावें व त्याचा विनियोग परोपकारार्थ व्हावा असें चालूं झालें. या हिंदु अवलियाचें प्रस्थ फार माजलें हें पाहून कांहीं मुसलमान फकिरांनीं त्यांचा पुष्कळ छळ केला, पण प्रभूंचें अगाध सामर्थ्य त्यांच्या प्रत्ययास आलें तेव्हां त्यांनीं यांचे पायच धरले. धर्म, जातगोत, विद्याधन, या सर्वांच्या पलीकडे अस्सल साधुत्व आहे व सर्वांभूतीं भगवद्भाव उत्पन्न झाला कीं वैरीही आप्त होतात असा सार्वत्रिक नियम आहे. कांहीं मुसलमानांनीं मिळून आपल्यांतल्या एका जारणमारणविद्या जाणणाऱ्या माणसा-कडून प्रभूवर दुष्ट प्रयोग केला, पण प्रभूंनीं अंतर्ज्ञानानें तो प्रकार जाणून मंतरलेलें लिंबू एक काडी फेंकून परतविलें. दुसरे दिवशीं त्या आसन्नमरण स्थितींत आलेल्या मनुष्यास डोलींत घालून मुसल-मानांनीं आणलें तेव्हां तो प्रभूंच्या पायांवर गडबडां लोळून क्षमा मागूं लागला. प्रभूंनीं त्याच्या अंगावरून ममतेनें हात फिरवतांच

तो बरा झाला. "कोणाचा घातपात यापुढें करण्याची बुद्धि धरूं नकोस, आपलीच दुर्बद्धि आपल्या नाशास कारण होते म्हणून मनुष्यानें शुद्धचित्त ठेवावें व सर्वत्र खुदा पहावा. हिंदुमुसलमानांचा खुदा एक आहे. देव एकच आहे, दोन नाहींत" असा प्रभूंनीं त्यास बोध केला. तो प्रभूंचा अनन्य सेवक झाला. माणिकप्रभूंना हिंदु-मुसलमान दोन्ही धर्मांतले लोक मानूं लागले.

## प्रभूंची ब्रीदावलि

" भक्तकार्यकल्पद्रुम गुरु सार्वभौम श्रीमद्राजाधिराज
योगीमहाराज त्रिभुवनानंद अद्वैत अभेद निरंजन
निर्गुण निरालंब परिपूर्ण सदोदित सकलमतस्थापित
सद्गुरु श्रीमाणिकप्रभु महाराज की जय. "

माणिकप्रभूंनीं आपले धाकटे बंधु नृसिंहराव यांस ब्रह्मज्ञानाचा उपदेश केला. तो प्रभूंनीं आपल्या 'कल्पतरु' नामक ग्रंथांत लिहिला असून सदर ग्रंथ संस्थानांत आहे असें म्हणतात. माणिकप्रभु रात्रीं एकटेच अरण्यांत जाऊन एकांतस्थानीं प्रहरचे प्रहर बसत असत.

४. प्रभूंची स्वारी कांहीं मंडळी बरोबर घेऊन यानंतर यात्रेस निघाली. प्रथम पंढरपुरीं येऊन श्रीविठ्ठलाचें दर्शन घेतलें. त्या प्रसंगीं त्यांनीं विठ्ठलावर एक पद व आरती केली. 'आज विटेवरी नीट विठ्ठलसखा देखियला गे' हें पदाचें ध्रुवपद आहे.

## विठ्ठलाची आरती

जयदेव जयदेव जय पुंडलीकवरदा ।
अव्यक्ता व्यक्ती येउनि रक्षिसि निजब्रीदा ।। ध्रु० ।।
समपद कटिकर ठेवुनि भक्तांस्तव उभा ।
त्वंपद तत्पद वारुनि असिपदाचा गाभा ।। जय० ।। १ ।।

जागृति स्वप्न सुषुप्ती तुर्यातित वीट।
त्यावरि मूर्ती तूझी स्वतःसिद्ध नीट ॥ जय० ॥ २ ॥
पिंडब्रह्मांडाविण पंढरपुरवासी।
ठेवी दिन माणिक हा निज पायांपाशीं ॥ जय० ॥ ३ ॥

कांहीं दिवस स्वारी पंढरीस राहिली व नंतर चिंचवड, जेजुरी, कोल्हापूर, नीरानरसिंग, तुळजापूर, इ. क्षेत्रें पाहून माहुरक्षेत्रास गेली. तेथें श्रीदत्तात्रेयावर माणिकप्रभूंनीं कांहीं पदें, आरत्या व अष्टकेंही केलीं.

## श्रीदत्तावर पद

धरियले गे माय श्रीगुरुचे पाय। मीपण जेथें समूळ गेलें तूंपण कैंचें काय? ॥ धृ० ॥ कार्यकारण भाव हेही झाला वाव। त्रिपद महावाक्य याचा करितां अनुभव ॥ १ ॥ शबलद्वय गेलें शुद्धपण आलें। असिपद तेंही येथें समूळ मिथ्या झालें ॥ २ ॥ सर्वात्मक एक सद्गुरुपाय देख। माणिक म्हणे गुरु शिष्याचा थारु ॥ ३ ॥

माणिकप्रभूंनीं रामेश्वरपासून बद्रीनारायणापर्यंत सर्व प्रसिद्ध तीर्थक्षेत्रें पाहत दक्षिणोत्तर यात्रा केल्या व परत कल्याणीस आले. सर्वत्र आनंदीआनंद होऊन उत्सव महोत्सव चालू झाले.

५. यानंतर कोणाचा ब्रह्मसमंध काढला, कोणाची पोटशूळाची व्यथा दूर केली, कोणाला महाव्याधीपासून सोडविलें, कोणाचें दारिद्रय विच्छिन्न केलें, कोणाला पुत्रप्राप्तीचे आशीर्वाद देऊन संसारांत बसविलें, अधिकारपरत्वें कोणाला योग शिकविला, कोणाला ज्ञान सांगून कृतार्थ केलें, कोणाला भक्तिमार्गाला लावलें याप्रमाणें जनाच्या आधिव्याधि दूर करीत श्रीमाणिकप्रभूंनीं जगदुद्धाराचें महत्कार्य केलें. त्यांच्या दर्शनासाठीं लांबलांबूनचे लोक येत.

सारी मोंगलाई तर त्यांच्या पुण्यप्रतापानें हादरून गेली. दर्शनाबरोबर लोक प्रसन्नता पावत. प्रभूंचे हजारों शिष्य झाले व हजारों लोक दर्शन-प्रसाद घेऊन जात असत. प्रभू कधीं चालकापूर येथील श्रीहनुमंत सन्निध राहत, कधीं मैलारक्षेत्रीं राहत. स्वच्छंद कारभार. मनास येईल तेथें जात. प्रभूंनीं शेवटीं मणिगिरि म्हणून हुमणाबादेहून एक मैलावर गांव आहे तेथें वस्ती केली व त्यालाच लोक माणिकनगर म्हणूं लागले. प्रभू जातील तेथें ऐश्वर्य त्यांच्या मागेंच धांवत जाई व 'नित्यश्रीर्नित्यमंगलं' असा दरबारी थाट उडून जाई. माणिकप्रभु यांच्यासारखें वैभव राजामहाराजांनींही कधीं पाहिलें नसेल. प्रभूंनीं हळीखेड येथें मोठ्या समारंभानें एक यज्ञ केला त्या समयीं श्रीशंकराचार्य नृसिंहभारतीही आले होते. नंतर प्रभु गाणगापूर क्षेत्रीं जाऊन आले. माणिकनगरचें माहात्म्य माणिकप्रभूंच्यामुळें वाढत चाललें. हें नगर गुलबर्ग्यापासून थेट उत्तरेस ४१ मैलांवर आहे. तेथें प्रभु जाण्यापूर्वीं अगदीं जंगल होतें, पण तें जंगल जाऊन तेथें अल्प काळांतच रमणीय नगरी दिसूं लागली. माणिकप्रभूंपाशीं पुष्कळ द्रव्य आहे असें समजून हैदराबादेहून दोनचारशें रोहिले लोक तें लुटून नेण्यासाठीं माणिकनगरीस आले. प्रभूंनीं हें ओळखून त्यांस प्रेमानें जेवूं घातलें. तरी त्या चोरांची दुर्बुद्धि हटली नाहीं व त्यांनीं मध्यरात्रीं छापा घालण्याचा बेत केला. ते चोर हत्यारें सावरून जागेवरून उठणार तों एकासही जागेवरून उठवेना; ते सारे जागच्या जागीं खिळले गेले! तेव्हां ते प्रभूंस शरण गेले. प्रभूंनीं त्यांस सदुपदेश केला, वस्त्रपात्र व रोख रुपये दिले व 'कोणासही यापुढें उपसर्ग करणार नाहीं' असें कबूल करवून त्यांस सोडून दिलें!

६. इ. स. १८५७ सालच्या जंगी धामधुमीच्या वेळीं हुमणा-

बादेस महंमद नुरोद्दीन नामक एक अधिकारी होता. प्रभूंची भूतदया, भाषणचातुर्य, धर्मनिष्ठा हे गुण सतत १० वर्षें तो नित्य पाहत होता. त्याची त्यांचे ठायीं अत्यंत निष्ठा होती. हिंदूप्रमाणें हैद्राबादेकडील बडेबडे मुसलमानही प्रभूंना महान् अवलिया म्हणून मानीत. प्रभु निरंतर निजानंदीं निमग्न असत. मनोरथ न पुरतां त्यांचेपासून कोणी मागें फिरला नाहीं. त्यांचें सर्वांशीं वागणें इतकें प्रेमळपणाचें असे कीं, ज्याला त्याला प्रभुनिवासस्थान हें आपलें घर वाटे, घराहून प्रिय वाटे. एकदां एक व्यापारी चीनहून जहाजांत पुष्कळ माल भरून मुंबईस येत असतां वाटेंत जहाज बुडूं लागलें, तेव्हां त्यानें माणिकप्रभूंचा धांवा केला व या महा अरिष्टांतून वांचलों तर नफ्यासुद्धां निम्मी रक्कम प्रभूचरणीं अर्पीन असा संकल्प केला. जहाज बुडालें नाहीं, तरलें. त्याच वेळीं इकडे प्रभूंच्या अंगावरील वस्त्रें कारण नसतां भिजलेलीं दिसलीं. कांहीं कालानें तो व्यापारी माणिकनगरास प्रभूंच्या दर्शनास आला व संकल्पाप्रमाणें सर्व रक्कम प्रभूंच्या पुढें ठेवली. ‘ यांत दहा रुपये कमी आहेत रे ’ असें प्रभु म्हणाले. तेव्हां रक्कम मोजून पाहतां खरेच दहा रुपये कमी होते ! त्यानें आणखी २० दिले, पण त्याला १० परत घ्यावे लागले. प्रभूंचें सर्वात्मकपण व सर्वगामित्व असें अलौकिक होतें.

७. प्रभूंचें स्वरूप पाहतांच पूज्यभाव उत्पन्न होई. वर्ण सांवळा, आजानुबाहु, प्रसन्न व दयार्द्र मुखकमळ, शांत व समदर्शी मुद्रा, नेत्रांत दिव्य तेज, मधुर व मोहक भाषण, सत्यनिष्ठ व सदाचारी माणसांविषयीं प्रेम, खल व पामर यांविषयीं दया, अखंड आनंदाकार मूर्ति—असा हा श्रीमाणिकप्रभूंचा अवतार शके १७८७ मार्गशीर्ष शुद्ध ११ भौमवासरीं समाप्त झाला.

८. श्रीमाणिकप्रभूंचें चमत्कारप्रचुर चरित्र रा. गणेश शिवराम टोळे, यांनीं शके १८२३ मध्यें छापून प्रसिद्ध केलें असून प्रभूंची ' पद्ममाला ' संस्थाननेंच प्रसिद्ध केली आहे. प्रभूंची गादी त्यांच्या कनिष्ठ बंधूंचे चिरंजीव श्रीमार्तंडप्रभु हे चालवीत असून यांचाही अधिकार थोर आहे व यांचीही पद्यरचना सुंदर आहे. श्रीमाणिकप्रभूंचीं चार पदें खालीं देतों :–

१

यादव माधव स्मरण करा रे ।। धृ० ।।
दृश्य पदार्थ अशाश्वत मानुनि । चिद्रुप नेत्रिं भरा रे ।। १ ।।
सर्व घटीं हरि व्यापक जाणुनि । निश्चय ठेविं बरा रे ।। २ ।।
माणिक म्हणे हें गुज कळायास्तव । सद्गुरुचरण धरा रे ।। ३ ।।

२

बाई माझ्या मनीं वसे श्रीराम । विसरूनि गेले सर्व गृहकाम ।। ध्रु०।।
अंतर बाहिर व्यापक तोची । योगी मनविश्राम ।। २ ।।
माणिक म्हणे मज प्राप्तचि झालें । माझें जें निजधाम ।। ३ ।।

३

(गोपी उद्धवास म्हणतात):–

सगुणरूप नयनीं नयनीं आधि दावा ।।
मग तुम्हि वेदांतचि गावा ।। ध्रु० ।।

तुम्हीं तरि म्हणतां हरि हा हृदयस्थ । हे तंव जाणती समस्त ।।
नव्हों आम्ही योगी राहूं ध्यानस्थ । रिकामा वाढवूनि प्रस्थ ।।
भक्तीविण ज्ञान (हा वेदांत) निर्फळ मानावा ।। मग० ।। १ ।।

दह्यादुधाची दुधाचि करित चोरी । ठकविल्या गवळयांच्या पोरी ।।
चटक लावील्या लाविल्या लहानथोरी । यशोदे बांधिली ज्या दोरी
दामोदर तो दर तो आणावा ।। मग० ।। २ ।।

यमुनातीरीं तीरिं वाजवी वेणू । सवें गोपाळ चारि धेनू ।।
ब्रह्मादिक जे वंदिती पदरेणू । दर्शनसुकृतफळ नेणूं ।।
साहकाराचा आनंद मानावा ।। मग० ।। ३ ।।

रासक्रीडेचें क्रीडेचें सुख फार । हृदयिं आठवे वारंवार ।।
सुंदर रूपडें रूपडें सुकुसार । मूर्ति लावण्यरती सार ।।
**माणिक**प्रभु तो नेत्रीं वसवावा ।। मग० ।। ४ ।।

मी हैद्राबादेस भटजी बापूंच्या ( पृ० ७०–७४ ) भेटीस एके प्रभातीं गेलों असतांना त्यांनीं हें पद मंजुळ स्वरानें गाइलें. पदांत सगुण प्रेमाची किती लूट आहे हें प्रेमळांनाच ठाऊक ! आम्हां उभयतांच्या नेत्रांतून घटकाभर आनंदाश्रु वाहिले व आम्हीं गोपी-उद्धवसंगतींतला श्रीकृष्णप्रेमानंदाचा अनुभव घेतला.

# ३६. रमावल्लभदास

१. उत्तर व दक्षिण कानडा प्रांतांत श्रीकृष्णभक्तीचा प्रसार करणारे प्रेममूर्ति श्रीरमावल्लभदास यांचा जन्म दौलताबादेकडे शके १५३२ मध्यें झाला. यांचे वडील अंबाजीपंत राळेरासकर हे अंबरखान नामक यवन सुभेदाराचे कारभारी होते. त्यांस श्रीअंबाकृपेनें एक पुत्र झाला त्याचें नांव त्यांनीं 'तुकोपंत' ठेवलें. तुकोपंताचें लग्न १२ वे वर्षीं होऊन १८ वे वर्षीं त्यास वडिलांचा कारभार मिळाला. थोड्याच वर्षांत देवगिरीवर परचक्र आलें. त्यांशी तुंबळ युद्ध झालें व घोडे, हत्ती, जवाहीर मागें टाकून शत्रु पळून गेले. या युद्धांत तुकोपंतांनीं मर्दुमकी केली. लुटींत तुकोपंतास अलभ्य लाभ झाला. श्रीनाथभागवताची प्रत सांपडली. याचा तुकोपंताच्या सात्त्विक मनास परम लाभ वाटला. त्यांनीं ती पोथी देवापुढें ठेवून साष्टांग नमस्कार घातला व तेच दिवसापासून नाथभागवताच्या पारायणास प्रारंभ केला. नाथभागवत अमृतसागर आहे. त्यांत बुड्या मारतां मारतां तुकोपंताची वृत्ति तन्मय झाली, भक्तिसुखाच्या आंदोलनांनीं चित्त प्रसन्न झालें, प्रपंचाविषयीं वैराग्य होऊन सत्संगीं प्रेमा जडला, व श्रीगुरुप्राप्तीची तीव्र उत्कंठा लागली. त्यांना गोदातीरीं लक्ष्मीधरदास यांना भेटले. यांजवर अनुग्रह केला, व यांचें नांव त्यांनीं 'रमावल्लभदास' ठेवलें. हेच म्हणतात:—

'श्री' नामे शोभा येत। 'रमा' नामें भुक्ति देत।
'वल्लभ' नामें मुक्ति देत। 'दास' नामें प्रेम लेत॥ ५॥

श्रीरमावल्लभदासांनीं 'बृहद्वाक्यवृत्ती'वर विस्तृत टीका केली आहे,

तींत आपुली गुरुपरंपरा दिली आहे. नारायण–ब्रह्मा–नारद–व्यास–शुक–परीक्षिति–गौडपादाचार्य–गोविंदपादाचार्य–शंकराचार्य-श्रीधर ( भागवतटीकाकार )–विज्ञानाश्रम–आनंदाश्रम–लक्ष्मीधर–रमावल्लभदास. या परंपरेचा विचार करितां ' धरोनि अभेद हरिगुरु–भजन । बहुत संत झाले ज्ञानघन ' हा सिद्धांत पटतो, अद्वैतसिद्धांत व सगुणभक्ति यांचा यांत मिलाफ आहे. नाथभगवतांत तुकोपंतांस हेंच रहस्य सांपडलें, श्रीगुरूंनीं त्यांस हेंच उपदेशिलें, हेंच त्यांच्या जिव्हारीं बिंबलें, व हेंच त्यांनीं आपल्या शिष्यांस वाटलें व ग्रंथांतरीं प्रकट केलें, ज्ञानेश्वरनाथतुकोबांच्या परंपरेंत हेंच तत्त्व आहे. तुकोबांनीं हें पुण्यप्रांतीं शिकविलें व त्याच वेळीं रमावल्लभदासांनीं कानडा प्रांतांत याचा प्रसार केला. रमावल्लभदासास प्रवरासंगमक्षेत्रीं अनुग्रह मिळाला.

पर्वकाळीं श्री गोपाळविद्या । उपासना देतांच सुविद्या ।
प्रकटली गेली अविद्या । स्फूर्ति होऊं लागली ॥ ११–४३ ॥

गोपाळविद्या म्ह० श्रीकृष्णोपासना. निःसीम कृष्णभक्तीनें हे कृतकृत्य झाले. श्रीकृष्णभक्तीचा परमानंद यांनीं अपार लुटला व यांना त्या कामीं श्रीगोपाळगोसावी हे एक भक्त भेटले. उभयतांनीं गोदावरीतीरीं वास केला. तुकोपंतांनीं ' म्लेंच्छसेवा ' अर्थातच सोडून दिली.

२. वाईक्षेत्रीं त्यांना उमावल्लभदास नामक एक शिवभक्त भेटले व दोघांनीं हरिहरैक्यप्रेमा मनमुराद लुटला. तेथें त्यांनीं वाक्यवृत्तीवरील टीकेस प्रारंभ केला व ती टीका कोंकणांत संचार करीत असतांना संपविली. त्यांनीं दशमांतील श्रीकृष्णजन्माध्यायावर छोटीशी टीका शके १५५५ मध्यें लिहिली व तिचें नांव ' दशकनिर्धार ' ठेवलें. श्रीरमावल्लभदासांनीं गीतेवर ' चमत्कारी टीका ' नामक एक टीका केली. ती हुबळीचे ह. भ. सुब्राव गोपाळ उभयकर

हे रामचंद्रपंत कामत यांच्या साह्यानें सांप्रत छापवीत आहेत. यांनींच रमावल्लभदासांचें 'श्रीकृष्णजयंतीव्रतोत्सवभजन' फार भक्तिपूर्वक उत्कृष्ट छापलें आहे. 'गुरुवळी' ग्रंथ शके १५५८ मध्यें झाला. श्रीरमावल्लभदास हे कृष्णभक्तीचा आनंद लोकांना देत शिष्य-मंडळीसह कानडा प्रांतांत शिरले. शिवरात्रीच्या पर्वकाळीं ते गोकर्ण-क्षेत्रीं आले. तेथें त्यांना एक अत्यंत अधिकारी जीव भेटला. लक्ष्मी-बाई नांवाची एक सारस्वत ब्राह्मणाची एक सती तेथें स्नानार्थ आली होती. तिची त्यांजवर पूर्ण निष्ठा बसली. तिची परमार्थाची 'आवड' पाहून त्यांनीं तिला श्रीकृष्णोपासनाव्रत दिलें, तिनेंही त्याचें अनुष्ठान अत्यंत भक्तीनें केलें. गुरूंनीं तिचें नांव 'आवडी' असेंच ठेवलें, व त्यांच्या निजभक्तिभांडाराचें संपूर्ण धन तिनें आपल्या एकनिष्ठ भक्तीनें आपलेंसें केलें. रमावल्लभदास तिच्या भक्तीस्तव तिच्या गांवीं म्ह० मल्लापूर (ता. कुमटा, जि. कारवार) येथें गेले. तेथें श्रीकृष्णजयंतीचा उत्सव त्यांनीं मोठ्या समारंभानें केला व तिचे पति नारायणआप्पा यांसही अनुग्रह दिला. आप्पा लवकरच नगर संस्थानचे दिवाण झाले. कांहीं काळानें ते ती नौकरी सोडून स्वग्रामीं आले तरी नगरच्या राजानें त्यांना गैरसप्पा व चंदा-वर या उभय प्रांतांचा अधिकार दिल्यामुळें त्यांचें आडनांव 'उभय-कर' असें पडलें. श्रीकृष्णजयंतीचा उत्सव दरसाल होऊं लागून 'आवडीचा मठ' श्रीकृष्णप्रेमीजनांस विश्रांतिस्थान झालें. तेथें जयंत्युत्सव हा कालपर्यंत गुरुसांप्रदायविधीप्रमाणें उत्तम प्रकारें होत असतो. महाराष्ट्रांत भिन्नभिन्न प्रांतांत अनेक सत्पुरुष होऊन त्यांनीं भागवतधर्माचा प्रसार केला. हेंच कार्य कानडा प्रांतांत रमा-वल्लभदासांनीं केलें आहे. त्यांचे मुख्य शिष्य दोन. एक 'आवडी' व दुसरे 'राघवदास.' राघवाचा मठ शिराली (चित्रापर) येथें

आहे. त्यांनीं मराठी, कानडी व हिंदुस्थानी भाषांत सुंदर पदें, ध्रुपदें, गज्जली, ठुंबऱ्या वगैरे केल्या आहेत. त्यांनीं आपल्या ग्रंथांत रमावल्लभदासांची त्रोटक हकीकत दिली आहे. रमावल्लभदासांच्या सांप्रदायानुसार श्रीकृष्णजयन्तीव्रत कानडा प्रांतांत मल्लापूर (आवडी मठ) व शिराली (राघवगोसावी मठ) या शिवाय कुंदापुराजवळ जोगवाणी व गोसावी मठ या मठांत तसेंच कारवार, भटकळ, मंगळूर, पुत्तुर, हुबळी येथें होतो.

१

मुळीं लागतां सहज । मायबाप नाहींत मज ॥ १ ॥
झालों पोसणें संतांचें । मन कोंवळें तयांचें ॥ २ ॥
पूर्वीं संध्या ते त्रिकाळ । प्रेमसंध्या सर्वकाळ ॥ ३ ॥
पूर्वीं होतों मतभेदी । आतां झालों जी अभेदी ॥ ४ ॥
पूर्वीं बोलिलों लौकिक । आतां बोले अलौकिक ॥ ५ ॥
पूर्वीं मान म्यांच घ्यावा । आतां मान सर्वां द्यावा ॥ ६ ॥
पूर्वीं रुचे चतुरपण । आतां भोळीव आपण ॥ ७ ॥
पूर्वीं मुक्तिलागी बाहे । आतां भक्ती वास पाहे ॥ ८ ॥
पूर्वीं रुचे रूपनाम । आतां त्याचें नाहीं काम ॥ ९ ॥
नामरूप जाउनि भास । अवघा रमावल्लभदास ॥ १० ॥

२

यांची पुढील पदें फार गोड आहेत :--

(१) वांचो हा देह वांचो रे । हरिभक्ति नाहीं तरी चचो रे ॥
(२) विठ्ठल वाचे ! वोल । घडि घडि विठ्ठल वाचे ! बोल ॥
(३) गोपाळु पावला । स्वामी माझा गोविंदु पावला रे ॥
(४) नंदाच्या नंदना मनाच्या मोहना तुजवांचुनि ताप जाईना

श्रीरमावल्लभदासांची कविता प्रेमळ आहे व त्यांच्या व्रतोत्सव-भजनाचा समारंभ अद्याप वरील मठांतून प्रेक्षणीय होत असतो.

हरि होउनि हरिगुण गावे । तेणें आपण उद्धरावे ।। ध्रु० ।।
अवघा बोले चाले हरी । ज्याची कथा तोची करी ।। १ ।।
होऊनीयां श्रोता वक्ता । करी आपुली आपण कथा ।। २ ।।
विश्वव्यापक परिपूर्ण । अवघा एकचि नारायण ।। ३ ।।
कैंचा रमावल्लभदास । अवघा हरीचा उल्हास ।। ४ ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ................ वि: ................
क्रमांक ................ नोंद दि ................

# ३७. चिदंबर दीक्षित

**जन्म** :–कार्तिक वद्य ६ शके १६८०.

**निर्याण** :–पौष वद्य ४ शके १७३७.

१. परमेश्वर अवतार घेतो, सर्वगत निर्गुण निराकार परमात्मा सगुण साकार मानवदेवधारी बनतो हा सिद्धांत दुर्दैवानें हल्लींच्या कांहीं लोकांना विचारणीय किंवा विश्वसनीय वाटत नाहीं, पण सिद्धांताची सत्यता ही कांहीं कोणाचे विचारसरणीवर अवलंबून नसल्यामुळें लक्ष देण्याची गरज नाहीं. तथापि निर्मळ बुद्धीचे जिज्ञासु आक्षेपक जे असतील त्यांनीं बंगल्यांतील सुप्रसिद्ध शिशिरकुमार घोस यांनीं "लॉर्ड गौरंग" नामक दोन इंग्रजी व्हॉल्यूम्समध्यें श्रीचैतन्यस्वामी ऊर्फ "गौरचंद" या अवताराचें फारच सुरस व दिव्य चरित्र लिहिलें आहे, त्याची सुंदर प्रस्तावना तरी एकवार वाचावी अशी प्रेमाची सूचना आहे. श्रीगौरंगादिकांसारखे भगवदवतार जर मधून मधून झाले नाहींत तर धर्मज्ञानाचें रक्षण न होतां भक्तिमार्गही नीट चालणार नाहीं ही गोष्ट त्यांत युक्तिबुद्धीस धरून सप्रमाण सिद्ध केली आहे. शिशिरकुमार घोस हे अनेक प्रकारांनीं भगवंताची अवतारग्रहणशीलता प्रस्थापित करून म्हणतात :–

Love is the supreme motive power in man. While its object is merely human. A man's love is not without its troubles, for human beings must necessarily have many defects. The purer the object of love the more durable and sweeter is the enjoyment. Thus a man, who has been able to transfer his love to Him, who is absolutely without

a flaw & Whose love for men is disinterested, secures for himself the best object of love and therefore the highest blessing open to him. Now how is this love for God to be attained ? First of all God must bocome man in order to be loved. A man can love only a man. Dissimilars can never love one another.

ह्याचें तात्पर्य एवढेंच आहे कीं " मनुष्याच्या अंतःकरणांत जी प्रेमकला आहे तीच त्याच्या सर्व क्रियांच्या मुळाशीं आहे. प्रेम ही जगांत सर्व शक्तींत महत्तम शक्ति आहे. प्रेमाचा विषय जोंपर्यंत दुसरा मनुष्य आहे तोंपर्यंत गुलाबाच्या भोंवतालच्या कांट्यांप्रमाणें त्या प्रेमाच्या मागें संकटें, वियोग, दुःख, अपयश इ. लागलेले असणारच; कारण प्रेमाचा विषय निर्दोष असूं शकत नाहीं. प्रेमाचा विषय जितका अधिक निर्दोष व निर्मल, तितका त्या प्रेमाचा अनुभव अधिक शाश्वत व सुखप्रद असतो. म्हणून स्त्रीपुत्रगृहादिकांच्या ठिकाणीं जें आपलें प्रेम आहे तेंच श्रीहरीकडे वळविणें हें आपलें मुख्य काम आहे. " या प्रीतिरविवेकानां विषयेष्वपायिनी। त्वामनुस्मरतः सा मे हृदयान्मापसर्पतु " एवढेंच भक्त देवापाशीं मागत असतात. प्रेमाचा फक्त विषय बदलायचा आहे. निर्दोष असा एक परमात्मा आहे व त्याचें जीवावर निरपेक्ष प्रेम आहे, म्हणून आपल्या प्रेमसर्वस्वाचा विषय आपण श्रीहरि करावा म्हणजे आपण पूर्ण व अखंड सुखशांतीचा अनुभव घेण्यास पात्र होऊं. आतां हें प्रेम श्रीहरीकडे वळवायचें म्हणजे श्रीहरि आपल्यासारखाच देह धरून आला पाहिजे. प्रेम सारख्यासारख्यांत होतें, समविषमांचें प्रेम खरें कसें असूं शकेल ? " त्याचप्रमाणें :–

It is perfectly true that God is above all human emotions, but if He does not assume human emotions, then

man's association with Him becomes an impossibility and religion is reduced to a farce. In the same manner, it is all quite true that He is as big as the Universe, but unless He assumes the form of a human being there cannot be any true relationship between Him and man

म्हणजे " परमात्मा निर्विकार आहे. तो मनुष्याला सहज अशा प्रेमादि सर्व विकारांहून वेगळा आहे हें खरें, पण प्रेमादि विकार-मय तो झाला नाहीं तर मनुष्याचा त्याच्याशीं समागम होणें हें अशक्य होऊन धर्म म्हणजे एक फार्स होऊन बसेल. त्याचप्रमाणें हेंही खरें आहे कीं, तो विश्वाएवढा मोठा आहे, त्याला आपण विश्वात्मा व सर्वात्मा म्हणतों, पण तो मनुष्य झाल्याशिवाय म्हणजे सगुण साकार झाल्याशिवाय त्याचा व मनुष्याचा संबंधच होऊं शकणार नाहीं. " कारण असें पहा कीं :–

Love exercises the greatest influence upon man. For a man to love God, either God must become man, or man must become God. But a man can never become God, so that if there is to be such a thing as love between God and man it is necessary that God should come down to earth and appear in the shape of man for the purpose of this union.

याचा अर्थ असा आहे :–" प्रेमप्रीतीचा मनुष्यावर सर्वांपेक्षां अधिक परिणाम होतो. मनुष्याचें देवावर पूर्ण प्रेम बसण्यास देव तरी मनुष्य झाला पाहिजे, किंवा मनुष्य तरी देव झाला पाहिजे. जीव तरी शिव झाला पाहिजे किंवा शिव तरी जीव झाला पाहिजे. पण मनुष्य देव होऊं शकत नाहीं म्हणून देवालाच मनुष्य झालें पाहिजे. मनुष्य व देव यांचें अन्योन्यप्रेम व्हावें असेल तर देवच मनुष्य

म्हणजे सगुणसाकार होऊन आला पाहिजे, तो नामरूप घेऊन ह्या मनुष्यलोकीं अवतरला पाहिजे." आणि प्रेमळ भक्त जे जे आजपर्यंत झाले त्यांच्यासाठीं देव सगुणसाकार होऊन आलेला आहे. भक्ताला पूर्णप्रेमानुभव पाहिजे असतो व तो त्याला निरालंबीं मिळत नाहीं. तुकाराममहाराज स्पष्टच म्हणतात:–

देवाहातीं रूप धरवूं आकार। नेदूं निराकार होऊं त्यासी ।। १ ।।

भक्त देवापाशी मागतो:—

नको ब्रह्मज्ञान आत्मस्थितिभाव। मी भक्त तूं देव ऐसें करी ।।१।।
दावी रूप मज गोपिकारमणा। ठेवूं दे चरणांवरी माथा ।।२।।
पाहीन श्रीमुख देईन आलिंगन। जीवें निंबलोण उतरीन ।।३।।
पुसतां सांगेन हितगुजमात। बैसोनी एकांत सुखगोष्टी ।।४।।
तुका म्हणे यासी न लावी उशीर। माझें अभ्यंतर जाणोनीयां ।।५।।

या अनुभवास पटणाऱ्या विवेचनावरून श्रीगौरंग, श्रीपादवल्लभ इत्यादि भगवदवतार भक्तिज्ञानमार्ग उज्ज्वल राखण्यास किती उपयोगी पडले हें सहज दिसून येईल.

२. श्रीगौरंगप्रभूचा अवतार संवत् १५४२ (शके १४०७ चे सुमारास) फाल्गुन शुद्ध पौर्णिमादिवशीं बंगाल्यांत नडिया प्रांतांत झाला. हा श्रीकृष्णदेवाचा पण मिश्र अवतार होता. श्रीपादवल्लभ नामक दत्तदेवाचा अवतार तत्पूर्वीं दक्षिणेकडे पीठापुरांत झाला होता. पुनः तिसरा अवतार करजपुरांत झाला होता. त्यांच्या महाभाग्यवंत मातापितरांचीं नांवें अनुक्रमें सौ. अंबाबाई व माधवभटजी हीं होत. श्रीपादवल्लभ स्वामींनीं आश्विन वद्य द्वादशी दिवशीं (शक वर्ष कोठें मिळत नाहीं) आपला अवतार संपविला म्हणून त्यांच्या पुण्यतिथीस श्रीगुरुद्वादशी म्हणतात आणि श्रीनरसिंहसरस्वती स्वामीमहाराज हे माघ वद्य प्रतिपदेदिवशीं (शके १३८०)

गाणगापुराहून श्रीशैलास जाऊन लौकिक दृष्टीनें गुप्त राहिले. अवतार संपविला म्हणून त्या दिवसास श्रीगुरुप्रतिपदा म्हणतात. हे दोन्ही उत्सव श्रीक्षेत्र वाडी व गाणगापूर वगैरे दत्तोपासनास्थलीं होत असतात. श्रीगुरुचरित्रनामक सर्वमान्य ग्रंथांत याच दोन अवतारांचें चरित्र आहे. श्रीमाणिकप्रभूंचें चरित्र मराठींत प्रसिद्ध आहे. श्रीचिदंबरचरित्र मात्र असावें तितकें अद्याप प्रसिद्ध नसल्यामुळें मुमुक्षु वाचकांसाठीं देतों. श्रीचिदंबर महाराजांचा अवतार बेळगांव जिल्ह्यांत परसगड तालुक्यापैकीं मुरगोड (महाल) येथें शके १६८० सालीं झाला.

३. **श्रीचिदंबरमहाराजांच्या** घराण्याची पूर्वींची माहिती विशेष कोठें मिळत नाहीं. तरी चार पांच पूर्वपिढ्यांची थोडक्यांत खात्रीलायक माहिती सांपडली आहे, ती अशी कीं, हें घराणें मूळ विजापूर प्रांतांतील **गोठें** या गांवचें राहणारें. यांचें पूर्वींचें उपनांव जोशी. चिदंबरमहाराजांचे तीर्थरूप मार्तंडमल्हार यांनीं एक सोमयाग केल्या वेळेपासून या घराण्यास दीक्षित हें उपनांव प्राप्त झालें. नागेशभट्ट नामक एक शुक्लयजुर्वेदीय कण्वशाखेचा देशस्थ ब्राह्मण फार सात्त्विक वृत्तीचा होता. त्यापासून शंकरभट्ट व त्यापासून त्र्यंबक जोशी नामक विद्वान् ज्योतिषी, आणि त्यापासून (चिदंबरजनक) **मार्तंडदीक्षित** झाले. यांना ऐन तारुण्यांतच कांहीं बलवत्तर पूर्वसंस्कारानें जोशीपणाचा कंटाळा येऊन ते श्रीक्षेत्र काशी येथें विद्याभ्यास व तपोवृद्धि करावयास जाऊन राहिले. '**ब्राह्मणस्य तु देहोऽयं क्षुद्रकामाय नेष्यते**' ह्या भागवती श्लोकानें त्यांच्या मनास एकदां फार चटका लागला. कांहीं दिवसांनीं त्यांचें तपोबल उदयास येऊन तेव्हां मणिकर्णिकेच्या घांटावर असलेल्या **स्वयंप्रकाश** नामधारक स्वामींचें त्यांना **दर्शन** झालें. त्यांचे सेवेस

राहून गुरुभक्तीचा संचय झाल्यावर कांहीं तिखट परीक्षेच्या प्रकारानें हे **मार्तंड** जोशी स्वामींच्या पसंतीस उतरले आणि त्यांनीं त्यांचेवर अनुग्रह केला. नंतर केवळ गुर्वाज्ञेसाठीं ते बेळगांव जिल्ह्यांत मुरगोड (महाल) मुक्कामीं आपली मंडळी रहात होती तिकडे आले आणि गृहस्थाश्रमी झाले. सौ. लक्ष्मीबाई नामक सुशील पत्नीसहवर्तमान ते प्रपंचपरमार्थ उत्तम करूं लागले. हे चांगले योगशास्त्रसंपन्नही होते. लोकांत यांना मोठी मानमान्यता मिळे. श्रीगुर्वाज्ञेनुसार वंशवृद्ध्यर्थ म्हणून पुत्रप्राप्तीसाठीं मार्तंडदेवाचें क्षेत्र **हिप्परगी** मुक्कामीं जाऊन त्यांनीं सहा महिने कुलदेवाची एकनिष्ठ आराधना केली. मग " दक्षिणप्रांतीं आकाश चिदंबर नामक माझें स्थान आहे तेथें जाऊन अनुष्ठान कर " असा दृष्टांतनिरोप त्यांना झाला. त्याप्रमाणें तेथें सहकुटुंब जाऊन ते बारा वर्षें राहिले. ते स्वत: केवळ निष्काम असे एकांतिक भक्त होते, पण श्रीगुरुवचनप्रतिपालनाच्या पुण्याईनें अनुष्ठानांतीं त्यास भगवान् **चिदंबर** म्ह० शंकर प्रत्यक्ष दर्शन देऊन " मीच तुमचा पुत्र होऊन येतों, निर्भय असा " असें वचन देऊन कृपाहस्त मस्तकीं ठेवून गुप्त झाले. आनंदपूर्ण चित्तानें हें भाग्यवंत दांपत्य पुनः मुरगोडास आलें, आणि लवकरच साध्वी लक्ष्मीबाई गर्भवती झाल्या. मार्तंड दीक्षितांनीं मुरगोडहून एक-दीड कोसाचे अंतरावर असलेल्या **सोगल** (सुगाल) नामक पुण्यस्थळीं जाऊन ब्रह्मतेजोवृद्धीसाठीं गायत्रीचीं तीन पुरश्चरणेंही केलीं. गर्भवती लक्ष्मीबाई फारच असामान्य प्रकारचे डोहाळे होऊन दिवस भरतांच पुत्ररत्न प्रसवल्या, तेंच भगवान् **चिदंबर दीक्षित** होत. त्यांचा जन्म शके १६८० कार्तिक वद्य षष्ठी सूर्योदयानंतर दहा घटका मकरलग्नीं झाला.

**चिदंबरेश्वरांचे** समकालीन साधु त्यांचे पट्टशिष्य जे **राजाराम-**

**महाराज** यांनीं जन्मवेळ दिली आहे :—" प्रात:काळीं सविस्तर। दिवस आला दोनप्रहर ॥ १ ॥ तये वेळीं हा अवतार। प्रगटला चिदंबर." तरी पण मकरलग्न निश्चित केल्यावरून कुंडलीमध्यें कांहीं चूक असण्याचा संभव नाहीं. अब्बूनाना नामक तत्कालीन मिरजेजवळील मशाळ गांवच्या विद्वान् भक्तोत्तमांनीं लिहून ठेविलेल्या ‘ श्रीचरित्र ’ नामक अनेक वृत्तात्मक मोठ्या प्राकृत काव्यग्रंथांत श्लोक सांपडतो तो असा :–

स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शकीं सोळांक ऐशी वरी।
मासीं ऊर्ज सुकृष्ण षष्ठि तिथि हे शुभ्रांशुच्या वासरीं ॥
योग ब्रह्महि कर्ण तो वणिज हा बव्हानसंवत्सरीं।
भोगी तिष्य (?) दिवा चिदंबरगुरु प्रत्यक्ष ये जागरीं ॥ १ ॥

४. श्रीचिदंबरमहाराजांचें चरित्र प्रत्यक्ष पाहून लिहून ठेवणारे तिघे कवि मुख्य होत. हे **अब्बूनाना** (कोकणस्थ ब्राह्मण) **राजाराममहाराज** (बाभूळगांवचे पाटील) आणि **शिवशास्त्री** (तैलंगी ब्राह्मण)–पहिल्यांचा ग्रंथश्लोक, आर्यांचा इत्यादि रूपांचा फारच रसाळआहे. दुसऱ्यांचा सुमारें एक लक्ष अभंगांचा आहे ! तिसऱ्यांचे मात्र संस्कृत श्लोकबद्ध अनेक लहानमोठे ग्रंथ आहेत. पैकीं हल्लीं छापून प्रसिद्धींत आलेली सर्वांची कविता म्हणजे एक सहस्रांशही नाहीं !

५. ज्या स्थळीं प्रभूचा जन्म झाला तें स्थळ (मुरगोडांत) अद्याप नीट राखून ठेविलें असून रोज रांगोळी घालून तेथें आरंभीं नारळ वगैरे ठेवीत असतात. बाकीचे सर्व भाग पडून वाडा नामशेष झाला आहे. कानडी भाषेंत मुरगोड म्हणजे तीन शिंगें किंवा शिखरें अशा सृष्टिशोभेवरून त्या स्थळास "मुरगोड" म्हणतात ! ग्रंथांतरीं ‘ अमरकल्याण ’ किंवा ‘ त्रिशृंगपूर ’ अशीं नांवें सांपडतात. भरतखंडांत द्वादश ज्योतिर्लिंगें आहेत. त्या प्रत्येक नांवाचें एकेक लिंग

मुरगोडांत स्थापन केलें आहे. श्रीचिदंबरअवतारानें अमरकल्याण हें गांवाचें नांव सार्थ झालें. श्रीपादवल्लभादि यतिरूपाचे पूर्णावतारांनीं भक्तिज्ञानयोगादि मार्गांची संस्थापना आणि संन्यासाश्रमाचा जीर्णोद्धार, यवन व हिंदु समाज यांमध्यें फारच उपकारक असा समेट वगैरे पुष्कळ गोष्टी केल्या; पण मातापितरांची आजन्म सेवा व गायत्रीमंत्रोपदेशक पिताच सद्‌गुरु मानून तसें सच्छिष्यभावनेचें सेवाव्रत आणि दुष्ट दुराचारी यांचेंही मन न दुखवितां धर्माचरणाकडे त्यांस वळविण्याचें व 'सर्वांभूतीं भगवद्‌भाव' वृत्तिपालनाचें कडक व्रत हीं पूर्णपणें कोणत्याही पूर्व अवतारानें चालविलीं नव्हतीं तें सर्व ह्या चिदंबरावतारानें करून दाखविलें !

बहुत कठिण कलि हा दुर्धर। भ्रष्टवी आचार चहूं वर्ण ॥ १॥ मुख्य वर्ण तोही आचार लोपला। इतर यातीला पुसे कवण ? ॥ २ ॥ वर्णआश्रमांचा झाला कर्मलोप। कलि महापाप वर्ततसे ॥ ३ ॥ ह्यालागीं अवतार धरिला चिदंबर। **ब्राह्मण आचार अंगें वर्तें** ॥ ४ ॥ अनंतजनांच्या उद्धारालागून। मूर्ति हे सगुण प्रकटली'॥ ५ ॥

६. मग जेव्हां ते अगदीं बाळपणापासून आपल्या लीलांमध्यें कांहीं ना कांहीं अमानुषपणा प्रगट करून देवत्व दाखवूं लागले तेव्हां आईबापांना एकपरी वाईट वाटलें, कीं अशानें प्राकृत लोकांची यात्रा आपल्या घरीं येऊं लागून आपणांस या बालदेवाचें एकांतिक सान्निध्यसुख पोटभर लाभणार नाहीं म्हणून "प्रकट ते लीला दावी बाळपणीं। मातापिता दोन्ही विनविती ॥ ६ ॥ गुप्तरूपें देवा ! असावें आपण। सुख तें संपूर्ण भोगूं आम्हीं ॥ ७ ॥ नाहीं तरी यात्रा मिळतसे दाटी। मग तुशी भेटी दुर्लभ कीं ॥ ८ ॥ **दास** म्हणे लीला प्रकट दावीत। वेष्टण घालीत माया वरी ॥ ९ ॥"

७. आपण देह ठेवीपर्यंत मुलानें आपला अवतारीपणा प्रगट करूं नये अशी मार्तंड दीक्षितांची आज्ञा होती ती त्यानें बरोबर बजाविली. मार्तंड दीक्षितांचें देहावसान शके १७१४ मध्यें झालें; तेव्हांपासून त्यांचें देवपण लोकांत प्रगट झालें. तत्पूर्वी मौंजीबंधनाचे वेळीं व बापाबरोबर संसारांत असतां वगैरे "नहि कस्तूरिकामोदः शपथेन विभाव्यते" या म्हणीप्रमाणें त्यांचें असामान्यत्व दृग्गोचर होईच. चिदंबरांचे बंधु प्रभाकरनामक होते. मार्तंड दीक्षितांचे देहाची उत्तरक्रिया मुरगोड गांवाबाहेर त्यांच्या अनुष्ठानाच्या **केंगेरी** नांवाच्या स्थळीं झाली. दहन झाल्यावर तिसरे दिवशीं त्या जागेवर पांच औदुंबरांचे रोप उद्भवले ते मोठे झालेले पाहिलेले लोक अगदीं अलीकडेही होते. ती जागा चिदंबरांची फार प्रेमाची झाली. रोज तेथें ते जाऊन एकांतांत बसत असत. ब्रह्मचर्याश्रम पूर्ण होतांच ते गृहस्थाश्रमी झाले. सरस्वती व सावित्री नांवाच्या त्यांना दोन बायका होत्या. सहा मुलगे व एक मुलगी अशीं सात अपत्यें झालीं. मुरगोडांत मोठी पाठशाळा स्थापन करून अनेक प्रकारच्या लीला व ज्ञानदान करीत, देशोद्धार व धर्मसेवा करीत, कांहीं वर्षें घालविल्यावर तल्लूरकर देसायांच्या कांहीं प्रकरणानें एक ब्राह्मणहत्या झाल्यामुळें तत्काळ मुरगोडचें ठाणें उठवून चिदंबरमहाराज तेथून बारा मैल प्रभेच्या कांठीं जाऊन राहिले त्यासच **गुर्लहोसूर** म्हणजे कानडी 'गळ हास उरु' (गुरुरायाचें नवें गांव) म्हणतात. तेथें त्यांचा महिमा बराच प्रसिद्ध झाला. बाजीराव पेशवे, बापू गोखले, रास्ते इत्यादि बडे बडे सरदार त्यांचे सेवेंत येऊन रहात असत. त्यांनीं आपणांसाठीं बांधलेले मोठमोठे वाडे अद्यापही तेथें दिसतात. निपाणीकर, नरगुंदकर वगैरे संस्थानिकही चिदंबरप्रभूंचे एकनिष्ठ शिष्य झाले.

८. गुर्लहोसुरास येण्यापूर्वी दीक्षितमहाराज मुरगोडहून प्रथम देवलापुरास (बैलहोंगलाकडे) गेले होते. तेथें हल्लीं नरसोबाचे वाडींत प्रसिद्ध समाधि ज्यांची आहे ते **नारायणस्वामी** आपल्या उपास्य दैवताचे निरोपावरून दीक्षितांचे दर्शनास आले होते ते व **रामयोगी** नामक एक सिद्ध पुरुष यांनीं चिदंबरमहाराजांबद्दल फारच प्रेमादरानें क्वचित्प्रसंगीं लिहून ठेविलेला व पत्रद्वारां भक्तांस कळविलेला एक-दोन गोष्टींबद्दल उल्लेख आमच्या मित्राच्या पाहण्यांत आलेला आहे. देवलापुराहून कुसुगल, शिरहट्टी, वगैरे अनेक गांवें फिरून दीक्षितस्वामी अनेक प्रकारें अनेक भक्तजनांचा उद्धार करून गोण्णगरास आले. या गांवीं चिदंबरदीक्षितांनीं मोठ्या थाटामाटानें यथाविधि **सोमयाग** केला. त्याचें यथार्थ वर्णन श्रीचरित्र-नामक 'अब्बुनाना'कृत प्रत्यक्ष यज्ञसमारंभ वगैरे पाहून लिहिलेल्या मोठ्या ग्रंथांत आहे. "चिदंबराचे यज्ञांत आम्ही स्वतःही वाढीत होतों, पोळ्यांच्या पाट्या वाहून वाहून पाठीस कीण पडलें आहे," असे उद्‌गार प्रेमभराचे रंगांत अक्कलकोटचे स्वामीमहाराजांचे तोंडून ऐकलेले दोन-चार वृद्ध गृहस्थ अद्याप हयात आहेत! यावरून चिदंबरांची योग्यता व अक्कलकोटकर स्वामीमहाराजांची अगम्य आयुर्मर्यादा हीं दोन्ही अधिक कळून येतात.

९. चिदंबराचे अवतारानें सनातन वैदिक धर्माचा उद्धार केला. भक्तिज्ञानाचा प्रसार तर त्यांनीं मोठाच केला. प्राकृत वैदिकभिक्षुकांपासून तों तहत राजेरजवाड्यांपर्यंत मोठमोठे लोक त्यांच्या शिष्यवर्गांत होते. काशीपासून रामेश्वरपर्यंत व द्वारकेपासून जगन्नाथपुरीपर्यंत त्यांच्या कीर्तीचा डंका वाजून राहिला होता व नित्य नवीन नवीन यात्रा त्यांच्या गांवीं येत असे. चारी पुरुषार्थांची प्राप्ति अधिकारपरत्वें करून घेण्यास त्यांच्या चरणकमलीं सर्व

दर्जांच्या सर्व लोकांस सर्वदा मुक्तद्वार म्हणतात तशी मोकळीक होती. गुर्लहोसुरास कांहीं वर्षें राहिल्यानंतर पुनः ते मुरगोडासच आले. दोन्ही गांवांस मोठमोठ्या पाठशाळाही (भोजनगृहांसहित) त्यांनीं ठेविल्या होत्या. अन्नदानाविषयीं म्हटलें तर प्रत्यक्ष अन्नपूर्णा-देवीच त्यांचे दरबारीं नांदत होती म्हटलें तरी चालेल. प्रातःकाळीं स्नानसंध्यापूजादि नित्यकर्में करून नित्य सभा (जुन्या पद्धतीची) भरावयाची व मग भोजन, अध्यापन, पुराणकथाकीर्तनादि कामें करायचीं अशी त्यांची दिनचर्या होती. मोठमोठे ज्ञानी सत्पुरुष त्यांच्या दर्शनास येत असल्यामुळें भक्तिविषयक चर्चा तेथें मुमुक्षु-साधकांना नित्य ऐकावयास मिळत असे. सकाम भक्तही लहानमोठे नवस फेडण्यास सर्वदा येत असल्यामुळें अन्नवस्त्रधनादिकांची प्राप्ति तदपेक्षी जनांस होत असे. संस्थानिक व राजे लोक यांचें जाणें-येणें तेथें होऊं लागल्यामुळें श्रीचरणप्रीत्यर्थ म्हणून होत असणाऱ्या गायनवादनादिकांचा आनंदही मनसोक्त असा लोकांना लुटावयास सांपडे. सारांश, **श्रीचिदंबर दीक्षितांचें** तें एक मोठें संस्थानच झालें व त्या दरबारीं ‘ नित्यश्रीर्नित्यमंगलं ’ चालू होतें. संचारास कोठें कोठें जात, तेथें तेथें स्वामी सर्व प्रकारच्या दैन्यदुःखांचा नाश करून महदानंद करून येत असत.

१०. अशा अवतारी महापुरुषांच्या अवताराच्या चरित्राचें सूक्ष्मपणें निरीक्षण केलें असतां ‘ मिशन ऑफ लव्ह अँड सर्व्हिस ’ (परस्परप्रेम व सेवा अथवा परोपकार) हें जें नवीन म्हणून तत्त्व हल्लीं कित्येकांच्या भाषणांत किंवा लेखनांत फडकत असतें त्याचेंच मूर्तिमंत उदाहरण ते होते असें दिसून येतें; इतकेंच नव्हे तर अशा विभूतीचे सहवासांत असणाऱ्या भाग्यवंतांना ’ ‘ शाब्दिक

सिद्धांतापेक्षां तदनुरूप आचरणाचा परिणाम अधिक होतो' या नियमाची सत्यता पूर्णपणें अनुभवास येत असते.

११. नित्य सभेंत येण्याबरोबर दीक्षितस्वामी प्रथम 'शुभं ब्रूयात्। मंगलं ब्रूयात्। शुभं ब्रूयात्' असें तीन-चारदां म्हणून नंतर आसनावर विराजमान होत. कोणीही केव्हां कशाही कारणासाठीं अमंगल शब्द कोठेंही विनोदानेंदेखील मुखावाटें काढूं नयेत असें ते मंडळीस सांगत. "कर्मेंद्रियांच्या साह्यानें उत्पन्न होणाऱ्या सर्व शक्तींमध्यें वाक्शक्ति अधिक महत्त्वाची आहे आणि अत्यंत पवित्र व उच्च दर्जाची जी इच्छाशक्ति तीसुद्धां वाङ्मयतपाच्या स्वाधीन वरीचशी असते; वाईट शब्दोच्चाराचा परिणाम कोणा जीवास कसा भोगावा लागतो व स्वतः तसा उच्चार करणाऱ्यासही तो तत्त्वतः किती हानिकारक होतो हें कळत नसलें तरी तो उभय-पक्षीं तसा अनिष्ट असतो हें खास" असें ते म्हणत. (म्हणजे पर्यायानें ईश्वर व व्हायब्रेशनचें तत्त्वच ते समजावून देत.) एकदां एक श्रीमान् गृहस्थ प्रारब्धकर्मवशात् अत्यंत दरिद्री स्थितीस पोच-णार हें कळून त्यास तें सुचवावयाचा विचार दीक्षितांच्या मनांत आला, तेव्हां त्यांनीं "बाबा! तुझ्या घरीं मुलेंबाळें फार झालीं, उद्यांपासून नैवेद्यास कण्याभाकरी करीत जाशील तर बरें" असें सांगितलें.

१२. दीक्षितांचें मोडी अक्षर ठसठशीत वळणदार असे. सुमारें सव्वा इंच लांबीपेक्षां कमी बारीक अक्षर त्यांचे हस्तलिखित कागदपत्रांत सांपडत नाहीं. बापू गोखल्यांच्या हातचीं पत्रेंही त्यांना आलेलीं अजून पाहण्यांत येतात. "माझा धाक मानी त्रिभुवनीं लोक॥ यम कुंभीपाक धाक मानी ॥१॥ माझा धाक मानी व्याघ्र-सिंह सर्प। तिहीं लोकीं दर्प माझा असे ॥२॥ माझा धाक मानी

जळस्थळ अग्नी । आकाश पवनीं धाक माझा ॥३॥ " माझा धाक असे राक्षससुरांसी । नामा म्हणे त्यासी उद्धरितों ॥४॥ " हा अभंग वरप्रसादाप्रमाणें त्यांनीं भक्तांना अर्पण केला होता आणि नित्यश: तो म्हणण्यास अनेकांस त्या वेळीं आज्ञापिलें होतें. " यो यच्छ्रद्धः स एव सः ' सगुणोपासकांना हा अभंग जसा उपयोगी आहे तसाच केवळ ज्ञानमार्गीयांना, **रामतीर्थ**स्वामींच्या आत्मविकासाभ्यासकांना, आणि आमचे जुन्या चालीच्या प्रात:स्मरण, रुद्रसूक्तादिकांची तत्त्वानुरूपच " **सेल्फ सजेशन** 'ची पद्धत शोधून काढलेल्या अमेरिकन " न्यू थॉटर्स "च्या रसिक व मार्मिक भक्तांनाही हा अभंग उपयोगी पडेल.

१३. षट्कर्माधिकारांपैकीं प्रतिग्रहाधिकाराबद्दल हल्लीं ब्राह्मणांना धन्यता वाटते. प्रतिग्रह म्हणजे दान घेणें हें एक उपजीविकेस साधन किंवा मोकळें द्वार आहे, श्रेष्ठत्वसूचक चिन्ह नव्हे, असें श्रीचिदंबर दीक्षित म्हणत : " आम्हीं ब्राह्मणांनीं–ब्रह्मस्वरूपीयांनी सर्व जगाचें सर्वस्वदान दुसऱ्यास करतां येण्याजोगें दानशूर व्हावें, हात पसरण्यांतच स्वधर्म मानूं नये " असें ते शिष्यांस सांगत. ते प्रतिपादन करीत कीं " दान देण्यांत धन्यता वाटावी, दान घेण्यांत आनंद मानूं नये. कोणाकडून कांहीं न घेण्याच्या व्रतपरिपालनानें सर्वांस सर्वांचें इष्टदान करण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें. दान घेण्यास ब्राह्मणांस मोकळीक ठेविली आहे, ती निरुपाधिकपणें मोक्षधर्माचें आचरण करून आत्मतेज वाढविण्यासाठींच होय. दातृत्ववृत्तीनें आत्मविकास होतो, आणि प्रतिग्रहासक्तीनें ब्रह्मवर्चस्व नष्ट होतें," अशी त्यांची शिकवण होती. तरी एकदां त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव दिवाकरदीक्षित त्यांनीं पित्याच्या गुरुत्वाचा फायदा घेऊन गांवोगांवच्या लहानथोर शिष्यजनांकडे जाऊन कांहीं महिन्यांनीं

एकदां लक्ष रुपये गोळा करून आणले ! **चिदंबरमहाराजांना** त्या-बद्दल फार खेद झाला; आणि "हे सर्व रुपये बाहेरचे बाहेर गोर-गरीबांस वांटून किंवा विहिरी, धर्मशाळा वगैरे सार्वजनिक कामांत खर्चून टाक नाहीं तर आम्हीं तुझें तोंड पहाणार नाहीं" असा ते आग्रह घेऊन वसले व अनेक दिवस त्यास आपल्या दर्शनास येऊं दिलें नाहीं ! तेव्हां **दिवाकरांनीं** त्यांचेच इच्छेप्रमाणें केलें, घरीं एक पैही ठेवून घेतली नाहीं. आपखुषीनें अनेकांनीं देऊं केलेलीं अनेक इनामें जर त्यांनीं घेतलीं असतीं तर दीक्षितांचें घराणें एखाद्या संस्थानिकाप्रमाणें श्रीमंत राहिलें असतें; पण त्यांना तसें होऊं देणें इष्टच वाटलें नाहीं.

१४. एकदा एक बाई आपणांस मुलेंच होत नाहींत यासाठीं दीक्षितांनीं कृपा करावी म्हणून आली होती. ती पुष्कळ व्रतोपवास करीत असे, पण तिचें अंतःकरण अगदीं प्रेमदयादि गुणांनीं रहित असें होतें. सहज पसाभर भाजलेले हरभरे तिला देऊन 'दूर जाऊन बैस व मी बोलावीन तेव्हां ये' असें दीक्षितांनीं सांगितले. ती त्या-प्रमाणें गेली व हरभरे खात बसली. ती ते खात असतां पांच–सात मुलें खेळत खेळत तेथें आलीं व कोणी तोंडाकडे पहात व कोणी हात पसरून मागतही राहिलीं; तरी एकास दिलें म्हणजे सर्वांस द्यावे लागतील असा विचार करून ते फार गोड हरभरे तोंडावर पदर घेऊन तिनें एकाही मुलास चार दाणेसुद्धां न देतां सर्व खाऊन टाकले. दीक्षितांनीं तिला बोलाविल्यावर ती त्यांकडे गेली तेव्हां "फुकटचे मिळालेल्या हरभऱ्यांपैकीं चार दाणेही जर कोणास तुझ्यानें देववले नाहींत, तर देवानें तुला हाडामांसाचे मुलगे कसे व कां द्यावे बाई ? प्रेम व दया असल्यावांचून केवळ व्रतोपवासांनीं

देव प्रसन्न होत नसतो " असें उत्तर देऊन जमलेल्या मंडळीसही उत्तम धडा महाराजांनीं घालून दिला !

१५. श्रीगुरुकृपेनें अध्यात्मज्ञानारूढ झाल्यावरही कुलधर्म आणि वर्णाश्रमधर्म अवश्य पाळलेच पाहिजेत, अशी त्यांची सक्त आज्ञा असे. " एकमेवाद्वितीयं ब्रह्म " असें नुसतें तोंडानें म्हणून कांहीं लोक शास्त्रविहित कर्माचरणास व व्रतादिकांस नाक मुरडतात ! श्रीचिदंबरदीक्षितांच्या घरीं पूर्वीं प्रत्येक अमावास्येच्या दिवशीं ' ब्रह्मा ' व ' करेव्वा ' यांचें पूजन होत असे. तें महाराजांनीं अवतारसमाप्तीपर्यंत यथाविधि फार प्रेमादरानें चालू ठेविलें होतें. मुरगोडहून गुर्लहोसुरास जाऊन राहिल्यानंतरही ब्रह्मा व करेव्याच्या मूर्ति (कोनाडयांतील दगडाचे गोळे) तेथें नेऊन मुद्दाम त्यांजसाठीं चिमुकली गुढी बांधवून आपल्या वाडयांत स्थापना केली होती. ती गुढी अद्याप गुर्लहोसुर मुक्कामीं त्या जागेवर दिसते. भूतपिशाच्चादिकांप्रमाणें नाना देवदेवतांचें अस्तित्व तर्कटी लोकांचे प्रत्ययास येत नसलें तरी तें नाहींसें मात्र होत नाहीं ! अदृश्य सृष्टींत वावरणाऱ्या मानवी आत्म्यांशीं व देवदेवतांशीं दळणवळण ठेवितां येण्याची योग्यता आमच्यामधून गेली असल्यामुळें तसें दळणवळण पुनः सुरू होण्यास काय करावें हें सश्रद्ध अंतःकरणानें महात्म्यांकडून समजावून घेण्याची बुद्धि आम्हांस होईल तो सुदिन !

१६. **चिदंबर दीक्षितांचा** स्वभाव अत्यंत सदय व शांत, बाणा अगदीं साधा व पोषाखही तसाच शुभ्र वर्णाचा होता. महापातकी माणसांचाही त्यांनीं कधीं धिक्कार किंवा उपमर्द न करतां व आपल्या छळकांची व निंदकांचीही अवहेलना न करतां हा सर्व प्रकृतिदोष आहे एवढेंच म्हणून अशा सर्व जीवांना ते गोड, मृदु आणि बोधपर शब्दांनीच सन्मार्गावर आणित असत. मातापित्यांचे

सेवेची दीक्षा तर त्यांनीं लोकांस आपल्या आचरणावरूनच उत्तम दिली. त्यांचा शरीरवर्ण सांवळा होता. त्यांच्या डोईवर नित्य शुभ्र पागोटें व हातांत जलपूरित पात्र (गंडी) असे. राजाराममहाराज म्हणतात :–

(१)

सगुण सांवळा ब्रम्हीचा पुतळा । देखियेला डोळां चिदंबर ॥ १ ॥
चंद्रकांति ऐसा चिरा साजे शिरीं । भाळीं हे कस्तुरीटिळक शोभा ॥ २ ॥
धोत्र शुभ्रकांठी कासेसी कसोटी । अंगीं शोभे उटी मैलागिरी ॥३॥
त्यावरी हो साजे यज्ञोपवीतशोभा । विद्युलता नभामाजी जैसी ॥४॥
क्षीरार्णव जैसा अंगीचा दुशाला । मेळा भोंवताला ब्राह्मणांचा ॥५॥
**दास** म्हणे चाले त्रैलोक्याचा राणा । बरोबरी नाना यात्रा दाटी ॥६॥

(२)

स्वारी चले चिदंबर । विप्रमंडलीके भार ॥ १ ॥
झांज ढोलकी मंजिरे । प्रेमभजन लगतथ्यारे ॥ २ ॥
बिना सतार मुरली । भजन करत स्वारी चली ॥ ३ ॥
**दास** कहे चिदंबर । लीला बतावे अपार ॥ ४ ॥

१७. एकदां चिदंबर दीक्षित हयात असतां राजारामबुवांनीं भजन आटोपून दीक्षितांची स्वारी शयनगृहीं गेल्यानंतर लगेच शेजारतीचा अभंग रचून म्हटला. त्यांत " सनकादिक भक्त स्तुति-स्तवन करिती ॥ देव सर्वहि मिळोनी जयजयकार गर्जती " हें कडवें म्हणून संपतें तों **लक्ष चरणीं ठेवुनि सुखें करा संसार** असा एक चरण घालण्यास आंतून दीक्षितांनीं निरोप पाठविला तेव्हां राजारामांनीं " आज्ञा सांगुनि धाडी माझा स्वामि चिदंबर " असा उत्तरार्ध जोडून शेवटीं " इंद्रिय कपाट लाउनि दास द्वारीं रक्षण ॥

चला म्हणे सर्वांस माझें साष्टांग नमन ।। " असें एक कडवें म्हणून अभंग संपविला.

१८. सरदारवीर बापू गोखले व त्यांची पत्नीही दीक्षितमहाराजांचे चरणीं एकनिष्ठ भक्ति ठेवून असत व त्यांचीं वारंवार पत्रेंही येत. प्रत्येकांत सेवेची इच्छा आणि कृपाशीर्वादाची मागणी असे. कांहीं दिवसांमागें अशीं दोन पत्रें मुरगोडास वे. शा. सं. प्रभाकर दीक्षितांचे दप्तरांत आमच्या स्नेह्यानें पाहिलीं आहेत.

१९. जे शिवोपासक होते त्यांना दीक्षितमहाराजांनीं शंकरस्वरूपानें भेट देऊन कृतार्थ करीत असावें, व जे वैष्णव असतील त्यांना त्यांचे भावनेप्रमाणें प्रत्यय आणीत असावें; यासाठीं त्या वेळचे अनेक संतमहंत त्यांना हरिहरात्मक अवतार म्हणतात. अवतारमीमांसावेत्त्या शास्त्रकारांचा सिद्धांत असा आहे आहे कीं, जरी ब्रह्मा विष्णु व महेश हे एकाच परमात्म्याचीं भिन्नभिन्न कार्यासाठीं तीन वेगळीं रूपें आहेत, तरी बद्ध असलेलें विश्व मुक्त व्हावें म्हणून स्वतः मुक्त असून बद्ध झाल्यासारखा होतो, अवतार घेतो, वरून खालीं येतो, तो विष्णूच होय; म्हणून अवतार घेऊन भूतलावर लोकहितार्थ नांदणारी देवता म्हणजे विष्णूच होय.

२०. अशा प्रकारें धार्मिक, सामाजिक आणि नैतिक बाबतींत उत्तम व अमोघ असें चालन देऊन ही अवतारमूर्ति वयाच्या सत्तावन्नाव्या वर्षीं मर्त्यजनांच्या दृष्टीआड झाली. त्यांचे पित्याचें समाधिस्थान जिकडे होतें त्या केंगेरींतच त्यांचें पुण्यशरीर अग्निसात् करून दगडी देऊळ बांधून लिंगाची स्थापना केली. त्यांचें शव मुरगोडांतून केंगेरीस पोहोंचेपर्यंत (अर्ध्या मैलापेक्षां कमी अंतर आहे,) हळदकुंकू, बुक्का वगैरे वाटेवर लोकांनीं उधळलेला होता त्याचा रस्त्यावर पडलेला थर सुमारें चार पांच इंच झाला होता म्हणतात !

७

## ३८. साध्वी सुंदराबाई

१. साध्वी सुंदराबाई ह्या गौड सारस्वत असून वेंगुर्लें येथील व्यापारी रा. रा. गणेश काळबा गाडेकर यांच्या त्या पत्नी होत. गाडेकर हे आपल्या व्यवसायांत तसेच परमार्थांतही दक्ष आहेत. श्रीएकनाथीभागवत निर्णयसागर छापखान्यांत छापलेलें—जें रा. रा. लक्ष्मणराव पांगारकर यांनीं टीपा देऊन संपादिलें आहे, त्यांतच गाडेकर यांनीं प्रत्येक अध्यायांतील सार काय तें काढून ओव्यांच्या अनुक्रमानें संगतवार दिलें आहे. कऱ्हाडानजीक वाटेगांव म्हणून गांव आहे तेथें श्रीवासुदेवाचें स्थान असून मूर्ति पंचरसी धातूची श्रीमद्‌भागवतांतील वर्णनाप्रमाणें स्थापन केलेली आहे. श्री. बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांनीं जो सुबक असा फोटो काढला आहे तो त्याच मूर्तीचा होय. तेथील गादीवरील अधिकारी ह. भ. प. वाटोपंत यांजकडून गाडेकर यांनीं उपासना घेतली आहे. या संप्रदायांत दादामहाराज पाटणकर व त्यांचे शिष्य मुमुक्षूंतील प्रसिद्ध लेखक ‘ गोविंदसुत ’ हे आहेत.

२. परमार्थमार्गाला स्त्री अनुकूल असणें हा योग येणें हें सर्वांत फारच भाग्य होय. गाडेकर यांना परमार्थमार्गाला स्त्री अनुकूल होती इतकेंच नव्हे, तर त्यांना परमार्थाकडे वळविण्याला तीच कारण झाली ! यांना पूर्वीं कादंबऱ्या व नाटकें वाचण्याचा फार नाद होता, पण ते नाटकें कादंबऱ्या वाचूं लागले म्हणजे सुंदराबाईंनीं विनोदानें म्हणावें: “ तुमच्या आमच्या जन्माचें नाटक चाललें आहे त्याचा विचार करावयाचा सोडून हें नाटकाचें नाटक वाचून काय मिळणार

आहे ? माणसानें कांहीं देवाचा विचार करावा." याप्रमाणें नेहमीं बोलून गाडेकर यांना परमार्थ ग्रंथ वाचण्याचा सुंदराबाईंनीं प्रथम नाद लाविला ! पुढें उभयतांनींही श्रीवाटोपंतापासून उपासना घेऊन श्रीज्ञानेश्वरी दासबोध इ० ग्रंथांतून अनुभवामृताचे घुटके घेत परमार्थसुख भोगिलें. सौ. सुंदराबाई ह्या प्रपंचांत दक्ष असून परमार्थांतही दक्ष होत्या ही विशेष आश्चर्याची गोष्ट होय ! उभयतां श्रीवासुदेवाचे उपासक असल्यामुळें नेहमीं परमार्थाचा सुखसंवाद उभयतांमध्यें चालावयाचा अशा रीतीनें कालक्रमणा मोठ्या आनंदानें चालत असे. बाईला अभंग व पदें पुष्कळ पाठ येत होतीं. तेविसावे वर्षीं त्यांना उपासना मिळाल्यापासून श्रीवासुदेवाचें ध्यान भजन, पूजन एकनिष्ठेनें चालू होतें. याप्रमाणें त्यांनीं एकवीस वर्षें "उपासनामूर्तिध्यानीं अथवा आत्मानुसंधानीं" राहण्याबद्दल समर्थांची आज्ञा आहे, त्याप्रमाणें कालक्रमणा चालून शेवटीं पौष शु० ११ गुरुवार शके १८३६ रोजीं 'अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरं' हें वाक्य खरें करून दाखवून त्यांनीं देह सोडला.

३. सौ. सुंदराबाई यांना नवज्वर येऊन त्या बेशुद्ध झाल्या. उपचारानंतर जरा शुद्धीवर येत. इकडे सर्व अंग गार पडलें होतें, तरी वासुदेवनामाचा घोष चालूच होता ! नाडीचे ठोके बंद पडले तरी नामस्मरण जोरानें चालूच होतें. शेवटीं गुरुवारीं 'मला माझ्या सुनेकडून कुंकूं लावा ! फुलांची माळ घाला ! मी आतां जातें !' असें म्हटल्याप्रमाणें कुंकूं लावल्यावर सर्व मुलांच्या अंगावर हात फिरवून 'तुमचें कल्याण होवो' म्हणून त्यांस आशीर्वाद दिला. रा. गाडेकर यांनीं विचारलें कीं "सद्गुरूंनीं सांगितलेल्या खुणेवर आहांना ?" त्यांनीं 'होय' म्हणून सांगितलें आणि मुलगा मनमोहन यांस हांक मारून बोलल्या कीं "मनमोहना ! भवजलांतून

सुटल्यें रे सुटल्यें ! " असें सांगून पुन्हां श्रीवासुदेवाचा घोष चालविला, आणि त्यांतच अभंगांचीं कडवीं म्हटली तीं:—

" तूंचि माझी माता तूंचि माझा पिता। तूंचि माझा भ्राता। पंढरिनाथा ! ॥ १ ॥ तूंचि माझी संपत्ति। तूंचि माझी संतति। तूंचि माझा पती। पंढरीनाथा !" असें म्हणून वासुदेवाची मूर्ति पाहिली व शेवटीं 'पतीच्या सहवासानें मला वासुदेव भेटले तेव्हांच मी मेल्यें, आतां आणखी काय मरायचें राहिलें आहे ?' असें म्हणून पुन्हां 'नमो राधाकृष्णवासुदेवाय ! ' असा घोष चालून शांतपणानें त्यांतच प्राणोत्क्रमण झालें ! आला मनुष्य जाणार हें तर ठरलेलेंच आहे, पण अशा प्रकारचे गोड मृत्यु पाहिले म्हणजे आनंद होतो ! उत्तम पुरुषाच्या उपासनेच्या दाढर्यानें जिवंत असतांनाच जे कोणी भाग्यवान् मरणाचें सुख भोगीत असतील त्यांचेंच प्राणोत्क्रमण आनंदानें होतें !

# ३९. श्रीशीलनाथ महाराज

१. शीलनाथ महाराजांची योग्यता फार मोठी होती. त्यांचें अति तीव्र वैराग्य, तपेंच्या तपें उग्र तपश्चर्या, अपकारसहिष्णुता, अहिंसापालन, भूतदया, शांत स्वभाव, निर्लोभता हीं उच्च कोटींतील होतीं आणि ज्ञान तर अपूर्वच होतें. आम्ही पुढें जी नाथांची हकीकत सांगणार आहों ती सर्व त्यांचेच तोंडून श्रवण केलेली आहे.

२. **बालपण** :– नाथमहाराजांचा जन्म हरियाणा प्रांतांत एका गांवीं झाला. पुराणांतून या प्रांतास हरिवन म्हटलेलें आढळतें. या प्रांतांतील लोकांचा धंदा शेतकी आणि ढोरें बाळगून तूप विकणें हा आहे. हा प्रांत गायीम्हशी यांची उत्तम खाण आहे. दिल्लीच्या उत्तम म्हशी याच प्रांतांतील होत. क्षत्रिय कुलांत ह्यांचीं आईबापें जन्मलीं, अर्थात् हे जातीनें क्षत्रिय होते. शिक्षणाबद्दल एवढेंच सांगावयाचें कीं खेडेगांवांत अगोदर शिक्षण नाहींच, त्यांतून शेतकरी, मागासलेला प्रांत, मग काय शिक्षण मुळींच नाहीं. अगदीं अक्षरओळख किंवा शंभरापर्यंत अंकसुद्धां माहीत नव्हते! त्यांच्या बोलण्यांत गायी म्हशी यांना 'धन' म्हणण्याचा प्रघात दिसून येत असे, त्यावरून हेंच दिसतें कीं हरियाण्यांत गो हेंच धन मानण्यांत येतें. वेदामध्यें सुद्धां अमक्यानें अमुक काम करण्याबद्दल इतक्या गायी दिल्या वगैरे वरून 'धन' शब्दानें गायी समजाव्या असें होतें.

३. **गुरुकृपा** :– येथपर्यंत वयाचीं सात आठ वर्षें झाल्यावर त्यांच्या जीवनक्रमास निराळी दिशा लागली. या वयांत नाथांना कांहीं झोंपेंत दिसे, कांहीं ऐकूं येई, पण कोणाला कांहीं विचारा-

वयास अगर सांगावयास गेले कीं, कोणी उत्तर देत नसून त्यांना वेडसरांत काढीत ! असें वर्ष दीड वर्ष चाललें होतें. कर्मधर्म-संयोगानें एके दिवशीं एक कानफाटे नाथ शीलनाथमहाराजांच्या गांवीं आले. त्यांचे चमत्कार पाहून किंवा भाषण ऐकून किंवा लोकांनीं त्यांची स्तुति केलेली पाहून त्यांच्याबरोबर रहावें असें त्यांच्या मनानें घेतलें, आणि एके दिवशीं त्यांची जाण्याची संधि गांठून त्यांच्या मागोमाग घरांत न कळवितां ते चालते झाले ! त्यांचे होणारे गुरु त्यांच्याशीं अत्यंत कठोरपणानें वागले आणि तीन दिवस त्यांची पूसतपास कांहीं एक केली नाहीं. अंगावर यथा-तथा असलेला पोषाख, वस्त्रपात्र कांहीं नव्हतें. ते चालूं लागले कीं नाथमहाराजांनीं त्यांच्या मागें चालावें, थांबतील तेथें थांबावें, तहान लागल्यास पाणी भेटेल तेथें प्यावें. अन्नाचें नांव नाहीं. इतक्या अल्प वयांत इतके कष्ट सोसून गुरूंच्या बरोबर रहाण्याची दृढ इच्छा होतांच गुरूंनीं आपल्याबरोबर रहाण्याची परवानगी दिली, आणि क्रमाक्रमानें उपदेश देऊन हठयोगाचा पूर्ण अभ्यास करवून घेतला. गुरुद्वार किंवा गुरूचा मठ मुंबई-बडोदा रेल्वेपैकीं मीटर गेजच्या भिवानी स्टेशननजीक सुलतानपूर या गांवीं आहे. तेथून जवळच शीलनाथमहाराजांचें जन्मस्थान असावें. आठ दहा वर्षांपूर्वी आपल्या शिष्यांसह वर्ष दीड वर्ष गुरुद्वारीं महाराज जाऊन राहिले असतांना त्यांचा पुतण्या त्यांना भेटावयास आला होता. नाथमहा-राजांस गुरूंनीं पूर्ण हठयोग शिकवून त्यांनीं आपल्याबरोबर देश-पर्यटनही करविलें. या सगळ्या गोष्टींस बारा वर्षें लागलीं. म्हणजे गुरुगृह सोडण्याच्या सुमारास नाथांचें वय सुमारें वीस बावीस वर्षांचें असावें. आपला शिष्य पूर्ण झालेला पाहून गुरूंनीं नाथांना राजयोगाच्या गोष्टी सांगितल्या आणि "तुम्हीं आतां

स्वतंत्रतेनें विचार करण्यास योग्य झालांत, संतांचा संग करा, आणि अधिक ज्ञान मिळवा " असें सांगितलें.

**४. सत्संग :–** गुरूपासून निराळे निघाल्यावर वर्षा दोन वर्षांतच श्रीजोहारनाथ महाराज यांचा सत्संग मिळाला. जोहारनाथ आणि शीलनाथ ही जोडी माळव्यांत ५० वर्षें फार प्रसिद्ध आहे. हे दोन साधू एकाच धुनीवर सुमारें चाळीस वर्षें रहात होते! ते दोघे एकाच गुरूचे शिष्य किंवा गुरुशिष्य असा पुष्कळ लोकांचा समज सहज होत असे, कारण त्यांची सारखी राहणी होती. आम्हीं शीलानाथमहाराजांचें दर्शन घेतल्यावर कांहीं दिवसांनीं जोहारनाथ महाराजांच्या दर्शनास गेलों होतों. त्यांस पाहून आम्हांस व आमच्या बरोबरच्या सर्व लोकांस फार चमत्कार वाटला कीं ह्या दोन मूर्ती अगदीं एकसारख्या कशा? बसण्याचें आसन, बोलण्याची ढब, त्याच त्या गोष्टी, चालण्याची, पहाण्याची, आदरसत्कार करण्याची, प्रश्न विचारण्याची, कामें सांगण्याची, वगैरे सर्व बाबतींत एकच तऱ्हा! फक्त शरीरें निरनिराळीं. जोहारनाथांची शरीराची ठेवण उंचधिप्पाड, वर्ण गोरा, आणि डोळे फार मोठे होते; आणि ते शीलनाथापेक्षां वृद्ध दिसत. शीलनाथांची उंची कमी म्हणजे पांच फूट किंवा एखादा इंच जास्त इतकीच होती. वर्ण तांबूस, वरचे दांत थोडे पुढें आलेले, हात सर्वसाधारण माणसांपेक्षां जास्त लांब, आणि कमरेखालचा भाग पायांपर्यंत लांबट. जोहारनाथांच्या नाकाचा शेंडा जरा राघूच्या चोंचीसारखा होता आणि शीलनाथांच्या शेंड्याची चोंच नव्हती, गोल होती. दोघांच्या डोक्यावर जटा दीड फूट लांबीच्या होत्या. दाढी पाहिली म्हणजे विस्मय वाटे. एकदां तर मोजून पाहिली ती साडेचार हात लांब भरली. दोघांच्या कमरेला अडबंद (करगोटा) लोंकरीचा

सुमारें मनगटासारखा जाड असे. गळ्यांत शिंगी, शैली, पुंगी असावी लागते हा त्या पंथांचा युनिफॉर्म होय ! नेसावयास लंगोटी. दाढी फारच लांब असल्यानें तिच्या घड्या करून बांधून ठेवण्याची यांची रीत असे. धुनी म्हणजे विस्तव. जसा अग्निहोत्री कुंडांत नेहमीं अग्नि राखतो तसा हे लोक आपल्याबरोबर अग्नि राखीत. जमिनीच्या सपाटीपासून सुमारें हातभर उंच गोल ओटा बांधून त्याच्या मध्यभागीं अग्नि ठेवीत. त्या अग्नीपासून दीड दोन हातांवर आपलें बसावयाचें स्थान करीत.

५. **दिनचर्या** :—दोन्ही नाथ सकाळीं चार वाजतां उठून शौचमुखमार्जनादि विधि आटोपून कधीं तापविलेल्या पाण्यानें स्नान करीत आणि अंगाला व केशांनासुद्धां भस्म फांसून नवी लंगोटी नेसून आसनावर बसत, ते रात्रीं अकरा वाजल्याखेरीज बहुधा उठत नसत ! बसण्याचें म्हणजे सिद्धासन नेहमीं असेंच ठेवीत, व फुरसतीच्या वेळीं योगवासिष्ठ ऐकत. जोहारनाथांना वाचतां येत असे आणि शीलनाथांना तेंही पण येत नव्हतें. धुनीची व्यवस्था असल्यास कोणी शिष्य किंवा सेवक अथवा कधीं स्वतःही करीत असत. निजतेवेळीं अग्नि कमी केला जात असे, आणि उठल्याबरोबर त्यांतली गवऱ्यांची राख निराळी करून काढून ठेवीत, कधीं त्या धुनीवर पसरीत आणि वर पाणी शिंपून ठोकून काढीत. त्यामुळें यावर बसण्याचीं वस्त्रें खराब होत नसत. अंगाला लावण्याचें भस्म म्हणजे रानगवऱ्यांची राख किंवा कांहीं त्यावर विशेष संस्कार करून तयार करीत, नंतर सूर्योदय झाल्यावर चहा पण घेत. नऊ दहा वाजतां कोणी घेऊन येईल त्याचा घ्यावा. हे दोघे कधीं हातांनीं स्वयंपाक करीत नसत. जे लोक ईश्वरसंबंधीं ज्ञान विचारीत त्यांच्यांशीं त्यांची चर्चा चाले. संध्याकाळीं सकाळप्रमाणें भोजन

होऊन अकरा बारा वाजतां निद्रा. याप्रमाणें दिनक्रम असे. ह्या दोघा साधूंनीं एका धुनीवर राहून बहुतेक हिंदुस्थानचा प्रवास केला होता. बंगालचा बराचसा भाग, काश्मीर, पंजाब, सिंध व फ्रांटीयर, राजपुताना, मारवाड, गुजराथ, काठेवाड, महाराष्ट्र, मद्रास वगैरे-कडे फिरून हे आलेले होते. मौज वाटेल तितके दिवस एके ठिकाणीं रहावें, नाहींतर उठून दुसरीकडे जावें.

६. साधुलोकांचे मोठे मेळे चार आहेत. त्यांतील प्रत्येक बारा वर्षांनीं येतो; म्हणजे बारा वर्षांत हे चारी येऊन जातात. **सिंहस्थ नाशकास, कन्यागत उज्जयिनीस, वृषभ अलाहाबादेस आणि कुंभ हरिद्वारास भरतात.** सगळ्यांत प्रयाग अथवा अलाहबादचा फार मोठा मेळा भरतो, कारण कीं; तो प्रदेश मध्यावर आहे. ह्या दोन्हीं साधूंची धुनी एक असे, तरी मार्ग क्रमण्यांत चुकीमुळें अलग धुन्या लागत, आणि पुन्हां एकमेकांची खबर एकमेकांस मिळून पुन्हां एक होत. अशीं पस्तीस वर्षें झाल्यावर शीलनाथांनीं आपण स्वतंत्र ( एकाकी ) रहाण्याचें ठरविलें, आणि त्याप्रमाणें त्यांनीं निराळी धुनी करून निराळ्या गांवीं राहूं लागले. आणि त्यांज-कडून (जोहारनाथाकडून) कोणी खबर घेऊन आल्यास " पुढें मागें भेटूं " असें त्यास सांगत.

७. शीलनाथमहाराज एकाकी राहूं लागल्यावर त्यांच्या ज्ञानाचा प्रकाश पडण्यास फारसा वेळ लागला नाहीं. ती वेळ म्हणजे विवेकानंद स्वामींनीं योगावर दिलेलीं व्याख्यानें आणि हिंदुस्थानां-तील शिक्षण पावलेल्या लोकांच्या मनांतील योगाविषयीं माहिती मिळविण्याची धडपड ही होय. शिक्षण पावलेले लोक साधु व योगी यांना धुंडूं लागले आणि त्यांना निर्भीड आणि निरपेक्ष असा गुरु भेटला. महाराजांचें सिद्धासनाचें स्थैर्य इतकें पक्कें होतें कीं, आम्ही

आपल्या नजरेनें अठ्ठेचाळीस तास ते कोणाच्याही कार्याकरितां उठले नाहींत किंवा आसन मोडलें नाहीं असें पाहिलें आहे. त्याबद्दलचा खुलासा :–धुनीच्या ओटयाच्या भोंवतीं सहा सात हाताच्या अंतरावर बहुतेक सर्व ठिकाणीं तटया उभा केलेला असे. त्यास जाण्यास एक दार असे. त्याचे आंत रात्रीं बारा वाजल्यानंतर विचारल्याखेरीज कोणी जात नसे. ही बंदी महाशिवरात्रीस नसे. महाशिवरात्रीचे दिवशीं तीन वाजतां स्नान करून ते बसले म्हणजे लोकांची दर्शनाची रहदारी सारखी रात्रंदिवस असे. बहुतेक दिवसा ते मुळींच उठत नसत आणि विशेष परिचयाखेरीजही उठत नसत. महाशिवरात्रीचे दिवसभर व दुसरे रात्रीं एक वाजेपावेतों आम्ही तेथें होतों म्हणजे जदळ जवळ सेहेचाळीस तास झाले होते. इतक्या काळांत ते उठले नाहींत.

८. माळव्यांत खाती म्हणजे किसान लोक व कबीराचीं निर्गुण भजनें गाणारे बरेच आहेत, त्यांपैकीं कांहीं लोक धुनीवर येऊन बोलतां बोलतां शीलनाथमहाराजांस म्हणाले कीं, ‘ कोणी भजन ऐकणारा भेटत नाहीं ’ महाराजांनीं उत्तर दिलें ‘ मी ऐकतों. ’ खाती म्हणाले ‘ चार घटका ऐकून बंद करतां उपयोगी नाहीं. ’ त्यावर महाराज म्हणाले ‘ तुम्हीं जोंवर भजन म्हणाल तोंवर आम्हीं जाग्यावरून उठत नाहीं, निजत नाहीं, पण आमची एक अट आहे कीं, एकदां म्हटलेलें भजन पुनः म्हणूं नये. ’ याप्रमाणें ठरलें, आणि त्यांनीं आपली मंडळी बोलावून आळीपाळीनें सात दिवस सप्ताह केला, तोंपर्यंत महाराज लघवीस सुद्धां उठले नाहींत !

९. **प्रचंड धुनी** :–साधारण धुनीला रोजीं दोन तीन खंडी लांकडें लागत, पण लांकडें खूप देणारा भेटल्यास दहा खंडी लांकडें पुरत नसत ! एकदां इंदूर मुक्कामीं एवढी प्रचंड धुनी लागली होती कीं,

त्यांतील तीन मुख्य लांकडें वीस फूट, अठरा फूट, पंधरा फूट परिघाचीं होतीं. तीं तीन लांकडें नऊ दिवसांत भस्म झालीं, आणि तीं भस्म होण्यास बारीक लांकडें पंधरा गाड्या लागलीं. एवढ्या मोठ्या आगीपाशीं चोवीस तास बसावयाचें आणि दोनच हात दूर, जास्त नाहीं ! आम्ही चारी साधूंचे मेळे पाहिले, पण एवढी मोठी धुनी कोणाची पाहिली नाहीं. आजच्या हिशेबानें रोजींना शंभर रुपयांचीं रोज लांकडें धुनीला पाहिजेत. उन्हाळा, पावसाळा आणि थंडी तिन्ही ऋतूंत अगदीं उघडें बसावयाचें. झाडाची सावली सुद्धां उपयोगाची नाहीं. भर पावसांत धुनी विझत नसे, व धुनी कधीं छायेंत नेत नसत.

**१०. अहिंसाव्रत** :–धुनीवर सर्व लोकांस ताकीद असे कीं, तेथें कोणी हिंसा करूं नये. विंचवाच्या गोष्टी पुष्कळ वेळां पाहण्यांत आलेल्या आहेत कीं, विंचू त्यांच्या अंगावरून फिरत आहे आणि ते स्वस्थचित्त आहेत. दुसरा कोणी त्यांच्या अंगावरील विंचू उडविण्यास गेला तर त्यास मात्र विंचू चावे. महाराजांना मात्र केव्हांही चावलेला पाहण्यांत नाहीं. नर्मदेच्या पलीकडे गोहेरा म्हणून घोरपडीच्या जातीचा एक अतिविषारी प्राणी आहे. एका धुनीवरील तव्यापाशीं असला प्राणी रहात असे. हें लोकांनीं पाहिल्यावर त्यास मारावें असें लोकांनीं ठरविलें, पण महाराजांनीं बंदी केली. ज्या बाजूकडे त्याचें घर होतें त्या बाजूकडे धुनीवर कोणी बसण्यास धजत नसे. महाराजांनीं लोकांच्या त्या विषारी प्राण्याबद्दल शंका कुशंका दूर करण्याचा यत्न केला. पण लोकांना धीर येईना. एके दिवशीं सकाळीं, थंडीचे दिवस होते–सुमारें नऊ वाजतां महाराज ध्यानस्थ असतां शरीराची अगदीं स्थिरता पाहून तो गोहेरा महाराजांच्या डोक्यावर जटेंत ऊन खात बसला ! महाराजांस ठाऊक नव्हतें.

इतक्यांत कांहीं लोक दर्शनास आले. त्यांनीं महाराजांकडे पाहिलें तों त्यांचेच डोक्यावर बसलेला गोहेरा दृष्टीस पडला. मंडळी हल्ला (गोंधळ) करीत बाहेर पळाली. गोहेरा पण हल्ल्यामुळें बिळांत पळून गेला. महाराजांचें ध्यान उघडलें. लोक आले आणि त्यांस झालेला वृत्तांत सांगितला. महाराजांनीं अहिंसेचें महत्त्व समजाविलें, आणि लोकांची पण भीति कमी झाली व त्यास मारण्याचा बेत रहित केला.

११. उज्जनीपासून त्रिवेणी तीन कोसांवर आहे. तेथें क्षिप्रा व दुसऱ्या एका नदीचा संगम आहे. तेथें महाराजांची धुनी लागली होती. त्या ठिकाणीं स्वतः पाहिलेली गोष्ट ही कीं देवास, इंदोर व उज्जनी येथील शास्त्रीपुराणिक मंडळी संध्याकाळीं चार वाजतां कांहीं वेदांतावर बोलत बसली होती. महाराज कांहीं सांगत होते. त्यांच्या अंगावर पाल फिरत होती. महाराजांचें तिकडे लक्ष नव्हतें. लोकांनीं पाहिल्यावर हाकलूं लागले. ती जी पळाली. ती दाढींत जाऊन लपली. महाराज म्हणाले 'ती भ्याली आहे; कांहीं वेळानें जाईल' व पंधरा मिनिटांनीं निघून गेलेली सर्वांनीं पाहिली !

१२. नाशकास मोठा मेळा भरला होता. त्या मेळ्यास शेकडों साधु गेले, त्यांत महाराजही होते. पाऊस अतिशय पडूं लागला. साधूंच्या धुन्या सावकार धनिक लोकांनीं मोठमोठीं उंच छपरें बांधून त्यांत लावून दिल्या. त्यांच्याबरोबर महाराजांस सेवक लोकांनीं छपरांत धुनी नेण्याची विनंती केली. महाराज म्हणाले. 'धुनी राहील तर पावसांत उघड्यांत ठेवीन, छपरांत ठेवणार नाहीं. कदाचित् पावसानें विझली तर त्या दिवसापासून धुनी ठेवण्याच मुळींच सोडून देईन.' सावकार लोकांनीं सर्व प्रकारें मदत करण्याचें ठरविलें. महाराजांनीं लांकडें तयार ठेवण्यास सांगितलें. सावकार

लोकांपैकीं एका भाटियानें हजार खंडी लांकडें ठेवून दिलीं. धुनी भर चातुर्मासांतही तशीच राहिली. ते वेळीं नाथांचें आसन हातभर लांब लोंकरीच्या फडक्याचें असे, आणि पाऊस एकदम अति पडूं लागल्यानें ओटयाची व्यवस्था ठीक झाली नव्हती, त्यामुळें नेहमीं ओल्यांतच बसावें लागे. सुमारें चार महिन्यांत जमिनीस लागत असलेला शरीराचा भाग सडून अलग झाला. पावसांत धुनी नीट राहिली हें त्या भाटियानें पाहून हजारों रुपयांचा दानधर्म केला, आणि धुनीवाल्या साधूंत नाथांची ख्याति झाली.

१३. जोहारनाथ महाराजांपासून अलग राहूं लागल्यावर सुमारें बारा वर्षांनीं त्यांनीं ठरविलें कीं, जनांचा त्याग करून आपलें मन आपल्या ताब्यांत आपणांस ठेवतां येतें, परंतु संसारांत राहून आपलें मन जाग्यावर राहणार नाहीं तर तेंही व्यर्थ होईल. सिद्ध पुरुषांची इच्छा कशावरही जात नाहीं आणि कदाचित् गेलीच तर सिद्धि तयारच असते. झालें. देवासच्या धाकटया पातीच्या महाराजांनीं जाहगीर व नक्त नेमणूक नाथांस करून दिली. नाथांनीं बालकनाथ या नांवाचा चेला केला आणि संसार थाटला. परंतु ह्या वेळीं मात्र नाथमहाराज फार दक्षतेनें वागूं लागले, न जाणों मन कशांत लुब्ध होईल ! कामकाजाच्या वेळा ठरविल्या आणि एकांतांत वेळ जास्त घालवूं लागले ! श्रद्धावानाशींच कमजास्त बोलावें, इतरांशीं बहुतेक कमीच. अलीकडे त्यांच्या पाठीच्या हाडांत कांहीं विकार झाला होता. अंतकाळ जवळ आला असें समजल्यावर हृषीकेशास जाऊन तेथेंच सर्वांसमक्ष शके १८४२ च्या चैत्रांत त्यांनीं हा नरदेह ठेविला. अंतसमयीं नाथांचें वय सुमारें ऐंशीं असावें. ८ वर्षें बालपण, १२ गुरुगृहीं, ३६ जोहारनाथांचा सत्संग, १२ स्वतंत्र, १२ संसारांत राहून, एकूण ८०.

१४. नाथांचें चरित्र जवळ जवळ समर्थांच्या चरित्रासारखेंच आहे. लहानपणीं घरांतून पळून जाणें, पुष्कळ तीर्थयात्रा करणें आणि शेवटीं घर धरून राहून इतरांना संसारांत राहून ईश्वराकडे चित्त ठेवतां येतें हें करून दाखविणें. त्यांच्या शिष्यगणांत कांहीं रामदासी आहेत, त्यांत हें खरें वाटतें. कांहीं लोक विशेषतः कबीर-पंथी म्हणत. नाथ हे कबिराचा अवतारच होत नाहीं तर कबिराचीं वचनें सर्व ह्यांच्या तोंडीं कशी ? कित्येक तर ह्यांना गोरखनाथ म्हणत. नाथांचा उजवा डोळा धुनीच्या ठिणगीनें गेला होता. गोरख-नाथांचा उजवा डोळा त्यांनीं काढून दिल्याची कथा आहेच.

## ४०. गोंदवलेकर महाराज

जन्मः–शके १७६६ माघ शुद्ध १०

समाधिः–शके १८३५ मार्गशीर्ष वद्य १०

१. गोंदवलें हा गांव सातारा जिल्ह्यांत माणगंगेच्या तीरीं दहिवडीनजीक आहे. तेथील हे पिढीजात कुलकर्णी. हे शुक्ल यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण. यांच्या घरीं पंढरीची वारी कित्येक पिढ्यांची होती. त्यांचे आजे लिंगोपंत हे उत्तम विठ्ठलभक्त असून त्यांनीं तेथें विठ्ठलमंदिर बांधिलें आहे. त्यांचे पुत्र रावजी. रावजी व गीताबाई या हरिभक्तांचे पोटीं श्रीगोंदवलेकर महाराजांचा जन्म झाला. महाराजांचें पाळण्यातलें नांव गणपति हें होतें व त्यांची मूर्तिही बाळपणापासून या नांवासारखींच स्थूल, गौरवर्ण व सूक्ष्ममति अशी होती. आपल्या लाडक्या नातवाचें कोडकौतुक आजाआजींनीं पुष्कळ केलें. गणपतीची बुद्धिमत्ता पाहून लिंगोपंतांस धन्यता वाटे. बाळपणीं आजानें श्लोक म्हटला कीं नातवानें लगेच तो पाठ म्हणून दाखवावा, संध्या, वैश्वदेव, पुरुषसूक्त, रुद्र, पवमान हें त्याचें सहज पाठ झालें. खेडेगांवच्या शाळेतलें शिकणेंही संपलें. स्वभाव अत्यंत खोडकर. गांवच्या मुलांना यांच्या हातचा मार खातां खातां पुरें झालें. पोहण्यांत व कुस्तींत पटाईत. लिंगोपंतांनीं बाळपणींच यांचें लग्न करून दिलें. रोज गुरें घेऊन शेतांत चारायला न्यावीं, गाईच्या मागें धांवत असतांना भजन करावें, गाणीं म्हणावीं, गुराख्यांत खेळावें, यथेच्छ दूध प्यावें असा क्रम कांहीं काळ चालला. पुढें प्रवास करावा, तीर्थक्षेत्रें पाहावीं, साधुसंत धुंडा-

वेत अशी इच्छा होऊन स्वारी घराबाहेर पडली. मिरजेचे अण्णाबुवा, अक्कलकोटचे स्वामी, नाशीकचे देवमामलेदार यांचीं दर्शनें घेतलीं व पूर्वसंस्कारबलानें व सत्संगतीनें यांच्या भगवद्भक्तीचा विकास झाला. पुढें हे अबूच्या पहाडांत कोणी महायोगी आहे असें ऐकून तेथें गेले. व त्या तपस्वी महापुरुषाच्या गुहेंत निर्भयपणें शिरले. तेथें कांहीं योगाभ्यास त्यापाशीं शिकून स्वारी तेथून निघाली ती गोदातीरानें क्षेत्रें हिंडत हिंडत वऱ्हाडांत गेली. तिकडे त्यांचे सद्गुरुराज त्यांस भेटले.

२. श्रीतुकाराममहाराज येळीवकर हे त्यांचे सद्गुरु त्यांस भेटले. यांनी गुरुसेवा अपार केली व समर्थ गुरुंनींही कठोर कसोटी लावून यांनीं पसंत केलें. यांची गुरुपरंपरा अशी आहे:–

अदिनारायण–ब्रह्मा–वसिष्ठ–राम–रामदास–कल्याण–
बाळकृष्ण–चितामणि–रामकृष्ण–तुकाराम–ब्रह्मचैतन्य
म्ह० गोंदवलेकर महाराज.

या परंपरेचे श्लोकही पूर्वी (मुमुक्षु वर्ष ८ अंक ७) प्रसिद्ध झाले आहेत. यावरून ही रामदासी परंपराच होय हें उघड आहे. एकनाथ व रामदास यांच्या व इतरही परंपरा ठिकठिकाणीं चालू आहेत, पण सर्व संप्रदायपरंपरांचा इत्थंभूत इतिहास व्यवस्थेनें कोणी शोधकानें आज तयार करायला हवा आहे. समर्थांची परंपरा कल्याणस्वामींकडून चालू झाली व त्या परंपरेंतले गोंदवलेकर महाराज हे आहेत एवढेंच ध्यानांत ठेवायचें आहे. आणखी एका परंपरेचा मला छडा लागला आहे तीही येथेंच नमूद करून ठेवतों. कुबडी, वाक्यवृत्ति, सदाचार इ. प्रसिद्ध ग्रंथांचे कर्ते हंसराजस्वामी व त्यांचे शिष्य कोशकर्ते प्रसिद्ध रघुनाथ शास्त्री गोडबोले हे समर्थ

रामदासस्वामींच्याच परंपरेंतले आहेत. टाकळीच्या उद्धवस्वामीं-कडून ही परंपरा आली:–
आदिनारायण–हंसब्रह्मा–वसिष्ठ–राम–रामदास–उद्धव–माधव–रुद्र–नागनाथ–लक्ष्मण–नारायण ऊर्फ हंसराज–रघुनाथशास्त्री गोडबोले.

तात्पर्यः–हंसराजस्वामी व गोंदवलेकर महाराज हे दोघेही समर्थ श्रीरामदासस्वामींच्या परंपरेंत झालेले आहेत. वरील तुका-राम महाराज हे महायोगी असून भक्तिज्ञानवैराग्याचे पुतळे होते. त्यांच्या कसोटीस गोंदवलेकर उतरल्यावर त्यांची पूर्ण कृपा झाली. नंतर त्यांनीं दक्षिणोत्तर तीर्थयात्रा सर्व केल्या. काशीची कावड रामेश्वरास अनेक वार नेली. मथुरावृंदावन, अयोध्या वगैरे करून नेपाळांत गेले. नैमिषारण्याच्या एकांतांत कांहीं काळ वस्ती केली. उज्जयिनीच्या बाहेर वनांत १२ वर्षें घोर तपश्चर्या केली. इंदूर-लाही थोडा वेळ राहिले. तिकडे कांहीं अद्‌भुत चमत्कार झाले. महाराज तीर्थयात्रा आटपून परत गोंदवल्यास आले. मातोश्रींच्या आज्ञेवरून त्यांना बरोबर घेऊन एक वार त्रिस्थळी यात्रा केली.

३. गोंदवलेकर महाराजांनी रामदासी संप्रदायाचा व राम-भक्तीचा प्रसार फार मोठ्या प्रमाणावर केला आहे. त्यांनी गोंद-वलें, पंढरपूर, सोलापूर, हर्दा, वऱ्हाड, आटपाडी इ. अनेक ठिकाणीं राममंदिरें बांधलीं व हजारों लोकांस रामनामाचा छंद लावला. त्यांचे हजारों शिष्य आहेत व अनेक चमत्कारही प्रसिद्ध आहेत. माझे कित्येक विद्वान् मित्र व परिचित त्यांचे शिष्य असून त्यांच्या तोंडून महाराजांच्या साधुत्वाच्या, चमत्काराच्या, वैराग्याच्या, रामनामभक्तीच्या, शिष्यप्रेमाच्या व व्यवहारचातुर्याच्या बऱ्याच गोष्टी मीं ऐकल्या आहेत. त्यांच्या चरित्रांतल्या सर्व गोष्टी

सप्रमाण लिहिण्याचें कोणी विवेकी मनुष्यानें मनावर घेतलें तर दुसरें भारत होईल. मी स्वत: महाराजांस दोन चार वेळ पाहिलें होतें. त्यांना रामदासस्वामींचा दुसरा अवतार म्हणतात. समर्थांची रामभक्ति, नामप्रीति, दक्षता, शिस्त व टापटीप यांची आवड, व्यवहारचातुर्य इ. गुणांचें वास्तव्य त्यांच्यांत होतें यांत शंका नाहीं. त्यांचे शिष्य जालना येथील अनंतसागर हे महान् सत्पुरुष होते. हे गुरुजींच्या कठीण कसोटीला चांगले उतरले. हे मोठे साक्षात्कारी व विरक्त असत. त्यांचे दुसरे शिष्य ब्रह्मानंद हेही असेच प्रसिद्ध आहेत. यांचें तीन शास्त्रांचे अध्ययन झालेलें असून महाराजांचा समागम घडून त्यांची विद्वत्तेची घमेंड जिरली व ते त्यांच्या चरणीं नम्र झाले. ब्रह्मानंदांच्या (पहिलें नांव अनंतशास्त्री) प्रज्ञा व श्रद्धा दोन्ही अलौकिक होत्या. त्यांनीं सर्वसंग सोडून एकदां गुरुचरणीं जी अनन्य भावानें मिठी मारली ती त्यांना तेथेंच समरसता प्राप्त झाली. यांची गुरूभक्ति अलोट होती. महाराजांचे ब्रह्मानंद हे पट्ट-शिष्य म्हणून मानले जात. यांनीं शके १८४० मध्ये देह ठेवला. अनंतसागर व ब्रह्मानंद हे महाराजांचे डावे उजवे हात होते. महा-राजांची उत्कट भावानें अपूर्व सेवा करणारे तिसरे शिष्य म्हणजे कुर्तकोटी महाभागवत. हे पुढें श्रीशंकराचार्यांच्या संकेश्वर व कर-वीर येथील पीठावर आरूढ झाले. हे सांप्रत महाराष्ट्रांत धर्म-प्रचाराचें काम किती उत्कृष्ट करीत आहेत हें सर्वश्रुत आहेच. हे गर्भश्रीमंत व शास्त्राध्ययन केलेले महाबुद्धिवान् व कर्तबगारीचे पुरुष आहेत. यांनीं परम कष्ट सोसून गुरुसेवा केली तीच त्यांचे भाग्यो-दयास कारण झाली. घरचें ऐश्वर्य सोडून यांनीं गुरुचरणसेवेची दीक्षा घेऊन ती उत्कृष्ट केली. श्रीगोंदवलेकर महाराजांचे हजारो शिष्य हिंदुस्थानभर पसरले आहेत. महाराष्ट्रांत व कर्नाटकांत

विशेष आहेत. तथापि ब्रह्मानंद, आनंदसागर व महाभागवत हे त्यांचे मुख्य शिष्य होत. पहिल्या दोघांनीं परमार्थाची लूट केली व तिसरे राष्ट्राचा प्रपंचही सांवरीत आहेत. कर्नाटकांत तमण्णाशास्त्री ऊर्फ सच्चिदानंद यांनीं महाराजांवर कवनें करून त्यांचा संप्रदाय व कीर्ति पुष्कळ वाढविली आहे.

४. महाराजांनीं परमार्थलाभ पूर्ण करून घेऊन बाह्य प्रपंचही सोडला नाहीं. स्नानसंध्या, पंचमहायज्ञ, अतिथिसत्कार, अन्नदान, व नामसंकीर्तन यांमुळें त्यांचें घर राममंदिरासारखें पवित्र वातावरणानें सर्वकाळ पवित्र वाटत असे. श्रीसमर्थांच्या उपदेशाप्रमाणें त्यांचें वर्तन होतें. हे कुलधर्मकुलाचार यथास्थित चालवीत. नित्य सकाळीं एकनाथीभागवत, दासबोध यांचें निरूपण स्वतः करीत. स्नान, भोजनोत्तर जरा विश्रांति घेत. यांचें सायंकाळचें भजन फार प्रेमळ असे. रामनामाचा त्यांचा मुख्य उपदेश असे. ते स्वतः नामस्मरणानंदांत तल्लीन असत. गायींवर व ब्राह्मणांवर यांची निष्ठा मोठी होती. गाईंचे कळप व वासरांचीं खिल्लारें पाहून त्यांस प्रेमाचें भरतें येई.

५. महाराजांचें कवित्व व पत्रव्यवहारही उपलब्ध आहेत. त्यांचें एक चरित्र सोलापूरचे घुगरदरे मास्तर यांनीं छापलें आहे, पण त्यांत ‘ चरित्र ’ फारच थोडें आहे, लेखकाच्या वक्तृत्वानेंच पुस्तक भरलें आहे. रा. त्र्यंबक नारायण देशपांडे, शिवापूर, पुणें यांनीं त्यांच्या ‘ तोंडचीं गद्यपद्यरूप वचनें ’ एकत्र लिहून काढलीं असून तीं क्रमशः ‘ मुमुक्षु ’ मासिकांत प्रसिद्ध होत.

# ४१. योगीन्द्र रघुनाथभटजी नाशीककर

१. सुमारें सवाशें वर्षांपूर्वी हे सिद्ध सत्पुरुष नासिक क्षेत्रीं होऊन गेले. हे जातीचे कऱ्हाडे ब्राह्मण होत. यांच्या पूर्वजांविषयीं व जन्मभूमीविषयीं माहिती उपलब्ध नाहीं. सुमारें दहा वर्षांच्या वयाचे असतां यांवर कोणा सत्पुरुषाचा अनुग्रह झाला. यांस योगविद्या व ब्रह्मविद्या यांचा लाभ अगदींच अल्प वयांत झाला. पुढील आयुष्य नैष्ठिक ब्रह्मचर्यानें घालवून योगमार्गानें परमेश्वरप्राप्ति करून घ्यावी व देहाचें सार्थक करावें असा मनाचा निश्चय करून श्रीरामचंद्राच्या चरणधुलीनें पवित्र झालेल्या जनस्थानक्षेत्रांत ते आले. त्याकाळीं तेथें पांडुरंगशास्त्री म्हणून कोणी नामांकित सदाचारसंपन्न अति वृद्ध गृहस्थवर्य होते. 'शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते' या भगवदुक्तीची चरितार्थता दर्शविण्याकरितांच कीं काय रघुनाथभटजींनीं शागीर्दपेशानें त्यांच्या घरांत प्रवेश केला व तेथेंच त्यांनीं तीन चार वर्षें काढिलीं. शास्त्रीबोवांच्या कुटुंबांत दोनच माणसें होतीं. एक ते स्वतः व दुसरी त्यांची पत्नी. हीं दोन्ही माणसें साधीं, सरळ, प्रेमळ व उदार होतीं. त्यांचा सगळीं वेळ स्नानसंध्या व भजनपूजन यांत जात असे. रघुनाथ भटजींचा अधिकार व स्वरूप हीं त्यांच्या लक्षांत प्रथम आलीं नाहींत. भटजी तेजस्वी, प्रसन्नमुख, चपल व कार्यदक्ष होते. या त्यांच्या बाह्य गुणांवर ते दंपती प्रसन्न झाले होते. गंगोदक आणणें, देवगृह संमार्जित करणें, पूजोपकरणें स्वच्छ करून मांडणें व पुन्हां जेथल्या तेथें ठेवणें, तुळशी, फुलें, बेल इत्यादि आणून देवघरांत तयार ठेवणें, शास्त्रीबोवांचे स्नानसंध्यासमयीं

जवळ असणें, शास्त्रीबोवांचीं धोतरें धुऊन त्यांच्या घड्या करून ठेवणें व त्यांच्या शयनाची व्यवस्था ठेवणें हीं कामें रघुनाथभटजी-कडे होतीं. तीं त्यांनीं मोठ्या टापटिपीनें, व्यवस्थेनें, प्रेमानें व वेळच्या वेळीं करावीं, यामुळें शास्त्रीबोवा व त्यांची पत्नी यांचें रघुनाथावर पुत्रनिर्विशेष प्रेम जडलें. रघुनाथानें त्यांची मातापितरां-प्रमाणें इतरही कांहीं सेवा करावी. बाकीच्या वेळीं एकांतांत बसून ध्यानधारणा वगैरे उपासना करावी. अशा प्रकारें तीन वर्षें काळ लोटला असतां एके दिवशीं एकादशीच्या दिवशीं एक चमत्कारिक प्रसंग घडून आला. शास्त्रीबोवा दुपारीं नेहमींप्रमाणें विश्रांतीकरितां शयनावर पडले होते. दुसऱ्या दिवशीं द्वादशीचें पारणें होतें. त्या-करितां कांहीं जिन्नस शोधावा म्हणून त्यांची पत्नी सहज तिसऱ्या मजल्यावर गेली. तेथें पाहते तों रघुनाथ समाधिनिमग्न झाला आहे. भूमीपासून एक हातावर त्याचें ब्रह्मासन गेलें आहे ! बाईंना पुराणांतरींच्या योगकथा ऐकून मात्र ठाऊक होत्या. त्यांना या गोष्टीचा मोठा चमत्कार वाटला. हातांतलें काम बाजूला ठेवून त्या लगबगीनें खालीं गेल्या. त्यांनीं झालेली हकीकत यजमानांच्या कानां-वर घातली. आपण एका महा योगभ्रष्टाला सेवेकरितां ठेवून घेतलें याबद्दल त्या उभयतांना परम खेद झाला. तथापि सत्पुरुषाची पायधूळ लागून आपलें घर व आपण पुनीत झालों असें मनांत येऊन त्यांस परम संतोषही झाला. तिकडे नेहमींची वेळ झाल्याबरोबर भटजींची समाधि उतरली. त्यासरशी ते नित्यक्रमाप्रमाणें यजमा-नाच्या सन्निध एका बाजूला नम्रपणानें सेवेला येऊन उभे राहिले. शास्त्रीबोवांचा कंठ दाटून आला. डोळे बाष्पांनीं भरून गेले, अंगा-वर रोमांच उभे राहिले. हृदय प्रेमलहरींनीं आंदोलित झालें, त्यांनीं व त्यांच्या पत्नीनें एकदम त्यांच्या चरणकमलाला दृढ आलिंगन

दिलें व त्यावर अश्रुधारांचा अभिषेक केला. यावरून सगळा प्रकार रघुनाथभटजींना कळून चुकला. त्यांनीं आपल्या आश्रयदात्यांस व त्यांच्या पत्नीस उठविलें, त्यांचें मधुर शब्दांनीं सांत्वन केलें व दुसरीकडे एकांतांत राहण्याचा आपला दृढ संकल्प त्यांस निवेदित करून त्याप्रमाणें दूर गोदातटाकावर निर्जन प्रदेशांत वसति केली.

२. आतां रघुनाथभटजींना त्यांना पाहिजे होतें तसें ठिकाण मिळालें. अष्टांगयोग सुरूं झाला व तो सिद्धीस गेला. ते अत्यंत विरक्त व सिद्ध पुरुष झाले. पहाटे तीन वाजतां गोदास्नान, अरुणोदयीं सन्ध्यावन्दन, पुढें देवतार्चन व अल्पसमाधि, पुन्हां मध्यान्हीला स्नान व संध्या, त्यावर चार घरीं मागितलेली भिक्षा गंगोदकांत भिजवून तिचा स्वीकार, पुढें थोडी विश्रांति, नंतर वेदांतविषयाचें मनन, याउप्पर कांहीं काळ भेटीला येणाऱ्या मुमुक्षु व भाविक जनांशीं यथोचित व मित परमार्थपर भाषण, पुढें सायंकाळीं पुन्हां स्नान व संध्या, नंतर जपजाप्य व शेवटीं ब्रह्मचिंतनांत उपरम अशी भटजींची दिनचर्या होती. योगबलानें त्यांस ब्रह्मसाक्षात्कार होत असे. ते प्रवचन करीत नसत, पुराणही सांगत नसत, केव्हां केव्हां ब्रह्मोपासनेचा उपदेश मात्र करीत. योगाप्रमाणें वेदांतशास्त्र व व्युत्पत्तिग्रंथ त्यांस उत्तम येत, परंतु ते त्यांनीं कधीं शिकवले नाहींत. त्यांचें बोलणें मधुर, मित व हितकर असे. नैष्ठिक ब्रह्मचर्याचें तेज व ब्रह्मोपासनेचें ओज यांच्या अंगावर झळकत असे. ते वैराग्याची केवळ मूर्ति होते. ज्ञान, शांति, दया, शुचित्य इत्यादि उज्ज्वल साधुगुणांनीं त्यांचा लौकिक चहूंकडे पसरला. त्यांच्या दर्शनाला आबालवृद्ध भाविक लोकांची गर्दी होऊं लागली. त्यांच्या चारित्र्यावरून भगवान् महाभागवत भीष्म यांची आठवण होते. त्यांनीं अनेक मुमुक्षु जनांवर अनुग्रह केले.

३. नासिक येथील सुप्रसिद्ध पंडित अच्युतराव मोडक यांच्यावर भटजी महाराजांचा अनुग्रह झाला; व त्यामुळेंच ते मोठ्या योग्यतेला चढले, व कृतार्थ झाले. भिवंडीचे सखारामाबोवा कवाडकर हे भटजींचे शिष्य होत. नारायणमहाराज योगी व विंचूरकरांचे आश्रित प्रसिद्ध अन्याबोवा पुराणिक हेही भटजींच्या छात्रवर्गांतील होते. भटजींकडे कोणी पढण्याच्या इच्छेनें आलें म्हणजे त्यांनीं त्यास अच्युतरावजींकडे पाठवावें. हे गृहस्थ सरसव्युत्पन्न असून न्यायवेदांतांत प्रवीण होते. साहित्यावरही यांचा व्यासंग होता. यांनीं काव्येंही रचिलीं आहेत. यांचे कांहीं ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. असो. भटजींचें चतुर्थाश्रमांतलें नांव 'अद्वैतसच्चिदानंदेन्द्रसरस्वती' असें होतें. कै. श्री. विठ्ठलराव ऊर्फ तात्यासाहेब विंचूरकर यांनीं या सत्पुरुषाची उत्तम सेवा केली. यांच्या प्रसादानें त्यांस पुत्ररत्न झालें. त्याचें नांव तात्यासाहेब यांनीं 'रघुनाथ' असेंच ठेविलें. हे गृहस्थ रघुनाथराव विठ्ठल ऊर्फ अण्णासाहेब विंचूरकर या नांवानें प्रसिद्ध होते. माघ व. १४ शके १७३९ रोजीं योगिकुलावतंस महाराज रघुनाथभटजी हे आपला नश्वर देह टाकून चिरंतन ब्रह्मस्वरूपांत विलीन झाले. त्यांची समाधि नासिक येथें गोदातीरावर श्रीदत्तात्रेयमंदिरानजीक त्यांच्या योगसाधनाच्या मठीच्या सन्निध बांधिली आहे. तिच्यावर एक लहानसें देऊळ आहे. त्यासमोर एक भव्य व प्रशस्त सभामंडप असून त्याच्या भोंवतालीं धर्मशाळा आहेत. या सभामंडपाच्या जागेंत नासिक येथील संस्कृत पाठशाळा आज कित्येक वर्षें भरत असते. तसेंच त्यांत पुराणकीर्तनाचेही प्रसंग होतात या हरिदासांची भटजीमहाराजांवर मोठी निष्ठा असे. अद्यापि या समाधीच्या दर्शनार्थ प्रत्यहि पुष्कळ भाविक क्षेत्रस्थ जातात. हें स्थान शांत, पवित्र व मनःप्रसाद कर-

णारें आहे असा अनुभव तेथें जाऊन आलेले भाविक सांगतात. रघुनाथभटजींचे केशवभटजी या नांवाचे पुतणे होते. ते सत्पुरुषाच्या कोटींतलेच होते. वेदांत व हटयोग त्यांस चांगला अवगत होता. ते शके १७८१ त कैलासवासी झाले.

# ४२. देवमामलेदार

१. श्रीमन्महाराज यशवंतराव महादेव भोसेकर ऊर्फ देव मामलेदार यांचें पावन चरित्र खालीं संक्षेपानें लिहितों. सोलापूर-जिल्ह्यांत पंढरपूर तालुक्यांत भोसें म्हणून गांव आहे. प्रस्तुत साधु पुरुषाचे आजे रा. धोंडो नारायण हे तेथील वतनदार देशपांडे व कुळकर्णी होते. यांचें कुलदैवत श्रीनरहरि असून आपल्या पूर्वजां-प्रमाणें तेही नृसिंहोपासक होते. भोसें हा गांव पंढरपूरच्या वाटेवर असल्यामुळें पंढरीस जाणाऱ्या येणाऱ्या अनेक यात्रेकऱ्यांचा ते परा-मर्श घेत असत. यांचे चिरंजीव रा. महादेव धोंडो यांनाही वडि-लांचेंच वळण होतें. यांची पत्नी सौ. हरिबाई ही धार्मिक वृत्तीची परोपकारी साध्वी होती. ही खरोखर अष्टपुत्रा सौभाग्यवती होती. तिच्या आठ पुत्रांची नांवें अशीं होतीं:—दादा, यशवंत, मनोहर, आबा, रामचंद्र, प्रल्हाद, वासुदेव आणि बळिराम. तिला सखुबाई या नांवाची एक कन्याही होती. रा. बाळाजी मकाजी वाजपे या नांवाचे एक गृहस्थ पेशव्यांचे दिवाण माणकेश्वर यांचे कारभारी होते. ते सौ. हरिबाईंचे तीर्थरूप होत. बाई आपल्या माहेरीं पुणें येथें आल्या असतां त्यांस शनिवार पेठेंतील ओंकारांच्या वाड्यांत शके १७३७ च्या भाद्रपद शुद्धांत (ता. १३ ऑगस्ट १८१५ इ. रोजीं) पुत्ररत्न झालें. हें नातवंड मोठें पायगुणाचें झालें म्हणून त्याच्या आजोबांनीं त्याचें 'यशवंत' असें अन्वर्थक नांव ठेविलें. या नांवाची सार्थकथा पुढें अखिल भरतखंडाच्या प्रत्ययाला आली.

२. नृसिंहोपासकांच्या कुलामध्ये उत्पन्न झालेल्या यशवंताची

बाललीला आप्तेष्टांच्या कौतुकास कारण झाली हें लिहिणें नकोच. दया, शांति, विनय, दातृत्व, सत्यप्रियता, निस्पृहता, मातापितरांविषयीं भक्ति व उपासनेविषयीं अनुरक्ति या गोष्टी त्यांच्या अंगीं बाळपणींच दिसून आल्या. मोडीबाळबोध लेखनवाचन, उजळणी, बाराखड्या इत्यादिकांत बुद्धिमान व चलाख यशवंताची उत्तम गति लवकरच झाली. पुढें आठव्या वर्षीं त्याचा मौंजीबंधसंस्कार होऊन त्यास ब्रह्मकर्म संपूर्ण शिकविण्यांत आलें. यशवंताची देवभक्ति पाहून त्यांच्या वडिलांनी त्यांस घरांतलें देवपूजेचें काम तसेंच अतिथिअभ्यागतांची शुश्रूषाही सांगावी, यामुळें देवताराधन व अतिथिसत्कार या आवडीच्या गोष्टी बाळपणापासून करण्याची संधि यशवंतास मिळाली व या गोष्टींवरील त्याचें प्रेम यावज्जीव सारखें वृद्धिंगतच होत गेलें. यशवंतरावांचा विवाह त्यांच्या बाराव्या वर्षीं मोठ्या थाटानें झाला. माणकेश्वराची टेंभुरणी येथील कुळकर्णी रा. जिवाजी बापू देशपांडे म्हणून होते. त्यांची कन्या सुंदराबाई ही यशवंतरावांची पत्नी होय. माधवरावांनीं लवकरच आपल्या चिरंजिवांना कुळकर्ण्याच्या कामांत वाकबगार केलें. पुढें यशवंतरावांच्या मामांनीं त्यांस सरकारी नोकरी लावून देण्याकरितां कोंपरगांवीं नेलें; व त्यांस नगर येथील कलेक्टरच्या हुजुरांत १० रुपयांची कारकुनाची नोकरी मिळवून दिली!

३. सोळाव्या वर्षापासून तों अठ्ठावन्नाव्या वर्षापर्यंत यशवंतरावांनीं सरकारी नोकरी केली. ते दहा रुपयांपासून दोनशें रुपयांपर्यंत वाढले. कारकुनाचे मामलतदार झाले. पारनेर, कर्जत, नशिराबाद, चाळिसगांव, अंमळनेर, एरंडोल, शहादें, सिंदखेड, सटाणें इत्यादि ठिकाणीं त्यांची नोकरी झाली. दयाळु व हुषार अंमलदार असा त्यांचा सर्वत्र लौकिक झाला. भूतदया, शांति, विनय व

औदार्य या गुणांचा विकास उत्तरोत्तर त्यांच्या ठिकाणीं होत गेला. अधिकारी व प्रजाजन अशा उभयतांसही ते प्रियच होत गेले. एरंडोल येथें मामलतीवर असतां त्यांची दैवी गुणसंपत्ति ज्यास्त चमकूं लागली. त्यांस प्रथम अंमळनेर येथें **देवमामलेदार** ही अनन्यसाधारण पदवी मिळाली. तसाच "यशवंतराव महाराजकी जय" असा मंगलध्वनि प्रथमत: भक्त्युद्रेकानें दरवळलेल्या अंमळनेरच्या वातावरणांतच दुमदुमूं लागला. पुढें तर त्यानें अखिल महाराष्ट्र पादाक्रांत करून सोडला. एरंडोल, अंमळनेर व सटाणें या ठिकाणीं महाराजांची बदली अनेक वार झाली. त्यामुळें तेथील लोकांना महाराजांच्या दर्शनाचा व सेवेचा विशेषच लाभ घडला. या सर्व ठिकाणीं महाराजांचे औदार्यादि गुण ऐकून व साधुत्वाची कीर्ति श्रवण करून शेकडों कोसावरून अनाथ लोकांच्या झुंडीच्या-झुंडी दर्शनार्थ येऊं लागल्या. अन्नसंतर्पण व दानधर्म हीं महाराजांच्या घरीं मोठ्या प्रमाणावर सुरू झालीं. पत्नीचें आनुकूल्य असल्यामुळें महाराजांच्या विश्वकुटुंबीपणाला रंग चढूं लागला. नित्य शेंपन्नास पात्रें पंक्तीला उठूं लागलीं. सर्व प्रकारच्या लोकांची दर्शनाला गर्दी उसळूं लागली. त्यांतून एकादशी पर्वणी आली कीं मग गर्दीच्या बंदोबस्ता-करितां सरकारी पोलीसची मदत देखील घ्यावी लागे! या खानदेश-मधील देवमामलेदारांची कीर्ति भरतखंडभर पसरली. ज्या ज्या गांवीं ते गेले त्याला त्याला पंढरीचें स्वरूप प्राप्त झालें. महाराजांना लोक नवस करूं लागले व माहाराजही नवसाला पावूं लागले! महाराजांच्या घराला लक्ष्मीच्या मंदिराची शोभा आली. द्वारावर अष्टौप्रहर मंगलवाद्यें व चौघडे झडत आहेत, कीर्तनपुराणांची गर्दी चालू आहे, अतिथिअभ्यागतांचा सत्कार सुरू आहे, दर्शनाला येणाऱ्या हजारों आबालवृद्ध स्त्रीपुरुषांचा तोबा उडाला आहे, नारळ व पेढे

बर्फी यांची प्रसाद म्हणून खैरात चालू आहे, अशी लगिनगर्दी महाराजांच्या घरीं सतत असावयाची. ‘ नित्यश्रीर्नित्यमंगलम् ’ हा थाट त्यांच्या घरीं चहूंकडे चाललेला असे. अनाथांची विपत्ति महाराजांना पाहवत नसे. त्यांचें कोमल अंत:करण गरिबांकरितां तिळतिळ तुटत असे. लोकांची विपत्ति दूर करण्याकरितां ते कर्जही काढूं लागले ! महाराज असतील तेथें गोसावी, बैरागी, गोंधळी वाळसंतोष, वाघ्यामुरळे, कानफाटे, आंधळे, पांगळे, महारोगी, फकीर, हरिदास, गवय्ये, बजवय्ये, शास्त्री, पंडित, पुराणिक, ब्रह्मचारी, गृहस्थ, संन्यासी, वैदिक, व्यापारी, सावकार, अधिकारी, वेश्या, नट, याचक वगैरे सर्व जातींचे व धंद्यांचे लोक जत्रेसारखे गोळा होत व त्या सर्वांचा परामर्श महाराज घेत. ते सर्वांशीं प्रेमानें व विनयानें बोलत, सर्वांस आशीर्वाद देत. ‘ नारायण ’ हा त्यांचा मंगलमंत्र व ‘ नारायण तुमचें कल्याण करो,’ हा त्यांचा मंगल आशीर्वाद असे. महाराजांचा हा उत्कर्ष कित्येक अधिकाऱ्यांस सहन झाला नाहीं. त्यांच्या कारस्थानांमुळें महाराजांस १८७३ सालीं सरकारनें पेनशनांत काढिलें. आपल्या कामांतला दोष दाखविण्यासंबंधानें महाराजांनीं सरकारास आव्हान केलें, परंतु त्याचा उपयोग झाला नाहीं. अशा रीतीनें मिळवलेलें पेनशन महाराजांच्या मानी स्वभावास रुचलें नाहीं. त्यांनीं तें घेण्याचें साफ नाकारलें.

४. याप्रमाणें महाराज सरकारच्या बंधनांतून मुक्त झाले. वस्तुत: ते मनानें मुक्तच होते. बेचाळीस वर्षें सरकारी नौकरी करून जनतेला महाराजांनीं परम गहन अशा सेवाधर्माचें रहस्य शिकविलें व हें रहस्य शिकवितांना सेवा करणारा पुरुष सर्वांचा धनी कसा होऊं शकतो हें आपल्या स्वत:च्या उदाहरणाने लोकांच्या निदर्शनाला आणून दिलें. आतां अधिकार गेला, पेनशन गेलें, जवळ कांहीं नाहीं

अशी महाराजांची एकदम स्थिति झाली; तरी महाराजांच्या मनावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. त्यांचा व्यवसाय पूर्ववत् चालू राहिला, जगत् त्यांचें कुटुंब झालें, त्यांच्या दयेला व औदार्याला व सीमा राहिली नाहीं. त्यांच्या साधुत्वाची कीर्ति दिगंतीं जाऊन थडकलीच होती. महाराजांचा सेवापाश तुटला अशी वार्ता ऐकून येवल्याचे मामलेदार रा. सा. शहाणे यांनी महाराजांना सटाण्याहून येवल्यास नेलें. तेथेंही महाराजांचा जयजयकार व सत्कार अपूर्व थाटाने झाला. वरील शहाणे मामलेदारांची बदली सटाण्यास झाली व पुनरपि येवल्यास झाली. या अवधींत महाराज बराच काल त्यांच्यापाशीं होते व त्यांचा दानधर्म अखंड चालू होता. पुढें महाराज मनमाड येथें येऊन राहिले. तेथें श्रीविठ्ठलमंदिरांत त्यांचा मुक्काम होता. त्यांच्या वास्तव्याने मनमाड पंढरी व महाराज पंढरिराय बनले. हजारों लोक दक्षिण व उत्तर हिंदुस्थानांतून त्यांच्या दर्शनाला तेथें येऊं लागले.

५. आपले चुलतबंधु हरिभाऊ भोसेकर यांच्या प्रेमपूर्वक निमंत्रणावरून महाराज संगमनेर येथें कांहीं दिवस जाऊन राहिले होते. तेथेंही महाराजांचें उत्कृष्ट स्वागत झालें व त्यांच्याप्रीत्यर्थ मोठाले समारंभ झाले. तेथून परत येवल्यास जात असतां वाटेंत अलीबागकडच्या इनामदारीण ताईबाई शित्रे या महाराजांस भेटल्या व त्यांनीं महाराजांस कोंकणांतील आपलें गांव मेढें येथें श्रीरामाची मूर्ति स्थापन करण्याविषयीं परमादरानें विनंती केली. महाराजांनीं ती तात्काळ मान्य केली व ते ताईबरोबर कोंकणांत गेले व त्यांनीं वरतीं सांगितलेल्या गांवीं श्रीरामाची मूर्ति स्थापन केली. महाराज कोंकणांत जातांच साऱ्या कोंकणपट्टींतील व गुजराथ व काठेवाड कडील हजारों लोकांची यात्रा त्यांच्या दर्शनाला लोटली.

पुढें रोहें, अलीबाग वगैरेवर महाराजांनीं पादधूली झाडली व ते परत येवल्याला गेले. इ. स. १८७४ सालीं बागलाणांत तिकडील प्रसिद्ध साधु विष्णुदासपंडित यांनीं महाराजांना विष्णुयागाकरितां स्वतः निमंत्रण केलें होतें. महाराज या यागाला गेले होते. इ. स. १७७६ सालीं विंचूर येथें श्री. अण्णासाहेब विंचूरकर यांच्याकडे नृसिंहजयन्तीचा उत्सव होता. विंचूरकरांनीं महाराजांस स्वतः निमंत्रण करून तेथें नेलें. विंचुरास महाराजांचा मुक्काम विंचुरकरांच्या वाड्यांत होता. तेथेंही हजारों लोकांची गर्दी त्यांच्या दर्शनाकरितां वाड्यांत होऊं लागली. पुढें सटाणें, मनमाड, विंचूर इत्यादि ठिकाणीं महाराज आलटून पालटून राहत असत. इ. स. १८७० सालीं महाराज येवल्यास असतां सटाण्याकडे भयंकर दुष्काळ पडला. तिकडील लोकांचें महाराजांवर पराकाष्ठेचें प्रेम होतें. महाराजांचें हृदय तिकडच्या दुष्काळग्रस्त लोकांकरितां तिळतिळ तुटूं लागलें. महाराज एकदम त्यांच्याकरितां धांवून गेलें. घरांतले दागिने, सोनेंनाणें व इतर मौल्यवान् चीजवस्त दरोबस्त त्यांनीं विकून टाकली. शिवाय मिळालें तितकें कर्जही काढिलें. हे सर्व गोळा झालेले पैसे त्यांनीं क्षुधितांस एक भाकर व ओगराळेंभर कालवण देण्याचे कामीं खर्ची घातले. अशा रीतीनें हजारों दुष्काळग्रस्तलोकांचें त्यांनीं प्राण वांचविले! ही महाराजांची कामगिरी दामाजीपंतांच्या कामगिरीसारखीच अपूर्व झाली. यानंतर महाराज मनमाडास जाऊन राहिले.

६. सामान्य जनतेकडून महाराजांचा सर्व हिंदुस्थानभर जयजयकार झाला; तसाच तो कित्येक श्रीमान् व संस्थानिक पुरुषांकडून झाला. इ. स. १८७२ सालीं शिंदे सरकार श्री. जयाजीराव अलीजाबहाद्दर यांची स्वारी दक्षिणेंत पंढरीच्या यात्रेला आली होती.

स्वारीचा मुक्काम मुंबईस असतां त्यांनीं मुंबई सरकारमार्फत महाराजांना मुंबईस दर्शनार्थ आणविलें. त्या वेळचा महाराजांच्या स्वारीचा थाट कांहीं अपूर्व होता. शिंदे सरकारच्यामार्फत सर्व व्यवस्था होती. महाराजांचा मुक्काम कांदेवाडींत एका भव्य व प्रशस्त बंगल्यांत होता. महाराज तेथें पोंचल्यावर शिंद्यांचे दिवाण व दुसरे अधिकारी यांनीं महाराजांस मोठ्या भव्य रथांत बसवून शिंद्यांच्या मुक्कामाकडे नेलें. वाटेंत पुष्पवृष्टीनें महाराजांचा रथ भरून गेला व जयजयकारानें दशदिशा दणाणून गेल्या. महाराजांची स्वारी शिंद्यांच्या बंगल्यासमोर येऊन थडकल्याबरोबर श्री. जयाजीराव महाराज महाराजांच्या गाडीपर्यंत सामोरे आले. त्यांनीं महाराजांच्या चरणांस वंदन केलें व त्यांस हस्तावलंब देऊन गाडींतून खालीं उतरून घेतलें. पुढें जयाजीरावांनीं महाराजांस आपल्या मंदिरांत नेऊन उच्च स्थानीं बसविलें. नंतर महाराजांच्या व श्रीसंतांच्या परस्पर प्रेमपूर्वक भेटी झाल्या, कुशलप्रश्न झाले, संतोषपूर्वक भाषणें झालीं. शिंदे सरकारांनीं सोन्यारुप्याच्या ताटांत महामूल्य वस्त्रें व भूषणें घालून तीं नजर म्हणून महाराजांच्या चरणीं निवेदन केलीं. महाराजांनीं त्यांचा स्पर्शमात्रानें स्वीकार केला व तीं सर्व परत केलीं. त्यामुळें जयाजीरावांस महाराजांविषयीं अधिकच आदर उत्पन्न झाला. पुढें महाराजांनीं श्रीमहाराजांचें दर्शन घेतल्यावर समारंभ बरखास्त झाला. शिंदे सरकारांनीं महाराजांना एक मोठी टोलेजंग मेजवानी दिली. त्या दिवशीं मुंबईतील सर्व सुप्रसिद्ध गृहस्थ हजर होते. त्यावेळीं मोठा दीपोत्सवही झाला. शिंदे मुंबईहून परत गेल्यावर नाना शंकरशेट वगैरे मंडळींनीं महाराजांस मुंबईस सुमारें पंधरा दिवस राहवून घेतलें. या अवधींत महाजनांनीं महाराजांची उत्कृष्ट व्यवस्था ठेविली होती. लाखों लोक दर्शनाकरितां महा-

राजांच्या द्वारीं लोटूं लागले. पोलिस पार्टीलाही बंदोबस्त होण्याची मारामार पडली. हजारों नारळ फुटूं लागले. बाजारांत नारळ मिळेनासा झाला! रेवड्याफुटाण्यांची मोजदाद अशक्यच. पेढे-बर्फीच्या शेकडों पराती प्रसादावारी खलास होऊं लागल्या. मंगलवाद्यें, भोजनें, दानधर्म, कीर्तनें, यांचा नुसता पाऊस पडत होता! पुढें महाराज पुण्यास गेले व तेथें आपल्या जन्मभूमीला भेटले. पुण्यास असतां नगर, सोलापूर, विजापूर, निजामशाही, सातारा, इकडील सहस्रावधि लोक त्यांचें दर्शन घेऊन गेले यांत नवल नाहीं. पण मुंबईचे त्या वेळचे गव्हर्नर सर विल्यम फिट्झरल्ड यांनीं गणेश-खिंडींत या ' मामलेदाराला ' बडी जाफत दिली.

येवलें येथें श्री. तुकोजीराव होळकर यांनीं महाराजांचें दर्शन घेतलें व पुढें इ. स. १८८१ मध्यें श्रीमंतांनीं त्यांस आपल्याबरोबर इंदूर येथें नेलें. तेथें महाराज सुमारें तीन वर्षें राजवाड्यांतच राहिले होते. तेथें असतां राजपुताना, नेमाड, महेश्वर, दिल्ली, प्रयाग, बनारस इकडील भाविक लोकांच्या झुंडीच्या झुंडी त्यांच्या दर्शनाला येत. निजाम सरकारचे पेषकार नरेंद्रबहादर हे कलकत्त्याहून हैदराबादेकडे परत जात असतां त्यांनींही महाराजांचें खांडवा मुक्कामीं दर्शन घेतलें व निजाम सरकारालाही महाराजांचें दर्शन घडविलें.

७. पुढें महाराज पुण्यास गेले असतां त्यांस नासिक त्र्यंबकेश्वर येथील निमंत्रण आलें. त्यास मान देऊन ते तिकडे गेले. नासिक येथें थोडा मुक्काम करून ते त्र्यंबकेश्वर येथें गेले. तेथें देवाचे कारभारी नारायणराव जोगळेकर यांच्या घरीं त्यांचा मुक्काम होता. तेथें असतां महाराजांच्या शरीरास थोडा अपघात झाला, त्यामुळें त्यांची प्रकृति कायमची बिघडली. पुढें ते नाशिक येथेंच जाऊन राहिले. नंतर त्यांची प्रकृति दिवसेंदिवस अधिकाधिक क्षीण होत चालली.

शेवटीं मार्गशीर्ष वद्य ११ शके १८०९ सर्वजिन्नाम संवत्सरीं (ता. १७ माहे डिसेंबर सन १८८७ इ.) या पुण्यदिवशीं आपलें अवतारकृत्य आटोपून महाराज वैकुंठवासी झाले ! महाराजांचा पांचभौतिक देह चंदन व तुळसीकाष्ठें यांनीं अग्निसात केला. श्रीगोन्यारामजीच्या मंदिराच्या उत्तरेस खडकावर महाराजांचें दहन झालें. त्या ठिकाणीं त्यांच्या पादुका स्थापल्या असून त्यांवर छत्री बांधली आहे.

८. नृसिंहोपासना, मातापितरांची भक्ती, विनय, दयालुता, औदार्य, निस्पृहता, शांति, क्षमा, संतोष, परोपकार, विश्वबंधुता, चारित्र्य इत्यादि गुणांची महाराज केवळ मूर्ति होते. असा पुरुष महाराष्ट्रास लाभला हें त्याचें परम भाग्य होय.

# ४३. श्रीशुभराय सोलापूरकर

१. मद्रास इलाख्यांत पसकोट प्रांतांत भालूर गांव आहे. तेथें या साधु पुरुषाचा जन्म शके १६५७ च्या सुमारास झाला. यांच्या आईचें नांव पन्नामा व वडिलांचें नांव गिरीधरराव. वडीलबंधूंचें नांव शंकर व धाकटयाचें चौंडाप्पा होतें. हे ऋग्वेदी जामदग्न्यगोत्री होते. टिपू सुलतान याचे दिवाण पूर्णय्या नांवाचे होते. यांचे हाताखालीं दुय्यम दिवाणासारखे सुब्बाराव हे गृहस्थ होते. यांचेंच नांव त्यांच्या पुण्यचरिताच्या योगानें शुभराय असें रूपान्तर पावलें आहे. टिपूची राजधानी बंगलोर येथें आपल्या कामावर असतां एक अशुभ वार्ता सुब्बाराव यांच्या कानांवर आली. ती ही कीं, कोणा एका काजीनें टिपू सुलतानाला ब्रह्महत्त्येचा उपदेश केला. आतां पुढें अनर्थ उद्‌भवणार, आपल्या धर्मास आपण मुकणार, अशी विलक्षण धास्ती सुब्बारावांच्या मनानें घेतली. हेंच त्यांच्या वैराग्याला कारण झालें. ऐहिक वैभवावरील मन उडालें व तें परमार्थाकडे धांव घेऊं लागलें. ते परम मातृपितृभक्त होते. त्यांनीं होन व पुतळ्या यांनीं पितरांस स्नान घातलें व त्यांचें तर्पण केलें. नंतर ते सर्व स्वकीय माणसांस सोडून तेलंगी ब्राह्मणाच्या वेषानें मध्यरात्रीं पळून गेले. नातलगांनीं पुष्कळ शोध व शोधक केला, पण कांहीं पत्ता लागला नाहीं. सुलतानाला हें वर्तमान कळतांच त्यानें चहूंकडे घोडेस्वार पिटाळले. परंतु सुब्बाराव सांपडले नाहींत. त्यांच्या विरहानें त्यांच्या पत्नीचा लवकर अंत झाला.

२. सुब्बाराव लपत छपत करवीरास येऊन पोंचले. तेथें थोडा

मुक्काम करून ते पंढरपुरास गेले. त्या ठिकाणीं सहा महिने राहून ते सोलापूर येथें जाऊन राहिले. या ठिकाणीं मात्र ते शेवटपर्यंत होते. प्रथम ते सिद्धेश्वराच्या समोर बेगमपेठेंत हत्ती–बावडी जवळील ओरींत रहात असत. स्नानसंध्या जपतपयोगसाधन यांत ते काल घालवीत. गांवांत मधुकरी मागत. केव्हां विटाळ झाल्यामुळें त्यांस उपास पडत. ते आरंभीं आरंभीं मौन धरून होते. त्यांच्या साधुत्वाचा लौकिक पसरूं लागला तसतसे पुष्कळ लोक त्यांच्या दर्शनाला येऊं लागले. बेगमपेठेंत मुक्काम असतां पेठेंतील शेटे त्यांची सेवा करूं लागले. त्यांनीं बोवांकरितां हल्लींचा इमला बांधिला. त्यांत बावांनीं स्थापिलेली पांडुरंगमूर्ति आहे. कसबा पेठेंतील हरिपंत तात्या राळेरासकर हे बोवांस पुडी पाठवूं लागले. आबा कुंडले किल्लेदार यांनीं प्रथम प्रस्तुतच्या मठांत बोवांस आणिलें. सोलापुरीं पांडुरंगमूर्ति स्थापण्याविषयीं दृष्टांत झाल्यावरून बोवांनीं शेटे यांजकडून पंढरपुराहून चंद्रभागाप्रवाहांतून मूर्ति आणविली व तिची प्राणप्रतिष्ठा आषाढ शुद्ध ११ ला मठाच्या जागेंत केली. कागदाचे व मेणाचे मंडप बोवांनीं तयार केले. श्रीचा अष्टपैलु रथ तयार केला. हें पितळेचें काम प्रेक्षणीय आहे. चित्रमय रासक्रीडा बोवांनीं तयार केली. चित्रें कातरून रांगोळ्या काढणें व पाण्यावर रांगोळीचे गालीचे काढणें या कामांत बोवा कुशल होते. पुण्याचे माधवराव वर्वे यांनीं ही कला बोवांपाशीं संपादिली व तिचा फैलाव पुण्यांत केला. पुष्पपूजेचे अनेक प्रकार बोवांनीं प्रसृत केले. बोवांनीं आपल्या मठात सर्व प्रकाचे उत्सव सुरू केले. त्या निमित्तानें लोक त्यांच्याभोंवतीं गोळा होऊं लागले. या लोकांत भक्ति, ज्ञान व वैराग्य यांचा प्रसार करण्याचा त्यांनीं उपक्रम केला. भगवदुपासना आरंभिली व भिक्षावृत्तीनें पांडुरंगाची

उपासना दृढ केली. जन्माष्टमीचा मोठा उत्सव त्यांनीं सुरू केला. या प्रसंगीं श्रीकृष्णाची मूर्ति मठांत नेण्याचा मान अद्यापि राळेरासकर यांच्याकडे आहे. रामनवमी, नृसिहजयंती, आषाढी-कार्तिकी एकादशी ( रथोत्सव, अन्नकूट, दीपाराधना, गोपाळकाला ) माघांत वसंत-पंचमी रथोत्सव, वलिप्रतिपदा, तुलसीविवाह, कार्तिकी शुद्ध १०–१५ पर्यंत दीपोत्सव इत्यादि उत्सव बोवांनींच सुरू केले होते. यांच्या शिष्यमंडळांत शेषाय्या शास्त्री, पेठेंतील शेटे, राळेरासकर ( हरिपंततात्या ), बाबा जाईल, दासंभट शास्त्री, आबा कुंडले किल्लेदार, रावजीबोवा व सीतारामबोवा असे प्रमुख होते.

३. बोवांच्या गादीच्या परंपरा चालविणारे रावजीबोवा मूळचे बारामतीचे राहणारे असून सराफीचा धंदा करणारे होते. बोवांची सेवा करून ते पतीपत्नीसह अनुगृहीत झाले. यांच्या मागें विठ्ठलदास-बोवा, गोविंदबोवा, केशवबोवा, जयकृष्णबोवा यांनीं गादी चाल-विली. हल्लीं गादीवर ह. भ. जनार्दनबोवा आहेत. मठाचें उपा-ध्यायकृत्य दासंभटजीकडे होतें तें त्यांचे वंशजाकडे आहे. स्नान-संध्या, हरिकीर्तन, बोध, अनुग्रह व भारतीबोवांचें पुराण श्रवण ही बोवांची दीनचर्या असे.

४. बोवांनीं चमत्कारही करून दाखविले. चिटणीसकुळांतल्या सिदराम नांवाच्या चाकराला गोहत्या घडली होती. त्यामुळें त्याला वेड लागून तो भुंकूं लागला होता. चिटणीसांनीं त्याला बोवांच्या मठांत आणून सोडलें. बोवांनीं तुळशीला पाणी घालायला लावून पापमुक्त केलें. त्यांनीं आपलें मरण दहा दिवस पुढें ढकललें. भाऊ-साहेब माणकेश्वर व दासंभट शास्त्री यांस त्यांनीं साक्षात्काराचा लाभ दिला, चिमा नायकीण शरणागत झाली तेव्हां तिच्यावर त्यांनीं अनुग्रह केला. मठाचा तट हिनें बांधला व नगारखाना हिनें

उभा केला असें सांगतात. या नायकिणीची गुलाबी नांवाची कुलुंगी कुत्री होती, ती बोवांना प्रदक्षिणा घालून मुक्त झाली. खडर्याची लढाई चालू असतां सोलापूरच्या किल्ल्यांत बावा जाईल कैद झाले, त्यांनीं बोवांना आळविलें. पार्टिजर साहेबांना सोडण्याची स्फूर्ती झाली. जाईल मुक्त होतांच बापू गोखल्यांना भेटले. नंतर त्यांनीं बोवांच्या पायांवर सर्वस्व निवेदन केलें. सोलापूर येथें सोजिरांनीं लुटीचा अनर्थ मांडिला असतां राळेरासकर यांच्या घराचें बोवांनीं मथुरानाथ व द्वारकानाथ या सेवकांच्या मिषानें संरक्षण केलें. पंढरीचे *वाळकृष्ण* रणसुभे यांस दृष्टांत होऊन ते बोवांचे शिष्य झाले.

५. वुवांच्या ठिकाणीं कवित्व चांगलें होतें. त्यांचीं पदें मधुर आहेत. त्यांत द्वैत व अद्वैत दोन्ही प्रकार आहेत. बोवांना गाण्याचा नाद असे. चित्रकलाही त्यांस अवगत होती. दुसरे अनेक हुन्नरांचे प्रकार त्यांस ठाऊक होते. बोवा निस्पृह होते. आपला मठाचा निर्वाह भिक्षेवर करीत. अद्यापि संस्थान भिक्षेवरच चालू आहे. दुसरे बाजीरावसाहेब सोलापुरीं गेले असतां त्यांनीं बोवांचें दर्शन घेतलें व त्यांस विनंती केली कीं, "आम्हीं मठास चाळीस हजारांचे वर्षासन देतों तें स्वीकारावें म्हणजे मठाची व्यवस्था निर्वेध राहील." असें म्हणून बाजीरावसाहेबांनीं ४०,००० रुपये चांदीच्या तबकांत भरून पुढें ठेविले. बोवांनीं वर्षासन नाकारलें व पुढें केलेले रुपये दासंभटजी शास्त्री यांच्याकडून धर्मादाय करविले.

६. बोवांचा शिष्यसमुदाय मोठा होता. तो महाराष्ट्रांत इतस्ततः विखुरला आहे. निजामशाहींतही त्यांची शिष्यशाखा असल्याचें समजतें. या सत्पुरुषाची इहलोकींची यात्रा शके १७४२ सालीं भाद्रपद वद्य १० स. संपली. यांचा शतसांवत्सरिक महोत्सव सोलापूर येथें मोठ्या थाटानें साजरा करण्यांत आला. बोवांचे वडील

वारले तेव्हां त्यांनीं अशौच धरलें नाहीं. आजच्याप्रमाणें त्याकालींही सज्जनांस उपद्रव देणारे लोक होतेच. त्यांनीं बोवांवर ग्रामण्य उभारलें. श्रीशंकराचार्य यांनीं मध्यस्थी स्वीकारिली व बोवांची खरी योग्यता जाणून फिर्यादीकडून बोवांची माफी मागितली! बोवांची जन्मभाषा मराठी नव्हती, तरी त्यांचीं पदें इतकीं अस्सल मराठी धर्तीचीं आहेत कीं मराठी ज्याची जन्मभाषा आहे अशा मोठ्या कवीनें तीं रचल्यासारखीं दिसतात.

बोवांच्या शिष्यमंडळांत बावा जाईल म्हणून एक गृहस्थ होते. त्यांचें नांव वरतीं आलेंच आहे. त्यांनीं ' ब्रह्मीभूताख्यान ' नांवाचा लहानसा ओवीबद्ध ग्रंथ रचिला आहे. त्यांतील माहिती खुद्द बोवांस विचारून लिहिली असें जाईल म्हणतात. या माहितीचा उपयोग हा लेख लिहितांना केला आहे.

७. पूर्वोक्त राळेरासकर हे सुप्रसिद्ध कृष्णभक्त रमावल्लभदास यांचे वंशज होत. शुभराय यांच्या समकालीन प्रसिद्ध व्यक्तींत रसिक कवि रामजोशी हे होते. ' हटातटाने पटा रंगवूनि ' ही प्रसिद्ध लावणी शुभरायांच्या संबंधानें त्यांनीं रचिली असा अपवाद आहे!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र.

REFBK-0016038